Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06

पुणे, रविवार, ३० मे २०२१

पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

वर्ष १२, अंक १४, ५ रुपये, शहर आवृत्ती

पृष्ठे १२ + लोकरंग

रविवार लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

LOKSATTA.COM | FACEBOOK.COM/LOKSATTALIVE | TWITTER.COM/LOKSATTALIVE | LOKSATTA.COM/APPS

तापमान — कमाल ३५.३°सें | किमान २४.२°सें

हवामानाचा अंदाज

संध्याकाळी आकाश अंशतः ढगाळ.
मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि हलक्या पावसाची शक्यता.

लोकरंग
जपू या निसर्गाचा आनंदकंद!

|| वास्तू परिचय ||

a RED initiative आजच्या अंकासोबत **|| वास्तु परिचय ||** हे विशेष पान देण्यात आले असून, ते 'दी इंडियन एक्स्प्रेस ग्रुप'च्या 'मार्केटिंग सोल्यूशन्स टीम'च्या पुढाकाराने सादर करण्यात आले आहे.

करोनामुळे अनाथ झालेल्या मुलांसाठी केंद्राकडून योजना

नवी दिल्ली: आपल्या सरकारच्या दुसऱ्या पर्वातील दुसऱ्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करोनामुळे अनाथ झालेल्या लहान मुलांसाठी शनिवारी अनेक कल्याणकारी घोषणा केल्या. ही लहान मुले जेव्हा १८ वर्षांची होतील तेव्हा त्यांच्यासाठी १० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा आणि त्यांच्या शिक्षणाचा या योजनांमध्ये समावेश आहे.

मेट्रोच्या कामासाठी महात्मा फुले मंडईतील अतिक्रमणांवर कारवाई

पुणे : मेट्रोकडून महात्मा फुले मंडई परिसरात फळबाजारातील

अतिक्रमणांवर शनिवारी कारवाई करण्यात आली. फळ बाजारात उभी करण्यात आलेली तात्पुरती शेड तसेच लगतच्या भाजीपाला बाजारात महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून कारवाई करण्यात आली. वृत्त...३

नववीतील मुलांच्या नोंदणीतून बाब उघड; करोनाचा शिक्षणावरील परिणाम

अडीच लाख विद्यार्थी प्रवाहाबाहेर!

रसिका मुळ्ये, लोकसत्ता

मुंबई : करोना प्रादुर्भावामुळे उद्योग-नोकऱ्यांवर झालेल्या दुष्परिणामांतून कित्येक नागरिकांचे शहरगावातून विस्थापन झाले. मोठी स्थलांतरे झाली. या सर्वांमुळे नवे सामाजिक आणि शैक्षणिक प्रश्न निर्माण झाले असून गेल्या वर्षी नववीतून दहावीत गेलेल्या विद्यार्थ्यांची शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जाण्याची संख्या अडीच लाखांहून अधिक असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

राज्यातील शाळाबाह्य किंवा सद्यःस्थितीत संपर्क क्षेत्रात नसलेल्या बालकांची नोंद शिक्षण विभागाने केली. पहिली ते आठवीपर्यंतच्या शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात आला. मात्र त्यापुढील म्हणजेच १४ वर्षांपुढील मुलांच्या परिस्थितीची गणती फारशी झालेली नसल्याचे दिसत आहे. गेल्या वर्षी नववी झालेली मुले दहावीत जाताना यंदा मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची गळती झाल्याचे समोर आले. गेल्या वर्षी (२०१९-२०) नववीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या *(पान ४ वर)*

झाले काय?

यंदा दरवर्षीपेक्षा दहावीच्या परीक्षेला नोंदणी काहीशी अधिक झाली असली तरी या माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यावर साधारण अडीच लाख विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर गेल्याचे समोर आले. म्हणजेच करोनाच्या कारणांमुळे झालेले स्थलांतर, शहर-गाव यांतील बदलांमुळे नववीनंतरच अडीच लाख विद्यार्थ्यांची शाळा सुटली. ग्रामीण भागात हे प्रमाण अधिक आहे.

आकडेवारी काय सांगते? गेल्या वर्षी १९ लाख ३४ हजार ९४ विद्यार्थ्यांनी नववीच्या वर्गात प्रवेश घेतला. त्यातील १८ लाख ३१ हजार ३४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यानुसार या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेचा अर्ज भरणे अपेक्षित होते. मात्र यंदा दहावीच्या परीक्षेसाठी आलेले एकूण अर्ज १६ लाख ५७ हजार ७९ आहेत. त्यातील साधारण ५६ हजार पुनर्परीक्षार्थी आहेत. म्हणजेच साधारण १६ लाख नियमित विद्यार्थी आहेत. यानुसार ३ लाख विद्यार्थी नियमित शिक्षणप्रवाहात टिकू शकलेले नाहीत.

कारणे काय?

- ऑनलाइन शिक्षणाच्या प्रवाहात दुर्गम भागातील अनेक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचता न आल्यामुळे त्यांच्या शिक्षणावर परिणाम झाला.
- करोना काळात भीतीमुळे शहरांतून गावात किंवा एका गावातून दुसऱ्या गावात स्थलांतरित झालेल्या कुटुंबांमुळे अनेक विद्यार्थ्यांची शाळा आपोआप सुटली.
- ग्रामीण भागात भविष्याविषयी चिंतेतून बालविवाहाची वाईट प्रथा फोफावली. त्यातून अनेक मुलींचे शिक्षण नववीनंतर कुटुंबीयांनीच थांबविले, त्यामुळे हा परिणाम झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

एक लाख विद्यार्थी अनुत्तीर्ण...

गेल्या वर्षी नववीच्या अंतिम परीक्षा झाल्या नाहीत. दोन चाचणी आणि सहामाही परीक्षेच्या सरासरी मूल्यांकनाच्या आधारे अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. त्यामध्ये राज्यातील २४ हजार विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले, तर ७४ हजार विद्यार्थ्यांचा निकाल सरल प्रणालीवर नोंदवण्यात आला नाही. गेल्या वर्षी नववीच्या वर्गात कुणालाही अनुत्तीर्ण न करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र विद्यार्थी संपर्कात नसल्याने किंवा एकही परीक्षा न दिल्याने विद्यार्थी अनुत्तीर्ण झालेले असू शकतात.

शिक्षण सोडून मजुरीकडे?

मुंबई : करोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा फटका अल्पवयीन मुलांनाही बसला आहे. कमावत्या व्यक्तीचा रोजगार बुडाल्याने आणि वर्षभरापासून शाळा बंद असल्याने अनेक मुले मजुरीकडे ढकलली गेली आहेत. गेल्या वर्षभरात वीट भट्टी, ऊस तोडणी, घरकाम अशा ठिकाणी शालेय शिक्षण घेणारी मुले काम करताना आढळू लागल्याचे सामाजिक संस्थांच्या पाहणीत समोर आले आहे. मात्र कामगार विभागाच्या दरबारी एप्रिल २०२० ते मार्च २०२१ या काळात ५५ बालकामगारांची नोंद झाली आहे. - पान ४

महाराष्ट्राच्या राजकारणाचा उद्यापासून भविष्यवेध

'लोकसत्ता'च्या 'दृष्टी' आणि 'कोन' उपक्रमात प्रमुख नेत्यांशी संवाद

देवेंद्र फडणवीस | राज ठाकरे | प्रकाश आंबेडकर | अमित देशमुख | सुप्रिया सुळे | उद्धव ठाकरे

लोकसत्ता प्रतिनिधी

विविध राजकीय पक्ष, त्यांचे नेते यांची 'दृष्टी' आणि 'कोन' हे सर्वसामान्यांसाठी नेहमी कुतूहलाचे, कधी कौतुकाचे आणि प्रसंगी क्रोधाचेही कारण राहिलेले आहे. महाराष्ट्र राज्य आपल्या स्थापनेचा ६१वा वर्धापन दिन साजरा करीत असताना आगामी काळात या प्रमुख पक्षांचे येत्या दहा वर्षांतील राजकारण कसे असेल हे उलगडून दाखवण्याचा प्रयत्न म्हणजे 'लोकसत्ता'ची ही 'दृष्टी' आणि 'कोन' ही दूर-संवादमाला. आगामी राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात अशा सहा पक्षांचे प्रमुख नेते या उपक्रमातील वेबसंवादात आपले विचार मांडतील.

देशातील सर्वात प्रगतीशील म्हणवल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याची भविष्यातील वाटचाल कशी असेल, याबाबत नेहमीच उत्सुकता असते. करोनामुळे *(पान ४ वर)*

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रस्तुत लोकसत्ता दृष्टी आणि कोन

सहप्रायोजक: mep Infrastructure Developers Ltd. | MIDC | CAPACITE Transforming Vision into Reality

प्रायोजक

- प्रस्तुती : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
- सहप्रायोजक : एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लि. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), कपॅसिटे इन्फ्रा प्रोजेक्ट्स लि.

सध्याच्या राजकारणात शिळेपणा कसा?

पुणे : राज्याच्या राजकारणात शिळेपणा आला आहे. खासदार संभाजीराजे यांनी पुढाकार घेतला तर त्यामध्ये ताजेपणा येईल, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी शनिवारी मांडली. राज्याच्या राजकारणात शिळेपणा आला म्हणजे काय, या विषयी 'लोकसत्ता'च्या ऑनलाइन कार्यक्रमात नेमकी भूमिका सविस्तरपणे मांडणार असल्याचे आंबेडकर यांनी सांगितले. - पान ४

पुण्यात मुसळधार पाऊस

आजही विजांच्या कडकडाटात पावसाची शक्यता

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : पुणे शहर आणि परिसरामध्ये शनिवारी (२९ मे) ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. शहरात रात्री साडेआठपर्यंत २४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. शहर आणि परिसरात रविवारीही (३० मे) दुपारनंतर मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता पुणे वेधशाळेकडून व्यक्त करण्यात आली आहे.

अरबी समुद्रातून येणारे बाष्प आणि राज्यावर सध्या कमी दाबाचे दोन पट्टे निर्माण झाल्याने पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. प्रामुख्याने मध्य महाराष्ट्रात जोरदार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यानुसार पुणे शहर आणि जिल्ह्यात काही ठिकाणी शनिवारी जोरदार *(पान ३ वर)*

करोनाने कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास कुटुंबाला निवृत्तिवेतन

नवी दिल्ली : करोनामुळे घरातील कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाला असेल तर त्या व्यक्तीवर अवलंबून असलेल्या कुटुंबाला निवृत्तिवेतन देण्यासह अनेक योजना शनिवारी सरकारने जाहीर केल्या. या योजनांमुळे कुटुंबांना भेडसावणाऱ्या आर्थिक समस्या दूर होण्यास मदत होईल, अशी आशा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. - पान ४

४५ दिवसांतील सर्वांत कमी रुग्णसंख्येची नोंद

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

करोना विषाणू साथीच्या दुसऱ्या लाटेतून देश हळूहळू सावरत असून दैनंदिन रुग्णसंख्याही दिवसेंदिवस घटत आहे. शनिवारी गेल्या ४५ दिवसांतील सर्वांत कमी रुग्णसंख्येची नोंद करण्यात आली.

गेल्या २४ तासांत देशात एक लाख ७३ हजार ७९० नवे रुग्ण आढळले. ४५ दिवसांतील हा नीचांक आहे. या नव्या रुग्णांमुळे देशातील आतापर्यंतची रुग्णसंख्या दोन कोटी ७७ लाख २९ हजार २४७ झाली आहे. रुग्णनिदानाचा दर दहा टक्क्यांच्या खाली म्हणजे ८.३६ टक्के आहे. तो गेले सलग पाच दिवस दहा टक्क्यांच्या खाली आहे. साप्ताहिक रुग्णनिदान दर ९.८४ टक्के आहे. दिवसभरात ३६१७ जण मरण पावल्याने मृतांची एकूण संख्या तीन लाख २२ *(पान ३ वर)*

साखरेचा निर्यात कोटा वाढण्याची शक्यता धूसर

महाराष्ट्रातून १८ लाख ६५ हजार टन साखर परदेशात

प्रथमेश गोडबोले, लोकसत्ता

पुणे : राज्यासह देशभरात साखरेचे अतिरिक्त उत्पादन झाल्याने आणि त्या प्रमाणात साखरेला मागणी नसल्याने साखर उद्योग अडचणीत आला आहे. अतिरिक्त साखर निर्यात करण्याचा एकमेव व्यवहार्य मार्ग उपलब्ध आहे. मात्र, यंदा ठरवण्यात आल्याप्रमाणे ६० लाख टन साखरेची निर्यात झाली असून त्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय अद्याप झालेला नाही.

जगातील साखर उत्पादनात अग्रेसर असणाऱ्या इतर देशांनी भारतातून जादा साखर निर्यात होत असल्याबद्दल जागतिक व्यापार संघटनेकडे तक्रार केली आहे. त्यावर भारताने साखर निर्मितीसाठी लागणारी किंमत लक्षात घेऊन निर्यातीवर अनुदान देण्यात येत असल्याचे म्हटले आहे. परंतु साखर निर्यातीसाठी अनुदान द्यावे लागत असल्याने *(पान ४ वर)*

नेमकी समस्या काय? साखर निर्यातीसाठी अनुदान मिळत असल्याने भारताची साखर जागतिक बाजारात जास्त येते, परिणामी आमची साखर जागतिक बाजारात येऊ शकत नसल्याची तक्रार ब्राझील, ऑस्ट्रेलिया, थायलंड यांनी जागतिक व्यापार संघटनेकडे (डब्ल्यूटीओ) केली आहे. या पार्श्वभूमीवर यंदा साखर निर्यातीचा ६० लाख टनांचा कोटा वाढण्याची शक्यता कमी असल्याचे साखर आयुक्तालयाकडून सांगण्यात आले.

तृणमूल-केंद्र सरकार संघर्ष पुन्हा तीव्र

पीटीआय, नवी दिल्ली / कोलकाता

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बोलावलेल्या शुक्रवारच्या 'यास' वादळ आढावा बैठकीला पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी अनुपस्थित राहिल्याने पश्चिम बंगाल सरकार आणि केंद्रातील भाजप सरकार यांच्यातील संघर्ष शनिवारी पुन्हा उफाळून आला.

आपला अपमान झाल्याचे नमूद करत वादळ आढावा बैठक पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांच्यामध्ये होणार होती. परंतु या बैठकीला भाजपचे नेते आणि

राज्यपालांना का निमंत्रित करण्यात आले, असा सवाल ममता बॅनर्जी यांनी केला. ममता यांचा रोख भाजपचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी ट्वीट केलेल्या छायाचित्रावर होता. हे छायाचित्र पंतप्रधान मोदी, पश्चिम बंगालचे राज्यपाल जगदीप धनखार आणि अन्य केंद्रीय मंत्री ममता यांची प्रतीक्षा करीत असल्याचे *(पान ४ वर)*

मुंबईतील महिला पोलिसाचे करोना रुग्णांसाठी मोलाचे योगदान

सुरक्षेसह हजारोंच्या आरोग्याचीही रक्षणकर्ती

जयेश शिरसाट, लोकसत्ता

मुंबई : पोलीस म्हणजे भ्रष्ट, भावनाशून्य असा साधारण समज असला, तरी करोनाकाळात कित्येक सहृदयी पोलिसांनी समाजभान जपत नागरिकांची सेवा केली. मुंबईतील सशस्त्र दलात पोलीस नाईक पदावर कार्यरत असलेल्या रेहाना शेख यांनी मात्र गेल्या सव्वा वर्षात आपल्या कामासह राज्यभरातील हजारो करोनारुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना औषधांपासून सर्व प्रकारची मदत मिळवून देत सेवाव्रताचा नवा आदर्श समोर ठेवला आहे.

पीड़ पराई जाने रे...

करोनाच्या पहिल्या लाटेत पोलीस दलात करोना संसर्ग बऱ्यापैकी फोफावला होता. याच काळात एका अडलेल्या सहकाऱ्याने त्यांच्याकडे आपल्या वृद्ध आईसाठी प्लाझ्मा उपलब्ध करून देण्याची विनंती केली. रेहाना शेख यांचा दांडगा जनसंपर्क आणि मदतीला धावून जाण्याचा स्वभाव यांतून तातडीने या सहकाऱ्याच्या आईला प्लाझ्मा मिळाला. त्यानंतर शेख यांनी करोना रुग्ण आणि त्यांच्या हतबल नातेवाईकांना लागणारी मदत मिळवून देण्याचा चंग बांधला. बाधितांना रेमडेसिव्हिर, टोसिलीझुमॅब आदी औषधे, खाट, प्लाझ्मा, रक्त उपलब्ध करून देण्यासाठी रेहाना यांनी आपला जनसंपर्क कामी आणला. आपली नोकरी, संसार आणि दुर्धर आजाराने ग्रासलेल्या बहिणीची शुश्रूषा या सर्व आघाड्यांवर पुरून त्यांनी समाजसेवेचा हा गाडा अविरत सुरू ठेवला. राज्यातील विविध भागांतून त्यांचा फोन *(पान ४ वर)*

महत्त्व का? रेहाना यांनी पोलीस दलातील आपला जनसंपर्क वापरून सुरुवातीला रुग्णांना आवश्यक अशा खाटा, औषधे या स्वरूपात मदत केली. त्यानंतर त्यांनी समाजकार्य करणाऱ्या विविध संस्था आणि व्यक्तींशी समन्वय साधून रुग्णांसाठी मदतीचा परीघ वाढविला.

> मदत खरेच देता येईल का, या विचारापेक्षा प्रयत्नांवर जोर दिला. कारण कुणीतरी आपल्यासाठी प्रयत्न करतेय, ही जाणीवही रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबामध्ये सकारात्मकता आणू शकते. अनेकांना माझ्यामुळे धीर मिळाला, वेळेत उपचार मिळाल्याने रुग्ण बरा झाला. काहींचे प्राण वाचले, याचे समाधान अमूल्य आहे. - रेहाना शेख

कुलदीप सिंह यांच्याकडे 'एनआयए'चा कार्यभार

नवी दिल्ली : केंद्रीय राखीव पोलीस दलाचे (सीआरपीएफ) प्रमुख कुलदीप सिंह यांना राष्ट्रीय तपास यंत्रणेचा (एनआयए) अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. येत्या सोमवारी निवृत्त होणारे एनआयचे महासंचालक वाय.सी. मोदी यांची ते जागा घेतील, असे केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. भारतीय पोलीस सेवेचे (आयपीएस) आसाम-मेघालय कॅडरचे १९८४ च्या तुकडीचे अधिकारी असलेले मोदी यांची सप्टेंबर २०१७ मध्ये एनआयएचे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. वाय.सी. मोदी यांच्या एनआयएच्या महासंचालकपदावरून ३१ मे २०२१ रोजी निवृत्तीनंतर सीआरपीएफचे महासंचालक कुलदीप सिंह हे या पदाचा अतिरिक्त कार्यभार पाहतील.

अलिगड : विषारी दारूबळींची संख्या २२

अलिगड : अलिगड विषारी व बनावट दारू दुर्घटना प्रकरणातील बळींची संख्या आता २२ झाली असून आणखी २८ जणांची प्रकृती चिंताजनक आहे. शुक्रवारी रात्री या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला होता. आणखी २८ जणांना जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज रुग्णालयात, तर काहींना जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे.

आसाम : आमदाराचा करोनामुळे मृत्यू

गुवाहाटी : युनायटेड पीपल्स पार्टी लिबरलचे (यूपीपीएल) आमदार लेहोराम बोरो (६३) यांचा शनिवारी येथील एका रुग्णालयात करोनामुळे मृत्यू झाला. जवळपास एका आठवड्याच्या कालावधीत आसाममधील दुसऱ्या विद्यमान आमदाराचा करोनामुळे मृत्यू झाला आहे. बोरो यांना करोनाची लागण झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांना गुवाहाटी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात गुरुवारी दाखल करण्यात आले होते. शनिवारी त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. बुधवारी आमदार मजेंद्र नारझरी यांचा करोनामुळे मृत्यू झाला होता.

केंद्राकडून रेमडेसिविर पुरवठा बंद

राज्यांकडे पुरेसा साठा असल्याचा मंत्र्यांचा दावा

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

केंद्राकडून राज्यांना होणारा विषाणूरोधक रेमडेसिविर या औषधाचा पुरवठा आता केंद्राने थांबवला आहे. कारण राज्यांकडे पुरेसा साठा असल्याने आता केंद्राकडून पुरवठ्याची गरज नाही, असे केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांनी सांगितले.

ते म्हणाले, की आता देशातही रेमडेसिविरचा पुरेसा साठा आहे. मागणीपेक्षा पुरवठा जास्त अशी परिस्थिती निर्माण झाल्याने आम्ही राज्यांना रेमडेसिविरचा पुरवठा थांबवत आहोत.

रसायने व खते मंत्री मांडविय यांनी म्हटले आहे, की कोविड १९ मध्ये वापरल्या जाणाऱ्या या औषधाचा पुरवठा आधी मागणी वाढल्याने मोठ्या प्रमाणात म्हणजे किमान दहा पटींनी वाढवण्यात आला होता. ११ एप्रिलला हा पुरवठा ३३ हजार कुप्यांचा होता, सध्या रोज ३ लाख ५० हजार कुप्यांचा झाला. सरकारने रेमडेसिविर उत्पादन करण्यासाठी काही महिन्यांतच २० ते ६० प्रकल्प उभारले आहेत. सरकारने आपत्कालीन साठ्यासाठी पन्नास लाख कुप्यांची खरेदी केली होती. पण आता राज्यांकडेही पुरेसा साठा आहे. त्यामुळे केंद्राकडून पुरवठ्याची गरज नाही. सरकारने रेमडेसिविर या औषधावरचे अबकारी शुल्क माफ केले आहे. या इंजेक्शनची किंमतही सरकारने कमी केली आहे. ११ एप्रिलच्या सुमारास रेमडेसिविरची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली होती. अनेक कंपन्यांनीही रेमडेसिविरच्या किमती कमी केल्या होत्या कारण सरकारने हस्तक्षेप केला होता.

कोव्हॅक्सिनमधील घटकांची भारतात निर्मिती

हैदराबाद : राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाच्या अंतर्गत काम करणाऱ्या इंडियन इम्युनॉलॉजिकल्स या कंपनीने कोविड १९ प्रतिबंधक लशीसाठी लागणाऱ्या औषधी घटकाचे उत्पादन १५ जूनपासून करण्याचा निर्णय घेतला आहे. या औषधी घटकाचा पहिला टप्पा भारत बायोटेक या लस निर्मात्या कंपनीला १५ जून रोजी दिला जाणार आहे. आयआयएलएसचे संचालक के. आनंद कुमार यांनी सांगितले, की २० ते ३० लाख मात्रांसाठी लागणारे औषधी घटक आम्ही तयार करणार असून यावर्षी ७० लाख व नंतर १.५ कोटी मात्रांसाठी लागणारे औषधी घटक तयार करण्यात येणार आहेत. कोविड प्रतिबंधक लस निर्मितीला प्राधान्य दिले जात असून त्यासाठी भारत बायोटेकशी भागीदारी करण्यात आली आहे. तंत्रज्ञान हस्तांतर प्रक्रिया वेगाने सुरू आहे. आयआयएलएसकडे निष्क्रिय विषाणूपासून लस उत्पादन करण्याची क्षमताही आहे.

प्राणवायूच्या तुटवड्याला केंद्राची अकार्यक्षमता कारणीभूत – प्रियंका

नवी दिल्ली : देशातील करोनाच्या दुसऱ्या लाटेत देशात वैद्यकीय प्राणवायूचा तुटवडा प्रकर्षाने जाणवत असून त्याला सरकारची अकार्यक्षमता आणि नियोजनाचा अभाव कारणीभूत असल्याचा आरोप काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी-वढेरा यांनी शनिवारी केला. कोविड-१९ मुळे जे मृत्यू झाले त्याबाबत सरकारला जनतेला उत्तर द्यावे लागेल, असेही त्या म्हणाल्या.

प्रियंका यांनी 'जबाबदार कोण' मोहीम हाती घेतली असून सरकारने कोविड-१९ स्थिती ज्या पद्धतीने हाताळली त्याबद्दल त्या सरकारला प्रश्न विचारत आहेत. भारताने २०२० मध्ये प्राणवायूची निर्यात ७०० टक्क्यांनी वाढवली आणि देशात करोनाच्या दुसऱ्या लाटेत प्राणवायूची मागणी वाढलेली असतानाही प्राणवायूची आयात करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत, असा आरोपही त्यांनी केला. तुटवड्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारची अकार्यक्षमता आणि नियोजनाचा अभावच कारणीभूत आहे हे स्पष्ट आहे, असे त्या म्हणाल्या.

पुलवामा हल्ल्यातील हुतात्मा अधिकाऱ्याची पत्नी लष्करात

वृत्तसंस्था, जम्मू

पुलवामा येथे २०१९ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात हुतात्मा झालेले मेजर विभूती शंकर धौंडियाल यांच्या पत्नी निकिता कौल या लष्करात लेफ्टनंट पदावर दाखल झाल्या आहेत.

शनिवारी एका विशेष समारंभात कौल यांनी लष्करी सेवेत प्रवेश केला. लष्कराचे उत्तर कमांडचे लेफ्टनंट जनरल वाय.के. जोशी यांनी त्यांना लष्करी गणवेशाची मानचिन्हे प्रदान केली. संरक्षण मंत्रालयाच्या उधमपूर येथील शाखेच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी याबाबतची चित्रफीत ट्विटरवर जारी केली असून कौल यांच्या भारतीय लष्करातील प्रवेशाचे स्वागत करण्यात आले आहे.

''मेजर विभूती शंकर धौंडियाल यांचा पुलवामात २०१९ मध्ये झालेल्या हल्ल्यामध्ये मृत्यू झाला होता. आज त्यांच्या पत्नी निकिता कौल या लष्करात दाखल झाल्या आहेत, हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे '', असे उत्तर कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल वाय.के. जोशी यांनी म्हटले आहे.

नेटकऱ्यांपैकी स्वप्नील पांडे यांनी म्हटले आहे, की ''ही घटना महत्त्वाची आहे कारण आमचे लष्कर जवानांच्या कुटुंबीयांना कधीच एकटे सोडत नाही. आता कौल यांनी लष्करी गणवेश परिधान केला आहे. लष्कराच्या मूल्यांबाबत बोलावे तितके थोडे आहे.''

कौल यांच्या लष्कर प्रवेशाचे अनेकांनी स्वागत केले असून त्यांच्या पतीलाही श्रद्धांजली वाहिली आहे. दिवंगत पतीला हीच योग्य श्रद्धांजली ठरेल, असे नेटकऱ्यांनी म्हटले आहे. मेजर धौंडियाल यांना मरणोत्तर 'शौर्य चक्र' देण्यात आले होते.

विवाहानंतर नऊ महिन्यांत पतीवियोग

पतीच्या निधनानंतर २९ वर्षीय निकिता कौल यांनी तमिळनाडूतील एक वर्षाचे खडतर प्रशिक्षण पूर्ण करून लष्करात प्रवेश केला आहे. लेफ्टनंट पदावर त्या रुजू झाल्या असून त्या मूळ काश्मीरच्या निवासी आहेत. त्यांचा विवाह मेजर विभूती शंकर धौंडियाल यांच्याशी झाला होता, त्यानंतर नऊ महिन्यांतच जैश-ए-महंमदने केलेल्या पुलवामा हल्ल्यात धौंडियाल यांना वीरमरण आले.

बहुराष्ट्रीय कंपनीतील नोकरीवर पाणी

धौंडियाल हे मूळ डेहराडूनचे होते. निकिता यांनी बहुराष्ट्रीय कंपनीतील नोकरी सोडून पतीच्या स्मृतीसाठी लष्करात दाखल होण्याचा निर्णय घेतला. संरक्षण गुप्तचर संस्थेचे लेफ्टनंट जनरल के.जे.एस ढिल्लाँ यांनी ट्विट संदेशात कौल यांचे अभिनंदन केले.

जयशंकर यांच्याशी चर्चा फलदायी –ब्लिंकन

वृत्तसंस्था, वॉशिंग्टन

भारत व अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय चर्चा फलदायी झाली असून त्यात भारत–चीन सीमेवरील परिस्थिती, अफगाणिस्तानातील परिस्थिती या विषयांचा समावेश होता, असे अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटनी ब्लिंकन यांनी म्हटले आहे. कोविड १९ मदतीवरही चर्चा झाली असून दोन्ही देशांनी सामायिक मुद्द्यांवर सहकार्य करण्याचे ठरवले आहे.

जयशंकर हे अमेरिकेत बायडेन प्रशासनाने सूत्रे हाती घेतल्यानंतर तेथे भेट देणारे पहिलेच भारतीय मंत्री आहेत. भारत व अमेरिका यांच्यातील जागतिक भागीदारी पुढे नेण्याच्या प्रश्नावर त्यांनी भर दिला असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते नेड प्राइस यांनी म्हटले आहे.

जयशंकर यांनी सांगितले की, भारत व अमेरिका लस सहकार्यावरही चर्चा झाली असून लशीचा पुरेसा साठा मिळणार आहे. अमेरिकेने या काळात भारताच्या पाठीशी राहून मदत केल्याबाबत आम्ही आभार मानतो.

पाच राज्यांतील मुस्लिमेतरांना भारतीय नागरिकत्वासाठी संधी

पीटीआय, नवी दिल्ली

गुजरात, राजस्थान, छत्तीसगड, हरियाणा व पंजाब या राज्यांतील १३ जिल्ह्यांमध्ये राहणाऱ्या हिंदू, शीख, जैन व बौद्ध अशा मुस्लिमेतर लोकांकडून केंद्र सरकारने भारतीय नागरिकत्वासाठी अर्ज मागवले आहेत.

नागरिकत्व कायदा १९५५ व २००९ साली या कायद्याखाली तयार करण्यात आलेले नियम यांच्या अन्वये काढण्यात आलेल्या

सुधारित नागरिकत्व कायद्याशी संबंध नाही

आदेशाच्या तात्काळ अंमलबजावणसाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने शुक्रवारी या आशयाची अधिसूचना जारी केली. मात्र २०१९ साली तयार करण्यात आलेल्या सुधारित नागरिकत्व कायद्याशी (सीएए) या आदेशाचा काही संबंध नाही. सीएएअन्वये सरकारने अद्याप नियम तयार केलेले नाहीत.

२०१९ साली सुधारित नागरिकत्व कायदा करण्यात आला, तेव्हा देशाच्या निरनिराळ्या भागांत व्यापक निदर्शने करण्यात आली होती, दिल्लीत २०२० च्या सुरुवातीला दंगलीही झाल्या होत्या. सीएएअन्वये, बांगलादेश, पाकिस्तान व अफगाणिस्तान या देशांमधून धार्मिक छळामुळे ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत भारतात आलेल्या हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारशी व ख्रिश्चन या मुस्लिमेतर लोकांना भारतीय नागरिकत्व दिले जाणार आहे.

गुरे चोर समजून जमावाकडून मारहाण; एकाचा मृत्यू

पीटीआय, बिलासपूर

छत्तीसगडच्या गौरेला-पेंड्रा-मारवाही जिल्ह्यात ग्रामस्थांनी गुरे चोर असल्याच्या संशयावरून केलेल्या बेदम मारहाणीत एका ४५ वर्षीय इसमाचा मृत्यू झाला तर अन्य पाच जण जखमी झाले. साल्हेघोरी गावात गुरुवारी घडलेल्या या घटनेसंदर्भात जवळपास सहा जणांना अटक करण्यात आली आहे.

मेढाखारमधील दोन इसम खरेदी केलेल्या चार म्हशी पोहोचविण्यासाठी साल्हेघोरी येथून बुधवारी आले होते. स्थानिकांनी त्यांना गुरे त्यांच्या मालकीची असल्याबाबतची कागदपत्रे दाखविण्यास सांगितले. मात्र त्यांच्याजवळ कोणतीच कागदपत्रे नव्हती. ग्रामस्थांनी त्यांना लाठ्याकाठ्यांनी बेदम मारहाण केली. त्यांना गावातील एका सभागृहात डांबले. गुरुवारी सकाळी या दोघांचे नातेवाईक आले असता त्यांनाही बेदम मारहाण झाली. त्यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक
प्रस्तुत
लोकसत्ता मार्ग यशाचा ५०

मुदतवाढीनंतरची संधी

करोनाच्या प्रादुर्भावामुळे १२ वीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठीच्या परीक्षासुद्धा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. काही परीक्षांचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. या संधीचा लाभ घेऊन यंदा १२ वीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी या संस्थांमधील प्रवेशासाठी प्रयत्न करायला हवा. मुदतवाढीचा लाभ घेऊन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. यासाठी पालकांनी त्यांना मदत करायला हरकत नाही. अशा काही संस्था आणि अभ्यासक्रमांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

(१) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, इंदौर या संस्थेमार्फत पाच वर्षे कालावधीचा पाच वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम चालवला जातो. कोणत्याही शाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यास हा अभ्यासक्रम करता येतो. खुल्या संवर्गातील विद्यार्थ्यांना १० वीमध्ये किमान ६० टक्के गुण मिळणे आवश्यक. १२ वीमध्ये फक्त उत्तीर्ण श्रेणीची अट ठेवण्यात आली आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ मे २०२१, संपर्क- आयआयएम, प्रबंध शिखर, राउ-पिथमपूर रोड, इंदोर- ४५३५५६, दूरध्वनी- ०७३१-२४३९६६६, संकेतस्थळ - https://www.iimidr.ac.in/

(२) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रोहतक या संस्थेने पाच वर्षे कालावधीचा इंटिग्रेटेड प्रोग्रॅम इन लॉ (आयपीएल-लॉ). हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. कोणत्याही ज्ञानशाखेतील १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम करता येतो. हा आंतरज्ञानशाखीय अभ्यासक्रम असून यामध्ये व्यवसाय व्यवस्थापन (बिझिनेस मॅनेजमेंट) विधि आणि सुशासन यांचे सखोल ज्ञान प्रदान केले जाते. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर, बीबीए-एलएल.बी. ही पदवी प्रदान केली जाते. अर्हता- खुला संवर्ग, आर्थिकदृष्ट्या कमकुवत गट, आणि एनसीएल ओबीसी ६० टक्के गुण. उमेदवारांची निवड कॉमन लॉ ॲडमिशन टेस्टव्दारे केली जाते. आयआयएमला अर्ज करण्याची शेवटची तारीख ३१ मे २०२१. कॉमन लॉ ॲडमिशन टेस्टला अर्ज करण्यासाठी १५ जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या परीक्षेतील गुणांच्या आधारावर निवडक उमेदवारांची जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात संस्थेमार्फत ऑनलाइन मुलाखत घेतली जाईल. गुणवत्ता यादी तयार करताना १० वी आणि १२ वीतील गुणांना ४० टक्के, क्लॅटमधील गुणांना ४५ टक्के वेटेज मुलाखतीला १५ टक्के दिले जाते. संपर्क - आयआयएम, मॅनेजमेंट सिटी, सदर्न बायपास, एनएच १०, रोहतक- १२४०१०, दूरध्वनी- ०१२६२-२२८ संकेतस्थळ - https://www.iimrohtak.ac.in/

(३) राष्ट्रीय विधि विद्यापीठांमधील प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या कॉमन लॉ ॲडमिशन टेस्टला अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आल्याने, विधि शाखेत प्रवेश घेण्याची इच्छा, आवड आणि कल असणाऱ्या आणि यंदा १२ वीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा. अर्ज ऑनलाइन करता येतो. इच्छुक विद्यार्थ्यांनी, संकेतस्थळ https://consortiumofnlus.ac.in/ ला नियमितपणे भेट देऊन नव्या तारखेवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. या परीक्षेतील गुणांचा आधार घेऊन २२ राष्ट्रीय विधि विद्यापीठ (नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी) मध्ये प्रवेश दिला जातो. यामध्ये महाराष्ट्रातील मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद संस्थांचा समावेश आहे. अर्हता- कोणत्याही शाखेतील १२ विद्यार्थी. खुला संवर्ग, इतर मागास वर्ग, दिव्यांग विद्यार्थ्यांना ४५ टक्के गुण. संपर्क- ईमेल- clat@consortiumofnlus.ac.in

(४) इंडियन मेरिटाइम युनिव्हर्सिटी - केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा असलेल्या या संस्थेव्दारे, बी.टेक इन मरीन इंजिनीअरिंग (कालावधी चार वर्षे), बी.टेक इन नेव्हॅल आर्किटेक्चर ॲण्ड ओशन इंजिनीअरिंग (कालावधी चार वर्षे), बी.एस्सी इन नॉटिकल सायन्स (कालावधी चार वर्षे), बी.एस्सी इन शिप बिल्डिंग ॲण्ड रिपेअर (कालावधी तीन वर्षे. हा अभ्यासक्रम या संस्थेशी संलग्नित कॉलेज ऑफ शिप टेक्नॉलॉजी - पल्लकड याच एका संस्थेत करता येतो.) या अभ्यासक्रमांना ऑनलाइन कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (आयएमयू-सीईटी) व्दारे प्रवेश दिला जातो. या सर्व अभ्यासक्रमांसाठी १२ वी विज्ञानशाखेत गणित, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयांमध्ये सरासरीने ६० टक्के गुण मिळालेले विद्यार्थी अर्ज करू शकतात. १० किंवा १२ वीमध्ये विद्यार्थ्यांना इंग्रजीमध्ये ५० टक्के गुण मिळणे आवश्यक.

बीबीए इन लॉजिस्टिक्स - रिटेलिंग - ई कॉमर्स (कालावधी तीन वर्षे). या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना चाळणी परीक्षा देण्याची गरज नाही. या विद्यार्थ्यांना फक्त १२ वीच्या गुणांसह ऑनलाइन नोंदणी करावी लागते. सरासरीने ६० टक्के गुण मिळालेले विद्यार्थी अर्ज करू शकतात. १० किंवा १२ वीमध्ये विद्यार्थ्यांना इंग्रजीमध्ये ५० टक्के गुण मिळणे आवश्यक.

या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया मे किंवा जून महिन्यात पूर्ण केली जाते. मात्र यंदा अद्यापी अशी प्रकिया सुरू करण्यात आलेली नाही. विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रकियेच्या घोषणेकडे लक्ष ठेवावे. त्यासाठी या संस्थेच्या संकेतस्थळाला नियमितपणे भेट द्यावी. प्रवेश प्रक्रियेची माहिती महत्त्वाच्या वृत्तपत्रांमध्ये जाहिरातीव्दारे दिली जाते. त्याकडे पालकांनी लक्ष ठेवावे.

संपर्क- इंडियन मेरिटाइम युनिव्हर्सिटी, ईस्ट कोस्ट रोड, सेम्मेनचेरी चेन्नई- ६००११९, दूरध्वनी- ०४४-२४५३९०२०, संकेतस्थळ - https://www.imu.edu.in/

(५) नॅशनल रेल ॲण्ड ट्रान्सपोर्टेशन इन्स्टिट्यूट

या संस्थेत बीबीए इन ट्रान्सपोर्टेशन मॅनेजमेंट (कालावधी-तीन वर्षे/ अर्हता- कोणत्याही विषयातील १२ वी), बी.एस्सी इन ट्रान्सपोर्टेशन टेक्नॉलॉजी (कालावधी-तीन वर्षे / अर्हता- गणित विषयासह विज्ञान शाखेतील १२ वी), बी.टेक इन रेल इंफ्रास्ट्रक्चर इंजिनीअरिंग आणि बी.टेक इन रेल सिस्टिम्स ॲण्ड कम्युनिकेशन इंजिनीअरिंग (कालावधी-चार वर्षे / अर्हता- गणित,भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयासह विज्ञान शाखेतील १२ वी), बी.टेक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी जॉईंट एंट्रन्स एक्झामिनेशन (जेईई)-मेनमधील गुणांचा आधार घेतला जातो. बीबीए आणि बीएस्सी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी संस्थेमार्फत चाळणी परीक्षा घेतली जाते. यापैकी कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या खुल्या संवर्गातील उमेदवारांना १२ वीमध्ये किमान ५५ टक्के गुण मिळणे आवश्यक. अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागास वर्ग संवर्गातील विद्यार्थ्यांना गुणांमध्ये ५ टक्क्यांची सूट. या सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया संस्थेने अद्याप सुरू केलेली नाही. संपर्क- नॅशनल रेल ॲण्ड ट्रान्सपोर्टेशन इन्स्टिट्यूट कॅम्पस, लालबाग, बडोदा - ३९०००४, गुजरात, दूरध्वनी- ०२६५-२६४८३०५, ईमेल- hr@nrti.edu.in, संकेतस्थळ - https://www.nrti.edu.in/#

(६) सेंट्रल युनिव्हर्सिटी कॉमन एन्ट्रन्स टेस्ट २०२१ (सीयूसीईटी) ची प्रवेश प्रकिया अद्याप सुरू करण्यात आलेली नाही. या परीक्षेव्दारे आसाम, आंध्र प्रदेश, गुजरात, हरियाणा, जम्मू, झारखंड , कर्नाटक, काश्मीर, केरळ, ओडिसा, पंजाब, राजस्थान, दक्षिण बिहार आणि तमिळनाडू या १४ केंद्रीय विद्यापीठातील १२ वीनंतरच्या पदवी आणि इंटिग्रेटेड अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जातो. हे अभ्यासक्रम विज्ञान, कला, वाणिज्य शाखेतील आणि कौशल्य विकास निर्मितीचे आहेत. याशिवाय बाबा गुलामशाह बादशाह युनिव्हर्सिटी, बेंगळूरु डॉ.बी.आर आंबेडकर स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स युनिव्हर्सिटी, खल्लीकोटे युनिव्हर्सिटी-बेहरामपूर आणि सरदार पटेल युनिव्हर्सिटी ऑफ पोलीस, सेक्युरिटी ॲण्ड क्रिमिनल जस्टीज- जोधपूर या राज्य विद्यापीठामधील प्रवेशासाठी सीयूसीईटीचे गुण ग्राह्य धरले जातात. संपर्क https://www.cucetexam.in/

(७) इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फूड प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी

भारत सरकारच्या अन्न प्रकिया उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या या संस्थेमार्फत बी.टेक इन फूड टेक्नॉलॉजी, हा चार वर्षे कालावधीचा अभ्यासक्रम चालविला जातो. या अभ्यासक्रमाला जेईई-मेनमधील गुणांच्या आधारे प्रवेश दिला जातो. संपर्क- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फूड प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी, पुडुक्कोट्टाई रोड, तंजावूर- ६१३००५, संकेतस्थळ http://www.iifpt.edu.in/ ०४३६२-२२८१५५

मे महिन्यात होणारी जेईई मेन परीक्षा पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे ही परीक्षा झाल्यावरच या संस्थेची प्रवेश प्रकिया सुरू होईल. एनटीए अभ्यासॲपवर घटक निहाय आणि संपूर्ण पेपर सोडवण्याची सुविधा, नॅशनल टेस्टिंग एजंसीने उपलब्ध करून दिली आहे. अधिकाधिक सरावासाठी त्याचा उपयोग करता येईल. विद्यार्थी आणि पालकांनी www.nta.ac.in आणि jeemain@nta.ac.in या संकेतस्थळाला नियतिमपणे भेट द्यावी. दूरध्वनी- ०११-४०७५९०००

(टीप- वेगवेगळ्या संस्थांमधील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनुसूचित जाती, जमाती या संवर्गातील उमेदवारांना खुल्या संवर्गातील उमेदवारांपेक्षा १२ वीच्या गुणांमध्ये ५ टक्के सूट देण्यात येते.)

सुरेश वांदिले
ekank@hotmail.com

मेट्रोच्या कामासाठी मंडईतील अतिक्रमणांवर कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : मेट्रोकडून महात्मा फुले मंडई परिसरात फळबाजारातील अतिक्रमणांवर शनिवारी कारवाई करण्यात आली. फळ बाजारात उभी करण्यात आलेली तात्पुरते शेड तसेच लगतच्या भाजीपाला बाजारात महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून कारवाई करण्यात आली.

कारवाई दरम्यान फळबाजारातील व्यापारी आणि अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये वाद झाला. पोलिसांनी मध्यस्थी केल्यानंतर वाद मिटला. अतिक्रमण विभागाचे प्रमुख माधव जगताप आणि पथकाने ही कारवाई केली. मंडई परिसरात मेट्रोचे स्थानक होणार आहे. तेथील व्यावसायिकांचे स्थलांतर करण्यासाठी चर्चा सुरू आहे. महापालिकेने हुतात्मा बाबूगेनू वाहनतळासमोर या भागातील दुकानदार, फळविक्रेते, पान विक्रेत्यांसाठी स्टॉलची उभारणी केली आहे. मात्र, अद्याप तेथे व्यापारी स्थलांतरित झाले नाहीत.

अतिक्रमण विभागाकडून करण्यात आलेल्या कारवाईला विरोध करण्यात आला. महापालिकेने विश्वासात न घेता कारवाई केली. याबाबत न्यायालयात दाद मागण्यात येणार आहे, असे फळबाजारातील व्यापाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे प्रमुख माधव जगताप म्हणाले, मंडईत मेट्रो स्थानक होणार आहे. या भागातील अधिकृत किराणा माल विक्रेते, फळ विक्रेते, पान विक्रेते अशा ७० व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी गाळे बांधण्यात आले आहेत. त्याचे वाटप करण्यात आले आहे. मंडईत मेट्रोचे काम सुरू असल्याने कारवाई करून जागा मोकळी करून देण्यात आली. कायदेशीर प्रक्रिया पार पाडून ही कारवाई करण्यात आली.

पुणे शहरात करोनाचे ५५९, पिंपरीमध्ये ४५८ नवे रुग्ण

दिवसभरात ५३ रुग्णांचा मृत्यू

पुणे - ५५९ नवे रुग्ण, २७ मृत्यू
पिंपरी-चिंचवड - ४५८ नवे रुग्ण, १८ मृत्यू
उर्वरित जिल्हा - १३१० नवे रुग्ण, ८ मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह ग्रामीण भागात शनिवारी करोना संसर्गाचे २ हजार ३२७ नवे रुग्ण आढळून आले. त्यामुळे जिल्ह्यातील एकूण रुग्णांची संख्या १० लाख १० हजार ४९७ झाली आहे. शनिवारी दिवसभरात पुणे, पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्यातील कटक मंडळे आणि ग्रामीण भागात ५३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. करोनामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची एकूण संख्या १६ हजार ७५५ झाली आहे. दरम्यान, शनिवारी शहरात आढळून आलेले रुग्ण आणि झालेल्या चाचण्यांचे प्रमाण लक्षात घेता संसर्गाचे प्रमाण ७.०१ टक्के असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

आरोग्य विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार शनिवारी दिवसभरात आढळलेल्या रुग्णांपैकी ५५९ रुग्ण पुणे शहरातील आहेत, तर पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रामध्ये ४५८ रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात १ हजार ३१० नवे रुग्ण आहेत. दिवसभरात मृत्युमुखी पडलेल्या ५३ रुग्णांपैकी २७ रुग्ण पुणे शहरातील आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील १८ रुग्ण असून जिल्ह्यातील ८ रुग्णांचा समावेश आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील एकूण ९ लाख ६३ हजार ९५४ रुग्ण उपचारांनंतर बरे झाले आहेत. पुणे शहरातील १०२३ रुग्ण, तर पिंपरी-चिंचवडमधील ३१४ आणि कटक मंडळे आणि ग्रामीण भागातील २ हजार ५९९ अशा एकूण ३ हजार ९३६ रुग्णांना उपचारांनंतर शनिवारी घरी सोडण्यात आले.

बाणेर येथील करोना उपचार केंद्रात रुग्णांचा ऐवज चोरीस

सहा महिन्यांपासून चोरीचे प्रकार; मदतनीस महिलेसह दोघे अटकेत

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : महापालिकेच्या बाणेर येथील करोना उपचार केंद्रात रुग्णांचे दागिने, मोबाइल संच चोरीचा उलगडा करण्यात आला. चतु:शृंगी पोलिसांनी या प्रकरणात मदतनीस महिलेसह दोघांना अटक केली. त्यांच्याकडून सोन्याचे दागिने आणि मोबाइल संच असा एक लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी शारदा अंबिलढगे (वय ३५, रा. रहाटणी फाटा, थेरगाव) आणि अनिल तुकाराम संगमे (वय ४०, रा. गंगानगर, रहाटणी) यांना अटक करण्यात आली. डॉ. अजयश्री मस्कर (वय २५) यांनी या संदर्भात चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. उपचार केंद्रात वैद्यकीय तज्ज्ञ, परिचारिका आणि खासगी संस्थेतील मदतनीस काम करतात.

अंबिलढगेने तीन मृत महिलांसह सात रुग्णांचे दागिने, मोबाइल संच चोरले होते. पोलिसांकडे याबाबत तक्रार देण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार वाघचवरे, उपनिरीक्षक प्रेम वाघमोरे यांनी घटनास्थळी भेट दिली.सहायक पोलीस निरीक्षक राजेश माळेगावे अधिक तपास करत आहेत.

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये मोफत प्रवेशासाठी उत्पन्न मर्यादा आठ लाख

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : अल्पसंख्याक मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन, जैन, शीख, पारसी व ज्यू समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना वसतिगृहामध्ये मोफत प्रवेश घेण्यासाठी आता कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा आठ लाख रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे अल्पसंख्याक विकासमंत्री नवाब मलिक यांनी सांगितले.

या विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये पुरविण्यात येणाऱ्या खोलीभाडे, पाणी, वीज इत्यादी सुविधांचे शुल्क पूर्णपणे माफ असेल, असेही त्यांनी नमूद केले.

आतापर्यंत वसतिगृहामध्ये विनाशुल्क प्रवेशासाठी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची उत्पन्न मर्यादा अडीच लाख रुपये इतकी होती. ती आठ लाखांपर्यंत वाढविण्यात आली असून त्याहून कुटुंबाचे उत्पन्न जास्त असलेले विद्यार्थीही वसतिगृह प्रवेशासाठी पात्र आहेत व त्यांना माफक दरात या सुविधा देण्यात येतील, असे मलिक यांनी स्पष्ट केले.

४५ दिवसांतील सर्वात कमी रुग्णसंख्येची नोंद

(पान १ वरून) हजार ५१२ झाली आहे.

देशातील उपचाराधीन रुग्णांची संख्या २२ लाख २८ हजार ७२४ आहे. ती एक लाख १४ हजार ४२८ने कमी झाली आहे. हे प्रमाण एकूण रुग्णसंख्येच्या ८.०४ टक्के आहे. रुग्ण बरे होण्याचा राष्ट्रीय दर ९०.८० टक्के झाला आहे.

राज्यात २०,२९५ नवे बाधित

मुंबई : राज्यातील रुग्णसंख्याही कमी होऊ लागली असून गेल्या अडीच महिन्यांतील सर्वांत कमी म्हणजे २० हजार २९५ नव्या रुग्णांची नोंद शनिवारी करण्यात आली. राज्यात शनिवारी ४४३ रुग्णांचा मृत्यू झाला. दिवसभरात ३१ हजार ९६४ रुग्ण बरे झाले. सध्या राज्यात दोन लाख ७६ हजार ५७३ रुग्ण उपचाराधीन आहेत. दिवसभरात मुंबईत १०३८, नगर जिल्हा १२४६, नाशिक शहर २७६, उर्वरित नाशिक जिल्हा ६४८ रुग्ण आढळले.

पुण्यात मुसळधार पाऊस

(पान १ वरून) पाऊस झाला. शहरात दुपारपर्यंत आकाश निरभ्र होते. मात्र, दुपारी तीननंतर आकाश अंशतः ढगाळ झाले आणि संध्याकाळी हलक्या पावसाला सुरुवात झाली. संध्याकाळी साडेसातनंतर मात्र शहरात जोरदार पाऊस सुरू झाला. वाऱ्यांचा वेग वाढण्याबरोबरच ढगांचा गडगडाटही झाला. शिवाजीनगर केंद्रामध्ये रात्री साडेआठपर्यंत २४ मिलिमीटर पाऊस नोंदविला गेला. शहराच्या पूर्व भागात पावसाचे प्रमाण अधिक होते. त्यामुळे लोहगाव केंद्रात ३६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

पुणे वेधशाळेने दिलेल्या अंदाजानुसार शहरात ४ जूनपर्यंत पावसाळी स्थिती राहणार आहे. या काळात दुपारपर्यंत आकाश निरभ्र राहणार आहे. दुपारनंतर मात्र ते ढगाळ होऊन हलक्या स्वरूपाचा पाऊस होणार आहे. ३० मे रोजी संध्याकाळी आकाश अंशतः ढगाळ होईल. मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटात शहर आणि परिसरात पाऊस हजेरी लावेल.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
उप प्रादेशिक कार्यालय पुणे-1
पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना
शुद्धीपत्रक

दि. 29/5/2021 च्या दैनिक लोकसत्तामध्ये मे.निरा भिमा सहकारी साखर कारखाना लि.,शहाजीनगर, पो.रेडनी, ता.इंदापूर, जि.पुणे., यांच्या आसवणी प्रकल्पाच्या विस्तारिकरणारिता पर्यावरण विषयक जनसुनावणीची सुचना प्रसिद्ध करण्यात आली होती. तथापि, सबब जाहिरात पुनःश्च प्रकाशित करण्यात येत असून ती पुढीलप्रमाणे आहे. मे.निरा भिमा सहकारी साखर कारखाना लि., शहाजीनगर, पो.रेडनी, ता.इंदापूर, जि.पुणे येथील अस्तित्वात असलेल्या 3500 टन प्रतिदिन क्षमतेचा साखर कारखाना, 18 मे.वॅट क्षमतेचा सहवीज प्रकल्प व 30 किलो लिटर प्रतिदिन मळीवर अधारित असलेल्या आसवणी प्रकल्पामध्ये, आसवणी प्रकल्पाची क्षमता 30 किलो लिटर प्रतिदिन पासुन 105 किलो लिटर प्रतिदिन विस्तारिकरण करण्याबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी दिनांक 15/04/2021 रोजी दु.12.00 वाजता आयोजित करण्यात आली होती. त्याअनुषंगाने दि.09/03/2021 रोजी दैनिक लोकसत्ता मध्ये या विषयी सुचना देण्यात आली होती. परंतु कोवीड-19 च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे सदरील जनसुनावणीस मा.जिल्हाधिकारी, पुणे यांच्या आदेशान्वये स्थगिती देण्यात आली होती. त्याबाबतची सुचना दि.09/04/2021 रोजीच्या दैनिक लोकसत्ता मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जनसुनावणीची सुचना प्रसिद्ध सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरणविषयक सूचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर पर्यावरणविषयक जनसुनावणीचे आयोजन पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

दिनांक - 02/07/2021(शुक्रवार) **वेळ - दुपारी 12.00 वाजता**

ठिकाण -प्रकल्प स्थळी मे.निरा भिमा सहकारी साखर कारखाना लि.शहाजीनगर, पो.रेडनी, ता.इंदापूर, जि.पुणे.

सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरातील रहिवासी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवासी यांना प्रकल्पासंबंधी सूचना, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदवता येतील. सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात सूचना ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात-

प्रादेशिक अधिकारी / उप-प्रादेशिक कार्यालय पुणे-1,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर, 2 व 3 रा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे - 411 003.

सदर प्रकल्पासंबंधी माहिती असलेले कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी भाषेमध्ये तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल खालील कार्यालयांमध्ये यापुर्वीच दि.09/03/2021 रोजी उपलब्ध करुन दिलेले आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत सदर कागदपत्रे अभ्यासू शकतील.

1) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे. 2) जिल्हा परिषद कार्यालय, पुणे. 3) जिल्हा परिषद उद्योग केंद्र, पुणे. 4) प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालय पुणे-1, मप्रनि मंडळ, जोग सेंटर, 2 रा व 3 रा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे- 411 003. 5) मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्र. 7, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई-22. 6) झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरीयाट बिल्डींग, तलमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर- 440 001. 7) पर्यावरण विभाग, नविन प्रशासन भवन, 15वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32. 8) उपविभागीय कार्यालय,बारामती, ता. बारामती, जि.पुणे. 9) तहसिल कार्यालय -इंदापूर, ता. इंदापूर , जि. पुणे. 10) पंचायत समितीकार्यालय,इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे. 11) ग्रामपंचायत कार्यालय, रेडनी,भोडणी, रेडा, ता.इंदापूर, जि.पुणे.

टिप:- भारत सरकारच्या दि.29/08/2020 रोजीच्या "अनलॉक-4" च्या नियमावलीनुसार एकावेळेस 100 लोकांची उपस्थिती ठेवून नागरीकांमध्ये सामाजिक अंतर राखून व संबंधित नियमांचे पालन करुन जनसुनावणी घेण्यात येणार आहे. जनसुनावणीच्या दिवशी 100 पेक्षा जास्त नागरीक जमल्यास टप्या-टप्याने सदर जनसुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. तसेच सदर कलावधीमध्ये कोव्हीड-19 च्या प्रादुर्भावामुळे जर निर्बंध लावले असतील तर सदरची बैठक झूम अॅपद्वारे घेण्यात येईल. त्याबददलची सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येईल.

सही/- (प्रताप जगताप)
उप प्रादेशिक अधिकारी पुणे-1
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दहावी परीक्षेसाठीच्या याचिकेमुळे धनंजय कुलकर्णी यांना जिवे मारण्याची धमकी

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील दहावीची परीक्षा रद्द करण्याबाबत राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात याचिकेद्वारे आव्हान देणाऱ्या धनंजय कुलकर्णी यांना जिवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या प्रकाराबाबतची तक्रार कुलकर्णी यांनी शास्त्रीनगर पोलिस चौकीत दाखल केली असून, पोलिसांनी दोन व्यक्तींवर अदखलपात्र गुन्हे दाखल केले आहेत.

राज्य शासनाने दहावीच्या परीक्षा रद्द करण्याच्या घेतलेल्या निर्णयाविरोधात कुलकर्णी यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याचा राग मनात धरून दोन व्यक्तींनी फेसबुकद्वारे कुलकर्णी यांना जिवे मारण्याची धमकी दिली आहे. तसेच करोनाच्या काळात परीक्षेमुळे विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्यास जबाबदार धरण्याची धमकी दिल्याचे कुलकर्णी यांनी तक्रारीत नमूद केले आहे. तसेच समाजमाध्यमांद्वारे, दूरध्वनी आणि लघुसंदेशाद्वारे धमकी देण्यात येत असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

गणिताचे विद्यार्थिप्रिय अध्यापक डॉ. श्रीनिवास उडपीकर यांचे निधन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : गणिताचे विद्यार्थिप्रिय अध्यापक डॉ. श्रीनिवास गुरुराज उडपीकर (वय ८१) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुली आणि नातवंडे असा परिवार आहे. पूना बोर्डिंग हाउसचे संस्थापक स्वर्गीय गुरुराज उडपीकर यांचे श्रीनिवास हे पुत्र होत.



वडिलांच्या निधनानंतर पूना बोर्डिंग हाउसचे कामकाज पाहतानाच श्रीनिवास यांनी शिक्षण पूर्ण केले. गणित या विषयाची आवड असलेल्या उडपीकर यांनी स. प. महाविद्यालयामध्ये अध्यापन कार्य सुरू केले. जागतिक कीर्तीचे गणितज्ञ आणि भास्कराचार्य प्रतिष्ठानचे संस्थापक स्वर्गीय डॉ. श्रीराम अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाखाली १९९० मध्ये त्यांनी तत्कालीन पुणे विद्यापीठाकडून गणित विषयामध्ये पीएच. डी. संपादन केली होती. २००० मध्ये ते सेवानिवृत्त झाले. अखेरपर्यंत ते पूना बोर्डिंग हाउसमध्ये कार्यरत होते.

मार्केटयार्डातील घाऊक भाजीपाला बाजाराचे कामकाज आजपासून नियमित

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्डाचे कामकाज रविवारपासून (३० मे) नियमित सुरू होणार आहे. गेले पावणेदोन महिने शनिवारी आणि रविवारी मार्केटयार्डातील घाऊक भाजीपाला बाजाराचे कामकाज बंद ठेवण्यात आले होते.

मार्केटयार्डातील भाजीपाला बाजार, कांदा-बटाटा विभाग, फूल बाजार, केळी बाजार, पान बाजाराचे कामकाज रविवारपासून नियमित सुरू होणार आहे. बाजार समितीचे मांजरी, उत्तमनगर, खडकी, मोशी येथील उपबाजारांचे कामकाज नियमित सुरू होणार आहे. करोनाचा संसर्ग असल्याने बाजार आवारातील सर्व घटकांनी नियमावलीचे पालन करून सर्व व्यवहार पार पाडावेत. बाजार आवारात फक्त ठोक स्वरुपात खरेदी करणाऱ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे, असे आवाहन पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांनी केले आहे.

मुखपट्टी परिधान करून ‘एनडीए’मध्ये दीक्षान्त संचलन

नौदलप्रमुखांनी मानवंदना स्वीकारली

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : करोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर मुखपट्टी परिधान करून राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) १४० व्या तुकडीतील छात्रांचे शानदार दीक्षान्त संचलन झाले. नौदलप्रमुख ॲडमिरल करमबीर सिंग यांनी दीक्षान्त संचलनाची पाहणी करून मानवंदना स्वीकारली.

करोना प्रादुर्भावाच्या सावटाखाली शासकीय नियमांचे पालन करत दुसऱ्या वर्षीचे दीक्षान्त संचलन शनिवारी झाले. यामध्ये १४० व्या तुकडीतील ३११ छात्रांसह ६९६ छात्रांनी सहभाग घेतला. या छात्रांमध्ये लष्कराच्या २१५, नौदलाच्या ४४ आणि हवाई दलाच्या ५२ छात्रांचा समावेश होता. १८ छात्र हे मित्र देशांमधील होते. मौसम वत्स याने राष्ट्रपती सुवर्णपदक पटकाविले. जयवंत ताम्रकर याने रौप्यपदक, तर नीरज सिंग पापोला याने कांस्यपदक पटकावले. प्रतिष्ठेचा ‘चीफ ऑफ स्टाफ बॅनर ’ गोल्फ स्क्वाड्रनने पटकावला.

‘जमीन, समुद्र, अवकाशात आणि सायबर क्षेत्रात युद्धाचे स्वरूप सातत्याने बदलत असून, त्याचा संयुक्तपणे सामना करणे काळाची गरज आहे,’ असे मत ॲडमिरल करमबीर सिंग यांनी व्यक्त केले. ‘सेवा परमो धर्म’ हे अकादमीचे बोधवाक्य तीनही सैन्यदलातील अधिकाऱ्यांच्या पिढ्यांना लढण्यासाठी प्रशिक्षित करत आहे. संयुक्तपणे लढण्याची ही वृत्ती उत्तीर्ण छात्रांनी भविष्यातही कायम ठेवावी,’ असा संदेशही त्यांनी दिला.

PUDUMJEE

पदमजी पेपर प्रॉडक्ट्स लिमिटेड

greenlime Think Fresh
Pudumjee Hygiene

नोंदणीकृत कार्यालय: थेरगाव, पुणे – ४११ ०३३.
दूरध्वनी: ०२०-४०७७३३३३, ई-मेल: sk@pudumjee.com
संकेतस्थळ: www.pudumjee.com सीआयएन : एल२१०९८पीएन२०१५पीएलसी१५३७१७

३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या तिमाही व वर्षाकरिता
स्वतंत्र लेखापरिक्षित वित्तिय निष्कर्षांचे विवरण

(रु. लाखात, अन्यथा नमूद नाही तोपर्यंत)

अनु. क्र.	तपशील	संपलेली तिमाही			संपलेले वर्ष	
		३१-मार्च-२१ (लेखापरिक्षित)	३१-डिसें-२० (अलेखापरिक्षित)	३१-मार्च-२० (लेखापरिक्षित)	३१-मार्च-२१ (लेखापरिक्षित)	३१-मार्च-२० (लेखापरिक्षित)
१	प्रवर्तनांकडील एकूण उत्पन्न	१४,७८७.३०	१२,८५०.७९	१३,३२७.२३	४३,६८८.०३	६०,४४८.२२
२	कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (कर आणि अपवादात्मक आयटम्सपूर्वी)	२,४३७.२३	२,३१३.८७	५७९.७०	५,९१९.९१	४,१०५.१३
३	करापूर्वी कालावधीसाठी निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आयटम्सनंतर)	२,४३७.२३	(१३५.७२)	५७९.७०	३,४६९.६०	४,१०५.१३
४	करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आयटम्सनंतर)	२,१२७.८८	(७४.९४)	३९०.२१	३,००३.१०	२,७२१.२५
५	कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीकरिता समाविष्ट नफा आणि अन्य व्यापक उत्पन्न (करानंतर)]	२,२१७.९८	(४७.४२)	२२९.१८	३,०५३.८३	२,५८७.४३
६	समन्याय भाग भांडवल	९४९.५०	९४९.५०	९४९.५०	९४९.५०	९४९.५०
७	ताळेबंदानुसार पुनर्मूल्यन राखीव वगळता अन्य समन्याय				३०,१००.०१	२७,०४६.१८
८	प्रती समन्याय भाग कमाई : मूलभूत व सौम्य केलेले (रु)	२.२४	(०.०८)	०.४१	३.१६	२.८७

नोंदी :

१ संचालक मंडळाने २८ मे, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेत २०२०-२१ वर्षाकरिता प्रत्येकी रु १ च्या रु ०.३० प्रती समन्याय भागाच्या लाभांशास, एकूण रु. २८४.८५ लाख, आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेत भागधारकांच्या मान्यतेच्या, विषयाधीन मान्यता दिली आहे.
२ वरील वित्तीय निकालांचे पुनरावलोकन व लेखापरीक्षण समितीने शिफारस केली आणि संचालक मंडळाने २८ मे २०२१ रोजी झालेल्या बैठकीत नोंदी घेतली.
३ वैधानिक लेखा परीक्षकांनी ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखापरीक्षण केले. ३१ मार्च २०२१ आणि ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या तिमाहीच्या आकडेवारीत संपूर्ण आर्थिक वर्षाच्या आणि आत्ताच्या वर्षापर्यंत प्रकाशित केलेल्या लेखा परीक्षेच्या आकडेवारीचे संतुलन आहेत. संबंधित आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीपर्यंतची आकडेवारी.
४ हे विवरण शक्य तेवढे कंपनी अधिनियम, २०१३ मधील अनुच्छेद १३३ मध्ये विहित केल्यानुसार सुधारित कंपन्या (इंडियन अकाऊन्टिंग स्टॅंडर्ड्स) नियम, २०१५ (Ind -AS) आणि इतर मान्यताप्राप्त लेखा पद्धती आणि नीतीच्या अनुसार तयार करण्यात आलेले आहेत.
५ अपवादात्मक आयटम्स मध्ये खर्चाच्या रुपात दर्शविलेले २४४९.५९ लाख रुपये हे कंपनीने २०१६-१७ आणि २०१७-१८ या आर्थिक वर्षात ग्रुप कॅप्टीव्ह स्कीम (जीसीएस) अंतर्गत पावर जनरेटर्स द्वारे घेतलेल्या विज पुरवठा संदर्भातील तरतुद आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (एमईआरसी) जीसीएस चा दर्जा नाकारुन, दि. २२.१०.२०२० आणि २९.१०.२०२० रोजी दिलेले आदेश लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने, मागीतलेल्या क्रॉस सबसीडी अधिभार, अतिरीक्त अधिभार आणि त्यावरील व्याज याविरोधात कंपनीने माननिय विद्युत अपील न्यायधिकरण (एपीटीईल) कडे अपील करण्यास प्राध्यान्य दिले आहे आणि माननिय एपीटीईल चा निर्णय प्रलंबित असल्यामुळे त्यानुसार तरतुद करण्यात आलेली आहे.
६ भारतात आणि जगभरात कोविड-१९ महामारीचा वेगाने प्रसार झालेला आहे. या विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी शासनाने उचललेल्या लॉक-डाऊन आणि इतर पावलांमुळे आर्थिक घडामोडींवर परिणाम झालेला असून सामान्य व्यवसायातसुद्धा व्यत्यय आलेला आहे. या घटनांचा कंपनीच्या उत्पादन आणि कार्यावरही परिणाम झाला आहे. कंपनीच्या उत्पादनांना आवश्यक वस्तू म्हणून वर्गीकृत केले गेले आहे आणि अहवाल देण्याच्या तारखेपासून, कारखान्यांमध्ये उत्पादन सुरु झाले आहे. कंपनीने कोविड-१९ शी संबंधित महामारीमुळे घेणी, गुंतवणुकी आणि दिलेली कर्जे यांसह सर्व मत्ता आणि दायित्वांवर होणारे संभाव्य परिणाम लक्षात घेतलेले आहेत. प्रबंधानाने आर्थिक विवरणपत्रांवर कोविड-१९ च्या संभाव्य परिणामांचे मूल्यमापन केलेले असले आणि ते लक्षात घेतले असले तरीही भविष्यातील आर्थिक घडामोडींवर त्याच्या परिणामाची अनिश्चितता लक्षात घेता पुढे होऊ घातलेल्या घटनांचा परिणाम पुढे कशी परिस्थिती होईल यावर अवलंबून असेल.
७ सेबीच्या २६-११-२०१८ सर्क्युलर परिपत्रकात दिलेल्या निकषानुसार ३१ मार्च २०२१ रोजी कंपनी 'लार्ज कॉर्पोरेट' नाही.
८ मागील कालावधीतील आकडेवारी पुन्हा सादर केली गेली आहे आणि वर्तमान कालावधीच्या सादरीकरणास अनुरूप आवश्यक तेथे पुन्हा एकत्रित केले गेले आहे.
९ वरील उतारा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजसकडे फाईल केलेल्या ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता वित्तिय निष्कर्षाचा सविस्तर प्रारुप उतारा आहे. या वित्तिय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारुप www.bseindia.com व www.nseindia.com या स्टॉक एक्सचेंजच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे तसेच www.pudumjee.com या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्थळ : पुणे
दिनांक : २८ मे, २०२१

संचालक मंडळाच्या वतीने आणि करिता
अरुणकुमार एम. जाटिया
कार्यकारी अध्यक्ष

जाहीर उद्घोषणा

लावासा कॉर्पोरेशन लिमिटेड (एलसीएल) आणि त्यांच्या पूर्णपणे मालकीच्या असलेल्या उपकंपन्या वारसगाव ॲसेट्स मेंटेनन्स लिमिटेड (डब्ल्यूएएमएल), दासवे कन्व्हेन्शन सेंटर लिमिटेड (डीसीसीएल), वरसगाव पॉवर सप्लाय लिमिटेड (डब्ल्यूपीएसएल) आणि दासवे रिटेल लिमिटेड (डीआरएल) (अशा एकत्रिकृत प्रक्रियेचा यानंतर ‘एलसीएल कॉन्सोलिडेटेड सीआयआरपी’ असा संदर्भ असलेले) हे सध्या माननीय राष्ट्रीय विधि न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (एनसीएलटी)च्या आदेश दिनांकित फेब्रुवारी २६, २०२० आणि मे १३, २०२१ अनुसार सध्या चालू असलेल्या एकत्रिकृत कॉर्पोरेट इन्सॉल्व्हन्सी रिझोल्यूशन प्रक्रियेच्या संदर्भात आहे, ज्यासाठी श्री. शैलेश वर्मा यांची ठराव व्यावसायिक (‘आरपी’) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

उपरोक्तच्या संदर्भात एलसीएल कॉन्सोलिडेटेड सीआयआरपी (‘सीओसी’)च्या धनकोंच्या समितीच्या अधिकारपत्रावर आधारित मे २५, २०२१ रोजी त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती, ज्यासाठी आरपी यांनी प्रस्तावित ठराव व्यावसायिक यांना त्यांच्या एलसीएल कॉन्सोलिडेटेड सीआयआरपीसाठी ठराव सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. पात्र इच्छुक संस्थांनी निम्नस्वाक्षरीकारांना व्हर्च्युअल डेटा रूमचा प्रवेश मिळवण्यासाठी inlavasaip@deloitte.com वर प्रस्तावित ठराव अर्जदारांच्या प्रालेखासोबत www.lavasa.com वर उपलब्ध असलेल्या विहित स्वरूपामध्ये असलेले गोपनीय अंडरटेकिंग सादर करावे, ज्यामध्ये एलसीएल कॉन्सोलिडेटेड सीआयआरपीच्या संदर्भात ठराव नियोजनाच्या सादरीकरणासाठी प्रक्रिया निश्चित करणारी तपशीलवार प्रक्रिया कागदपत्रे, इन्फॉर्मेशन मेमोरॅंडम आणि उपरोक्तच्या संदर्भात (जे अपलोड करायचे आहे आणि वेळोवेळी फेरफार/सुधारित करायचे आहे) अन्य संबंधित तपशील (जसे दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ मध्ये नमूद करण्यात आले आहे) सोबत असावा. प्रस्तावित ठराव अर्जदार ज्यांनी यापूर्वीच एलसीएल कॉन्सोलिडेटेड सीआयआरपीसाठी जाहीर उद्घोषणा दिनांकित फेब्रुवारी २७, २०२१ च्या अनुसार ठराव नियोजन आणि/किंवा त्यांची अभिव्यक्ती व्यक्त केली आहे आणि ठराव नियोजनासाठी विनंती दिनांकित फेब्रुवारी २६, २०२१ अनुसार सादर केले आहेत, तेदेखील गोपनीय अंडरटेकिंगच्या प्राप्तीनंतर वरील प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र असतील.

सर्व ठराव व्यावसायिक अर्जदारांनी व्हर्च्युअल डेटा रूमवर अपलोड करण्यात आलेली सर्व माहितीसह स्वत:ला अद्ययावत आणि नियंत्रित करावे आणि ती माहिती प्राप्त झाल्याचे समजण्यात येईल आणि त्यांना देण्यात आलेल्या व्हर्च्युअल डेटा रूम प्राप्त झाल्यानंतर अपलोड करण्यात आलेली माहिती/अपलोड करण्यात येणारी माहिती याची नोंद घ्यावी.

कृपया नोंद घेण्यात यावी की, पात्रता निकष जर असल्यास आणि मूल्यांकन निकष हे पूर्णपणे वर नमूद करण्यात आलेल्या व्हर्च्युअल डेटा रूमला पूर्णपणे कळविणे आवश्यक आहे. सीओसी यांच्याकडे कोणतेही कारण न देता आणि कोणतेही दायित्व न ठेवता बोली प्रक्रियेच्या कोणत्याही वेळी प्रक्रिया, पात्रता निकष, मूल्यांकन निकष रद्द करण्याचे किंवा फेरफार करण्याचे आणि/किंवा कोणतीही संस्था/बोली/प्रस्ताव नाकारण्याचे/अपात्र ठरवण्याचे अधिकार सीओसी यांच्याकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

पाहणी, अटी आणि शर्ती आणि अन्य माहितीच्या संदर्भात अन्य कोणत्याही स्पष्टीकरणासाठी लावासा कॉर्पोरेशन लिमिटेडच्या कॉन्सोलिडेटेड कॉर्पोरेशन इन्सॉल्व्हन्सी रिजोल्यूशन प्रोसेससाठी श्री. शैलेश वर्मा, ठराव व्यावसायिक यांना कृपया लेखी कळवावे.

पत्रव्यवहारासाठी पत्ता : डेलोईटे टच टोमास्तू इंडिया एलएलपी, २७ वा मजला, टॉवर ३, सन इंटरनॅशनल सेंटर, एल्फिन्स्टन (पश्चिम), मुंबई ४०००१३.
ई-मेल : inlavasaip@deloitte.com; shaiverma@deloitte.com

ठराव नियोजन सादर करण्यासाठी शेवटचा दिनांक जुलै १३, २०२१ आहे. ठराव नियोजन सादरीकरणासाठीच्या दिनांकामध्ये कोणताही बदल असल्यास व्हर्च्युअल डेटा रूमवर अपलोड करण्यात येईल आणि एलसीएलच्या संकेतस्थळावर अधिसूचित करण्यात येईल आणि सर्व प्रस्तावित ठराव व्यावसायिक अर्जदारांनी नियमितपणे अधिक नवनवीन माहितीसाठी भेट देणे आवश्यक आहे.

सही/-
विनम्र
शैलेश वर्मा
लावासा कॉर्पोरेशन लिमिटेडच्या कॉन्सोलिडेटेड कॉर्पोरेट इन्सॉल्व्हन्सी प्रोसेससाठी ठराव व्यावसायिक
नोंदणीकरण क्र. आयबीबीआय.आयपीए-००२/आयपी-एन०००७०/२०१७-१८/१०१४८
नोंदणीकृत पत्ता : ई-१००४, विजया अपार्टमेंट्स, माल रोड, अहिंसा खंड २, शांती गोपाळ हॉस्पिटलजवळ, इंदिरापूरम, गाझियाबाद, उत्तर प्रदेश, २०१०१४
ई-मेल : shailesh3108@gmail.com
दिनांक : मे ३०, २०२१

प्रादेशिक परिवहन विभागात अनागोंदी

अनिल परब यांच्यावरही आरोप ; निलंबित मोटार निरीक्षकाची पोलिसात तक्रार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : प्रादेशिक परिवहन विभागात (आरटीओ) अनागोंदी कारभार, बदल्या, पदोन्नतीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याची तक्रार निलंबित मोटार निरीक्षक गजेंद्र पाटील यांनी शहर पोलिसात दिली आहे. या तक्रारीत खात्याचे मंत्री अनिल परब यांचाही

उल्लेख असून हे कथित आर्थिक व्यवहार सांभाळणाऱ्या उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याने बदल्यांमध्ये मोठी गटबाजी, जातीयवाद केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दुसरीकडे, या तक्रारींमागे विरोधी पक्षाचा हात असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला आहे. परब यांनी आरोप फेटाळले आहेत.

तक्रारदार पाटील यांनी परिवहन विभागातील कथित भ्रष्टाचार, गैरकारभाराचे अनेक दाखले देत पंचवटी पोलीस ठाण्याकडे इ मेलद्वारे तक्रार दिली. या खात्याचे मंत्रिपद स्वीकारल्यानंतर परब यांनी विभागाचा कारभार, पैसे गोळा करण्यासाठी वर्धा येथील उपप्रादेशिक अधिकारी बजरंग खरमाटे याची नेमणूक केली.

> “प्राप्त झालेली तक्रार आरोप स्वरूपाची असून कुठलेही पुरावे दिलेले नाहीत. सविस्तर जबाब नोंदविण्यासाठी तक्रारदाराला हजर राहण्यास सांगण्यात आले. तथापि, प्रारंभी त्यांच्याकडून अपेक्षित सहकार्य मिळाले नाही. तब्येत बरोबर नसल्याचे कारण सांगितले. आरोपांचे गांभीर्य लक्षात घेऊन हा तपास उपायुक्त (गुन्हे) यांच्याकडे सोपवून पाच दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. आता तक्रारदाराने ३१ मे रोजी जबाब नोंदविण्याची तयारी दर्शविली आहे. पत्रात ज्यांची नांवे आहेत, त्यातील नऊ अधिकारी आणि तीन खासगी व्यक्ती अशा १२ जणांचे जाबजबाब घेण्याचे काम सुरू करण्यात आले आहे.
>
> -दीपक पाण्डये, पोलीस आयुक्त, नाशिक शहर

> “तक्रार करायची, मग न्यायालयात जायचे. न्यायालयाच्या निर्देशानुसार काही कलमांन्वये गुन्हा दाखल करायचा. काहीतरी मागे चौकशीचे झेंगट लावायचे. हा विरोधी पक्षांचा जुना खेळ आहे. रस्त्यावर अनेक गोष्टी घडत असतात. त्याला मंत्री कसा जबाबदार असू शकतो ?
>
> -छगन भुजबळ, अन्न नागरी पुरवठा मंत्री

संबंधिताने विभागातील निरीक्षक, वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून प्रचंड पैसे काढले. काही बेकायदेशीर, अन्यायकारक बदल्या केल्या. विशिष्ट समाजाच्या अधिकाऱ्यांना झुकते माप दिले.

जिथे जास्त पैसा मिळतो, तिथे बदल्यांवर भर राहिला. परिणामी कमी पैसे मिळणारी रत्नागिरी, नगर, बीड, अंबेजोगाई, मुंबई (मध्य) या कार्यालयातील जागा रिक्त राहिल्या. वरिष्ठांना कुठून कशा, किती दाम मोजून बदल्या मिळाल्या, याची सविस्तर यादी तक्रारीत मांडली आहे. एका प्रकरणात बदलीसाठी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचा आदेश होऊनही नऊ महिने त्या नस्तीवर कुठल्याही प्रकारचे आदेश दिले गेले नाहीत. या अधिकाऱ्यांकडून कोट्यवधी रुपये वसूल केल्यानंतर त्यांना नेमणूक मिळाली. कुठल्याही पदोन्नतीनंतर नागपूर, अमरावती, औरंगाबाद या विभागात पदस्थापना दिल्यानंतर तीन वर्षाच्या आत तिथून पुन्हा सबळ कारणाशिवाय बदली करता येत नाही.

हा कायदा धाब्यावर बसवून खरमाटे याने अनेक मोटार वाहन निरीक्षकांच्या बेकायदेशीरपणे विभागीय संवर्ग बदलून बदल्यांचा सपाटा लावला. प्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारीपदी पदोन्नतीचे शासन आदेश निघूनही काहींचे पदस्थापना आदेश दोन-तीन महिने प्रलंबित ठेवले गेले.

काही जणांना तर निवृत्तीच्या शेवटच्या दिवसापर्यंत ताटकळत रहावे लागले. बदल्यांचे पैसे गोळा करण्यासाठी विभागनिहाय सहाय्यक अधिकारी नेमले. सध्या परिवहन विभागाचे मंत्री परब आहेत की खरमाटे अशी स्थिती असल्याकडे तक्रारदाराने लक्ष वेधले आहे.

बदनामीसाठी खोटी तक्रार -परब

मुंबई : निलंबित मोटार वाहन निरीक्षक गजेंद्र पाटील यांनी माझ्याविरुद्ध तसेच परिवहन आयुक्त व इतर पाच अधिकाऱ्यांविरोधात नाशिकमधील पंचवटी पोलीस ठाण्यात दिलेली तक्रार ही पूर्णतः निराधार व खोटी आहे, असे स्पष्टीकरण परिवहन मंत्री अनिल परब यांनी केले आहे.

विभागातील अनेक तक्रारीच्या पार्श्वभूमीवर निलंबित झालेल्या या अधिकाऱ्याने सूडबुद्धीने खोटे आरोप करून माझी व महाविकास आघाडी सरकारची बदनामी करण्याचे षड्यंत्र आखले आहे, असे परब यांनी म्हटले आहे. मंत्र्यांवर आरोप करून राज्य सरकार काहीही कारवाई करत नाही, असे भासवून उच्च न्यायालयामार्फत सीबीआय चौकशीची मागणी करायची आणि सरकार व मंत्र्यांची प्रतिमा मलिन करायची, या राजकीय हेतूने केलेली ही तक्रार असल्याचा आरोप परब यांनी केला आहे. चौकशीअंती सत्य जनतेसमोर नक्कीच येईल, असे परब यांनी स्पष्ट केले.

राज्याच्या राजकारणात शिळेपणा!

‘लोकसत्ता’च्या कार्यक्रमात भूमिका मांडेन- प्रकाश आंबेडकर

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्याच्या राजकारणात शिळेपणा आला आहे. खासदार संभाजीराजे यांनी पुढाकार घेतला तर त्यामध्ये ताजेपणा येईल, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी शनिवारी मांडली. राज्याच्या राजकारणात शिळेपणा आला म्हणजे काय या विषयी ‘लोकसत्ता’च्या ऑनलाइन कार्यक्रमात नेमकी भूमिका सविस्तरपणे मांडणार असल्याचे आंबेडकर यांनी सांगितले.

प्रकाश आंबेडकर

मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात खासदार संभाजीराजे यांनी प्रकाश आंबेडकर यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. त्यानंतर आंबेडकर आणि संभाजीराजे यांनी पत्रकारांशी बोलताना आपली भूमिका स्पष्ट केली.

‘लोकसत्ता’तर्फे महाराष्ट्राच्या राजकारणाचा भविष्यवेध घेणारी ‘लोकसत्ता’तर्फे ‘दृष्टी आणि कोन’ ही प्रमुख नेत्यांचा सहभाग असलेली दूर-संवादमाला सोमवारपासून (३१ मे) सुरू होत आहे. या मालिकेमध्ये बुधवारी (२ जून) प्रकाश आंबेडकर यांचा सहभाग आहे. खासदार संभाजीराजे यांच्याशी झालेल्या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना आंबेडकर यांनी राज्याच्या राजकारणामध्ये शिळेपणा आला आहे, अशी टिप्पणी केली. शिळेपणा आला म्हणजे काय, असे विचारले असता यासंदर्भात ‘लोकसत्ता’च्या कार्यक्रमात भूमिका मांडणार आहे, असे आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

‘योगदानाच्या आधारावरच साहित्यिकांची निवड’

लोकसत्ता, प्रतिनिधी

नागपूर : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य आणि अध्यक्ष यांची निवड ही त्यांच्या साहित्यिक योगदानाच्या आधारावरच केली जाते. यात प्रादेशिक समतोलही साधला जातो, असे मराठी भाषा विभागाकडून कळविण्यात आले आहे.

या मंडळावर यापूर्वी प्रा. सुरेश द्वादशीवार, सुरेंद्र बारलिंगे, मधुकर आष्टीकर हे तीन अध्यक्ष विदर्भातील होते. मराठवाड्याचे रा. रं. बोराडे, बाबा भांड हे अध्यक्ष झाले आहेत. याशिवाय मधु मंगेश कर्णिक हे कोकणातले होते. ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड यांच्या नंतर पुणे येथे वास्तव्यास असलेले ज्येष्ठ साहित्यिक सदानंद मोरे यांची नियुक्ती झाली आहे. मोरे यांच्या नियुक्तीने प्रथमच पुणे जिल्ह्याला अध्यक्षपदी प्रतिनिधित्व मिळाले आहे, अशी माहिती मराठी भाषा विभागाने दिली आहे. ‘शासनाकडूनच साहित्यातील प्रादेशिकवादाला खतपाणी!’ अशा शीर्षकाची बातमी ‘लोकसत्ता’च्या शनिवार २९ मे रोजीच्या अंकात प्रसिद्ध झाली होती. या बातमीवर मराठी भाषा विभागाने हा खुलासा केला आहे.

तृणमूल-केंद्र सरकार संघर्ष पुन्हा तीव्र

(पान १ वरून)

होते.

...तर मोदींचे पाय धरण्याचीही तयारी!

पश्चिम बंगालच्या विकासासाठी आपल्याला जर कोणी मोदी यांचे पाय धरण्यास सांगितले तर त्यासाठीही आपण तयार आहोत, असे ममता म्हणाल्या. मोदी आणि शहा यांना राज्यातील पराभव पचविता आलेला नाही, असे त्या म्हणाल्या.

ममतांकडून पंतप्रधानांचा अपमान : अधिकारी

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांनी ज्या पद्धतीने पंतप्रधानांचा अपमान केला, त्यावर टीका करण्यासाठी माझ्याजवळ शब्द नाहीत, असे भाजपचे नेते शुवेंदू अधिकारी म्हणाले.

अभिनेत्री मूनमून दत्ताविरोधात गुन्हा

मुंबई : जातिवाचक संवाद असलेली ध्वनिचित्रफीत प्रसारित करणारी अभिनेत्री मूनमून दत्ताविरोधात अंबोली पोलिसांनी अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार (ॲट्रॉसिटी ॲक्ट) गुन्हा नोंदवला. तारक मेहता का उल्टा चष्मा या मालिकेत दत्ता प्रमुख भूमिका साकारते आहे. वाल्मीकी विकास संघाचे अध्यक्ष नरेश बोहिल यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी ही कारवाई केली. बोहिल यांच्या तक्रारीनुसार ११ मेला दत्ता यांची एक ध्वनिचित्रफीत पाहण्यात आली. त्यात जातिवाचक संवाद होते. त्यामुळे वाल्मीकी समाजाच्या भावना दुखावल्या.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा उद्यापासून भविष्यवेध

ऑनलाइन सहभागासाठी...

या दूर-संवाद मालेत सहभागी होण्यासाठी http://tiny.cc/ LS_Drushti_ ani_Kon येथे नोंदणी आवश्यक.

क्यूआर कोडद्वारेही सहभागी होता येईल.

(पान १ वरून) गेली दोन वर्षे राज्याला कठोर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. अन्य राज्यांची स्पर्धा असली तरी विदेशी गुंतवणुकीपासून औद्योगिक, सेवा क्षेत्र, वित्तीय क्षेत्र, स्थावर मालमत्ता यात महाराष्ट्र नेहमीच आघाडीवर राहिले. या पार्श्वभूमीवर पुढील दहा वर्षांत महाराष्ट्राची वाटचाल कोणत्या मार्गाने होईल, त्या वाटचालीतील राजकीय आव्हाने, आर्थिक व सामाजिक परिस्थिती याचा आढावा या नेतेमंडळींकडून घेतला जाणार आहे. ‘दृष्टी आणि कोन’ या वेबसंवादातून उद्यापासून ५ जूनपर्यंत दररोज सायंकाळी पाच वाजता भविष्याचा वेध घेतला जाणार आहे.

महाराष्ट्र राज्याच्या ६०व्या वर्धापन दिनानिमित्त गेल्या वर्षी झालेल्या ‘साठीचा गझल... महाराष्ट्राचा’ या वेबसंवाद कार्यक्रमात शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, नारायण राणे, देवेंद्र फडणवीस, अशोक चव्हाण या माजी मुख्यमंत्र्यांनी राज्याने कशी प्रगती केली याचा आढावा घेतला होता.

-: वेळापत्रक :-

- **३१ मे:** राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे
- **१ जून:** मनसेचे प्रमुख राज ठाकरे
- **२ जून:** वंचित बहुजन आघाडीचे ॲड. प्रकाश आंबेडकर
- **३ जून:** काँग्रेसतर्फे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री अमित देशमुख
- **४ जून:** माजी मुख्यमंत्री, भाजपचे देवेंद्र फडणवीस
- **५ जून:** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

कर्त्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास कुटुंबीयांना निवृत्तीवेतन

पीटीआय, नवी दिल्ली

करोनामुळे घरातील कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाला असेल तर त्या व्यक्तीवर अवलंबून असलेल्या कुटुंबाला निवृत्तिवेतन देण्यासह अशा कुटुंबासाठी अनेक उपाययोजना शनिवारी सरकारने जाहीर केल्या.

कुटुंब निवृत्तिवेतनासह ईडीआयएल विमा योजनेखालील लाभही वाढविण्यात येणार आहेत. या उपाययोजनांमुळे या कुटुंबांना भेडसावणाऱ्या आर्थिक समस्या दूर होण्यास मदत होणार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. आपले सरकार अशा कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असेही ते म्हणाले.

आपत्ती कोसळलेल्या कुटुंबांना सन्मानाने जगता यावे आणि त्यांचे राहणीमान चांगले असावे यासाठी ईएसआयएस निवृत्तिवेतन योजनेचा लाभ करोनामुळे मृत्यू झालेल्या कुटुंबांनाही देण्यात येणार आहे, असे मोदी यांच्या कार्यालयातून सांगण्यात आले. हे लाभ २४ मार्च २०२० पासून पूर्वलक्षी प्रभावाने देण्यात येणार असून अशा प्रकरणांसाठी ते २४ मार्च २०२२ पर्यंत देण्यात येणार आहेत.

‘माइंडशेअर इंडिया’ला एजन्सी ऑफ दी इयर पुरस्कार

नवी दिल्ली : यंदाचे फेस्टिव्हल ऑफ मीडिया ग्लोबल (एफओएमजी) पुरस्कार गुरुवार २७ मे रोजी जाहीर करण्यात आले असून ‘माइंडशेअर इंडिया’ने अत्यंत प्रतिष्ठेच्या ‘ग्रॅण्ड प्रिक्स : एजन्सी ऑफ दी इयर’ या पुरस्कारासह अनेक पदकेही पटकावली आहेत.

या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासह ‘माईंडशेअर इंडिया’ने दोन सुवर्ण आणि तीन रौप्य पदकेही पटकावली आहेत.

नियुक्तीमध्ये सर्वसमावेशकतेला हरताळ

पुणे : राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सदस्य नियुक्तीमध्ये सर्वसमावेशकतेला हरताळ फासण्यात आला आहे, अशा शब्दांत मुस्लिम सत्यशोधक मंडळाने नाराजी व्यक्त केली आहे.

पुरोगामी महाराष्ट्रामध्ये मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासात सर्वधर्मीयांसह मुस्लिम आणि ख्रिश्चन समाजातील मान्यवरांनी योगदान दिले आहे. या समाजांतून मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन केले जात असते. या समुदायांना मुख्य प्रवाहात आणण्याची भाषा करताना भाजपकडून सापत्नभावाची वागणूक दिली जाते अशी ओरड केली जाते. सर्व समाजघटकांना प्रतिनिधित्व असावे असे एकीकडे म्हणायचे आणि नेमक्या वेळी त्याचा विसर पाडायचा हा प्रकार क्लेशकारक आहे, अशी टीका मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष प्रा. शमसुद्दीन तांबोळी यांनी केली आहे. येथील मुस्लिम, ख्रिश्चन आणि अन्य समाजघटक मूलनिवासी असून विविध क्षेत्रांत प्रतिनिधित्व मिळणे त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे. यासंदर्भात शासनाने दाखवलेली उदासीनता भेदभावाला खतपाणी घालते असा समज निर्माण झाल्यास आश्चर्य वाटणार नाही, याकडे तांबोळी यांनी लक्ष वेधले आहे.

करोनामुळे मृत पावलेल्या एसटी कर्मचाऱ्यांच्या वारसाला नोकरी

मुंबई: करोनामुळे मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपातत्वावर नोकरी देण्याचा निर्णय झालेला असतानाही त्याची अंमलबजावणी होत नव्हती. परिणामी वारसांकडून नोकरीसाठी एसटीकडे हेलपाटे मारावे लागत होते. यामुळे महामंडळावर बरीच टिका झाल्यानंतर वारसांना अनुकंपातत्वावर नोकरी देण्यासंदर्भात शनिवारी परीपत्रक जारी केले.परीपत्रकानुसार, सेवेत असताना अन्य कारणांमुळे किंवा करोनामुळे कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्या कर्मचाऱ्यांच्या एका वारसाला नोकरी देण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.

दिनदर्शिका

रविवार, ३० मे २०२१

भारतीय सौर ०९ ज्येष्ठ शके १९४३

मिती वैशाख कृष्णपक्ष - पंचमी : उ.रा. ०२ : १३ पर्यंत. नक्षत्र : उत्तराषाढा : १६ : ४१ पर्यंत. चंद्र - मकर

मेष : व्यापारी वर्गाला दिलासा.
वृषभ : नावलौकिक होईल.
मिथुन : अंगवळणी सवय बदला.
कर्क : आनंदी दिन.
सिंह : प्रकृतीची काळजी घ्या.
कन्या : वैवाहिक सौख्य लाभेल.
तूळ : गुंतवणूक वाढेल.
वृश्चिक : भावंडांशी हितगुज.
धनू : खर्च वाढवू नका.
मकर : नियोजन यशस्वी होईल.
कुंभ : अनावश्यक गोष्टी टाळा.
मीन : आत्मसंयम वाढेल.

शुभ राशी : वृषभ, मकर

नेटक्लिप्स

लोकसत्ता.COM

- परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुंबई महापालिकेची नवी नियमावली
- परळी ते वरळी ...लोकांच्या मनातील पंकजा मुंडे

हे व्हिडीओ बघण्यासाठी खालील क्यूआर कोड स्कॅन करा..

सर्वाधिक वाचकपसंती

- अग्रलेख - प्रतिमापालनाला नकार
- थोडी माणुसकी असायला हवी होती; अजित पवारांनी व्हेंटिलेटर्सच्या प्रश्नावर व्यक्त केली खंत
- ‘....नाहीतर मी राजकारणात यायला अजिबात इच्छुक नव्हते’, पंकजा मुंडेंनी सांगितलं कारण!
- करोनाविषयी मेघालयचे आरोग्यमंत्री म्हणतात, ‘माणूस स्वतःला वाचवू शकणार नाही, आता आपल्याला देवाच्या मदतीची गरज’!

सुरक्षेसह हजारोंच्या आरोग्याचीही रक्षणकर्ती

(पान १ वरून)

चोवीस तास मदतीसाठी खणखणू लागला आणि गरजूंना मदत मिळेस्तोवर त्यांच्यासाठी रेहाना शेख झटत राहिल्या.

मुंबई पोलिसांनी सुरू केलेल्या कोव्हिड कक्षातूनही रेहाना यांना विनंत्या येऊ लागल्या.

गेल्या वर्षभरात किती जणांना मदत केली, असे त्यांना विचारल्यावर ‘मोजायला कुणाला वेळ आहे? सव्वा वर्षातील व्हॉट्सॲप नोंदी त्यासाठी पहाव्या लागतील’, असे त्या म्हणाल्या. अनेकांना मदत करता आली. पण ज्यांना करू शकले नाही, किंवा उपचारात उशीर झाला, त्याबाबत दुःख वाटते, असेही त्यांनी सांगितले.

कार्यतत्परता...

मुंबईसह महानगर प्रदेश, पुणे, नाशिक, सातारा, नागपूरमधील पोलीस, त्यांचे नातेवाईक आणि त्यांच्या संपर्कातून वेगवेगळ्या आर्थिक स्तरांतील नागरिक त्यांच्याकडे समस्या घेऊन येतात. रेहाना बहुतांशवेळा त्या तातडीने सोडवितात. ओळखदेख नसूनही त्यांची मदतीसाठीची तत्परता पाहून सारेच भारावून जातात.

पोलीस दलातील एका आयपीएस अधिकाऱ्याच्या साहाय्यकाच्या आईला टोसिलीझुमॅब आवश्यक होते. ते शहरात कोठेच उपलब्ध नव्हते. सर्व पर्याय जवळपास संपल्याने अखेर त्यांनी रेहाना यांच्याशी संपर्क साधला. ओक्साबोक्शी रडत त्यांनी रेहाना यांच्याकडे मदत मागितली.

रेहाना यांनी खटपट करून त्यांना टोसिलीझुमॅब उपलब्ध करून दिले. साहाय्यकाच्या आईने करोनावर मात केली. त्या घरी आल्या. मात्र दोनच आठवड्यांत त्यांचे निधन झाले. अन्य एका प्रसंगात एका मंत्रालयीन कर्मचाऱ्यास कृत्रिम श्वसनयंत्रणेची व्यवस्था असलेली रुग्णशय्येची आवश्यकता होती. रेहाना यांनी त्यासाठी मुंबई पालथी घातली. अखेर ठाण्यातील एका नामांकित रुग्णालयात त्यांनी या व्यक्तीसाठी रुग्णशय्या उपलब्ध करून दिली. मात्र उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. वाहतूक पोलीस दलात कार्यरत अंमलदारासाठीही रेहाना यांनी प्लाझ्माची जुळवाजुळव केली. प्लाझ्मा उपलब्ध झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्याचाही मृत्यू झाला. ही तीन प्रसंगांची सल रेहाना यांना अद्याप आहे.

रेहाना शेख यांच्या धडपडीत पोलीस असलेले त्यांचे पती नासीर रेहाना यांना नेहमीच प्रोत्साहन देतात. रेहाना यांच्यामुळे मदत उपलब्ध झालेले अनेकजण, त्यांचे कुटुंबीय संपर्कात आहेत. ते विचारपूस करतात. सणउत्सवात शुभेच्छा देतात. हा संवाद मला आणखी मदत करण्यास अधिक बळ देतो, असे त्यांनी सांगितले.

साखरेचा निर्यात कोटा वाढण्याची शक्यता धूसर

(पान १ वरून) केंद्राकडून निर्यात कोट्यात वाढ होण्याची शक्यता धूसर आहे. केंद्र सरकार निर्यात साखरेला प्रतिटनाला सहा हजार रुपये अनुदान देते. परदेशात साखर कमी भावाने निर्यात करावी लागते.

देशाला दरवर्षी २०० लाख टन, तर महाराष्ट्राला ३५ लाख टन साखरेची गरज असते. मात्र, यंदा देशभरात ३०० लाख टनांपेक्षा अधिक साखरेचे उत्पादन झाले आहे. त्यातील महाराष्ट्राचा वाटा १०६ लाख टनांचा आहे. अवकाळी पावसाने पिकांचे अतोनात नुकसान होत असल्याने राज्यातील शेतकरी द्राक्षे, डाळिंब, सोयाबीन या पिकांकडून आता उसाकडे वळत आहेत. ऊस हे हमखास पैसे मिळवून देणारे पीक असल्याने त्याकडे शेतकऱ्यांचा ओढा जास्त आहे. या पार्श्वभूमीवर देशाची गरज भागवून शिल्लक साखरेचे काय करायचे? हा मोठा प्रश्न साखर उद्योगापुढे आहे.

याबाबत साखर आयुक्त शेखर गायकवाड म्हणाले, ‘शिल्लक साखर निर्यात करणे, जास्तीत जास्त इथेनॉल निर्मिती करणे हेच उपाय सध्या उपलब्ध आहेत. इथेनॉल निर्मितीसाठी डिस्टलरी बसवण्यासाठी एक ते दीड वर्षांचा कालावधी लागतो. तसेच पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण सध्या दहा टक्के निश्चित करण्यात आले आहे. आगामी काळात त्यामध्ये वाढ करण्यात येणार आहे.’

वनखात्यातील १५० कर्मचारी करोनामुळे मृत्यूमुखी

नागपूर : करोनाचा प्रादुर्भाव सुरू झाल्यापासून आतापर्यंत वनखात्यात सुमारे १५० कर्मचारी कर्तव्यावर असताना मृत्यूमुखी पडले आहेत. करोना प्रादुर्भाव काळात काही महिने ५० टक्के कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीचे शासनाने आदेश काढले होते. मात्र, मानव-वन्यजीव संघर्ष निवारण अत्यावश्यक सेवेत असल्यामुळे कर्मचाऱ्यांना क्षेत्रीय स्तरावर जाण्यावाचून पर्याय नव्हता. वनखात्यातील या कर्मचाऱ्यांचे तातडीने लसीकरण करण्यात यावे, यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) जी. साईप्रकाश यांनी वनखात्याचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर यांना एका पत्राद्वारे विनंती केली आहे.

कामगार विभागाच्या लेखी केवळ ५५ बालकामगार

करोना काळात शिक्षणात खंड, बालमजुरीत वाढ

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : करोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा फटका अल्पवयीन मुलांनाही बसला आहे. कुटुंबातील कमावत्या व्यक्तीचा रोजगार बुडाल्याने आणि वर्षभरापासून शाळा बंद असल्याने अनेकजण बालमजुरीकडे ढकलली गेली आहेत. गेल्या वर्षभरात वीट भट्टी, ऊस तोडणी, घरकाम अशा ठिकाणी शालेय शिक्षण घेणारी मुले काम करताना आढळू लागल्याचे सामाजिक संस्थांच्या पाहणीत समोर आले आहे. मात्र कामगार विभागाच्या दरबारी एप्रिल २०२० ते मार्च २०२१ या काळात केवळ ५५ बालकामगारांची नोंद झाली आहे.

आश्रम शाळा, वसतिगृहात राहून शिकणारी मुले सध्या घरीच आहेत. दुर्गम भागात आणि ऑनलाइन शिक्षणासाठी मोबाइल फोन तसेच इंटरनेट सुविधेअभावी मुले शिक्षणाच्या प्रवाहापासून तुटली आहेत. त्यातच कुटुंबीयांना आर्थिक मदत करण्यासाठी मुले बालमजुरीकडे ढकलली जात आहेत.

‘विनीत (नाव बदलून) हा नववी इयत्तेत शिकणारा मुलगा टाळेबंदीमध्ये वीटभट्टी कामगार झाला. त्याचे वडील वीटभट्टीवर, तर आई मोलमजुरीचे काम करते. टाळेबंदीत दोघांचे काम सुटले. ऑनलाइन शिक्षणाची सोय नसल्यामुळे विनीत शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडला होता. त्यामुळे पुन्हा काम सुरू होताच कुटुंबीयांना आर्थिक मदतीसाठी विनीतही वीटभट्टीवर कामाला जाऊ लागला,’

अशी माहिती वंचित विकास संस्था खंडाळाचे सचिव राजेंद्र काळे यांनी दिली.

‘सध्या शाळा बंद आहेत. त्यामुळे अनेक मुले गाड्या धुणे, कचरा गोळा करायला, भंगार गोळा करायला जाताना दिसत आहेत. गेल्या वर्षभरात हे प्रमाण वाढल्याचे दिसत आहे,’ असे बालहक्क कृती समिती पुणेचे मंदार शिंदे यांनी सांगितले.

शिकणाऱ्या मुली घरकामाला

सरकारच्या बालकामगारांच्या व्याख्येनुसार १४ आतील मुले ही बालकामगार म्हणून गणली जातात. तर १४ ते १८ वयोगटातील आणि धोकादायक उद्योग व्यवसायात काम करणारी मुले बालकामगार समजली जातात. मात्र कारोनाकाळात अनेक १४ ते १८ वयोगटातील मुले मजुरीकडे वळली आहेत. ‘मुंबईत वांद्रे परिसरात शिक्षण घेणारी १० वर्षीय मुलगी तीन चार घरात घरकाम करू लागली आहे. या मुलीच्या आईचा रोजगार बुडाला आहे. या दोघी मायलेकी घरकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवू लागल्या आहेत,’ असे क्राय संस्थेशी संलग्न असलेल्या हॅबिटाट अँड लाईवलीहूड वेल्फेअर असोसिएशनच्या प्रमुख श्वेता दामले यांनी सांगितले.

संस्थेचे सर्वेक्षण

संकल्प मानव विकास संस्था परभणीने केलेल्या पाहणीत ऊस तोडणी, वीटभट्टी, शेतात आणि घरकामाला बाल मजुरांचे प्रमाण वाढल्याचे आढळून आले. संस्थेला जालना जिल्ह्यात १४ वर्षांखालील ७४२ बालमजूर आढळून आले. त्यातील १६२ मुलांना बालमजुरीतून मुक्त करण्यात आले. परभणी जिल्ह्यात १४ वर्षांखालील ५७९ बालमजूर आढळून आले. यातील १२९ मुलांना बालमजुरीतून मुक्त करण्यात आले, असे संकल्प मानव विकास संस्थेचे सुधाकर क्षीरसागर यांनी सांगितले. तर १० ते १८ वयोगटामधील बालमजूर अहमदनगर जिल्ह्यात ७९, पुणे २७, औरंगाबाद ४२ आढळून आल्याची माहिती क्राय या संस्थेने दिली. कलापंढरी संस्थेने केलेल्या पाहणीत लातूर आणि नांदेड जिल्ह्यात जानेवारी ते मार्च या कालावधीत बालमजुरांची ४६९ प्रकरणे समोर आली आहेत. यातील२५९ मुले शेतीच्या, तर ऊसतोड मजुरीच्या कामात ६६ मुले आढळून आली आहेत. दरम्यान संस्थेने केलेल्या पाहणीत ऊसतोडणी करताना आढळलेल्या मुलांमध्ये ६० मुली आहेत.

कारवाई नगण्य

कामगार विभागाकडून एप्रिल २० ते मार्च २१ या वर्षात १४ वर्षांच्या आतील २१ बालकामगार आणि १४ ते १८ मधील धोकदायक उद्योगात काम करणारे ३४ बालकामगार सापडले. तर बालमजुरी केल्याप्रकरणी २७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

अडीच लाख विद्यार्थी प्रवाहाबाहेर!

(पान १ वरून) संख्येच्या तुलनेत दहावीच्या परीक्षेचा अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत साधारण अडीच लाखांची तफावत आहे. म्हणजेच इतक्या संख्येने विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडले.

> “विद्यार्थ्यांच्या नोंदणीत एवढा फरक दिसणे काळजीचे आहे. अनेक विद्यार्थी स्थलांतरामुळे या प्रवाहात राहिले नसल्याची शक्यता आहे. मात्र एवढा फरक का दिसतो, हे विद्यार्थी कुठे गेले याचा शोध घेणे महत्वाचे आहे.
>
> - वसंत काळपांडे, शिक्षणतज्ज्ञ

लोकसत्ता ADVERTORIAL

।। वास्तू परिचय ।।

An initiative by RED* Read. Engage. Deliver.

न्यू नॉर्मल, ब्रेकिंग द चेन आणि बांधकाम व्यवसाय !

''तुमच्या अंतर्गत गोंधळासाठी बाहेरील जगाला दोष देणे थांबवा.''

स्टीव्ह माराबोली

स्टीव्ह माराबोली, हे एक अमेरिकन इंटरनेट रेडिओ समालोचक आहेत, प्रेरणादायी वक्ते व लेखक आहेत. कुणीही प्रेरणादायी वक्ता तुम्ही घालून ठेवलेल्या गोंधळासाठी इतर कुणाला जबाबदार धरणार नाही, स्मार्ट पुणे शहरातील व महाराष्ट्रातील लोकांनी जीवनाचे हे मूलभूत तत्व समजून घेण्याची वेळ आली आहे. लॉकडाउनचा दुसरा हंगाम सुरू झालाय, विषाणूची दुसरी लाट आलीय, इतर कोणताही प्रदेश, राज्य किंवा देशाने या लाटेची (खरेतर आपण तिला त्सुनामीच म्हटले पाहिजे) इतकी भीषण दाहकता अनुभवलेली नाही, जेवढी आपल्या सर्वांत प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्राने अनुभवली. एवढेच नाही तर कोणत्याही समाजाने किंवा सरकाराने या विषाणूच्या लाटेला इतक्या दयनीयपणे (म्हणजे मूर्खपणे) तोंड दिले नसेल जेवढे आपण देत आहोत. एक लक्षात घ्या, मी ''आपण'' असे म्हणतोय व मी कुणालाही दोष देत नाही कारण विषाणू कुणाच्या शरीरावर हल्ला करतोय हे पाहात नाही, तसेच शत्रू सीमेवरून गोळी झाडताना जवानाचा रंग, जात, धर्म किंवा रेजिमेंट पाहात नाही. म्हणून लष्कर, सैन्य किंवा सशस्त्र सैन्य दल कोणत्याही युद्धात लढताना काटेकोर शिस्त व एकजूट दाखवते जी आपण सोयीस्करपणे विसरलो आहोत किंवा तिच्याकडे दुर्लक्ष करत आहोत. दुर्दैवाने, युद्धामध्ये तुमच्या अज्ञानाला क्षमा नसते मग तुम्ही कितीही निरागस असाल किंवा अतिशय प्रामाणिकपणे लढत असाल, तरी गोळी हा विचार करत नाही तिला फक्त तुम्ही समोर आहात एवढेच माहिती असते व ती थेट तुमच्यावर हल्ला करते, धडाम्!

आता, पहिल्या मुद्द्याविषयी म्हणजेच माझ्या क्षेत्राविषयी किंवा कामाविषयी किंवा व्यवसायाविषयी अर्थात रिअल इस्टेटविषयी बोलू ज्यांना लोक ''बिल्डर'' असे म्हणतात! साधारण आठ महिन्यांपूर्वी म्हणजे गेल्यावर्षी सप्टेंबरपासून रुग्ण संख्या कमी होऊ लागली होती, पहिले लॉकडाउन संपले होते व लोक पुन्हा नव्याने सामान्यपणे जगू लागले होते. पुण्यामध्ये तसेच महाराष्ट्रमध्ये इतर कोणत्याही उद्योगांपेक्षा दोन उद्योगांना या काळात सर्वाधिक फटका बसला ते म्हणजे हॉटेल (उपाहारगृहे) व रिअल इस्टेट, कारण या दोन्ही उद्योगांवरचे निर्बंध सगळ्यात शेवटी हटविण्यात आले. याच दोन्ही उद्योगांमध्ये सर्वाधिक स्थालांतरित मजूर काम करतात व त्यापैकी बहुतेक हे इतर राज्यातील असून तिथे परिस्थिती एवढी गंभीर नव्हती, तिथली कामे जुलैच्या मध्यापासून सुरूही झाली.

मला मान्य आहे की रिअल इस्टेटपेक्षाही हॉटेल उद्योगाला (उपाहारगृहांना) मोठा फटका बसला याचे कारण त्यांचे उत्पादन हे नाशवंत असते व त्यामध्ये करावी लागणारी गुंतवणूक. याउलट रिअल इस्टेटमध्ये उत्पादन नाशवंत नसते, जमीनीचे दर कालांतराने वाढतच जातात कधीकधी खूप संथपणे वाढत असले तरीही ते वाढतात. मात्र रिअल इस्टेटमध्ये करावी लागणारी गुंतवणूक अतिशय मोठी असते, इथे मी नेहमी ऑटोमोबाईल क्षेत्राचे उदाहरण देतो की एखादी कार किंवा घर खरेदी करणे हे प्रत्येक मध्यमवर्गीय किंवा उच्च मध्यमवर्गीय व्यक्तीचे स्वप्न असते. जेव्हा, एखादा मध्यमवर्गीय पुरुष (किंवा महिला) कार खरेदी करायला जातो तेव्हा तो मर्सिडीज किंवा ऑडी बघेल का जिची सुरुवात कमीत कमी ४० लाखांपासून होते, याचे उत्तर आहे, अजिबात नाही, तर ती व्यक्ती साधारणतः दहा लाखाच्या आतीलच कार पहाते ! मात्र जेव्हा एखादी व्यक्ती एक चांगले दोन बीएचके घर खरेदी करण्यासाठी जाते तेव्हा त्याची सुरुवात ५० लाखांपासून होते व तरीही तो एवढी रक्कम मोजण्यासाठी तयार असतो, नेमका हाच रिअल इस्टेट व इतर कोणत्याही उत्पादनातील फरक आहे. म्हणूनच रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक तसेच जोखीम अतिशय जास्त असते, मात्र दुर्दैवाने बहुतेक लोक (अगदी बांधकाम व्यावसायिकही) या उद्योगाची केवळ नफ्याचीच बाजू पाहतात व अडचणीत येतात.

मला सुरुवातीलाच एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते, की मी रिअल इस्टेट म्हणजेच बांधकाम सुरू ठेवण्याचे समर्थन अजिबात करत नाहीये, तसेच मी सरकारी अधिकारी त्याचसोबत या विषाणूविरुद्ध लढण्यासाठी प्रत्येकजण करत असलेल्या प्रयत्नांचा अनादरही करत नाही. मला रोगाची साथ ज्या वेगाने पसरते आहे त्याचे गांभीर्य आहे व त्यामुळे निर्माण झालेल्या गोंधळाची पूर्णपणे जाणीवही आहे. मात्र त्याचवेळी पुणे प्रदेशातील जवळपास ५ लाख लोक रिअल इस्टेटमधील बांधकामावर अवलंबून आहेत हे आपल्याला विसरून चालणार नाही व जवळजवळ तेवढेच लोक या बांधकामांमध्ये आपली घरे शोधत आहेत! अधिकृत आकडेवारी उपलब्ध नसली तरीही पुणे महानगरपालिका क्षेत्र, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण या सगळ्यांच्या हद्दीतील रिअल इस्टेटशी संबंधित सर्व कामे ठप्प झाली आहेत. पैशांपेक्षा जीव अधिक मोलाचा हे मान्य असले तरीही कुणाच्या चुकीमुळे जनतेवर हा लॉकडाउन लादला जातोय व काही लोकांच्या चुकीची किंमत कोण मोजतोय, यासारखे प्रश्न रिअल इस्टेटने आता सरकारला विचारायची वेळ आली आहे. आपण गेल्यावर्षी लॉकडाउन स्वीकारले व कोणतीही तक्रार न करता त्याचे परिणाम भोगले. त्यावेळी सरकारनेही मुद्रांकशुल्क कमी करून व इतरही सवलती देऊन पाठिंबा दिला. मात्रा यावेळच्या लॉकडाउनमुळे रिअल इस्टेटला दुहेरी मार बसणार आहे (आधीच बसला आहे), एक म्हणजे संपूर्ण बांधकाम प्रक्रियेला खिळ बसणार आहे कारण इतर सर्व राज्यांमध्ये कामकाज सुरू आहे, असेही मजूर इथे काम करायला वैतागले आहेत व आता जे इथे कम करत आहेत ते सुद्धा आपल्या राज्यात पळ काढण्याच्या मार्गावर आहेत. लॉकडाउन व संचारबंदी महिनाभर किंवा त्याहून अधिक काळासाठी असली तरीही त्यामुळे झालेला गोंधळ व बसलेला फटका यामुळे बांधकाम प्रक्रियेवर पुढील पाच ते सहा महिने परिणाम होईल कारण संपूर्ण मनुष्यबळ पुन्हा गोळा करणे व कामाला सुरुवात करणे हे काही यंत्रवत नाही!

दुसरे म्हणजे लॉकडाउन विषयीच्या अशा अनियमित धोरणांमुळे संपूर्ण बाजाराची भावना (म्हणजे घर खरेदी करणाऱ्यांची) विस्कळीत होते, कारण भविष्याविषयी अनिश्चितता असेल तर लोक घर घेण्यासारखे निर्णय लांबवणीवर टाकतात कारण ते एकदाच घेतले जाते व बहुतेकांसाठी ती सर्वात महागाची खरेदी असते, त्यामुळे मी त्यांना दोष देत नाही. हे झाले घरांचे, व्यावसायिक विभागात (प्रकल्पांबाबत) तर आणखी घबराट पसरलेली आहे. खरे पाहता त्याची गरज नाही, मात्र अशा परिस्थिती

लॉकडाउन व संचारबंदी महिनाभर किंवा त्याहून अधिक काळासाठी असली तरीही त्यामुळे झालेला गोंधळ व बसलेला फटका यामुळे बांधकाम प्रक्रियेवर पुढील पाच ते सहा महिने परिणाम होईल कारण संपूर्ण मनुष्यबळ पुन्हा गोळा करणे व कामाला सुरुवात करणे हे काही यंत्रवत नाही!

भल्याभल्यांची गाळण उडते व रिअल इस्टेटही या तर्काला अपवाद नाही. अनेक उद्योगांनी घरून काम करायची परवानगी दिलीय, त्याचप्रमाणे इतर क्षेत्रांमध्ये (पर्यटन, आतिथ्य वगैरे) मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात केली जात आहे, यामध्ये उत्पादन उद्योगाचाही समावेश होतो, यामुळे व्यावसायिक जागांची मागणी कमी झाली आहे ही वस्तुस्थिती आहे, मात्र ही तात्पुरती स्थिती आहे. योग्य ठिकाणी असलेली व्यावसायिक जागा सोन्यासारखी असते, तिचे दर स्थिर वाटू शकतात किंवा मागणी कमी होऊ शकते मात्र शेवटी सोने हे सोने असते, बरोबर? त्याचवेळी, हे एकेदिवशी संपेल व आयुष्य ''पुन्हा एकदा नव्याने सामान्य'' होईल व ज्यांची शहरामध्ये योग्य ठिकाणी व्यावसायिक जागा आहे, स्वतःचे घर आहे त्यांना नक्कीच अशी जागा स्वतःच्या मालकीची असल्यामुळे फायदा होईल, रिअल इस्टेटमध्ये नेहमी असेच होत आले आहे. मी एक बांधकाम व्यावसायिक असल्यामुळे असे म्हणत नाही, तर केवळ तर्कशुद्ध भूमिका मांडतोय. रिअल इस्टेटमध्ये तुम्ही जेव्हा भविष्याकडे योग्य नजरेने पाहता (यात जोखीम असते हे मान्य आहे, मात्र ती तुमच्या कामाचा एक भाग आहे) व त्यानुसार वर्तमान काळात पावले उचलता तेव्हाच पैसे कमवू शकता.

अनेक कुटुंबांमध्ये घरून काम करण्याचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत कारण नवरा बायको आपापले लॅपटॉप घेऊन बसलेली असतात, व मुले ऑनलाईन असतात हे कोणत्याही घरासाठी फारसे चांगले दृश्य नाही. म्हणूनच, आज ना उद्या पुन्हा ऑफिसमध्येच काम करायलाच सुरुवात होईल, लवकरच माहिती तंत्रज्ञान व सेवा पुरवठा क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांना जाणीव होईल की घरून काम करण्याच्या संस्कृतीने प्रत्यक्षात त्यांच्या महसूलावरच वाईट परिणाम होतोय, असा माझा तर्क आहे. जिथे लोकांना गरज असते, तिथेच व्यवसाय असतो व त्यासाठी आधी तिथे लोक असावे लागतात, जे पुण्यामध्ये नक्कीच आहेत.

*पुणे हा प्रदेश संपूर्ण राज्याचे वर्तमान व भविष्य आहे, या साथीनंतर लोक अशा शहरातच राहणे पसंत करतील जिथे सार्वजनिक आरोग्य सुविधा (खाजगीही) आहेत. म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्रातून उपचार घेण्यासाठी लोक पुण्यामध्ये येत आहेत, यामुळे शहरातील संपूर्ण सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधेवर ताण पडून ती कोलमडली, तसेच संपूर्ण देशभर पुणे शहराविषयी चुकीच्या बातम्या पसरल्या.

देशातील कुठल्याही भागाच्या तुलनेत या प्रदेशाचे भविष्य तसेच निवासी व व्यावसायिक जागांचे भवितव्य अतिशय उज्ज्वल आहे, कारण या प्रदेशात पाणी, सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ, संस्कृती असे कोणत्याही व्यवसायाच्या वाढीसाठी आवश्यक असलेले सगळे घटक आहेत, हे वाणिज्य शाखेचा शिकाऊ उमेदवारही तुम्हाला सांगू शकेल.

वस्तुस्थिती अशी आहे की पुणे हे इतर कोणत्याही शहरापेक्षा जास्त सुरक्षित आहे व इथे अतिशय उत्तम सार्वजनिक आरोग्य सुविधा आहेत व इतर प्रदेशांपेक्षा इथले लोकही अधिक जागरुक आहेत, मात्र (माय बाप सरकारच्या) गोंधळात टाकणाऱ्या धोरणांमुळेच हा सावळा गोंधळ झाला आहे. आधी आपण म्हणतो की न्यू नॉर्मल म्हणजेच नवीन सामान्य परिस्थिती अशीच असणार आहे, जेव्हा परिस्थिती हाताबाहेर जाते तेव्हा आपण म्हणतो की 'साखळी तोडा', त्यानंतर आपण दररोज नवीन परिपत्रक काढून साखळी तोडतच राहतो.

रिअल इस्टेटमधील परिस्थिती आणखी बिकट आहे कारण बांधकामाला परवानगी देण्यात आलीय मात्र बांधकाम स्थळी राहणारे मजूरच त्यावर काम करू शकतात, हा काय विनोद आहे? अशा परिस्थितीत लहान प्रकल्पांनी काय करायचे कारण सगळेच मजूर बांधकामस्थळी राहात नाहीत, मग त्यांना कामावर येऊ दिले जाणार नाही का? त्याचवेळी बांधकाम साहित्याशी संबंधित कोणतीही दुकाने व शोरूम उघडायला परवानगी नाही तसेच वास्तुरचनाकारांसारख्या सल्लागारांना कार्यालयही उघडायला परवानगी नाही व तुम्ही म्हणता की बांधकाम सुरू ठेवा, अरे व्वा!

कोणतेही शासकीय प्राधिकरण रिअल इस्टेटसाठी व्यवहार्य, सोपी व स्पष्ट मार्गदर्शक तत्वे का तयार करू शकत नाही, हे मला कधीच समजलेले नाही.

– संजय देशपांडे

स्वतःचे घर घेताय? मग हे नक्की वाचा...

स्वतःचे घर हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो आणि म्हणूनच स्वतःचे घर असावे, हे स्वप्न प्रत्येक जण पहातो. घर घेण्यासाठी योग्य वेळ कोणती, गुंतवणूक म्हणून गृहखरेदी किती महत्त्वाची आहे, सध्याची बाजाराची परिस्थिती काय आहे या विषयी जाणून घेऊयात अधिक माहिती.

शेतीप्रधान देश म्हणून ओळख असलेल्या आपल्या देशात शेतीनंतर बांधकाम क्षेत्र हे देशात रोजगार उपलब्ध करून देणारे सर्वांत मोठे क्षेत्र आहे. किमान २५० व्यवसाय हे शेतीशी संलग्न असून जीडीपीमधील या क्षेत्राचा वाटा हा ५ ते ७% इतका आहे. भविष्याचा विचार केला तर इतर कोणत्याही क्षेत्रातील गुंतवणुकीपेक्षा बांधकाम क्षेत्रातील गुंतवणूक हा एक सर्वसमावेशक व उत्कृष्ट पर्याय असल्याचे समोर आले आहे. याबरोबरच गुंतवणुकदाराला विक्रीबरोबरच मालमत्ता भाडेतत्त्वावर देण्यामधून देखील वेळोवेळी फायदा मिळविता येतो. अनेकवेळा आर्थिक मंदीच्या काळात बांधकाम क्षेत्राने गुंतवणुकदाराला तारल्याची देखील उदाहरणे आहेत.

सध्या जागतिक महामारीचा फटका हा बांधकाम व्यवसायाला बसला असला तरी, गृहखरेदीदाराला याचा फायदा घेता येऊ शकतो. गृहकर्जावरील ऐतिहासिक म्हणावा असा सर्वात कमी व्याजदर सध्या आकारला जात आहे

व्यवसायाला बसला असला तरी, गृहखरेदीदाराला याचा फायदा घेता येऊ शकतो. गृहकर्जावरील ऐतिहासिक म्हणावा असा सर्वात कमी व्याजदर सध्या आकारला जात आहे, यापेक्षा व्याजदराच्या किंमती आणखी कधी कमी होतील हे सांगता येणार नाही. महिलेच्या नावावर घर खरेदी केल्यास मुद्रांक शुल्कात सवलत मिळत आहे. व्याजाच्या रकमेवर देखील टॅक्स बेनिफिट मिळत आहे याबरोबरच बांधकाम व्यवसायिक देखील सध्या सर्वांत कमी दरांमध्ये गृहप्रकल्पांची विक्री करीत आहे. त्यामुळे सध्याचा काळ हा गृहखरेदीच्या व गुंतवणूकीच्या दृष्टीने अगदी योग्य काळ आहे, असे निरीक्षण आहे.

मालमत्ता खरेदीची सर्व नोंदणी ही ऑनलाईन पद्धतीने होत असल्याने यावर सरकारची नजर असते. इतकेच नव्हे तर कागदपत्रे हरविल्यास सरकारकडून ती पुन्हा मिळविणे देखील आता शक्य आहे. बँक कर्जावर मालमत्ता खरेदी करीत असताना त्याची बँकेच्या वतीने तपासणी होत असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने काळजी घेतली जाते. निवासी मालमत्ता ही खरेदीच्या किंमतीवर किमान ३ ते ५ % भाडे देऊ शकते व मालमत्ता जुनी असेल तर पुनर्विकासाअंतर्गत चांगला परतावा मिळू शकतो, याचा देखील फायदा गुंतवणूकदाराला मिळू शकतो.

वाढती मागणी, मर्यादित पर्याय, सिमेंट आणि स्टीलच्या वाढत्या किंमती यामुळे नजीकच्या भविष्यात बांधकाम क्षेत्रातील गुंतवणुकीच्या किंमती या निश्चितपणे वाढतील. या उलट सध्या कमी मागणी व कमी किंमत असल्याने हाच काळ खरेदी व गुंतवणूकीसाठी योग्य आहे. याच दरम्यान बांधकाम क्षेत्रातील विक्रीमध्ये वाढ झाल्यास अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास देखील मदत होणार आहे.

बांधकाम क्षेत्र हा एक 'फिजीकल सेट' असल्याने तो हरवू किंवा चोरीला जाऊ शकत नाही. जर योग्य प्रकारे त्याची काळजी घेतल्या गेली तर अगदी पुढच्या काही पिढ्यांसाठी देखील तो गुंतवणूकीचा एक महत्वपूर्ण पर्याय ठरतो.

जागतिक महामारीच्या अनुभवावरून लाखो नागरिकांना स्वतःच्या घरामुळेच एक मानसिक आधार मिळाला आहे. अनेकांना या काळात घराने सुरक्षित ठेवले. घराचे हे महत्त्व अधोरेखित होत असताना नाईटफ्रँक इंडियाच्या सर्वेक्षणानुसार पुण्यासह भारतातील ८ शहरांमध्ये गृहखरेदीमध्ये मागील वर्षीच्या पहिल्या तिमाहीमध्ये तब्बल ४४% वाढ झालेली पहायला मिळाली. मात्र कोविडच्या दुस-या लाटेमुळे हा दर पुन्हा कमी होऊ शकतो. पण असे असले तरीही गुंतवणूकीसाठी इतर क्षेत्रांपेक्षा बांधकाम क्षेत्र हेच सध्या जास्त फायद्याचे आहे.

महारेराच्या कायद्यांमुळे आता गृहखरेदी व त्यामधील गुंतवणूक आणखी सुरक्षित झाली आहे. बांधकाम व्यवसायिकांना दिलेल्या वेळेत घरे हस्तांतरीत करावी लागत असल्याने यामध्ये ग्राहकांचाच फायदा आहे. दुस-या बाजूला इंटरनेट, चॅनल पार्टनर यामुळे गृहखरेदीची प्रक्रिया सोपी झाली आहे. नोंदणीसाठी आवश्यक सर्व बाबी बांधकाम व्यवसायिक आणि चॅनल पार्टनर पहात असल्याने खरेदीदाराला घर खरेदी करणे हे पहिल्यापेक्षा अधिक सोपे झाले आहे.

परवडणा-या घरांचा विचार केल्यास पंतप्रधान आवास योजनेचा मिळणारा फायदा, गरजेच्या वेळी प्रॉपर्टीच्या नावे घेता येणारे कर्ज या सुद्धा या क्षेत्रातील गुंतवणूकदारांसाठी जमेच्या बाजू आहेत. परदेशात वास्तव्यास असलेल्या भारतीयांना देखील महामारीच्या या पार्श्वभूमीवर भारतात आपले स्वतःचे घर असावे व भारतातील बांधकाम क्षेत्रात गुंतवणूक करण्याचे महत्व लक्षात आले आहे.

– अरविंद जैन
सचिव, क्रेडाई पुणे मेट्रो

कल का क्या भरोसा...
बुकिंग करून वाट पाहण्यापेक्षा...
तयार फ्लॅटमध्ये लगेच रहायला या...
अतुलनगर शेजारी वाराणसी सोसायटी मध्ये
RMD सिंहगड कॉलेज मागे, सर्वांगसुंदर गृहप्रकल्प
~~₹80~~ लाख | ₹77 लाख
*सर्व खर्चासहित
आदित्य टेरेस वारजे
रेडीपझेशन प्रशस्त फ्लॅटस्, पेन्ट हाऊस
• प्रत्येक मजल्यावर तीन दिशांना ओपन २ च फ्लॅटस्.
• सुरक्षित सोसायटीतील स्वतंत्र रस्ते व ओपन स्पेस.
स्पेशल ऑफर साठी संपर्क करा
8975338283

GANGOTREE HOMES & HOLIDAYS
BE A PUNEKAR AT
'AIR'NDWANE
BREATHE IN THE FRESH AIR
SUHRUD
2.5 & 3 BHK HOMES
88888 36564 / 88888 18964

Homes that give your old melodies, a new rhythm.
PROJECTS AT SB Road | Dahanukar Colony
Shivaji Housing Society | Karve Road
Ideal Colony | Lokmanya Colony | Kothrud
Patwardhan Baug | Erandwane
Prabhat Road | Model Colony | Aundh
7030 432 432
ravetkargroup.com
Ravetkar

सुखी जीवनाची सुरूवात..
अमृत कलश
1, 2 BHK बजेट फ्लॅटस्
कॅनाल रोड, शिक्रापूर, पुणे
Booking Amount Rs.51000/-
स्पेशल ऑफर
1 BHK @ Rs.15.82 लाख
2 BHK @ Rs.21.37 लाख
(Stamp Duty, Regn.,GST extra)
LAXMI-RAMANA
बुकिंगसाठी संपर्क 9822175006
* प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत रु. २,६७,०००/- ची सुट (नियम व अटी लागू)
AMRUTKALASH PROPERTIES
अमृत कलश प्रॉपर्टीज्
Reg. Office : B-15, "Sampada" Apartment, 695, Narayan Peth, Pune - 30.
Ph.: 020-64011390 / 91.Email : amrutkalashproperties@gmail.com
साईट : अमृत कलश, गट नं. १२५१, कॅनाल रोड, शिक्रापूर, पुणे

Little Earth
Masulkar City
Within PCMC Corporation Limit
आजच बुक करा
2 BHK 41.11L to 54.33L
ALL INCLUSIVE
3 BHK 72.63L
लिटिल अर्थ, पिंपरी-चिंचवड परिसरातील किवळे येथील सर्वात मोठी टाऊनशिप घेऊन आली आहे
तुमच्या स्वप्नातील घर साकार करण्याची सुवर्णसंधी!
Actual Photograph
AMENITIES
2 Club Houses | Mini Theater | Amphitheater | Outdoor Gym | Kids Play Area | Central Garden | Yoga Room
SAMPADA | DLIPL
Sr. No. 19, Kiwale-Mamurdi Road Kiwale, Pune - 412013.
9021 90 5000
www.littleearthpune.com
https://maharera.mahaonline.gov.in/

COMMERCIAL PREMISES ON RENT IN PUNE
KATARIA CHAMBERS
Semi Furnished Office : 2200 Sq. ft.
ITI Road, Sanewadi, Opp. Reliance Digital, Aundh
ADITYA BUSINESS CENTER
Offices : 1000, 1500, 4500 Sq. ft.
Near Lullanagar Chowk, Camp - Kondhwa Road, Near Jyoti Restaurant Kondhwa Khurd
ADITYA CENTEEGRA
Veg Restaurant, Coffee Shop & Snacks Centre, Office Space
Deccan Gymkhana, F.C. Road, Next to Mantri House, Pune
ADITYA NAKODA ENCLAVE
Shop/Offices : 310, 500 & 810 Sq. ft.
Main Sinhagad Road, Near Axis Bank, Opp. Pu. La. Deshpande Garden, Parvati, Pune
For further details
9922960339 / 9689899120 / 02024490851/2
Email : adityacenteegra@gmail.com
rental.adityabuilders@gmail.com
Website : www.adityabuilders.com
www.adityacenteegra.com
ADITYA BUILDERS

लसीकरणाचा राजस्थानी मार्ग...

सिद्धार्थ ताराबाई

राज्यावलोकन
राजस्थान

राजकीय अस्थिरतेची पार्श्वभूमी असतानाही राजकीय मदभेद बाजूला सारून राजस्थान सरकारने करोना संकटावर लक्ष केंद्रित केले आणि लसीकरणातही आघाडी घेतली, ती कशी?

जेव्हा देशात करोना विषाणू साथीच्या संभाव्य दुसऱ्या लाटेला तोंड देण्यासाठी रणनीती आखली जात होती आणि करोनावरील लशी चाचणीच्या अंतिम टप्प्यात होत्या, तेव्हा 'राजांचे आणि राजपुत्रांचे राष्ट्र' अशी ओळख असलेले राजस्थान हे राज्य १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांच्या लसीकरणाचे नियोजन करीत होते. इतकेच नव्हे, तर या राज्याने त्यासाठी देशातील दोन लस उत्पादक कंपन्यांकडे लसमात्रांसाठी आगाऊ मागणीही नोंदवली होती.

इतक्या लवकर अशा प्रकारचे नियोजन करून राजस्थानने काय साध्य केले? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र या दोन लोकसंख्येने आणि आकाराने मोठ्या राज्यांशी त्याची तुलना करावी लागते. महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशपाठोपाठ लसीकरणाच्या बाबतीत हे राज्य आज तिसऱ्या स्थानावर आहे. त्यासाठी त्याला 'लसमहोत्सव' साजरा करण्याची आवश्यकता भासली नाही.

देशात ११ ते १४ एप्रिलदरम्यान 'टिका उत्सव' म्हणजे लसमहोत्सव साजरा झाला. तो जवळजवळ फसला. त्या चार दिवसांतील लसीकरणाचे आकडे आणि त्याच महिन्यातील अन्य दिवसांच्या आकड्यांची तुलना केली तर हे लक्षात येते. 'कोविड१९इंडिया(डॉट)ऑर्ग' या संकेतस्थळावरील आकडेवारीनुसार लसमहोत्सवाआधी ८ ते १० एप्रिल या तीन दिवसांत एक कोटी १३ लाख ९६ हजार ४७४ लसमात्रा देण्यात आल्या, तर लसमहोत्सवाच्या चार दिवसांत एक कोटी २८ लाख ९९ हजार ९१ लसमात्रा देण्यात आल्या.

खरे तर कमीतकमी कालावधीत, म्हणजे चार दिवसांत जास्तीतजास्त लोकांच्या लसीकरणाचे उद्दिष्ट होते. पण जास्तीतजास्त लोकांचे लसीकरण म्हणजे नेमक्या किती, हे मात्र जाहीर करणे सोईस्कर टाळले गेले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधून लसमहोत्सव साजरा करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

अन्य राज्यांप्रमाणे राजस्थानसाठीही 'लसमहोत्सव' हा नवा शब्द होता. पण लसीकरण हा काही चार दिवसांचा उत्सव नसतो; तर नियोजनबद्ध पद्धतीने चालणारी ती एक निरंतर प्रक्रिया असते आणि ती तशीच राबवायची असते, अन्यथा त्यातून गोंधळ माजण्याची भीती असते, याची जाणीव अनुभवी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांना होती. म्हणूनच त्यांनी 'लसमहोत्सव' अशा आकर्षक आणि लोकानुनयी शब्दाच्या आहारी न जाता, गेल्या वर्षीच्या नोव्हेंबरमध्येच सहा महिन्यांचे लसीकरणाचे नियोजन केले होते. १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांच्या लसीकरणात देशात तिसरे स्थान हे त्या नियोजनाचेच फलित.

१८ ते ४४ वयोगटासाठी १ मेपासून लसीकरण सुरू करण्यात आले. त्यात राजस्थानने २६ मेपर्यंत एकूण १४ लाख ९१ हजार ५८१ लसमात्रा दिल्या. याबाबतीत पहिल्या क्रमांकावर बिहार (१५ लाख २७ हजार मात्रा), दुसऱ्या क्रमांकावर उत्तर प्रदेश (१५ लाख १४ हजार) आणि तिसऱ्या क्रमांकावर राजस्थान आहे. सध्या लशींच्या तुटवड्यामुळे सर्वच राज्यांतील १८ ते ४४ वयोगटाचे लसीकरण रडतरखडत सुरू आहे.

राजस्थानने २६ मेपर्यंत एकंदर एक कोटी ६२ लाख ८३ हजार ४२० लसमात्रा दिल्या, असे केंद्रीय आरोग्य विभागाचे आकडे सांगतात. लसीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्र (दोन कोटी १२ लाख) आणि उत्तर प्रदेश (एक कोटी ६८ लाख) यांच्या पाठोपाठ राजस्थानची वाटचाल सुरू आहे.

राजस्थानने हे यश चार दिवसांच्या लसमहोत्सवातून मिळवलेले नाही. लसीकरण मोहीम राबवण्यात अनेक अडथळे होते, अडचणी होत्या. त्यांचा आधी विचार केला गेला. स्थानिक पातळीपासून वरिष्ठ स्तरापर्यंत नियोजन करण्यात आले. त्यात प्रशासनातील अधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील अधिकारी-कर्मचारी, आशा कार्यकर्त्या, दाई, सरपंच आदी सर्वांचे सक्रिय साहाय्य घेतले गेले. ८० हजारांहून अधिक आरोग्यमित्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यासंदर्भात 'द इंडियन एक्स्प्रेस'ला दिलेल्या मुलाखतीत राजस्थानचे आरोग्य सचिव सिद्धार्थ महाजन म्हणाले, ''आम्ही अगदी सुरुवातीपासून प्रत्येक गोष्टीचे तपशीलवार नियोजन केले. त्यात ग्रामपंचायतीपासून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना सहभागी करून घेतले. नेतृत्व जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवले. त्यामुळे जेव्हा ६० वर्षांवरील नागरिकांचे लसीकरण सुरू झाले तेव्हा देशात प्रतिदिन होणाऱ्या एकूण लसीकरणात राजस्थानचे योगदान २० ते २५ टक्के होते.''

राजस्थानातील लसीकरण मोहिमेची ही गोष्ट उद्बोधक आहे. मुख्यमंत्री गेहलोत हे या गोष्टीचे ७० वर्षीय नायक आहेत, पण त्याहीपेक्षा खरे नायक आहेत लसीकरणासाठी वरिष्ठ पातळीपासून गावपातळीपर्यंत राबणारे सर्वच संबंधित अधिकारी, डॉक्टर, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, सरपंच, आरोग्यसेवक, आशा कार्यकर्त्या, स्वास्थ्यमित्र. या सर्वांनी गेहलोत यांच्या 'निरोगी राजस्थान' या हाकेला प्रतिसाद देत झोकून देऊन काम केले.

पायाभूत सुविधा तयार असल्या तरी लसीकरणात मूलभूत अडचणी होत्या. नागरिकांमध्ये लसीकरणाबाबत भीती होती, गैरसमज होते. परिणामी, प्रतिसाद अत्यल्प होता. तो वाढवण्यासाठी प्रत्येक गावात सरपंचाच्या मार्गदर्शनाखाली समिती स्थापन करण्यात आली. त्यात आशा कार्यकर्त्या, आरोग्यसेविका, डाटा ऑपरेटर यांचाही समावेश केला गेला. अनेक गावांमध्ये आधी सरपंचाने लस घ्यायची आणि मग ग्रामस्थांनी, असे धोरण राबवले गेले. आदिवासी भागांमध्ये शिक्षकांचा शब्द प्रमाण मानला जातो. तिथे जनजागृती करण्यासाठी त्यांचा वापर करण्यात आला. आरोग्यसेवक आणि आघाडीवरील कर्मचाऱ्यांनी समाजमाध्यमांचा प्रभावी वापर केला. त्यांनी आपआपल्या फेसबुक खात्यावर लसीकरणाविषयीचे गैरसमज दूर करणारे चित्रसंदेश, दृक्श्राव्य संदेश प्रसारित केले. जनजागृतीच्या या मोहिमेत ८० हजारांहून अधिक 'स्वास्थ्यमित्रां'नी जानेवारी-फेब्रुवारीत घरोघर जाऊन लोकांना लस घेणे किती आवश्यक आहे, हे समजावून सांगितले, त्यांचे गैरसमज दूर केले.

शेतकरी आंदोलनापासून 'टूलकिट' या शब्दाला जाणीवपूर्वक बदनाम केले जात आहे. पण असे 'टूलकिट' प्रत्येक लढ्यात, चळवळीत महत्त्वाचे ठरते. राजस्थान शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाच्या संकेतस्थळाला भेट दिल्यावर या राज्याचे करोनाविरोधातील 'टूलकिट' किती प्रभावी आहे आणि ते तयार करण्यासाठी किती कष्ट घेतले गेले असावेत, याची कल्पना येते. जनजागृतीची साधनसामग्री १२ भाषांमध्ये आहे. त्यात ॲनिमेशन व्हिडीओ संदेश सर्वाधिक आहेत. शिवाय लोकसंगीत ते तरुणाईमध्ये लोकप्रिय असलेल्या रॅप संगीताचा वापरही जनजागृतीसाठी केला आहे. ते दृक्मुद्रित संदेश हजारो लोकांनी पाहिले आहेत. हिंदी भाषेतील दृक्मुद्रणे तर लाखो लोकांनी पाहिले. छोट्या-छोट्या नाट्यमय प्रसंगांतून मोठे संदेश देण्याचे काम या दृक्मुद्रणांच्या माध्यमातून केले जात आहे. एकंदर करोनाविरोधी लढ्यात राज्याचे प्रमुख या नात्याने मुख्यमंत्री गेहलोत यांच्यासह त्यांच्या संपूर्ण मंत्रिमंडळाच्या सक्रिय नेतृत्वाची झलक दिसते. त्यांच्या सक्रियतेमुळेच आघाडीवर काम करणाऱ्या योद्ध्यांचा उत्साह वाढत असल्याचे वरिष्ठ अधिकारी सांगतात. अगदी पोटनिवडणुकीच्या काळातही त्यांनी दररोजची आढावा बैठक चुकवली नाही.

राजस्थानमध्ये याआधी भाजपचे सरकार होते. पण सत्ता गेल्याने राजस्थान भाजपचे नेते अस्वस्थ होते. मध्यंतरी काँग्रेसची सत्ता उलथवून टाकण्यासाठी भाजपने भेदनीतीचा अवलंब केल्याचा आरोप झाला. पण तो प्रयत्न अपयशी ठरला. अशी राजकीय अस्थिरतेची पार्श्वभूमी असतानाही राजकीय मदभेद बाजूला सारून राजस्थान सरकारने करोना संकटावर लक्ष केंद्रित केले आणि लसीकरणात आघाडी घेतली.

siddharth.gangaram@expressindia.com

कुणाच्या यशाचे दावे खरे?

सुरक्षा आणि विकास हेच नक्षलींना योग्य उत्तर- या धोरणाला आता तिसेक वर्षे झाली. सुरुवातीला या चळवळीच्या विरोधात चाचपडत लढणाऱ्या सरकारांनी याच धोरणाचा सातत्याने पुनरुच्चार केला; पण गडचिरोलीच्या स्थितीत काय फरक पडला?

देवेंद्र गावंडे

१३ नक्षलवादी मारले गेल्यामुळे चर्चेत आलेले पैडी गाव. आठवडाभरापासून इथले सर्व लोक परांगदा झाले आहेत. तीन वर्षांपूर्वी कसनासूरजवळ ३९ नक्षलवादी ठार झाले होते. नंतरचे सुमारे तीन महिने या गावातले लोक बाहेर वास्तव्य करून होते. दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्रदिनी कुरखेडाजवळ झालेल्या स्फोटात १३ जवान शहीद झाले. त्यानंतर आजूबाजूच्या तीन-चार गावांतील लोक अनेक दिवस बेपत्ता होते. चकमक वा स्फोट झाला की इथल्या सामान्य लोकांची स्थलांतर करण्याची परंपरा गेल्या ४० वर्षांपासून कायम आहे. कारण एकच : मृत्यूची किंवा अटकेची भीती. घटनेत नक्षल मारले गेले तर फितुरीच्या संशयावरून चळवळीकडून छळ वा मृत्यू अटळ आणि पोलीस मारले गेले की मारहाण किंवा तुरुंगवारी ठरलेली. त्यामुळे दुर्गम भागातील कोणत्याही गावांना आपल्या परिसरात अशी घटना नको असते. दोन्हीकडील बंदुकींच्या कात्रीत अडकलेल्या या गावांची स्थिती काय दर्शवते? फक्त दहशत! या 'युद्धा'तील यशाच्या दाव्याच्या पार्श्वभूमीवरची अशी एकच घटना त्या गावांचे दैनंदिन जिणेच बदलून टाकते.

२००९ मध्ये धानोराजवळील मरकेगावला १४ पोलीस शहीद झाले. गावातील ४७ घरांमधील सगळ्यांवर खटले दाखल झाले, जे अद्याप सुरू आहेत. चकमकीत नक्षल मारले गेले की पोलीस जाहीर करतात : अमूक एका घटनेतला सूत्रधार ठार झाला. त्याच प्रकरणातल्या गावकऱ्यांवरचे खटले मात्र सुरूच राहतात. चार दशकांपूर्वी एका शिक्षकाचा हात तोडून नक्षलींनी त्यांच्या हिंसेची सुरुवात केली. आजही हे मृत्यूसत्र सुरूच आहे. अगदी परवाच त्यांनी गट्ट्याजवळ एका लग्नात शिरून एकाला ठार केले. ही चळवळ हवा त्याचा गळा कापते, कोट्यवधीची खंडणी राजरोसपणे वसूल करते. याचा अर्थ, दहशत कायम आहे असाच होतो. मग कुणाच्या यशाचे दावे खरे मानायचे? पोलीस की नक्षलींच्या? मग गेल्या ४० वर्षांत बदलले तरी काय?

गडचिरोलीत नक्षली कारवायांना सुरुवात झाल्यापासून आतापर्यंत १५ पोलीस अधीक्षक आले-गेले. त्यातले सुबोध जयस्वाल तर राज्याचे महासंचालक झाले. तरीही समस्या व त्यातून उद्भवलेली दहशत अजून कायम आहे. जेव्हा ही चळवळ पाय पसरू लागली होती, तेव्हा पोलिसांची संख्या तोकडी होती. दुर्गम भागात ठाणी नव्हती. आज सर्वत्र पोलिसांचा संचार आहे. केंद्र व राज्याचे मिळून १३ हजार पोलीस शेकड्याच्या संख्येत असलेल्या नक्षलींना शोधत असतात. त्यांच्या दिमतीला हजारो वाहनांचा ताफा आहे, जो मुंबई पोलीस दलापेक्षा मोठा आहे. या जवानांच्या मदतीसाठी, म्हणजे त्यांना नक्षलींचा सुगावा मिळावा म्हणून मोठी यंत्रणा उभी करण्यात आली. ज्यात नक्षलविरोधी अभियानाचे अधिकारी व कर्मचारी, केंद्रीय व राज्य गुप्तचर यंत्रणेत काम करणारे कर्मचारी, राज्य दहशतवादविरोधी पथकातील अधिकारी. शिवाय विशेष पोलीस अधिकारी म्हणून गावपातळीवर नेमलेले आदिवासी तरुण खबरे. तरीही नक्षलींचे अस्तित्व कायम आहे. एवढा मोठा फौजफाटा असूनही नक्षली ड्रोनद्वारे पोलीस ठाण्यांची पाहणी करण्याची हिंमत आजही दाखवू शकतात. काटेरी कुंपणाच्या आड सुरक्षित असलेल्या ठाणे व तळावरील जवानांना लगतच्या जंगलातून नक्षली शिवीगाळ करतात, गोळीबार करतात, पोलीस ठाण्याला खेटून भरणाऱ्या आठवडी बाजारात शिरून एखाद्याचा गळा कापतात. याला दहशत कमी झाली असे कसे समजायचे? याच चार दशकांत अनेक पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी (नक्षली मारण्याची) बजावली म्हणून त्यांना बक्षिसे, पदोन्नती मिळाली. गडचिरोलीचे प्रश्न मात्र कायम आहेत.

गडचिरोलीच्या जंगलात चळवळीतील अख्खी कारकीर्द घालवणारा जोगण्णा आधी अंध झाला. नंतर वृद्धत्वामुळे अपंगत्व आले. आज तो जिवंत आहे की नाही, हे कुणाला ठाऊक नाही; पण पोलिसांना सापडलेला नाही. उच्चशिक्षण घेतलेल्या नर्मदाने संपूर्ण आयुष्य याच जंगलात घालवले. प्रत्येक महत्त्वाच्या कारवायांत तिचा सहभाग राहिला. प्रभाव क्षेत्रातल्या प्रत्येक गावाने तिला पाहिले, पण पोलिसांना कधी ती सापडली नाही किंवा चकमकीत मारली गेली नाही. शेवटी कर्करोगाने तिला गाठले. अखेर उपचारासाठी हैदराबादला जातानाच ती पकडली गेली. जंगलाच्या बाहेर. अटकेच्या वेळी तिला शरण येते का, असे विचारले गेले. तिने ठाम नकार दिला. सध्या तुरुंगात आहे. गडचिरोलीत हिंसाचाराचे थैमान घालणारे अनेक नक्षली मारले गेले; पण जे कुख्यात होते त्यांनी शेजारच्या राज्यात शरण येणे सोयीचे मानले. यामागे त्यांचे उदात्तीकरण व्हावे हा हेतू नाही, पण संपूर्ण आयुष्य जंगलात राहून, पोलिसांशी लढून ते सुखरूप राहत असतील, तर सामान्य जनतेने त्यापासून बोध तरी काय घ्यायचा?

सुरक्षा आणि विकास हेच नक्षलींना योग्य उत्तर- या धोरणाला आता तिसेक वर्षे झाली. सुरुवातीला या चळवळीच्या विरोधात चाचपडत लढणाऱ्या सरकारांनी याच धोरणाचा सातत्याने पुनरुच्चार केला; पण गडचिरोलीच्या स्थितीत काय फरक पडला? विकासाचे धोरण राबवण्यासाठी आजवर अनेक योजना आणल्या गेल्या. या जिल्ह्यातील गावे, त्यात राहणारे आदिवासी आधी होते तसेच आताही आहेत. आधी ते लंगोट घालायचे. उघड्याने फिरायचे. आताही तेच करतात. या विकास नावाच्या भूताचे माणसात रूपांतर करण्यासाठी सरकारी यंत्रणांकडून योजना राबवण्याचा देखावा मात्र याच काळात बहरला. या जिल्ह्यात आरोग्य यंत्रणा उभारली गेली, पण डॉक्टर्सचा तुटवडा कायम राहिला. आजही रुग्णांना खाटेवरून रुग्णालयात नेले जाण्याची दृश्ये अधूनमधून प्रकाशित होत असतात. या भागात शेतकरी भरपूर. तेही आदिवासी. त्यांना उन्नत करण्यासाठी कृषी खात्याने, पशुसंवर्धन विभागाने आजवर नेमके काय केले? या प्रश्नावर दोन्ही खात्यांकडे सरकारी छापाचे उत्तर अगदी तयार असेल. दुर्गम भागात साधी बाजार समित्यांची उभारणी झालेली नाही. आदिवासी विकास हे महत्त्वाचे खाते. पण गेल्या सहा वर्षांत या खात्याचे मंत्रीच या जिल्ह्यात कधी फिरकले नाहीत. राज्यातला सर्वात मोठा व एकमेव आदिवासीबहुल जिल्हा असूनसुद्धा! या खात्याच्या कामाला गती यावी म्हणून सनदी व वनसेवेतील अधिकारी नेमण्याची पद्धत सुरू झाली. त्याने आदिवासींच्या जगण्यात किती फरक पडला हा संशोधनाचा विषय असला, तरी या सेवेत काम करणाऱ्या अधिकारी दाम्पत्यांच्या नेमणुकीची सोय मात्र झाली. नक्षलींच्या उपस्थितीमुळे येथे सरकारी विभागांना पैशाची कमतरता नाही. तरीही पिण्याचे शुद्ध पाणी अजूनही शेकडो गावांसाठी स्वप्नच आहे. कुपोषण, माता व बालमृत्यू यांतही हा जिल्हा कायम आघाडीवर राहिला आहे. प्रत्येक गावात वीज ही घोषणाही येथे फोल ठरली. मग हे सरकारी विभाग येथे नेमके करतात काय, असा प्रश्न साऱ्यांना पडू शकतो. त्याचे सोपे उत्तर प्रशासनाने शोधले. दहा ते बारा लाख लोकसंख्येच्या या जिल्ह्यात चार ते साडेचार लाख आदिवासी असे आहेत जे नक्षली प्रभाव क्षेत्रात राहतात. उर्वरित जरा मोकळा श्वास घेत जगतात. सरकारच्या बहुतांश योजनांचा फायदा या मोकळ्या श्वासवाल्यांना कमीअधिक प्रमाणात झाला आहे. जे काही नवनवे प्रयोग होतात, ते याच प्रभाव नसलेल्या भागात. त्याला प्रसिद्धी मिळाली की नाव गडचिरोलीचे होते. दुर्गम भागातला फाटका आदिवासी तसाच राहतो. दहशतीचा मुद्दा समोर करून सरकारी यंत्रणा दुर्गम भागात कधी जातच नाही. पटवाऱ्यांच्या साध्या साझ्यांची तपासणीसुद्धा वर्षानुवर्षे होत नाही. या भागातल्या शाळांमध्ये शिक्षक जातात का, हेही कुणी बघत नाही. तिथली नक्षलींना कंटाळलेली मुले काय करतात? शिक्षण अर्धवट थांबल्यावर कुठे जातात? स्वस्त धान्याचे वितरण बरोबर होते की नाही? आश्रमशाळा खरोखरच वर्षभर सुरू राहतात का? त्यातल्या मुलांना चांगले जेवण व सोयी मिळतात का? यांसारख्या विकासाला पूरक असलेल्या प्रश्नांना कुणी भिडत नाही. नेमके हेच प्रश्न नक्षलवादी प्रत्येक गावच्या बैठकांमध्ये विचारतात. लोकांकडून याची नकारात्मक उत्तरे आली की त्यांच्या व्यवस्थाविरोधी सुराला आपसूकच बळ मिळते. नक्षलींना हद्दपार करण्यासाठी विकास करायचा आहे हे विसरून 'नक्षली आहेत म्हणून विकास नाही' अशी नकारात्मक भाषा सरकारी पातळीवर आता रूढ झाली आहे. मग हा सारा योजनांचा पसारा कशासाठी? पोलीस जर यश मिळवत असतील तर विकासाला गती का मिळत नाही?

नेतृत्व हा या भागासाठी कळीचा मुद्दा राहिला आहे. नक्षलवाद संपावा अशी भाषा सारेच करतात, पण त्यासाठी आवश्यक असलेले नैतिक व राजकीय धैर्य दाखवण्यास कुणी तयार नाही. प्रत्येकाला स्वतःच्या जीवाची काळजी. पक्षाचा कार्यकर्ता जरी मारला गेला तरी नेते सांत्वनासाठी जात नाहीत. अशा वेळी पोरकेपणाची जाणीव झालेल्या सामान्य आदिवासींना नाईलाजाने का होईना, पण नक्षलींवर विश्वास टाकण्याशिवाय पर्याय उरत नाही. आज गडचिरोलीतून नक्षलभरती जवळजवळ संपुष्टात आली आहे, पण तिकडे पाठ फिरवणाऱ्या तरुणांसाठी इकडे काय उपाययोजना आहेत? मरणे किंवा मारणे यांतून हा गुंता सुटणारा नाही याची जाणीव का होत नाही?

तात्पर्य : गडचिरोलीत आतापर्यंत १६२ पोलीस शहीद झाले. २७५ नक्षलवादी मारले गेले, तर ५२५ नागरिकांना या 'युद्धा'त जीव गमवावा लागला. यातला सर्वात मोठा आकडा सामान्य नागरिकांचा असूनसुद्धा पोलीस व नक्षल या दोहोंभोवतीच ही चर्चा कायम फिरत राहते, म्हणून दहशत व त्याबरोबर येणारे प्रश्न कायम आहेत.

devendra.gawande@expressindia.com

चाँदनी चौकातून
दिल्लीवाला

धाक...

न्यायालयांनी कशाकशाची दखल घ्यायची? करोनाच्या दुसऱ्या लाटेनं दिल्लीत हलकल्लोळ माजल्यावर लोकांच्या मनात काय चाललंय, हे सरकारपेक्षा न्यायालयानं अधिक लवकर ओळखलं. दिल्ली उच्च न्यायालयानं स्वतःहून करोनाच्या मुद्द्यावर सुनावणी सुरू केली. राज्य आणि केंद्र सरकार दोघांनाही फैलावर घेतलं. न्यायालयात दोन्ही सरकारं एकमेकांविरोधात आरोप करू लागल्यावर न्यायालयानं निर्देश देऊन दोन्ही प्रशासनांना कामाला लावलं. करोनानंतर आता न्यायालयाचं लक्ष दिल्लीतल्या डासांकडं वळालेलं आहे. उच्च न्यायालयानं पुन्हा स्वतःच डासांच्या उपद्रवाबाबत सुनावणी घेतली. दिल्लीतल्या तीनही महापालिका प्रशासन आणि नवी दिल्ली प्रशासनाला बोलावून माहिती घेतली. ज्या दोन न्यायाधीशांनी डासांवर सुनावणी घेतली, त्यांपैकी एक करोनाच्या मुद्द्यावरही सुनावणी घेत आहेत. खरं तर दिल्लीकर तीन महिने रात्रन्दिवस डास मारत बसलेले आहेत. ते करोनामुळे जेवढे मेटाकुटीला आले असतील त्याहूनही जास्त डासांमुळे आले असतील. पण अचानक न्यायाधीशांना डासांचं अस्तित्व जाणवल्यानं दिल्लीकरांना सुखद धक्का बसला. कधी कधी न्यायाधीशांना सामान्यांचं दुःख कळतं. मोटारीत हादरे बसले की रस्ते खराब आहेत, खड्ड्यांचं साम्राज्य पसरलंय असं वाटू लागतं. रस्त्यांची दुरवस्था ही नेहमीचीच रडकथा होऊन बसलेली आहे. नवी दिल्लीत रस्ते चकाचक आहेत आणि पाऊस कमी पडतो, त्यामुळे रस्ते खराबही होत नाहीत. पण दिल्लीकरांना डासांचा त्रास खूप. उन्हाळ्याच्या मध्यावर दरवर्षी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल स्वतःच्या घराचं छायाचित्रं प्रसिद्ध करतात आणि डेंग्यूविरोधी मोहिमेची सुरुवात करतात. पाण्याचा निचरा करण्याचं आवाहन महापालिकेचे कर्मचारी करतात. डास मारण्यासाठी औषध फवारणी होत असते. करोनामुळे त्याकडे महापालिकेचं दुर्लक्ष झालंय. न्यायालयानं स्थानिक प्रशासनाला धारेवर धरलंय. आता कदाचित डासांना थोडा धाक राहील!

लेख कोणाचा?

एका नियतकालिकामध्ये छापून आलेल्या लेखाची चर्चा दुसऱ्या संकेतस्थळावर झाली. हा लेख कोणी लिहिला, या प्रश्नावरून नवा लेख लिहिला गेला. लेख कोणाचा, हा प्रश्न उपस्थित केला तो काँग्रेसचे अभ्यासक-जाणकार रशीद किडवाई यांनी. तर्क केला जातोय तो सोनिया गांधी वा प्रियंका गांधी-वाड्रा यांच्याबाबतीत.

कदाचित मनमोहन सिंग यांनीही लिहिला असावा म्हणतात. पण किडवाई यांचं म्हणणं असं की, हा लेख राहुल गांधी यांनी टोपणनावाने लिहिलाय. हे लिखाण सोनियांचं वा प्रियंका यांचं नाही. काँग्रेसबद्दल केलेली टिप्पणी, पक्षसंघटनेकडून अपेक्षा हे सगळे मुद्दे पाहता, राहुल गांधी यांनी लेखातून एक प्रकारे मन मोकळं केलं असावं. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त हा लेख लिहिला गेलाय आणि त्यात राजीव गांधी यांच्या राजकारणाबद्दल, त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल लिखाण करण्यात आलेलं आहे. लेखातली भाषा राहुल गांधी यांची वाटते. करोनाच्या भयभीत करणाऱ्या काळात लोकांना मायेची ऊब देणं हाच मोठा आधार आहे. ही करुणा राजीव गांधींकडे होती, असं त्या 'लेखका'चं म्हणणं आहे. आधुनिकता, तंत्रज्ञान, अधिकाधिक लोकाभिमुख कारभार, लोकशाही असे सगळे मुद्दे लेखात पेरलेले आहेत. राजीव गांधींना त्यांचे राजकीय विरोधक कधीही शत्रू वाटले नाहीत. त्यांनी काँग्रेसमधील सहकाऱ्यांचा विरोध पत्करून तत्कालीन भाजपनेते अटलबिहारी वाजपेयींना संयुक्त राष्ट्रांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व करण्यासाठी पाठवलं होतं, हा लेखातला उल्लेख पाहिला तर हे लिखाण राहुल गांधींनीच केलंय, असा किडवाईंचा कयास आहे. ते म्हणतात की, राहुल गांधींनी टोपणनावानं सातत्यानं लिखाण करत राहिलं पाहिजे. पंडित नेहरू, नरसिंह राव टोपणनावानं लिहीत असत. पंतप्रधानपदी बसलेल्या व्यक्तीच्या जाहीर बोलण्यावर, मतं मांडण्यावर मर्यादा येत असतील, तर मनात खदखदत असलेले विचार मांडण्यासाठी असे लेख उपयुक्त ठरतात. राहुल गांधी भलेही अशा पदावर नसतील, पण मनामधली खदखद त्यांनी टोपण नावानं लिखाण करून बाहेर काढली पाहिजे, असं किडवाईंचं म्हणणं आहे.

'यूपी'चे शर्मा

निदान आत्ता तरी मोदींनंतर शहा असंच दिसतंय. पण सतत चर्चा मोदींनंतर योगी अशी होत असते. करोनामुळे योगी मोदी-शहांच्या हाती सापडलेले आहेत. मोदींच्या प्रतिमेला धक्का लागलेला असो वा नसो, त्यांना योगींची प्रतिमा सुधारण्याची मोहीम हाती घ्यावी लागली आहे. ही मोहीम संघाच्या सहभागातून होत असल्यानं योगींना गप्प बसण्याशिवाय पर्याय नाही. गेल्या आठवड्यात भाजप आणि संघाची बैठक झाली, त्यानंतर योगींच्या मंत्रिमंडळाच्या विस्ताराच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. मोदींच्या विश्वासातील ए. के. शर्मा यांना उपमुख्यमंत्रिपद दिलं जाणार आहे असं म्हणतात. शर्मांकडे मोदींनी खास जबाबदारी सोपवली ती वाराणसीतला करोना आटोक्यात आणण्याची. मग त्याला 'काशी प्रारूप' म्हणले जाऊ लागले. उर्वरित उत्तर प्रदेशात काही का होईना, पण वाराणसीत शर्मांनी प्रशासनाला स्वस्थ बसू दिलं नाही. शर्मा थेट पंतप्रधानांशी बोलू शकतात. त्यामुळे योगींना त्यांच्या कामात हस्तक्षेप करता येत नाही. या शर्मांना उपमुख्यमंत्रिपदी बसवलं तर योगींना आपोआप चाप लागतो. मोदींशी स्पर्धा कोणी करू शकत नाही! संघाला मोदींचं ऐकावं लागतं, तिथं योगींचं काय चालणार? ए. के. शर्मांची प्रशासकीय हयात गुजरातमध्ये गेली. त्यांच्या डोळ्यांदेखत 'मोदी प्रारूपा'चा विस्तार झाला, त्यात शर्मांचाही सहभाग होता म्हणे. करोनाची पहिली लाट आली तेव्हा मोदींनी सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांसाठी मोठमोठ्या सवलती दिल्या होत्या. या घोषणेआधी शर्मा यांना या मंत्रालयात पाठवलं गेलं होतं. या खात्याचे मंत्री आहेत नितीन गडकरी. तिथून अचानक शर्मा प्रशासकीय सेवेतून राजकारणात उतरले आणि उत्तर प्रदेशच्या विधान परिषदेत पोहोचले. त्याच वेळी योगींचा परीघ आकसल्याचं दिसू लागलं होतं. शर्मा हे मोदींसाठी सर्वगुणसंपन्न आहेत. मोदींच्या विश्वासातले, मोदींच्या गुजराती संस्कृतीची जाण असलेले, मूळचे उत्तर प्रदेशचे- त्यामुळे वाराणसीही सांभाळता येतं आणि लखनौही!

जाब

संयुक्त किसान मोर्चाच्या सुकाणू समितीत शेतकरी नेते गुरुनामसिंग चढूनी यांचाही समावेश आहे. हरियाणा हा चढूनींचा गड. 'भारतीय किसान युनियन' नावाच्या संघटनेचे असंख्य गट आहेत, त्यांपैकी एका गटाचे नेतृत्व चढूनी करतात. शेतकऱ्यांच्या आंदोलनातलं हे बंडखोर व्यक्तिमत्त्व. आंदोलनाच्या सुरुवातीच्या काळात याच चढूनींनी दिल्लीत 'कॉन्स्टिट्युशन क्लब'मध्ये राजकीय नेत्यांना बोलावून बैठक घेतली होती. ही बैठक शेतकरी नेत्यांच्या अपरोक्ष आयोजित केलेली होती. शेतकरी आंदोलनात राजकीय पक्षांना आणि नेत्यांना सहभागी करून घ्यायचं नाही असं ठरलं असतानाही चढूनींनी ऐकलं नव्हतं. मग त्यांच्या या कृतीवर सुकाणू समितीत गंभीर चर्चा झाली. त्यांना जाब विचारला गेला. नंतर चढूनींची बंडखोरी थांबली, बैठकीचं प्रकरणही मागे पडलं. आंदोलनानंही बरीच स्थित्यंतरं पाहिली. आता याच चढूनींनी राकेश टिकैत यांना जाब विचारलाय. हरियाणात शेतकरी आंदोलन करताहेत, मग उत्तर प्रदेशमधले शेतकरी का शांत आहेत? उत्तर प्रदेशच्या शेतकऱ्यांनी गाझीपूरला गर्दी केली होती ती टिकैत यांचे अश्रू पाहून. योगींनी टिकैत यांना गाझीपूरमधून हुसकावून लावण्याचा अपयशी प्रयत्न केला होता. त्यानंतर पश्चिम उत्तर प्रदेशमध्ये संतापाची लाट आली आणि शेतकऱ्यांनी जिकडं तिकडं नेत्यांना गावात येण्याला बंदी केली. उत्तर प्रदेशमधला हा जोर ओसरलाय. पण हरियाणा-पंजाबमध्ये शेतकरी अजूनही लढण्याच्या 'मूड'मध्ये आहेत. आम्ही लढतोय, मग उत्तर प्रदेशमध्ये आंदोलन का होत नाही, असा चढूनींचा सवाल आहे. त्यावर, करोना थोडा कमी होऊ दे, मग उत्तर प्रदेशात शेतकरी कसा आंदोलन करतो ते बघा, असं टिकैत यांनी उत्तर दिलं. उत्तर प्रदेशच्या शेतकऱ्यांचा नेत्यांना धाक आहे, असं टिकैत म्हणत असले तरी, हरियाणातले शेतकरी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या विरोधात आक्रमक झाले तसे उत्तर प्रदेशात योगींविरोधात झाले नाहीत हे खरं. पण सध्या तरी राकेश टिकैत हेच शेतकरी आंदोलनाचा चेहरा बनले आहेत.

epaper.loksatta.com

।। उद्यमात सकल समृद्धिः ।।
MIDC
प्रस्तुत
लोकसत्ता
महाराष्ट्राचा चिंतामणी
डॉ. सी. डी. देशमुख - १२५वी जयंती विशेषांक
सहप्रायोजक
स्थापना 1995
लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि.
शिखर बँक
दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई
महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचे पालकत्व स्वीकारलेली संस्था

प्रायोजक
● प्रस्तुती : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी)
● सहप्रायोजक: दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटी लि.
● पॉवर्डबाय : कॉर्डेलिया क्रुझेस

रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर तसेच देशाचे अर्थमंत्री म्हणून स्वातंत्र्योत्तर भारताच्या वित्तीय संरचनेची पायाभरणी करणारे, असामान्य बुद्धिमत्तेचे कुशल प्रशासक, संस्कृत भाषेचे विचक्षण जाणकार अशा बहुमुखी प्रतिभेचे चिंतामणराव द्वारकानाथ अर्थात सी. डी. देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीचे हे वर्ष. त्यानिमित्ताने, चिंतामणरावांच्या अष्टावधानी कार्यकर्तृत्वाचे स्मरण जागवणारा 'महाराष्ट्राचा चिंतामणी' हा विशेषांक 'लोकसत्ता'ने निर्मिला असून त्याचे प्रकाशन रिझर्व्ह बँकेचे माजी कार्यकारी संचालक, अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते गुरुवारी झाले. त्या वेळी झालेल्या वेबसंवादात त्यांनी सी. डी. देशमुख यांच्या कार्याचा घेतलेला हा साक्षेपी मागोवा...

समाजहितदक्ष अर्थ-प्रशासक!



असामान्य बुद्धिमत्ता, अत्यंत सुसंस्कृत मन, विलक्षण ऋजुता आणि व्यापक आर्थिक-सामाजिक जाणिवा यांचा अनोखा संगम होऊन संपन्न झालेलं व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. चिंतामणराव द्वारकानाथ अर्थात सी. डी. देशमुख! चिंतामणरावांची थोरवी नेमकी कशात आहे? मुंबई विद्यापीठाने १९१२ साली घेतलेल्या मॅट्रिक परीक्षेत (होय, त्या वेळी मॅट्रिकची परीक्षा ही मुंबई विद्यापीठच घेत असे) सार्वकालिक सर्वोच्च गुण त्यांनी मिळवले हे त्यांचे मोठेपण काय? किंवा केम्ब्रिज विद्यापीठात पदवीसाठी वनस्पतीशास्त्र विषयात सर्वोच्च गुणांनी उत्तीर्ण होऊन, त्या विद्यापीठाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांनी मिळवला ही त्यांची थोरवी काय? वयाच्या केवळ २२ व्या वर्षी 'आयसीएस' या अत्यंत कठीण परीक्षेत गुणांचा उच्चांक नोंदवत ते सर्वप्रथम आले अथवा वयाच्या अवघ्या ४१ व्या वर्षी ब्रिटिश सरकारने त्यांना 'सर' ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला, ही त्यांची महती काय? तर माझ्या मते, या सर्व प्रश्नांचे उत्तर 'नाही' असेच आहे. त्यांचे श्रेष्ठत्व याहून वेगळ्या अंगाने आहे.

ब्रिटिश सरकारने प्रस्थापित केलेल्या 'इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस्' अर्थात 'आयसीएस'ची परीक्षा १९१८ साली सी. डी. देशमुख उत्तीर्ण झाले. सध्याच्या भारतीय प्रशासन सेवा म्हणजेच 'आयएएस'चा 'आयसीएस' हा ब्रिटिशकालीन अत्यंत कठीण पूर्वावतार म्हणता येईल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तत्कालीन गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांनी आयएएस आणि संलग्न सेवांसाठी परीक्षेची प्रक्रिया सुरू केली. आयसीएसचे अनेक मान्यवर टीकाकार त्या वेळी होते. त्यांच्या मते, इंडियन सिव्हिल सर्व्हिस अर्थात भारतीय मुलकी सेवा ही ना भारतीय, ना मुलकी होती आणि ती सेवा तर कदापिही नव्हती. सी. डी. देशमुख हे बहुधा असे पहिले आयसीएस अधिकारी होते, ज्यांनी या प्रतिमेला पार बदलून टाकले. समाजहितदक्ष कार्यकुशल प्रशासक म्हणून सनदी अधिकारी कसा असायला हवा, याचा कालातीत मापदंड चिंतामणरावांनी त्यांच्या कर्तृत्वातून घालून दिला. हीच चिंतामणरावांची खरी थोरवी आहे असे मला वाटते.

ब्रिटिश सरकारच्या सेवेतील १९१८ पासून १९३९ पर्यंत अशी पहिली २१ वर्षे चिंतामणरावांनी त्या वेळच्या मध्य प्रांतात म्हणजे सध्याचे मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि महाराष्ट्रातील विदर्भ मिळून होणाऱ्या प्रदेशात विविध उच्च पदांवर कामे केली. शिक्षण, आरोग्य, महसूल, वित्त अशा अनेक महत्त्वाच्या विभागांचे सचिव अर्थात प्रमुख या नात्याने त्यांनी पथदर्शी कामगिरी बजावली. ही विविध सरकारी पदे चिंतामणरावांनी अक्षरशः भूषविली म्हटले तर वावगे ठरू नये. म्हणजे या पदांमुळे ते मोठे झाले असे नाही, तर त्यांच्यामुळे ही पदे मोठी झाली. या सगळ्या अनुभवातून एक महान अर्थ-प्रशासक म्हणून चिंतामणरावांचा उदय झाला.

मध्य प्रांतातील २१ वर्षांच्या सेवेनंतर चिंतामणराव भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सेवेत संपर्क अधिकारी किंवा समन्वयक म्हणून १९३९ साली दाखल झाले. केंद्र सरकारचा वित्त विभाग व मध्यवर्ती बँकेत समन्वय साधण्याचे काम त्यांच्याकडे होते. तीन महिने या पदावर काम केल्यानंतर, रिझर्व्ह बँकेच्या केंद्रीय संचालक मंडळाचे सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. पुढे दोन वर्षांनंतर त्यांची डेप्युटी गव्हर्नर म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यानंतर दोन वर्षांनी रिझर्व्ह बँकेचे तिसरे आणि पहिले भारतीय गव्हर्नर म्हणून त्यांची नियुक्ती झाली. या पदावर त्यांची सहा वर्षांची कारकीर्द राहिली आहे. गव्हर्नर म्हणून चिंतामणरावांनी देशाला अनेकांगांनी मोठे योगदान दिले आहे.

नाणेनिधीच्या प्रमुखपदाची हुकलेली संधी

दुसरे महायुद्ध संपत आले होते, तेव्हा १९४४ साली युद्धोत्तर काळात जागतिक अर्थव्यवस्थेची घडी कशी बसवायची यावर विचारविमर्शासाठी अमेरिकेतील ब्रेटन वूड्स येथे मोठी जागतिक परिषद बोलावण्यात आली होती. जगातील सगळ्या देशांतील नेत्यांची त्याला उपस्थिती होती. या परिषदेचे इतिहासातील महत्त्व असे की, जगातील दोन प्रमुख शिखर संस्था त्यातून जन्माला आल्या. जगावर आजही अधिराज्य गाजवत असलेल्या त्या संस्था म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणे निधी (आयएमएफ) आणि जागतिक बँक होय. या दोन संस्थांमधील फरक सोप्या भाषेत सांगायचा तर, जागतिक बँक ही व्यायामशाळेसारखी आहे. जी कोणत्याही देशाच्या दीर्घावधीच्या विकासाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीत मदत करून त्या देशाला धष्टपुष्ट करण्याचे काम करते. त्याउलट नाणेनिधीचे स्वरूप हे रुग्णालयातील अतिदक्षता विभागासारखे आहे. म्हणजे कोणत्याही देशाची परकीय चलनाची गंगाजळी आटून गेली आहे आणि देशाकडे आयातीसाठी कोणतेच परकीय चलन शिल्लक नाही अशा आर्थिक आणीबाणीच्या स्थितीत नाणेनिधी त्या देशांना कर्जाऊ मदत देऊ करते. भारताने १९८१ आणि १९९१ अशा दोन प्रसंगी नाणेनिधीकडून मोठे कर्ज घेतलेले आहे. तर... या ब्रेटन वूड्स परिषदेत, पारतंत्र्यात असतानाही भारताच्या शिष्टमंडळालाही आमंत्रित करण्यात आले होते. या भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व चिंतामणरावांनी केले होते. त्या जागतिक परिषदेत त्यांनी इतकी प्रभावी कामगिरी केली की, त्या वेळचे जगातील सर्वात प्रसिद्ध आणि त्या शतकातील सर्वात महत्त्वाचे अर्थतज्ज्ञ जॉन मेनार्ड केन्स यांनी त्यांचे खूप कौतुक केले. इतकेच नव्हे, तर त्यांनी प्रस्तावित आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अर्थात आयएमएफचे संस्थापक-व्यवस्थापकीय संचालक म्हणून चिंतामणरावांच्या नावाची शिफारस केली होती. परंतु दुर्दैवाने ते शक्य झाले नाही. दुसऱ्या महायुद्धात सर्वाधिक नुकसान सोसाव्या लागलेल्या ब्रिटनचे महासत्तापद लयास जात अमेरिका ही नवीन महासत्ता म्हणून उदयाला येत होती. त्या उदयोन्मुख महासत्ता अमेरिकेचे या परिषदेतील प्रतिनिधी म्हणजे त्या देशाचे तत्कालीन वित्तमंत्री हॅरी डेक्स्टर व्हाइट आणि केन्स यांच्यामध्ये प्रचंड वाद झाला. जागतिक परिघावर वाढलेल्या महत्तेमुळे अर्थातच या वादात अमेरिकेची सरशी झाली. अमेरिकेने चिंतामणरावांना नाणेनिधीचे पहिले व्यवस्थापकीय संचालक म्हणून स्वीकृतीस नकार दिला.

नंतरही पुन्हा चिंतामणरावांकडे ही संधी चालून आली होती. १९५५ साली देशाचे अर्थमंत्री असताना नाणेनिधीचे व्यवस्थापकीय संचालकपद स्वीकारण्याचे रीतसर आमंत्रणच त्यांना आले होते. या प्रसंगाचे चिंतामणरावांनी आत्मचरित्रात वर्णन केले आहे. नाणेनिधीकडून आलेला प्रस्ताव नाकारण्याचा निर्णय पत्नी (दुर्गाबाई) आणि मी सहमतीने घेतला, असे चिंतामणरावांनी म्हटले आहे. पत्नी दुर्गाबाई यांचा चिंतामणरावांवर मोठा प्रभाव आणि दांडगा वचक होता, हे त्यांच्या आणि खुद्द दुर्गाबाईंच्या आत्मचरित्रातूनही जाणवते. त्यामुळे मला वाटते, देशात राहूनच देशसेवा करण्याच्या दुर्गाबाईंच्या आग्रहाखातर चिंतामणरावांनी नकाराच्या निर्णयाला संमती दर्शवली असावी. हा त्यांचा निर्णय खूप अभिमानास्पद निश्चित आहे, परंतु चिंतामणरावांनी ते आमंत्रण स्वीकारले असते तर जागतिक पातळीवर भारताचा प्रभाव आपण त्या वेळेपासून टाकू शकलो असतो. नंतरच्या काळात नाणेनिधी आणि जागतिक बँक यांची युरोप आणि अमेरिका या दोन सत्ताध्रुवांमध्ये जवळजवळ वाटणी झाल्यासारखी स्थिती आहे. नाणेनिधीचा प्रमुख हा नेहमी युरोपातून येत असतो, तर जागतिक बँकेचे नेतृत्वपद अमेरिकेकडे असा जणू अलिखित कायदाच झाला आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीवर स्थापनेच्या वेळी किंवा नंतरही चिंतामणरावांची नियुक्ती झाली असती, तर जागतिक अर्थकारणात विकसनशील देशांना प्राधान्य देणारी संस्था म्हणून नाणेनिधीने आज वळण घेतलेले दिसून आले असते. भारताचे जागतिक अर्थकारणात प्राबल्य वाढण्यासाठी ती बाब उपयुक्त ठरली असती. मात्र तसे होऊ शकले नाही, हे भारतासह सर्वच विकसनशील देशांचे झालेले मोठे नुकसान आहे.

भारताच्या वित्तीय संरचनेची पायाभरणी

रिझर्व्ह बँकेतील चिंतामणरावांच्या कारकीर्दीचा दुसरा महत्त्वाचा टप्पा हा स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा आहे. स्वातंत्र्योत्तर देशाच्या आर्थिक विकासाला पोषक अशा वित्तीय संरचनेच्या दिग्दर्शनाचे काम त्यांनी केले. १ एप्रिल १९३५ रोजी रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेच्या वेळी तिची रचना ही खासगी भागधारकांनी स्थापित केलेली बँक अशी होती. देशाची मध्यवर्ती बँक, परंतु तिची मालकी मात्र खासगी, अशी ती व्यवस्था होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेली पहिली गोष्ट म्हणजे, रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. हे संक्रमणही चिंतामणरावांच्या देखरेखीत त्यांच्याच गव्हर्नरपदाच्या कारकीर्दीत घडले. रिझर्व्ह बँकेला देशातील व्यापारी बँकांचे नियमन करण्याचा ज्या कायद्यान्वये अधिकार मिळाला, तो 'बँकिंग नियमन कायदा, १९४९' त्यांच्याच काळात आला. त्यांच्याच कारकीर्दीत रिझर्व्ह बँकेत अनेक नवीन विभाग सुरू झाले. त्यातील सर्वात महत्त्वाचा आर्थिक आणि सांख्यिकी संशोधन विभाग होय. पुढे त्याचे आर्थिक आणि सांख्यिकी अशा दोन स्वतंत्र विभागांत विभाजन करण्यात आले. पण आर्थिक विभाग हा आजही रिझर्व्ह बँकेचा कणा समजला जातो. मध्यवर्ती बँकेतील बँकिंग परिचालन विभागाची पायाभरणीही चिंतामणरावांनीच केली. उद्योगधंद्यांना बँकांकडून पतपुरवठा व्हावा म्हणून पहिल्या विकास बँकेची स्थापना त्यांनी 'इंडियन फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (आयएफसीआय)'च्या रूपात केली. त्याचबरोबर कृषी आणि ग्रामीण क्षेत्राला रिझर्व्ह बँकेकडून पतपुरवठा व्हावा म्हणून त्यांनी खूप महत्त्वाची पावले टाकली. अशा तऱ्हेने स्वतंत्र भारताच्या वित्तीय संरचनेची पायाभरणी करणारे शिल्पकार म्हणून चिंतामणरावांची वादातीत सर्वश्रेष्ठ भूमिका राहिली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या सेवेत चिंतामणराव जेव्हा १९३९ साली दाखल झाले, तेव्हा ती बँक बाल्यावस्थेत होती. मात्र दहा वर्षांच्या कार्यकाळात रिझर्व्ह बँकेला बाळसेदार बनवूनच चिंतामणराव पुढे केंद्र सरकारच्या सेवेत दाखल झाले. तथापि, त्यांचे रिझर्व्ह बँकेला योगदान येथेच संपत नाही. खूप नंतर, म्हणजे १९७० साली रिझर्व्ह बँकेचा इतिहास लिहिण्याचा प्रकल्प सुरू झाला, त्याचे नेतृत्वही त्यांच्याकडेच होते. म्हणजे १९३५ पासून १९५० पर्यंतच्या पहिल्या १५ वर्षांच्या कालखंडाचा अंतर्भाव असलेल्या पहिल्या खंडाच्या इतिहास लेखनाच्या यंत्रणेसाठी तयार करण्यात आलेल्या सल्लागार समितीचे प्रमुख चिंतामणरावच होते.

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९४९ सालच्या अखेरीस चिंतामणरावांना दिल्लीला बोलावून घेतले. नियोजन आयोगाची उभारणी करण्याची अतिशय महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. १५ मार्च १९५० रोजी नियोजन आयोगाची स्थापना झाली. पंतप्रधान नेहरू नियोजन आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष, तर चिंतामणराव हे प्रमुख सदस्य होते. मात्र, वित्त मंत्रालयाच्या बाहेर नियोजन आयोगाच्या रूपाने नवीन सत्ताकेंद्र निर्माण झाले असल्याचे म्हणत तत्कालीन अर्थमंत्री जॉन मथाई यांनी राजीनामा दिला. नियोजन आयोगाच्या स्थापनेच्या तीन महिन्यांतच हा प्रसंग उभा ठाकला. पण पंतप्रधान नेहरूंनी लगेच मथाई यांचा राजीनामा स्वीकारला आणि त्यांच्या जागी चिंतामणरावांची भारताचे अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली.

अर्थमंत्री म्हणून १९५० ते १९५६ अशी सहा वर्षे काम करीत असताना, चिंतामणरावांच्या कामगिरीचे ठळक असे काही टप्पे सांगता येतील. एक तर अर्थमंत्री आणि नियोजन आयोगाचे प्रमुख सदस्य अशी दुहेरी जबाबदारी ते पाहत होते. पहिली आणि दुसरी पंचवार्षिक योजना तयार करण्यात त्यांचे मोठे योगदान होते. ब्रिटिशांनी एकेकाळी सुरू केलेल्या तीन प्रेसिडेन्सी बँकांना एकत्र करून निर्माण केलेल्या इम्पीरियल बँक ऑफ इंडियाचे १९५५ साली राष्ट्रीयीकरण करून स्टेट बँक ऑफ इंडियाची स्थापना ही अर्थमंत्री म्हणून चिंतामणरावांच्या पुढाकारानेच झाली. त्याचबरोबर खासगी विमा कंपन्यांना एकत्र करून त्यांच्या राष्ट्रीयीकरणातून भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसीची स्थापना त्यांच्याच अर्थमंत्रिपदाच्या कारकीर्दीत झाली.

अगणित संस्थांचे संवर्धन

पुढे १९५६ साली संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर केंद्राच्या भूमिकेचा निषेध म्हणून चिंतामणरावांनी मंत्रिपदाचा त्याग केला. त्यानंतर, विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी पाच वर्षे काम केले. १९६२ पासून १९६७ पर्यंत म्हणजे वयाच्या ७१ व्या वर्षापर्यंत दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून त्यांची कारकीर्द राहिली. त्यानंतरही त्यांनी अनेक संस्थांची उभारणी केली. 'संस्थासंवर्धक' म्हणून त्यांची भूमिका विलक्षण महत्त्वाची आहे. स्थापनाच नव्हे, तर जोपासना करून त्या संस्थांच्या भरणपोषण, संवर्धनाचीही त्यांनी काळजी घेतली. अशा अगणित संस्थांची यादी सांगता येईल. उदाहरणार्थ, दिल्लीतील इंडिया इंटरनॅशनल सेंटर ही त्यांची निर्मिती. तसेच इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन आदी संस्थांच्या जोपासनेचे काम चिंतामणरावांनी केले.

चिंतामणरावांना अनेक भाषा अवगत होत्या. पण त्यांचे विशेष प्रेम होते ते मराठी, इंग्रजी, संस्कृत, फ्रेंच आणि जर्मन या भाषांवर. कालिदासाच्या 'मेघदूतम्' या खंडकाव्याचा त्यांनी मराठीत अनुवाद केला आहे. महात्मा गांधीजींची काही वचने त्यांनी श्लोकबद्ध केली आहेत. हिंदू धर्मग्रंथांचा आणि बौद्ध धर्माचा त्यांचा गाढा व्यासंग होता. त्यांनी भगवद्गीतेवर भाष्य लिहिले, तसेच धम्मपदावरीलही त्यांचे भाष्य प्रसिद्ध झाले आहे.

चिंतामणराव आणि डॉ. आंबेडकर

गेल्या दीडशे वर्षांत राष्ट्रीय पातळीवर अतुलनीय कामगिरी करणाऱ्या अनेक मराठीजनांची नावे डोळ्यांपुढे येतात. महात्मा फुले, राजर्षी शाहू छत्रपती, गोपाळ कृष्ण गोखले, न्या. महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि या नामावलीत सी. डी. देशमुखही आहेत. यांपैकी डॉ. आंबेडकर आणि सी. डी. देशमुख हे जवळजवळ समकालीन आहेत. डॉ. आंबेडकर हे चिंतामणरावांपेक्षा वयाने पाच वर्षांनी ज्येष्ठ होते. या दोघांमधील बंध-अनुबंध हा संशोधनाचा विषय आहे. दोघांमध्ये पहिली भेट १९३० साली दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या निमित्ताने झाली असावी. या परिषदेत डॉ. आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यात अक्षरशः खडाजंगी झाली होती. आयसीएस अधिकारी या नात्याने त्या परिषदेचे एक सचिव म्हणून चिंतामणरावांचीही उपस्थिती होती. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेच्या नऊ वर्षे आधी, १९२६ साली हिल्टन यंग आयोगाला डॉ. आंबेडकर यांनी एक अत्यंत महत्त्वाचे टिपण सादर केले होते. त्या त्यांच्या टिपणातूनच रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेचा मार्ग प्रशस्त झाला. तर... नंतर रिझर्व्ह बँकेची प्रत्यक्ष पायाभरणी तिचे पहिले भारतीय गव्हर्नर या नात्याने चिंतामणरावांनी केले. दोघांनीही नेहरूंच्या मंत्रिमंडळातून वेगवेगळ्या वेळी, म्हणजे डॉ. आंबेडकरांनी १९५१ साली, तर चिंतामणरावांनी १९५६ साली राजीनामा दिला.

तथापि, १९५० साली नेहरूंनी डॉ. आंबेडकर यांना शह देण्यासाठी चिंतामणरावांचा वापर केला, अशी माझी वैयक्तिक धारणा आहे. त्याला सबळ कारणही आहे. डॉ. आंबेडकरांनी १९५१ साली मंत्रिपदाचा राजीनामा देताना लिहिलेल्या पत्रात, जी कारणे दिली आहेत त्यावरून तरी तसे वाटते. पूर्वी कबूल केलेले असूनसुद्धा पंडित नेहरूंनी कुठल्याही प्रकारची आर्थिक विकासासंबंधीची जबाबदारी सोपवण्याचे टाळले, असे डॉ. आंबेडकर यांनी नाराजीची कारणे देताना राजीनामापत्रात नमूद केले आहे. नियोजन आयोगावर काम करण्याची डॉ. आंबेडकरांची तीव्र इच्छा होती, पण ती जबाबदारी त्यांना दिली गेली नाही, असेही त्यांनी पत्रात म्हटले आहे. डॉ. आंबेडकर खरे तर त्या वेळचे भारतातील सर्वाधिक प्रशिक्षित अर्थतज्ज्ञ होते. कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्रातून पीएच.डी., तर नंतर लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून डॉक्टर ऑफ सायन्स अशा दोन डॉक्टरेट पदव्या त्यांच्याकडे होत्या. शिवाय अर्थ-प्रशासनातील प्रदीर्घ अनुभव त्यांच्याकडे होता. १९४२ साली तत्कालीन व्हॉइसरॉयचे कार्यकारी मंडळ अर्थात ब्रिटिश मंत्रिमंडळात अर्थप्रशासक या नात्याने वेगवेगळ्या प्रकारची कामगिरी डॉ. आंबेडकरांनी बजावली होती.

नियोजन आयोगाची जुळवाजुळव करण्यास डिसेंबर १९४९ मध्ये सुरुवात झाली. त्याआधीच, म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय राज्यघटना संविधान सभेने संमत केली होती. म्हणजे ती ऐतिहासिक जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडल्यानंतर खरे तर डॉ. आंबेडकर मोकळेच होते. मात्र त्याच सुमारास नियोजन आयोगाची जुळवाजुळव हाती घेतली जात असताना, त्यासाठी डॉ. आंबेडकर यांच्या नावाचा विचार न करता नेहरूंनी चिंतामणरावांना त्यासाठी पाचारण केले. हा निव्वळ योगायोग आहे असे वाटत नाही. एकीकडे जनाधार असलेले ज्वलंत वृत्तीचे डॉ. आंबेडकर, तर दुसरीकडे सनदी नोकरशहा अशी पार्श्वभूमी असलेले चिंतामणराव, असे दोन पर्याय नेहरूंपुढे होते. पण दोघांमध्ये डॉ. आंबेडकर यांना नमवणे फार कठीण आहे, त्यामानाने चिंतामणरावांना नमते घ्यायला लावणे सहज शक्य आहे, असे नेहरूंना वाटले असावे. अर्थात, या विषयावर अधिक संशोधन होण्याची गरज आहे असेही वाटते.

भाबडेपणाचा गैरफायदा

चिंतामणरावांच्या सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्वामध्ये दोष दाखवायचाच झाला तर एकच दोष दिसून येतो. सुसंस्कृत आणि अतिशय निर्मळ मन असलेल्या चिंतामणरावांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये एक प्रकारचा भाबडेपणा होता. राजकीय नेत्यांनी त्यांच्या या दोषाचा पुरेपूर फायदा उठवला. य. दि. फडके आणि अनेक अभ्यासकांनी सांगितले आहे की, ते अर्थमंत्री असतानासुद्धा बरेचसे निर्णय परस्पर घेतले जायचे. नंतर लुटुपुटुच्या बैठका घेऊन त्यावर चिंतामणरावांच्या संमतीचे शिक्कामोर्तब होत असे. अर्थमंत्रिपदाचा १९५६ साली त्यांनी त्याग केला, त्यात त्यांचा मराठी बाणेदारपणा दिसतो, हे खरेच. पण आणखी काही वर्षे ते देशाचे अर्थमंत्री असायला हवे होते, असे वाटते. ते अर्थमंत्री म्हणून नकोसे झाल्यानंतर त्यांना राजीनामा द्यायला भरीस पाडणारे सत्ताधारीच होते. परंतु चिंतामणरावांनी अर्थमंत्रिपदाचा त्याग केल्याने देशाचे अपरिमित नुकसान झाले, असे माझे प्रामाणिक मत आहे. पुढे आयुष्याच्या सरत्या काळात, म्हणजे वयाची पंच्याहत्तरी गाठली असताना, स्वतंत्र पक्षातर्फे राष्ट्रपतीपदाची निवडणूक लढवण्यास त्यांना कोणी प्रवृत्त केले? आणि मानहानी करून घ्यायला लावणारे कोण? सत्ताधारी पक्षाने त्यांनाच आपला राष्ट्रपतीपदाचा उमेदवार म्हणून घोषित का केले नाही? हे प्रश्न विचारले गेलेच पाहिजेत. चिंतामणरावांच्या भाबडेपणाचा राजकीय नेत्यांनी गैरफायदा कसा घेतला, त्याचेच हे द्योतक आहे.

महाराष्ट्रात उपेक्षा...

या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे एकही यथोचित स्मारक महाराष्ट्रात झालेले नाही. त्यांनीच स्थापन केलेल्या इंडिया इंटरनॅशन सेंटर येथे चिंतामणरावांचा एक अर्धपुतळा आहे. रोह्यातील चिंतामणरावांच्या मूळ घराला त्यांचे स्मारक या रूपात दर्जा मिळावा, म्हणून मागणी करणारा प्रस्ताव शासनदरबारी अनेक वर्षे धूळ खात पडलेला आहे. महाराष्ट्राच्या या थोर सुपुत्राची अवहेलना आणि उपेक्षा ही अवघ्या महाराष्ट्राला अत्यंत लांच्छनास्पद आहे. म्हणून 'लोकसत्ता-महाराष्ट्राचा चिंतामणी' या विशेषांकातील लेखात राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यासंदर्भात व्यक्त केलेली खंत आणि 'सी.डीं.च्या महानतेला महाराष्ट्र प्रणाम केल्याशिवाय राहणार नाही' हे त्यांचे विधान खूप आश्वासक वाटते. शब्दाला जागणारे नेते म्हणून उद्धव ठाकरे यांचा लौकिक आहे आणि येथे तर त्यांनी लिखित वचनच दिले आहे. चिंतामणरावांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या स्मारकाच्या दृष्टीने सरकारकडून निश्चित काही सकारात्मक घडू शकेल, हे म्हणूनच खात्रीपूर्वक वाटते.

शब्दांकन : **सचिन रोहेकर**

> पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूटमधील माझे पीएच.डी.चे मार्गदर्शक डॉ. गाडगीळ यांच्या शिफारशीवरून मी १९४५ साली रिझर्व्ह बँकेत संशोधन अधिकारी म्हणून रुजू झालो. दोनच वर्षांनी भारताच्या फाळणीची घोषणा झाली, तेव्हा गव्हर्नर चिंतामणराव देशमुखांनी मला बोलावले आणि म्हटले, ''मोजक्याच मुस्लीम अधिकाऱ्यांनी पाकिस्तानला जाणे पसंत केले आहे, हे पाहता, प्रशिक्षित अधिकाऱ्यांच्या अभावी पाकिस्तानच्या स्टेट बँकेला अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो.'' पाकिस्तानची स्टेट बँक व्यवस्थित काम करेल ना, याविषयी महाराष्ट्रीय चिंतामणरावांना काळजी वाटत होती, हे मला वेधक वाटले. खरे तर त्यांना तशी काळजी वाटून घेण्याची आवश्यकता नव्हती. पण त्यांच्या बोलण्याचा रोख होता तो संशोधनाच्या महत्त्वेवर. पाकिस्तानच्या स्टेट बँकेला व्यावहारिक कामे पार पाडू शकतील अशा मंडळींची आवश्यकता भासणार होती. त्यामुळे त्यांनी मला तसे प्रशिक्षण घेण्यास सुचवले आणि त्यानुसार मला चलन-व्यवहार नियंत्रण विभागातील प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात आले.
>
> **- डॉ. हमझा अल्वी**
>
> (डॉ. हमझा अल्वी हे पाकिस्तानातील गेल्या पिढीतले अर्थतज्ज्ञ होते. वरील टिपण त्यांच्या 'फ्रॅगमेंट्स ऑफ ए लाइफ' या आत्मचरित्रातील असून ते ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ निळकंठ रथ यांच्या सौजन्याने प्राप्त झाले आहे.)

बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचा उलगडा

स्वातंत्र्योत्तर भारताच्या अर्थकारणाची आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या राजकारणाची दिशा ठरविणाऱ्या काळावर स्वतंत्र प्रज्ञेने आणि उच्च नैतिक आचरणाने आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या डॉ. सी. डी. देशमुख या महाराष्ट्राच्या सुपुत्राचा गौरव करणाऱ्या 'महाराष्ट्राचा चिंतामणी' या विशेषांकाचे प्रायोजक म्हणून प्रकाशन करताना मला अत्यंत अभिमान वाटतो. डॉ. सी. डी. देशमुखांच्या बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखविणारे त्यातील तज्ज्ञांचे लेख वाचकांना निश्चितच आवडतील, असा विश्वास वाटतो.

- डॉ. पी. अन्बलगन, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

धोरणकर्त्यांना मार्गदर्शक



ज्यांच्या अद्वितीय बुद्धिमत्तेमुळे ब्रिटिश राजवटीतच रिझर्व्ह बँकेचे भारतीयीकरण झाले, त्या डॉ. सी. डी. देशमुख यांच्या गौरवार्थ प्रकाशित झालेल्या 'महाराष्ट्राचा चिंतामणी' या विशेषांकात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यापासून अनेक मान्यवरांनी केलेले लेखन अप्रतिम आहे. त्यातही डॉ. विजय केळकर यांचा 'धोरण संशोधनाचा महामेरू' हा लेख धोरणकर्त्यांना निश्चितच मार्गदर्शक ठरावा. देशाच्या फाळणीबरोबरच रिझर्व्ह बँकेच्या विभागणीमध्ये गव्हर्नर या नात्याने त्यांनी बजावलेली भूमिका, रिझर्व्ह बँकेच्या स्वायत्ततेसाठी प्रसंगी सरकारविरोधी भूमिका घेण्याचे धाडस, विद्वत्तेला स्वाभिमानाची जोड मिळाल्यास सी.डीं.सारखे कणखर व्यक्तिमत्त्व उदयाला येणे, या सर्व गोष्टींवर प्रकाश टाकणारे हे संकलन प्रत्येक महाराष्ट्रीय व्यक्तीला प्रेरणादायी व अभिमानास्पद असेच आहे.

- विद्याधर अनासकर, अध्यक्ष, दी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.

विस्मयकारक जीवनप्रवास...

सी. डी. देशमुखांचा आयसीएस, जागतिक बँक-आंतरराष्ट्रीय नाणे निधीची निर्मिती, रिझर्व्ह बँकेचे पहिले भारतीय गव्हर्नर, वित्तमंत्री, नियोजन आयोगाचे सदस्य, पंचवार्षिक योजनेचे शिल्पकार हा प्रवास विस्मयकारक, तरीही त्या मानाने कमी स्मरला गेलेला असा भासतो. या विशेषांकातील मान्यवरांच्या लेखांद्वारे नव्या पिढीपर्यंत त्यांचा कार्यालेख पोहोचेल याचा आनंद वाटतो.

- किरण ठाकूर, संस्थापक अध्यक्ष, लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटी लि.

‘फ्रेंड्स’ची पुनर्भेट

स्वप्नील घंगाळे

टाळेबंदी उठली, करोनाचा ससेमिराही संपला आणि तुम्ही तुमच्या मित्रांना भेटलात तर जशी त्यांना कडकडीत मिठी माराल आणि धम्माल उडवून द्याल तसाच काहीसा प्रकार नुकताच साऱ्या जगाने अनुभवला. जगभरात लोकप्रिय असलेल्या ‘फ्रेंड्स’ या मालिकेतील कलाकार तब्बल १७ वर्षांनंतर एकत्र आले. गेला आठवडा त्यांच्या चाहत्यांसाठी खऱ्या अर्थाने ‘फ्रेन्ड्स’मय ठरला. या मालिकेतील मोनिका, जोई, चँडलर, रॉस, फिबी, रेचल या आपल्या लाडक्या व्यक्तिरेखांना एकाच स्टेजवर एकाच वेळी तसाच गोंधळ घालताना आणि किस्से सांगताना पाहणं हे चाहत्यांसाठी डोळ्यांचं पारणं फेडणारा अनुभव होता.

गेल्या आठवड्यात गुरुवारी दुपारी भारतात ‘झी फाइव्ह’वर ‘फ्रेंड्स रियुनियन’चा हा खास भाग प्रदर्शित झाला. दोन तासांचा हा शो पाहण्यासाठी चाहत्यांच्या या ओटीटीवर अक्षरशः उड्या पडल्या होत्या असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. मालिकेतील आता पन्नाशीत पोहोचलेल्या कलाकारांनी जुन्या आठवणींना दिलेला उजाळा, मूळ कार्यक्रमातील आठवणीतील प्रसंग पुन्हा साकारण्याचा प्रयत्न, दृश्य वाचन, मालिकेच्या चित्रीकरणादरम्यानचे किस्से, सेट भेट असं बरंच काही या दोन तासांमध्ये घडलं. चाहत्यांसाठी हा भाग म्हणजे छोटा पॅकेज बडा धमाका ठरला यात शंका नाही. म्हणूनच हा भाग प्रदर्शित झाल्यानंतर पहिल्या सात तासांमध्ये तब्बल १० लाख भारतीयांनी हा शो पाहिला. या कार्यक्रमाला एवढा प्रतिसाद होता की भारतामध्ये काही काळ झी फाइव्हच्या यंत्रणेला तांत्रिक बिघाडाचाही सामना करावा लागला.

रेचलची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री जेनिफर ॲनिस्टन आणि रॉसची भूमिका साकारणाऱ्या डेव्हिड स्क्विमरने खऱ्या आयुष्यातही आम्ही एकमेकांकडे आकर्षित झालो होतो अशी कबुली या भागात देत चाहत्यांना धक्का दिला. संपूर्ण जगाला वेड लावणाऱ्या या मालिकेतील प्रमुख पात्रांनीच आपण ही मालिका अद्याप पूर्ण पाहिली नसल्याचा खुलासाही यावेळी केला.

फिबीची भूमिका साकारणाऱ्या लिसा कुड्रोनेही आपण स्वतः ही मालिका पूर्ण पाहिली नसल्याचं सांगितलं. तर डेव्हिडनेही आपण ही संपूर्ण मालिका १७ वर्षांनंतर नुकतीच आपल्या मुलीसोबत पाहून पूर्ण केल्याचं सांगितलं. डेव्हिडसंदर्भातील आणखीन एक खुलासा या भागात झाला तो म्हणजे खास त्याला डोळ्यासमोर ठेवून रॉसची भूमिका लिहिण्यात आली होती. ही व्यक्तिरेखा त्यापद्धतीने पूर्ण लिहून झाल्यानंतर निर्मात्यांनी त्याच्याकडे काम करण्यासंदर्भात आग्रह धरला. मात्र टीव्ही मालिकांमधील काम बंद करून नाटकाकडे परतण्याचा निर्णय घेणाऱ्या डेव्हिडने आधी थोडे आढेवेढे घेतले. नंतर त्याने या मालिकेला होकार दिला. डेव्हिड हा या मालिकेसाठी निवडण्यात आलेला पहिला अभिनेता होता. या सिरीजमधील चँडलर अर्थात मॅथ्यू पेरीच्या आजारपणाबद्दलसुद्धा समाज माध्यमांवर चर्चा रंगली होती. चित्रीकरणाच्या आधी त्याच्या दातांवर शस्त्रक्रिया झाली होती, त्यामुळे त्याचे हावभाव आणि संवादफेकीची शैली वेगळी होती, हे नंतर स्पष्ट झालं. जॅक आणि जुडी गॅलर यांची या मालिकेतील छोटीशी झलक सर्व ‘फ्रेंड्स’च्या चाहत्यांसाठी खास होती.

कट्टर चाहत्यांनाही गोंधळवून टाकणाऱ्या या खुलाशांबरोबरच मालिकेतील गाजलेल्या भागांमधील कपडे घालून या कलाकारांनी केलेले रॅम्पवॉक, चाहत्यांसोबतच्या गप्पाही भन्नाट रंगल्याचं या भागात दिसून आलं. या भागासाठी अनेक तारांकित पाहुण्यांनीही आवर्जून हजेरी लावली होती. यात के - पॉप बॅण्ड बीटीएस, गायक जस्टीन बिबर, गायिका लेडी गागा, फुटबॉलपटू डेव्हिड बेकहॅम, ‘गेम ऑफ थ्रोन्स’ फेम अभिनेता कीट हॅरिंग्टन, सामाजिक कार्यकर्ती मलाला युसूफझाई, अमेरिकन अभिनेत्री मॅगी व्हिलर, अभिनेता टॉम सेललेक अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील नामवंतांनी ‘फ्रेंड्स’शी संबंधित आठवणींना उजाळा दिला. अनेक तारांकितांचा ज्या पद्धतीने या रियुनियनमध्ये सहभाग होता, त्याप्रमाणे या मालिकेत अविस्मरणीय भूमिका साकारणारे काही नामवंत चेहरेही या रियुनियनमध्ये असायला हवे होते असा सूर चाहत्यांमध्ये उमटतो आहे. यामध्ये मूळ व्यक्तिरेखांपैकी एक असलेल्या कॅरोल, माईक, बेन यांसारख्या व्यक्तिरेखांबद्दलही रियुनियनमध्ये काहीतरी हवं होतं, अशी भावना चाहत्यांनी समाजमाध्यमांवरून व्यक्त केली आहे.

गेले कित्येक दिवस ‘फ्रेंड्स’च्या या पुनर्भेटीची उत्सुकता होती. जगभरात करोनाचा कहर झाल्याने ही पुनर्भेट एकदा लांबवण्यातही आली. त्यामुळे होणार होणारच्या तालावर असलेल्या या रियुनियनची तारीख जाहीर झाल्यानंतर भारतातही ट्विटरवर ‘फ्रेंड्स’संदर्भातील हॅशटॅग ट्रेण्ड होत होते. या पुनर्भेटीचे निमित्त साधत अनेक कंपन्यांनी ‘फ्रेंड्स रियुनियन थीम’च्या माध्यमातून आपल्या उत्पादनांची हटके जाहिरातबाजीही केली. अनेक भारतीय कलाकारांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे या रियुनियनमध्ये सहभाग नोंदवला. भारतीय क्रिकेटपटू रोहित शर्मांने शतक साजरा केल्यानंतरचा चाहत्यांना अभिवादन करतानाचा जुना फोटो पोस्ट करत मी या ‘फ्रेंड्स’ सोबतच्या रियुनियनची वाट पाहतोय अशी पोस्ट केली होती. तर आलिया भट्ट, गौरी खान, मल्लायका अरोरा, सोफिया चौधरी या सेलिब्रिटींनीही समाजमाध्यमांवरून ‘फ्रेंड्स रियुनियन’ पहात असल्याचं सांगत स्टेटस पोस्ट केले. एकंदरीतच सर्वसामान्यांपासून ते सेलिब्रिटींपर्यंत सर्वांनाच सध्याच्या करोना परिस्थितीमुळे आलेली मरगळ या ‘फ्रेंड्स रियुनियन’ने थोडी का होईना दूर केली, अशा भावनाही चाहत्यांनी व्यक्त केल्या आहेत. एखादी मालिका इतक्या वर्षांनंतरही लोकांच्या मनात घर करून राहू शकते, लोक पुन्हा त्या मालिकेच्या आठवणीत रमतात, त्याचा आनंद नव्याने अनुभवतात हे या ‘फ्रेंड्स द रियुनियन’ने दाखवून दिले आहे.

भाषेपल्याडचं मनोरंजन

तेजश्री गायकवाड

छोट्या पडद्यावरच्या मनोरंजन विश्वाचा पसारा हा भलामोठा आहे. हिंदी, इंग्रजी ते प्रत्येक प्रादेशिक भाषेतील वाहिन्या, मालिका आणि कलाकारांचा घरोघरी मनोरंजनाचा राबता सुरू असतो. त्यांची लोकप्रियतेची समीकरणंही वेगळी असतात. सध्या या इंडस्ट्रीचा विस्तार एवढा वाढला आहे की भाषेची बंधनं सोडून अनेकदा मराठी किंवा बंगाली भाषेत गाजलेल्या मालिकांचा हिंदी रिमेक पहायला मिळतो. कधी एखाद्या लोकप्रिय हिंदी मालिकेचा प्रादेशिक अवतार पहायला मिळतो. कलाकारांच्या बाबतीतही आता हे भाषेचं बंधन उरलेलं नाही. याआधी अनेक मराठी कलाकारांनी हिंदी मालिकांमधून आपली ओळख निर्माण केली आहे, मात्र सध्या मालिकेतील तरूण कलाकार मंडळी सहज मराठीतून हिंदी किंवा हिंदीतून मराठी असा उलटसुलट प्रवास करताना दिसत आहेत. चांगल्या भूमिकाच्या शोधात असलेल्या या कलाकारांनी भाषेचा अडसर सहजी पार केला आहे.

मनोरंजनाला भाषेची मर्यादा नसते. म्हणूनच आता मनोरंजनसृष्टीत दाक्षिणात्य कलाकार मराठीमध्ये, मराठीतील कलाकार हिंदी, तमिळ भाषांमध्ये काम करतांना दिसतात. त्यातही प्रादेशिक मालिका-चित्रपटातून काम करणारे कलाकार हिंदीच्या मुख्य धारेत आले की त्यांना देशभरातील प्रेक्षकवर्ग ओळखू लागतो. त्यामुळे हिंदी मालिकेत काम करण्याकडे अनेकांचा कल दिसून येतो. नीना कुलकर्णी, मृणाल कुलकर्णी, स्वाती चिटणीस, निशिगंधा वाड, सविता प्रभुणे, शुभांगी गोखले, मानसी साळवी, मिलिंद गुणाजी, स्वप्नील जोशी, राकेश बापट, पूर्वा गोखले, स्नेहा वाघ अशा कित्येक मराठी कलाकारांनी याआधीच हिंदी मालिकांमध्ये काम करत आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. मधल्या काळात अनेक कलाकारांनी मराठी मालिकांमध्येच काम करण्यावर भर दिला होता. आता पुन्हा एकदा नव्या तरूण कलाकारांनी हिंदीत पाय रोवायला सुरूवात केली आहे. गश्मीर महाजनी आणि मयुरी देशमुख हे दोघेही सध्या ‘स्टार प्लस’च्या ‘इमली’ मध्ये काम करत आहेत. तर हेमांगी कवीचं ‘स्टार भारत’वरच्या ‘तेरी लाडली मै’ या मालिकेतील उर्मिलाचं पात्र चांगलंच लोकप्रिय ठरलं आहे. ‘सोनी टेलीव्हिजन’वरील ‘पुण्यश्लोक अहिल्याबाई’ मालिकेतही राजेश श्रृंगारपुरेसह सुखदा खांडकेकर, स्नेहलता वसईकर असे मराठमोळे चेहरे दिसत आहेत. ‘रात्रीस खेळ चाले १’ मधून घराघरात पोहोचलेला आदिश वैद्य सध्या ‘गुम है किसीके प्यार मे’ या मालिकेमध्ये काम करतो आहे. त्याने हिंदीतील प्रसिद्ध मालिका ‘नागिन’च्या तिसऱ्या पर्वासह ‘बैरीस्टर बाबू’, ‘साम दाम दंड भेद’ या मालिकांमध्येही काम केलं आहे.

एकीकडे मराठीतून हिंदी पोहोचलेले कलाकार आहेत, तसेच हिंदी मालिकांमधून सुरूवात करून तिथे लोकप्रियता मिळाल्यानंतर मराठीत काम करणारे कलाकारही आहेत.

अभिनेत्री अभिज्ञा भावेने ‘प्यार की एक कहानी’मध्ये छोटंस पात्र रंगवलं होतं. काही मराठी मालिकांमधून काम केल्यानंतर ८ वर्षांनी पुन्हा एकदा ती ‘बावरा दिल’या हिंदी मालिकेत काम करते आहे. अभिज्ञाप्रमाणेच शिवानी सुर्वेनेही हिंदी मालिकांमधून काम केल्यानंतर ‘देवयानी’ ही मराठी मालिका केली होती. तर आता नव्या दमाची सुंदरा म्हणजे अक्षया नाईकनेही हिंदी ते मराठी असा प्रवास केला आहे. भूमिकांमधलं वैविध्य, वाढता प्रेक्षकवर्ग, आर्थिक स्थैर्य आणि वेगवेगळ्या भाषेत काम करण्याचं समाधान अशा कारणांमुळे कलाकार सध्या भाषेचा विचार न करता हिंदी, मराठी किंवा अन्य भाषेत काम करण्यावर भर देताना दिसतात.



‘भाषेवर प्रभुत्व हवं’

मी सुरुवात जरी हिंदी मालिकांमधून केली असली तरी मला नेहमीच मराठी मालिकांचं आकर्षण होतं. माझी आजी नेहमी म्हणायची की तुला कधी तरी मराठीमध्ये काम करायची संधी मिळायला हवी, पण मला योग्य मार्ग सापडत नव्हता. मी खूप ऑडीशन सुद्धा देत होते. शेवटी लतिकाच्या भूमिकेने माझी आणि माझ्या घरच्यांची इच्छा पूर्ण झाली. हिंदीतून मराठी किंवा अगदी उलट पध्दतीने काम करत असतानाही तुमचं भाषेवरचं प्रभुत्व महत्वाचं ठरतं. माझ्या पहिल्या हिंदी मालिकेमध्ये माझं पात्र हे मराठी मुलीचंच होतं. त्यामुळे मी उत्तमरित्या मुंबईवाली हिंदी मराठी मिश्र भाषा बोलत होते. त्यानंतरच्या मालिकेत माझं पात्र राजस्थानी असल्यामुळे मला माझ्या हिंदीवर खूप काम करावं लागलं. हळूहळू हिंदीतून विचार करायची मला सवय लागली. त्यामुळे मला जेव्हा मराठी मालिकेत काम करायची संधी मिळाली तेव्हा सुरुवातीला थोडंसं जड गेलं. माझी मातृभाषा मराठीच असल्यामुळे मी सहज उत्तम मराठी बोलू लागले.

- अक्षया नाईक - सुंदरा मनामध्ये भरली

‘प्रेक्षकवर्ग वाढतो’

मला दोन्ही भाषांमध्ये काम करण्याची संधी सतत मिळत गेली. त्यामुळे अनेक वेगवेगळी पात्रं रंगवता आली. दोन वेगवेगळ्या भाषांमधील मालिकेत काम करताना जास्त फरक जाणवत नाही, कारण काम करण्याची पद्धत थोड्याफार फरकाने सारखीच असते. परंतु तुम्ही दुसऱ्या भाषेत काम करता तेव्हा तुम्हाला मोठा प्रेक्षकवर्ग मिळतोच. सध्या मी मल्हारराव होळकरांची भूमिका करतो आहे. एका यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते असं म्हटलं जातं. तसंच एका स्त्रीच्या मागे पुरुषाने भक्कमपणे उभं राहावं असंही म्हटलं जातं. मल्हाररावांनी ही गोष्ट आधीच केली होती. ते अहिल्याबाई होळकरांच्या मागे खंबीरपणे होते. अशा वेगवेगळ्या भाषेतील मालिकांमधून तितक्याच वैविध्यपूर्ण भूमिका करण्याचा, त्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा आनंद मला निश्चितपणे मिळतो.

- राजेश श्रृंगारपुरे - पुण्यश्लोक अहिल्याबाई

लोकसत्ता जीवनसाथी

दोन जीवांच्या मीलनाचा मंगल मार्ग

विवाहोत्सुक मंडळींसाठी रविवार लोकसत्तामध्ये छोट्या जाहिरातींचे खास सदर

वर पाहिजे

प्रथमवधू, २७, ५.३, एचएससी, मराठा ९६ कुळी, सुंदर वधूसाठी वर पाहिजे, जातीची अट नाही. मो. ८९५६०६८७९५. 0090284908-23

प्रथमवधू, ३१, ५.३, बीडीएस, डेंटिस्ट, वा. उ. ८ लाख, ब्राह्मण, जातीची अट नाही. मो. ८९५६०६८७९२. 0090284908-25

वधू- वय २७, उंची ५’-३’’, शिक्षण १२वी, प्रायव्हेट जॉब, प्रतिमहा १०,००० (आई आहे, वडील नाही), जात मराठा, वयाची, शिक्षणाची, जातीची अट नाही. सुयोग्य वर हवा. त्वरित विवाह. 9028241193. 0070740966-1

वर पाहिजे वय-३६, बीई, सॉफ्टवेअर इंजिनिअर, पगार ४८०००/- प्रायव्हेट जॉब. आई आहे. जातीची वयाची अट नाही. जात मराठा.- ८६००३१३९१६/ ७७५८८३९२७२. 0090285806-1

दादरस्थित, प्रथमवधू, ३४, ५.३, मराठा, बीकॉम, गव्हर्नमेंट जॉब, वा.उ. ९ लाख, सुंदर वधूसाठी सुस्थापित वराची अपेक्षा, आंतरजातीय चालेल. मो. ८९५६०६९६३०. 0090284908-24

सायनस्थित, नाममात्र घटस्फोटीत वधू, वय-३०, उंची-५.४, मराठा, एमबीए, दिसते मात्र २३-२४ ची देखणी, सुसंस्कृत, प्रतिष्ठित कुटूंब, अपेक्षा- विनाअपत्य, स्वजातीय, उच्च आंतरजातीय, प्रेमळ, मुंबईस्थित, वा.उ. ५ लाख. मो. ७७५६८१९१७०. 0090285616-20

प्रथमवधू, ३०, बुद्धिष्ट, ५.२, बॅचलर इन लॉ, वा.उ. ३ लाख, सुंदर वधूसाठी सुस्थापित वराची अपेक्षा, जातीची अट नाही. मो. ८९५६०६८७९८. 0090284908-27

घटस्फोटीत वधू, ३६, ५.४, मराठा ९६ कुळी, बी.फार्म, वा.उ. ९ लाख, सुंदर वधूसाठी योग्य जोडीदार हवा, जातीची अट नाही. मो. ८९५६०६९६५३. 0090284908-26

प्रथमवधू, २५, ५.२, बीई, मराठा, वा.उ. ३.५ लाख, सुंदर वधूसाठी वर पाहिजे, जातीची अट नाही. मो. ८९५६०६९६३३. 0090284908-28

वधू मराठा २५/ ५.१, गोरी देखणी, बांधेसूद बीई, सर्व्हिस- बेंगळूर ५८०००/- (कोकणातील सुस्थापित कुटुंब, सध्या बेळगाव वास्तव्य) अपेक्षा अनुरुप - ९४२२३८१८०५. 0090285802-1

पुणेस्थित, प्रथमवधू, वय-३२, उंची-५.३, सुंदर, बीटेक, एमएनसी कंपनीमध्ये मॅनेजर, वा.उ. १२ लाख, स्वतःचे घर, गाडी, सुशिक्षित, सुस्थापित वराची अपेक्षा. मो. ९३५६१८५२५९. 0090285616-26

वधू 96K कोकणस्थ मराठा, २९, ५’-३’’, M.E., MNC (Permanent Job). अपेक्षा- स्वजातीय, उच्चशिक्षित, 9136944765/ 9004624358/ 9869201547. 0070741544-1

मुंबईस्थित, प्रथमवधू, वय-४८, उंची-५.३, रंग-निमगोरा, देखणी, बीए, एलएलएम, हिन्दू, नोकरी, वा.उ. ८-१० लाख, वेल सेटल फॅमिली बॅकग्राऊंड, उच्चशिक्षित अनुरुप वराची अपेक्षा, जातीची अट नाही. मो. ९७७३४५६७३८. 0090285616-25

कांदिवलीस्थित, प्रथमवधू, वय-३९, उंची-५.६, हिंदू-सुतार, एचएससी, वा.उ. ४ लाख. मो. ८०९७७११४४५. 0090285616-21

अंधेरीस्थित, प्रथमवधू, वय-२८, उंची-५.५, बुद्धिष्ट, एअर इंडिया, वा.उ. ३० लाख, जातीची अट नाही. मो. ९६६५०७८७३१. 0090285616-14

वधू- ९६ कुळी मराठा, वय ३०, उंची ५’.७’’, गोरी, शिक्षण, एम.सी.ए. नोकरी आयटी कंपनी, पगार ११ लाख पॅकेज, अपेक्षा सुसंस्कृत, वयातील अंतर २-३ वर्षे, मनमिळाऊ, जॉब इन सेमफिल्ड, पुण्यात राहणारा, नोकरी करुन देणारा. संपर्क- ८४४६२६२८००. 0090285781-1

प्रथम वधू, मराठा, ३०, ५’.३’’, एमबीए, मुंबई, वा.उ. १० लाख, सुस्थापित परिवार, उच्चशिक्षित व योग्य वराची अपेक्षा, जातीची अट नाही. मो. ८८३०३२६५२३. 0090285813-1

भंडारी- प्रथम वधू- २७/ ५’-९’’/ M.Arch/ मुंबईस्थित, शाकाहारी, नीटस, Self- Employed, गहूवर्ण. अपेक्षा- अनुरूप, उच्चशिक्षित, मुंबईस्थित, कोकणस्थ- ब्राह्मण, मराठा, भंडारी. संपर्क- ‘९८६९२२२८४८’. 0070738895-1

बोरिवलीस्थित, घटस्फोटीत वधू, ५७, ५’.२’’, एमकॉम, मराठा, सरकारी नोकरी, वा.उ. १० लाख, स्वतःचे घर, रत्नागिरी येथे प्रॉपर्टी, सुशिक्षित समजुतदार वराची अपेक्षा, जातीची अट नाही. मो. ९३५६१८५२५९. 0090284737-28

पुणेस्थित, प्रथमवधू, वय-४१, उंची-५.४, एम,कॉम, एमबीए, एमएनसी कंपनीत असिस्टंट मॅनेजर, वा.उ. १५ लाख, स्वतःचे घर, पालक उच्चशिक्षित, दिसायला सुंदर, सुस्थापित मुलाची अपेक्षा. मो. ७६६६९१२३९०. 0090285616-17

प्रथमवधू कोकणस्थ ब्राह्मण, शाकाहारी, ३४ पूर्ण, 5’-2½” M.Com, 1st Class, Tried for CA 1st year, नोकरी, सुसंस्कारी कन्या. अपेक्षाः स्वजातीय, उच्चशिक्षित, सुस्थापित, मुंबईस्थित. संपर्क- 9224173941, वेळ- सकाळी ८ ते ११. 0070741063-1

ब्राह्मण

वर पाहिजे वधू- ब्राह्मण, गोरी, देखणी, ४५/ ५’-५’’, BE, Self Employed. अपेक्षाः सुशिक्षित, उच्चजातीय, मुंबईत राहणारा, घरजावई पाहिजे. 8779375734. 0070740063-1

वधू पाहिजे

अंधेरीस्थित, प्रथमवर, वय-४६, उंची-५.११, सीकेपी, बीई, एमबीए, मॅनेजर, वा.उ. २० लाख, निर्व्यसनी, जातीची अट नाही. मो. ७५०६२२९२१६. 0090285616-16

वर- ९६ कुळी कोकणस्थ मराठा, ३८ वर्षे, गोरा, ५’-६’’, एम.एस.सी., फार्मा कंपनीत नोकरी, वार्षिक उत्पन्न २७,००,०००/-, 2BHK Flat. अपेक्षाः स्वजातीय, नोकरी/ व्यवसाय, अनुरुप. संपर्कः 9870232086 - 8169909131. 0070741059-1

वर- क.ब्रा., ४६/ ५’-१०’’, B.A., १२,०००/-, स्वतःचे घर नाही, घटस्फोटित. अपेक्षाः जातीची, शिक्षणाची अट नाही. अपत्य/ विनाअपत्य चालेल. संपर्क- 9136789374. 0070741526-1

माहिमस्थित, घटस्फोटीत वर, वय-५४, उंची-५.११, मराठा, सीए, मॅनेजर, वा.उ. २० लाख, स्वतःचा फ्लॅट, निर्व्यसनी, जातीची अट नाही. मो. ७५०६२२९२१६. 0090285616-15

ब्राह्मण वर- घटस्फोटित, ५९/ ५’-८’’, उच्चशिक्षित, ३५ लाख वार्षिक, निर्व्यसनी, दोन मुलींपैकी एक विवाहित. अपेक्षाः ब्राह्मण, शाकाहारीच, अपत्य चालेल. 9920026531. 0070740058-1

विलेपार्लेस्थित, विधुर, वय-५५, उंची-५,११, मराठा, बीई, स्वतःचा ट्रान्सपोर्ट व्यवसाय, वा.उ. १ कोटी आणि इतर प्रॉपर्टी, हौशी साथीदाराची गरज, वयाची अट नाही. मो. ८८३०५५११३६. 0090285616-18

प्रथम वर, वय २५ वर्ष, मेकॅनिकल इंजिनीअर, मराठा, देखणा, उंची ५’-८’’, स्थायिक मुंबई - विरार, स्वतःचा फ्लॅट. जातीची अट नाही. संपर्क- 9967349723/ 9004322164. 0070741038-1

उच्चशिक्षित, उच्चपदस्थ, प्रथमवर, ९६ कुळी मराठा, *५२/ ५’-८’’, देखणा, निर्व्यसनी, M.B.A., LL.M, ICWA, CS, *ASS. GENERAL MANAGER - BANK 17 Lacs p.a. स्वतंत्र फ्लॅट. * अपेक्षा : Legal Profession / Doctor / CA. * 9821302834 *email: vijay141268@gmail.com 0070741578-1

परेलस्थित, प्रथमवर, ३२, ५’.११’’, को.ब्राह्मण, बीई, एमबीए फ्रॉम (आय.आय.एम. अहमदाबाद) एमएनसी कंपनीत कार्यरत, वा.उ. २८ लाख, वेल सेटल फॅमिली बॅकग्राऊंड अनुरुप वधू पाहिजे, जातीची अट नाही. मो. ९७७३४५६७३८. 0090284737-29

प्रथमवर ९६ कुकोम, ४८, ५’-५’’, बी.ए. गव्हर्न्मेंन्ट. वार्षिक उत्पन्न ८५००००/-, मध्य मुंबईत दोन ब्लॉक. अपेक्षा- प्रथमवर, नोकरी. 9220160237. 0070741036-1

घटस्फोटीत वर, वय-३९, उंची-५.८, सोनार, एमडी, डॉक्टर- गव्हर्नमेंट हॉस्पिटल, वा.उ. १५ लाख, आणि अधिक, लोकेशन-नाशिक. मो. ७७५६८१९१७०. 0090285616-19

घटस्फोटीत वर, वय-५०, उंची-५.१०, शिंपी, सीए, वा.उ. ३० लाख. मो. ८०९७७११४४५. 0090285616-22

घाटकोपरस्थित, प्रथमवर, वय-४०, उंची-५.१०, बुद्धिष्ट, एमकॉम, एमबीए, सरकारी नोकरी, वा.उ. २५ लाख, जातीची अट नाही. मो. ८५५०९४८७८९. 0090285616-24

प्रथमवर, ३८, ५.१०, शिंपी, मास्टर्स, वा.उ. १० लाख, सुस्थापित वरासाठी वधू पाहिजे, जातीची अट नाही. मो. ८९५६०६८७९४. 090284908-29

६० वर्षीय मुंबईस्थित डॉक्टरांना साथीदार पाहिजे. जातीची, धर्माची, शिक्षणाची, वयाची अट नाही. संपर्क- 9323072780. 0070741718-1

गिरगावस्थित, प्रथमवर, वय-३८, उंची-५.८, मराठा, बँक मॅनेजर, वा.उ. १० लाख, जातीची अट नाही. मो. ९६६५०७८७३१. 0090285616-13

डोंबिवलीस्थित, प्रथमवर, वय-३६, उंची-५.१०, ब्राह्मण, सीए, एमएनसी कंपनीमध्ये व्हीपी, वा.उ. ३० लाख, जातीची अट नाही. मो. ८४२१११७१८०. 0090285616-23

DEC. 64, 5’-3”, हिंदू SC, घटस्फोटित, मुलांची जबाबदारी नाही, डिप्लोमा इंजिनीअर, मासिक उत्पन्न ३०,०००/-. तळेगांवात वास्तव्य, इतरत्र राहण्याची तयारी. अपेक्षाः घटस्फोटित, विधवा, व्यवसाय, नोकरी, पेन्शनधारक असलेल्यांना प्राधान्य. जातीची, वयाची, शिक्षणाची अट नाही. 9619906575. 0070741055-1

वर, सिकेपी, ५’-७’’, ३४, MCA, मुंबई, वार्षिक उत्पन्न ५ लाख, जातीची अट नाही. 9869944107/ 8355912053. 0050178511-1

जातीची अट नाही

वधू पाहिजे- मराठा, ३४, ५’-११’’, CA (Finance), Business Analyst, मुंबईत स्थायिक, जातीची अट नाही, 9136583201. 0070741549-1

मॅरेज ब्युरो

‘सौभाग्य मॅरेज ब्युरो’ डोंबिवली- 8692932323 Lockdown मुळे घरी सुरक्षित राहून सर्व जातीतील स्थळांच्या Online नोंदणीसाठी- www.soubhagya.org 0070741034-1

सर्वजातीय कोकणी स्थळांसाठीच !! माऊली विवाह संस्था!! शाखा- ठाणे, सावंतवाडी, रत्नागिरी, रायगड, पुणे. 8888765029/ 7522990099. www.maulivivahsanstha.com 0070725676-1

फक्त ब्राह्मणांसाठी पवित्र बंधन विवाह संस्था भारत, विदेशातील भरपूर स्थळे. www.pavitrabandhanindia.in 9766800722 जोशी ऑनलाईन सेवा. 0070741570-1

शुभमुहूर्त विवाह मंडळ (www.shubhmurta.com) सर्व जातींची स्थळे (शहरभर ५० शाखा)
* (चिंचपोकळी ९८६९६११५५१)
* (घाटकोपर ९९२००२९८७७)
* (मुलुंड ९८६७९२८१८०)
* (ठाणे ९२२२६३९१५१)
* (ठाणे ८३६९९३१५६४)
* (कळवा ८८७९०१९४०२)
* (डोंबिवली ९८९२१३३५५१)
* (बदलापूर ८००७१३०३६७)
* (बदलापूर ७२७६७५३९०९)
* (कल्याण ९८६९८६८६२०)
* (माहीम ९६१९६१९११५)
* (सांताक्रूझ ८४२२९१००९७)
* (पवई ८६५५१५६८१९)
* (मालाड ९८३३७७६९४२)
* (पाली ९२२०३४२२०६)
* (कांदिवली ९९६९७५६०८४)
* (बोरीवली ९७५७०९५५०२)
* (बोरीवली ९८२१४०६४११)
* (वसई ९१५८५१९३००)
* (नालासोपारा ९३२४८६०५१८)
* (नालासोपारा ९७०२३२०९५९)
* (विरार ८७८८५२८९२८)
* (पनवेल ९३२४२०१८००)
* (डहाणू ९२२६९३९१११).
* (अलिबाग ९३७०५१७९४९)
* (रोहा ८८८८९३५७७५)
* (नवीन शाखेसाठी संपर्क) * (९५९४९९३३४९, ८३६९९२४९७७) 0070725913-1

ॲप डाउनलोड करा Google Play App Store

- 38 वर्षांची विश्वसनीय सेवा
- 50000 पेक्षा जास्त विवाहेच्छुक स्थळे.
- 100000 पेक्षा जास्त यशस्वी विवाह जुळविण्याचा अनुभव.
- Verified स्थळे
- अमर्याद गुण मिलन सुविधा
- आजच नाव नोंदवा

सौ. कुळकर्णींची PavitraVivah.com महाराष्ट्राची लोकप्रिय मॅट्रीमोनी

28, श्री बिल्डिंग, दुसरा मजला, रानडे रोड, दादर स्टेशनजवळ, दादर (प.), मुंबई - 28

9892625606 / 8450914835

बोरिवली : 7506458615 ठाणे : 7400481611

मराठा वधू-वर सूचक केन्द्र
फक्त मराठा समाजासाठी
www.marathavadhuwar.com
फोन : 020 -24453956 मो.: 9823350466
Android App : Marathavadhuwar
मराठा समाजाची भरपूर स्थळे

आनंद मराठा वधू-वर केंद्र ®
- फक्त मराठा समाजासाठी
- नेमका ऑनलाईन सर्च
- मोबाईल ॲप उपलब्ध
- ऑनलाईन फी 2000/-
- दरवर्षी 16000 नोंदणी
- ऑनलाईन नोंदणीची सोय
- SMS/ईमेलने मॅचिंग लिंक
- मोफत ऑनलाईन गुण मिलन

सुहास शिर्के, पुणे www.anandmaratha.com 9921501133 9822214005

क्षत्रिय मराठा तावडे हितवर्धक मंडळ, मुंबई
मराठा वधूवर सूचक केंद्र/तिमाही भव्य मेळावे
केंद्राला ५२ वर्षे पूर्ण
www.tawdevivah.com
ऑनलाईन नाव नोंदणीसाठी आजच वेबसाईटला भेट द्या
लोअर परळ- ऑफिस क्र.१, पहिला मजला, फ्लॉरेन्स टॉवर, करी रोड, लोअर परळ, ब्रिज नाका, मुंबई-१३ रोज दुपारी २ ते रात्री ८ रविवार सकाळी १० ते दुपारी १ ● संपर्क : ८५४०३२१८७ / ८५४०६०२६४
ठाणे - ४०७ पॅराडाइझ टॉवर, ठाणे (प.), स्टेशन जवळ, अलोक हॉटेल समोर. रोज दुपारी ४ ते रात्री ८, रविवार सकाळी १० ते दुपारी १ ● संपर्क : ९६१९९७०६८७ / ०२२-४१००६०९०
बोरीवली - १०८, पहिला मजला, अवंता स्क्वेअर मॉल, स्टेशनसमोर, बोरीवली (पश्चिम). रोज दुपारी ३ ते सायं. ७ रविवार सकाळी १० ते दुपारी १ ● संपर्क : ९८६९३६५४५८ / ०२२-२८९१८५६५

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग
जीवनसाथी
दर रविवारी लोकसत्ता'तून

epaper.loksatta.com

लग्नकल्लोळ!

निलेश अडसूळ

ठरावीक एका काळानंतर मालिकांमध्ये लग्नाचे ट्रॅक येत असतात. 'लग्न' ही बाब समान असली तरी प्रत्येक लग्नाची गोष्ट वेगळी. काही अपवाद वगळता दिमाखदार सोहळा, वराती, लोकांचा गराडा, उंची तामझाम असे काहीसे स्वरूप मालिकांमध्ये घडणाऱ्या लग्नांचे असते. मग मध्येच कुणीतरी मिठाचा खडा टाकणारे पात्र येते, कुणाचा तरी विरोध असतो किंवा नाना अडचणी येऊन उत्कंठा वाढत लग्न सफल होते. पण येत्या आठवड्यात झालेल्या आणि होणाऱ्या विवाहांची कथा काहीशी वेगळीच आहे. म्हणजे एकही लग्न सहज झालेले नाही. म्हणून कथाकल्लोळ करत झालेली ही लग्ने विशेष ठरतात. खास बात म्हणजे मुंबईबाहेर चित्रीकरण सुरू असल्याने त्या त्या जागेनुसार आशयात केलेले बदल, जुळवाजुळव यांची उत्तम सांगड घालून निर्माते-दिग्दर्शक आणि एकूणच चमूने हे विवाह यशस्वी केले आहेत. म्हणूनच या विवाहांचा शब्दचौघडा वाचकांच्या कानी पोहोचवण्याचा प्रयत्न...

■ सोनी मराठीवर वाहिनीवरील 'तू सौभाग्यवती हो' ही मालिका सध्या चांगलीच चर्चेत आहे. वयात अंतर असलेल्या जोडप्यांची कथा वाहिनी जगतला नवीन नाही. पण ग्रामीण बाज, आर्थिक, सामाजिक स्तर भिन्न असलेली दोन कुटुंबे आणि दर्जेदार अभिनय साकारणारे कलावंत यामुळे ही मालिका वेगळी ठरते आहे. कणखर बाणा असलेल्या सूर्यभानरावांच्या घरी काम करणारी अल्लड ऐश्वर्या थेट आता सूर्यभान जाधव यांच्याशी विवाहबद्ध होणार आहे. मालिकेच्या सुरुवातीपासूनच प्रेक्षक या दिवसाची वाट पाहत होते. या आधी ऐश्वर्याचे पहिले लग्न मोडले आहे. शिकार करत असताना सूर्यभान यांच्या हातून तिच्या नवऱ्याचा खून होतो. तर दुसरीकडे सूर्यभान विधुर आहेत, शिवाय त्यांचे प्रेमप्रकरणही आहे. असे असतानाही बायकोची जागा कुणालाही न देण्याचा सूर्यभान यांचा निश्चय आहे. पण बायजींना मात्र ऐश्वर्याच्या साधेपणाची आणि वेळप्रसंगी हुशारीची, जिद्दीची जाणीव असल्याने त्यांना हीच सून म्हणून हवी आहे. म्हणून सूर्यभानही लग्नासाठी तयार होतात. इतका गुंता असताना लग्न करणे ही ऐश्वर्यासाठी तारेवरची कसरत असणार आहे. येत्या आठवड्यात ऐश्वर्याची मेंदी, हळद, सूनमुख पाहणे, अंगठी शोधणे असे नाना सोहळे प्रेक्षकांना पाहायला मिळतील.

■ झी मराठी वाहिनीवर तर डॉ. अजितकुमार देव यांचा विवाह पाहण्यासाठी प्रेक्षक आतुरले आहेत. आजवर अनेक मुलींची फसवणूक केलेला हा 'देवमाणूस' अखेर लग्नबेडीत अडकतो आहे. अर्थात यामुळे 'देवमाणूस' ही मालिका एका भलत्याच रंजक वळणावर आलेली आहे. एकीकडे पोलीस अधिकारी असलेल्या दिव्या सिंगसोबत प्रेम प्रकरण करून त्यांना गुह्य'ाचा तपास थांबवायला भाग पडणारा अजितकुमार देव, दिव्या सिंग भरीस न पडल्याने थेट डिम्पलशी लग्न करण्याचा निर्णय घेतो. केवळ निर्णय नाही तर संपूर्ण गावापुढे याची घोषणा करतो. सध्या त्यांच्या लग्नाची जोरदार तयारी सुरू आहे. तर दुसरीकडे डॉ. अजितकुमार देव हाच गुन्हेगार 'देवी सिंग' असल्याचा दिव्याचा संशय बळावतो आहे. त्याच्या विरोधात पुरावे शोधण्यासाठी तिने पछाडलेले जंग आणि लग्नाची लगबग असा दुहेरी आशय मालिकेत रंग भरतो आहे.

आता हा विवाह सफल होणार की दिव्या सिंग त्याला बेड्या ठोकणार की पुन्हा डॉक्टर कुणाचा तरी खून करणार... प्रेक्षकांच्या मनाची उत्कंठा वाढवणाऱ्या अशा नाना प्रश्नांची उत्तरे येत्या भागात मिळतील.

■ तर याच वाहिनीवरील 'येऊ कशी तशी मी नांदायला' या मालिकेतही लग्नाच्या आधीची म्हणजे प्रेमाची पूर्वतयारी सुरू आहे. नुकताच मोहित आणि स्वीटूचा साखरपुडा मोडल्याने त्यांच्या लग्नाचे सर्व आडाखे गळून पडले आहेत. साखरपुड्या दिवशी ओमने जरी आपल्या प्रेमाची कबुली दिली असली तरी स्वीटूने मात्र अद्याप कबूल केलेले नाही. या रगाड्यातून शांतता मिळावी म्हणून ओम परदेशी जाण्याचा निर्णय घेतो. पण त्या वेळी स्वीटू व्यक्त होते आणि तो माघारी फिरतो. आता नेमके त्यांच्या प्रेमाचे पुढे काय होणार? नलू आणि मालविका अशा दोन तटांवर सुरू असलेला हा संघर्ष थांबून स्वीटू खानविलकरांच्या घरची सून कधी आणि कशी होणार?, याची उत्सूकता प्रेक्षकांमध्ये आहे.

■ कलर्स मराठी वाहिनीवरील 'राजा रानीची गं जोडी' या मालिकेत झालेला संजू आणि रणजीतचा विवाह सोहळा हादेखील एक रंजक प्रकार होता. रणजीतचे लग्न मोडणे, संजूचे वय लपवून तिच्याशी रणजीतचा विवाह होणे, त्याला आईसाहेबांचा विरोध असणे हा सगळा भाग आपण बघितलाच आहे. पण आता रणजीतच्या धाकट्या भावाचा म्हणजे सुजित ढालेपाटील याचा विवाह झाला आहे. अपर्णा या मुलीशी झालेला हा विवाह ही फसवणूक असल्याचे केवळ संजूच्या निदर्शनास आले आहे. परंतु तिच्यावर कुणीही विश्वास ठेवत नाही. उलट अपर्णा आणि राजश्री वाहिनी यांच्या कारस्थानाला ती बळी पडते आहे. कटाच्या जोरावर झालेला हा लग्नसोहळा साधेपणाने पार पडला असला तरी येत्या काही भागात मालिकेत अपर्णा धुमशान घालणार आहे. सध्या राजश्रीची अपर्णाला साथ असली तरी भविष्यात अपर्णा राजश्री वाहिन्यांच्या डोक्यावरही मिऱ्या वाटू शकते. त्यामुळे आता लग्न झाले असले तरी आगामी भागात खरा गोंधळ ढालेपाटलांच्या वाड्यात होणार आहे.

■ अभिषेक आणि अनघा यांचा साखरपुडा होत असतानाच अचानक अभिला फोन येतो आणि तो निघून जातो. आत्महत्या करायला निघालेल्या अंकिताला वाचवण्यासाठी गेलेला अभिषेक येताना अंकिताशी लग्न करून येतो. असा अनपेक्षित विवाहसोहळा स्टार प्रवाह वाहिनीवरील 'आई कुठे काय करते' या मालिकेत झाला आहे. अभिषेकची ही भूमिका प्रेक्षकांना अचंबा व्यक्त करायला लावणारी होती. पण अशा वेळी अरुंधती म्हणते तसे 'देशमुखांच्या घराला दोन बायकांची परंपरा आहे' हे वाक्य अभिलाही लागू होतेय का याचा प्रेक्षक विचार करत आहेत. कारण फसवणुकीने लग्नाच्या जाळ्यात ओढलेल्या अभिला सत्य समजल्यावर त्याची काय भूमिका असेल हे निर्णायक ठरणार आहे. विशेष म्हणजे अनघा सध्या मालिकेत दिसत नसली तरी प्रेक्षकांच्या मनात अजूनही अनघाचेच स्थान आहे. त्यामुळे अभि आणि अंकिताचे झालेले लग्न टिकेल का?, ही या लग्नाची खरी मेख आहे. अंकिताच्या स्वभावामुळे हे लग्न मोडले, तर अनघा झालेला अपमान विसरून पुन्हा देशमुखांच्या घरात येणार का?, अभि पुन्हा बोहल्यावर चढणार का?, याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे मालिकांमध्ये केवळ लग्न नाही लग्नकल्लोळ सुरू आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

झी टॉकीजवर 'केसरी'चा प्रीमिअर

करोनाच्या या कठीण काळातसुद्धा प्रेक्षकांना भरभरून मनोरंजन देण्याचा विडा 'झी टॉकीज'ने उचलला आहे. प्रेक्षकांचं अविरत मनोरंजन करण्याच्या उद्देशाने नवनवीन चित्रपट घेऊन येणाऱ्या झी टॉकीज वाहिनीवर सुजय डहाके दिग्दर्शित 'केसरी' या चित्रपटाचा वर्ल्ड प्रीमिअर होणार आहे. रविवारी, ३० मे रोजी दुपारी १२ आणि संध्याकाळी ६ वाजता हा चित्रपट पाहण्याची संधी प्रेक्षकांना मिळणार आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात आजही कुस्ती खेळली जाते. तेथील घराघरात एक तरी गडी हा पैलवान असतो आणि एकदा तरी 'महाराष्ट्र केसरी' जिंकण्याचे स्वप्न पैलवान उराशी बाळगून असतो. कुस्तीच्या या खेळाची आणि ते खेळणाऱ्या कुस्तीवीरांची कथा - व्यथा मांडणारा हा चित्रपट आहे. आखाड्यात उतरून भल्याभल्यांना चीतपट करण्याचे स्वप्न या चित्रपटातील नायक म्हणजेच बलराम जाधव पाहतो आहे. बलरामचे वडील गवळी, घरची परिस्थिती अगदी बेताची. तरीही बलराम आजोबांच्या मदतीने पैलवान होण्यासाठी धडपड करतो. मात्र बलरामच्या वडिलांना हे मान्य नाही. अखेर एका क्षणी पैलवान होण्याचे स्वप्न मनाशी घेऊन बलरामला घर सोडावे लागते आणि इथून पुढे त्याचा शोध सुरू होतो. आखाड्यात उतरण्यासाठी लागणारा खुराक कुठून आणायचा इथपासून ते तालीम देणारा गुरू कोण? असे अनेक प्रश्न समोर असलेला बलराम 'महाराष्ट्र केसरी' बनणार का? त्याचा प्रवास किती खडतर असणार? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं 'केसरी' या चित्रपटातून उलगडतील.

भाऊसाहेब शिंदेचा 'रौंदळ'

'ख्वाडा' या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटाद्वारे सिनेसृष्टीत पदार्पण करणारा अभिनेता भाऊसाहेब शिंदे पुन्हा एकदा एका नव्या रूपात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पदार्पणातच 'ख्वाडा'सारख्या बहुचर्चित चित्रपटात मुख्य भूमिका साकारल्यानंतर 'बबन' चित्रपटातील भूमिकेमुळे लोकप्रिय झालेल्या भाऊसाहेब शिंदेने 'रौंदळ' या आपल्या आगामी मराठी चित्रपटाची घोषणा केली आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने निर्माते बाळासाहेब शिंदे यांच्या साथीने पहिल्यांदाच भाऊसाहेब सहनिर्मात्याची जबाबदारीही पेलणार आहे. 'रौंदळ'चे पोस्टर प्रकाशित करण्यात आले असून यात एक रांगडा गडी पाहायला मिळतो. धडाकेबाज ॲक्शन आणि एका वेगळ्या भूमिकेतून भाऊसाहेब पुन्हा एकदा प्रेक्षकांसमोर येणार आहे. या चित्रपटातील इतर कलाकारांची माहिती सध्या तरी गुलदस्त्यात ठेवण्यात आली आहे. गजानन पडोळ हे या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. पदार्पणातच सर्वांचं लक्ष वेधून घेतलेल्या भाऊसाहेबने महाराष्ट्राच्या लाल मातीतील अस्सल नायक साकारत देश-विदेशांतील सिनेमहोत्सवांमध्ये जाणकारांकडून दाद मिळवली आहे. अभिनयाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना भाऊसाहेबने स्वतःच्या हिमतीवर मिळवलेलं हे यश आणि खेडेगाव ते चंदेरी दुनियेपर्यंतचा प्रवास कोणत्याही नवोदित कलाकारासाठी प्रेरणादायी ठरावा असा आहे. मनात आवड असेल तर कोणतंही काम कठीण नसल्याचं सिद्ध करणारा भाऊसाहेब 'रौंदळ'मध्ये पुन्हा काही तरी दणकेबाज करणार यात शंका नाही. लवकरच 'रौंदळ'च्या चित्रीकरणाला प्रारंभ होणार आहे.

सोनी मराठीवर 'गाथा नवनाथांची'

प्रतिनिधी

सोनी मराठी वाहिनीची पहिली पौराणिक मालिका लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'गाथा नवनाथांची' असे या मालिकेचे नाव असून नाथ संप्रदायाचे गुरू नवनाथ यांचे चरित्र मालिका रूपात प्रेक्षकांना पाहता येणार आहे. विशेष म्हणजे अनेकांना नवनाथ हे केवळ छायाचित्रातूनच माहिती आहेत, या निमित्ताने त्यांचे कार्य, महात्म्य जाणून घेता येईल. येत्या २१ जूनपासून या आध्यात्मिक पर्वाला सुरुवात होणार आहे.

महाराष्ट्राला नाथ संप्रदायांची मोठी परंपरा आहे. 'करुणा आणि शक्ती' यांचे मिलन साधणाऱ्या या संप्रदायाने आणि त्यातील नऊ गुरूंनी समाजाला अनेक दृष्टांत दिले. हरी आणि हर यांचा संगम सांधणारे अशी या संप्रदायाची ओळख आहे. मच्छिंद्रनाथ हे या संप्रदायांचे आद्य गुरू. त्यांनतर गोरक्षनाथ, गहिनीनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ, नागनाथ, चरपटीनाथ अशी देव अवतारी नऊ गुरूंची परंपरा या संप्रदायाला आहे. श्रावण मासात अनेक घरात नवनाथांचे चरित्र पारायण अनेक केले जाते. तेच चरित्र दृश्य रूपात प्रेक्षकांसमोर आणण्याचे काम सोनी मराठी आणि निर्माते संतोष अयाचित यांनी केले आहे. संतोष अयाचित आणि पौराणिक मालिका हे समीकरण सर्वांनाच ज्ञात आहे, त्यामुळे ही मालिकादेखील प्रेक्षकांच्या मनात घर करणार यात शंकाच नाही. अविनाश वाघमारे या मालिकेचे दिग्दर्शन करणार असून नवनाथांच्या भूमिकेसाठी अनेक नव्या पण दर्जेदार कलाकारांची निवड करण्यात आल्याचे समजते.

> "नवनाथांवर लोकांची श्रद्धा आहे. तसेच अनेकांना त्यांचे कार्य ठाऊकही नाही. विशेष म्हणजे त्यांचे कार्य, चरित्र आपल्याकडे लिखित स्वरूपात आहेत. त्याच आधारावर ही मालिका साकारण्याचे विचाराधीन होते. सोनी मराठीने ही कल्पना सत्यात उतरवण्याची संधी दिल्याने मालिका साकारली जात आहे. या चरित्रातील अनेक गोष्टी लोकांसमोर आणणे आव्हानात्मक आहे आणि ते आम्ही स्वीकारले आहे.
>
> - संतोष अयाचित, निर्माते

राशिभविष्य

३० मे ते ५ जून २०२१ • स्मिता अतुल गायकवाड

मेष : दिलासा मिळेल

चंद्र ग्रहाचे लाभस्थानातून होणारे भ्रमण शुभ फलदायी ठरेल. २ जून रोजी मंगळ कर्क या राशीत चतुर्थ स्थानी प्रवेश करेल. कोणत्याही गोष्टीचा गाजावाजा करणे टाळा. महत्त्वाच्या गोष्टींवर आताच चर्चा करणे फायद्याचे ठरणार नाही. त्यासाठी थोडा वेळ द्यावा लागेल. व्यवसायात बदलती स्थिती असेल.

मात्र नको त्या ठिकाणी धाडस वाढवू नका. भागीदारी व्यवसायात नव्याने सुरुवात करणे टाळा. नोकरदार वर्गाचा अडचणींचा कालावधी कमी होईल. कामाची घडी सुरळीत चालू झाल्याने वेळेचे नियोजन करावे लागेल. आर्थिकदृष्ट्या दिलासा मिळेल. राजकीय क्षेत्रात वादाच्या मुद्द्याला हात घालू नका. मित्रपरिवाराची मदत मिळेल. घरगुती स्तरावर ज्येष्ठ व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घ्या. प्रकृती उत्तम राहील.

शुभ दिनांक : १, २

महिलांसाठी : विशेष कार्यप्रणाली जागृत होईल.

वृषभ : आनंदी वातावरण राहील

भाग्यस्थानातून लाभस्थानाकडे भ्रमण करणारा चंद्र इच्छित फलप्राप्ती करून देणारा ठरेल. आजचे काम उद्या असा फळ देणारा कालावधी संपून जाईल. रखडलेल्या कामांना गती मिळेल. व्यावसायिक घोडदौड वाढलेली असेल. उत्पन्नातून फायदा मिळेल.

गुंतवणूक योग्य कारणी लागेल. नवीन योजना राबविण्यात यश मिळेल. नोकरदार वर्गाला बढतीसाठी प्रयत्न करावे लागणार नाहीत. संधी चालून येईल. अनपेक्षित असा भाग्योदय होईल. आर्थिक बाजू भक्कम राहील. राजकीय क्षेत्रातील ताणतणाव कमी होतील. नवीन ओळखीचा फायदा होईल. मित्रांची मदत मिळेल. मुलांच्या भवितव्यासाठी आगामी काळाची तरतूद चांगल्या पद्धतीने करता येईल. घरगुती वातावरण आनंदी राहील. आध्यात्मिक गोष्टींचा पगडा कायम राहील. मनोबल वाढेल. प्रकृतीस्वास्थ्य ठणठणीत राहील.

शुभ दिनांक : ३०, ४

महिलांसाठी : कष्टाचे चीज करा.

मिथुन : गती वाढेल

दिनांक ३० व ३१ या दिवशी चंद्राचे भ्रमण अष्टमस्थानातून होत आहे. या दिवशी मात्र कोणतीही गोष्ट सबुरीने घेतलेली बरी. विचारात्मक कृतीवर भर द्या. त्यानंतर चंद्राचे भ्रमण भाग्यस्थानातून पुढे होईल. या कालावधीत बऱ्याच कामाची गती वाढेल. व्यावसायिक कसर भरून काढाल. टप्प्याटप्प्याने का होईना, गुंतवणूक करणे इष्ट ठरेल. आवक वाढविण्याचा कल यशस्वी राहील. नोकरदार वर्गाची संभ्रमित अवस्था होणार नाही. हिशोबाच्या नोंदीची जबाबदारी मात्र इतरांवर सोपवू नका. कामाच्या बाबतीत गती वाढेल.

आर्थिक बाबींची काळजी कमी झाली तरी खर्चावर निर्बंध ठेवावे लागतील. राजकीय क्षेत्रात वरिष्ठांकडून प्रोत्साहन मिळेल. नातेवाईकांशी जवळीकता साधने शक्य नसले तरी संपर्कात राहाल. जुन्या व्याधींकडे लक्ष द्या.

शुभ दिनांक : १, २

महिलांसाठी : सैरभैर झालेले मन सावरा.

कर्क : जबाबदारी स्वीकारा

दिनांक १, २ रोजी चंद्र अष्टमस्थानात भ्रमण करत आहे. या दोन दिवशी मात्र निवडक गोष्टींना प्राधान्य द्या. द्विधा अवस्थेतला निर्णय घाईने घेऊ नका. शांत मनाने विचार करा. त्यानंतरचा कालावधी हा स्थिरस्थावर स्थिती निर्माण करेल. व्यवसायात सुरुवातीला अवघड वाटणारी गोष्ट सोपी होऊ लागेल. गुंतवणूक करताना वाटणारी भीती कमी होईल.

अपेक्षित फलप्राप्ती व्यवसायातून दिसून येईल. नोकरदार वर्गाला मनातील संकल्पना सध्या बाजूला ठेवाव्या लागतील. योग्य मुद्दे ठरवून मांडणी करावी लागेल.

कामातील जबाबदारी स्वीकारा. आर्थिक चणचण भासणार नाही. राजकीय क्षेत्रात बदलत्या स्वरूपाची घडामोडी होतील. नातेवाइकांशी संवाद साधाल व धार्मिक गोष्टींच्या कार्यक्रमाचे आयोजन आखाल. आहाराचे पथ्य पाणी सांभाळा.

शुभ दिनांक : ४, ५

महिलांसाठी : मनाची लवचीकता वाढेल.

सिंह : लक्ष केंद्रित करा

षष्ठस्थानातून अष्टमस्थानाकडे चंद्राचे भ्रमण होत आहे. तारेवरची कसरत अजूनही संपलेली नसली, तरी प्रयत्न सोडून चालणार नाही. परिश्रमाचे फळ उशिरा का होईना मिळेल. त्यासाठी चिंता वाढवू नका.

व्यवसायामध्ये अनेक गोष्टींऐवजी एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करा. नेहमीप्रमाणेची घाई आता योग्य नाही. स्वतःच्या हिमतीवर उभा केलेला डोलारा सावरण्यासाठी धीर धरा.

नोकरदार वर्गाला जुन्या अनुभवातून मिळालेले मार्गदर्शन मोलाचे ठरेल. संशोधन कार्य क्षेत्रात वेगवेगळ्या बाबींचा विचार करावा लागेल. आर्थिक बाबतीत आधी खर्चाचे नियोजन ठरवा. त्यामुळे तारांबळ उडणार नाही. सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा पणाला लावून कोणतेही कार्य करू नका. कौटुंबिक वादविवादापासून लांब राहा. शारीरिकदृष्ट्या हलगर्जीपणा टाळा.

शुभ दिनांक : १, २

महिलांसाठी : स्वतःहून इतरांना सल्ला देऊ नका.

कन्या : चिंतामुक्त राहा

ग्रहांचे पाठबळ सध्या पूरक नसले तरी वाईटही नाही. परिस्थितीत बदल घडवून आणण्याचे ठरवले तरी तांत्रिक अडचणी लक्षात घ्या. व्यावसायिकदृष्ट्या गांभीर्य लक्षात ठेवा. विचार करून कृती करा. हळूहळू का होईना परिस्थिती साथ देऊ लागेल. भागीदारी व्यवसायात न पडलेले चांगले. उधार उसनवारीचे व्यवहार टाळा. आगामी काळाचा विचार करून आताच हतबल होऊ नका. चिंतामुक्त राहा. नोकरदार वर्गाने वरिष्ठांविषयी असलेला गैरसमज दूर करा.

स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी संधीची वाट पाहा. आर्थिकदृष्ट्या जम कसा बसेल याकडे लक्ष द्या. सार्वजनिक ठिकाणी मनस्ताप होणाऱ्या गोष्टींमध्ये पडू नका. घरगुती वातावरण तप्त होणार नाही याची काळजी घ्या. आरोग्याबाबतीत सतर्क राहिलेले चांगले.

शुभ दिनांक : ३०, ३१

महिलांसाठी : कामात मग्न राहाल.

तूळ : प्रयत्न सफल होतील

पंचम स्थानातील गुरू,नेपच्युन, चंद्र यांचा शुभयोग दूरदृष्टीपणा वाढवण्यास मदत करेल. ठरवलेला युक्तिवाद कामी येईल. व्यवसायात होणारी धरसोड वृत्ती कमी होईल. भागीदारी व्यवसायात समजुतीच्या संवादाने मिळतेजुळते घ्यावे लागेल. रखडलेल्या गोष्टी पुढे सरकतील याकडे लक्ष द्या. विविध स्तरावरून आलेले प्रस्ताव स्वीकारायला हरकत नाही. कामकाजातील प्रयत्न सफल होतील. नोकरदार वर्गाने वरिष्ठांशी हुज्जत न घालता कामाकडे लक्ष केंद्रित करा. नेहमीप्रमाणेच संपूर्ण जबाबदारी तुमच्यावर पडेल.

आर्थिक चक्र सुरळीत चालू ठेवण्यासाठी नियोजन करावे लागेल. राजकीय क्षेत्रात जेवढ्यास तेवढे राहिलेले चांगले. मुलांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळेल. त्याचे समाधान लाभेल. घरातील ज्येष्ठ व्यक्तींचा आदर करा. कोणतेही दुखणे अंगावर काढू नका.

शुभ दिनांक : १,२

महिलांसाठी : उत्साह टिकवून ठेवा.

वृश्चिक : शुभ संकेत मिळतील

ग्रहांची अनुकूलता उत्तम असेल. ज्याच्यातून काही समाधान नाही अशा विचारात गुंतणे आता कमी होईल. प्रत्येक गोष्टीचा समतोल साधणे अवघड जाणार नाही. स्वतःमध्ये बदल करून राहण्याचा निर्णय योग्य असेल. अवतीभवतीचा विचार करणे टाळा. व्यवसायातील देवाणघेवाण चालू होईल. व्यवसायातील बौद्धिक ताण कमी झाल्याने कामातील उत्साह वाढेल. इतरांवर अवलंबून राहण्याचा कालावधी संपून जाईल. नियोजित गोष्टी घडतील. नोकरदार वर्गाला अधिकार प्राप्त होईल. हाताखालील लोकांचे सहकार्य मिळेल. आर्थिकदृष्ट्या शुभसंकेत मिळतील. राजकीय क्षेत्रात तुमच्या शब्दाला वजन असेल. ठरवलेले ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्नशील राहा. नवी ओळख होईल. उपासनेत मन रमेल. मनोबल वाढेल. प्रकृतिस्वास्थ्य ठणठणीत राहील.

शुभ दिनांक : ४, ५

महिलांसाठी : बचतीतून फायदा होईल.

धनू : कौटुंबिक सौख्य लाभेल

स्वतःचेच खरे करण्याची किमया तुमच्यामध्ये आहे. ते साध्य करणे उत्तम जमेल. कोणत्याही गोष्टीचा सोक्षमोक्ष लावल्याशिवाय शांत न राहणे हे सूत्र बाजूला ठेवा.

एकजुटीने निर्णय कसा घेता येईल याकडे लक्ष द्या. व्यावसायिक प्रश्न कमी होऊ लागतील. मोठ्या गुंतवणुकीची योजना आताच राबवू नका. मागील कमतरता भरून काढण्यासाठी प्रयत्नशील राहा. नोकरदार वर्गाला वरिष्ठांमार्फत होणारा लाभ समाधान मिळवून देईल.

जबाबदारी वाढल्याने कामकाज पूर्णवेळ व्यस्त असेल. डोक्यावर झालेले कर्जाचे ओझे बऱ्यापैकी कमी होईल. राजकीय क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व खुलून येईल. कौटुंबिक क्षेत्रात सौख्य लाभेल . धार्मिक गोष्टीतील उत्साह वाढेल. शारीरिक यष्टी मजबूत असेल.

शुभ दिनांक : २,३

महिलांसाठी : स्पष्ट बोलणे टाळा.

मकर : परिवर्तन घडेल

प्रत्येक पाऊल संयमाने टाकल्याने योग्य मार्ग सुचेल. निराशाजनक स्थिती बदललेली असेल. व्यवसायात असलेली गैरसोय कमी होईल. मात्र नियोजनाचा अभाव बिघडू देऊ नका. उत्पादनात वाढ करताना चढ-उतार लक्षात घ्या. वनस्पतिजन्य व्यवसायात साठवण करू नका.

आवश्यक तेवढी साठवण करा. आवाक्याबाहेर कोणतीही गोष्ट करू नका. नोकरदार वर्गांची अस्थिरता कमी होईल. कामाचा व्याप नीट समजून घ्या. नियोजनात्मक गोष्टींची अंमलबजावणी करा. राजकीय क्षेत्रात वरिष्ठांचे बदलते निर्णय स्वीकारावे लागतील. भावंडांशी हितगूज केलेल्या संवादातून आनंद वाढेल.

जुन्या गोष्टींना उजाळा मिळेल. कौटुंबिकदृष्ट्या परिवर्तन घडेल. आध्यात्मिक गोष्टीतून मानसिक स्थिरता येईल. आरोग्याबाबतीत काळजी वाटणार नाही.

शुभ दिनांक : ३०,३१

महिलांसाठी : कामामध्ये व्यस्त राहाल.

कुंभ : व्यवहाराला महत्त्व द्या

सप्ताहाच्या पूर्वार्धात चंद्र व्ययस्थानातून भ्रमण करत आहे. या कालावधीत इतरांच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका. गाफीलपणे कोणतेही निर्णय घेणे टाळा. नियम व अटींचे पालन करा. व्यवसायात दुहेरी भूमिका बाजूला ठेवा. रोखठोक व्यवहाराला महत्त्व द्या. वैद्यकीय क्षेत्रातील तांत्रिक अडचणी कमी होऊ लागतील. विविध क्षेत्रात पदार्पण करणे सहज शक्य होईल. नोकरदार वर्गाला उद्याचे कामही आजच करावे लागेल. मनाची तयारी करा. आळस झटकून कामाला लागा. कोणत्याही गोष्टींचा पाठपुरावा करणे आवडत नसले तरी, कामासाठी करावे लागणार आहे. वेळेचे बंधन न ठेवता सतत कार्यरत राहावे लागेल. आर्थिकदृष्ट्या खर्च कमी करा. सामाजिक क्षेत्रात उत्साह वाटणार नाही. कुटुंबाची जबाबदारी योग्यरीत्या पार पाडाल. आरोग्य चांगले राहील.

शुभ दिनांक : १,२

महिलांसाठी : तुमचे विचार इतरांना पाठवून देताना, शब्दप्रयोग जपून वापरा.

मीन : नव्याने सुरुवात होईल

बारीकसारीक गोष्टींचा नकारार्थी विचार टाळा. कामे वेळेत पूर्ण न झाल्याने चिडचिड होईल. कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आळस बाजूला ठेवा. कोणत्या कामामुळे त्रास होतो, त्या कामाचे वेळापत्रक आधी तयार करा. छोट्या व्यवसायाचे स्वरूप कलाटणी देणारे आहे. अपेक्षेप्रमाणे फळ मिळेल. बदललेले स्वरूपसुद्धा यशाचा प्रकाश पाडेल. नोकरदार वर्गांची न सुटणारी कोडी उलगडतील. कामात असणारी गैरहजेरी कमी होईल. पुन्हा नव्याने सुरुवात होईल. ओळखीचा उपयोग करून घ्या. आर्थिकदृष्ट्या स्थिती चांगली असली तरी, खर्चाची यादी मात्र तूर्तास बाहेर काढू नका. राजकीय क्षेत्रात मित्रपरिवाराचे प्रोत्साहन मिळेल. कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या बाबतीत आशेचा किरण दिसेल. आरोग्याबाबतीत हेळसांड करू नका.

शुभ दिनांक : ४,५

महिलांसाठी : नवीन गोष्टी करण्याची उत्सुकता वाढेल.

gsmita332@gmail.com

देशात आरोग्याच्या तुलनेत शिक्षणासाठी दुप्पट सीएसआर

सीएसआर संकेतस्थळावरील आकडेवारीतील चित्र

चिन्मय पाटणकर लोकसत्ता

पुणे : देशातील उद्योग क्षेत्राकडून २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीत शिक्षण क्षेत्राला सर्वाधिक सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर) मिळाला आहे. शिक्षणाखालोखाल आरोग्यनिगा आणि संबंधित क्षेत्राला निधी मिळाला असून, आरोग्याच्या तुलनेत शिक्षणासाठी जवळपास दुप्पट सीएसआर निधी मिळाला असल्याचे उद्योग व्यवहार मंत्रालयाच्या सीएसआर संकेतस्थळावरील आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

देशातील खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगातील कंपन्यांनी सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या रूपात दिलेल्या निधीचा तपशील सीएसआर संकेतस्थळावर देण्यात आला आहे. त्यात विविध क्षेत्रांसाठी आणि केंद्र सरकारच्या निधीसाठी कंपन्यांकडून देण्यात आलेल्या निधीची आकडेवारी संकलित करण्यात आली आहे. २०१४-१५ ते २०१९-२० या काळातील आकडेवारीचा आढावा घेतला असता शिक्षण क्षेत्राला सर्वाधिक निधी मिळाल्याचे दिसून येते.

शिक्षण, दिव्यांग, जीवनमान उंचावणे, विशेष शिक्षण, व्यावसायिक कौशल्य या क्षेत्रासाठी मिळून २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीत अनुक्रमे ३४ हजार ३५० कोटींचा निधी मिळाला. त्यातही केवळ शिक्षणासाठी २६ हजार ८४८ कोटी, विशेष शिक्षणासाठी ७९५ कोटी, व्यावसायिक कौशल्यासाठी ३ हजार १४१ कोटी मिळाले आहेत. म्हणजे जीवनमान उंचावणे हा घटक वगळता शिक्षण आणि संबंधित क्षेत्राला ३० हजार ७८४ कोटींचा निधी मिळाल्याचे दिसून येते. तर आरोग्य, निर्जंतुकीकरण, पिण्यासाठी स्वच्छ पाणी, गरिबी आणि कुपोषण अशा क्षेत्रांसाठी मिळून २४ हजार कोटींचा निधी मिळाला आहे. त्यापैकी १५ हजार ७७३ कोटींचा निधी केवळ आरोग्य क्षेत्रासाठी मिळाला.त्यामुळे आरोग्याच्या तुलनेत शिक्षणासाठी मिळालेला सीएसआर निधी जवळपास दुप्पट आहे. तर ग्रामविकासासाठी ९ हजार ६६४ कोटींचा निधी मिळाल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे.

देशातील सीएसआर निधी (कोटींमध्ये)

२०१४-१५	१०,०६५.९३
२०१५-१६	१०,५१७.२१
२०१६-१७	१४,३४२.०४
२०१७-१८	१३,८८९.८६
२०१८-१९	१८,६५४.८२
२०१९-२०	१७,८८४.७५

महाराष्ट्राला सर्वाधिक निधी

देशात सर्वाधिक सीएसआर निधी मिळालेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीत राज्याला १३ हजार ४९५ कोटींचा निधी मिळाला. महाराष्ट्राखालोखाल कर्नाटक (५ हजार ४७० कोटी), गुजरात (४ हजार २२६ कोटी), आंध्र प्रदेश (३ हजार ९६९ कोटी) यांचा क्रमांक लागतो.

७२ केंद्रांवर आज लसीकरण

कोविशिल्ड ५७ ; कोव्हॅक्सिन १५ केंद्रांवर उपलब्ध

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : शहरात महापालिकेच्या ७२ केंद्रांवर रविवारी (३० मे) लसीकरण होणार आहे. त्यामध्ये कोविशिल्ड लस ५७ केंद्रांवर, तर १५ केंद्रांवर कोव्हॅक्सिन लस उपलब्ध असणार आहे. दोन्ही प्रकारच्या लशींच्या प्रत्येक केंद्रावर १०० मात्रा उपलब्ध ठेवण्यात येणार आहेत.

उपलब्ध लशींच्या एकूण साठ्यांपैकी ६० टक्के लस ऑनलाइन पूर्व नियोजित वेळ घेतलेल्या नागरिकांना पहिली मात्रा (केवळ ४५ वर्षांपुढील नागरिकांना) दिली जाणार आहे. ऑनलाइन पूर्व नियोजित वेळ सकाळी आठ वाजल्यापासून आरक्षित करता येणार आहे. २० टक्के लस ४५ वर्षांवरील नागरिकांना पहिली मात्रा थेट केंद्रावर जाऊन नोंदणी करून मिळणार आहे, तर उर्वरित २० टक्के लस पहिली मात्रा ६ मार्चपूर्वी घेतलेल्या नागरिकांना दुसरी मात्रा देण्यासाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. औंध-बाणेर, शिवाजीनगर -घोले रस्ता, सिंहगड रस्ता, वानवडी-रामटेकडी, कोंढवा-येवलेवाडी, कसबा-विश्रामबागवाडा, बिबवेवाडी, येरवडा-कळस-धानोरी, कोथरूड-बावधन, नगर रस्ता-वडगावशेरी, ढोले पाटील, धनकवडी-सहकारनगर, वारजे-कर्वेनगर, हडपसर-मुंढवा आणि भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील महापालिकेची रुग्णालये, दवाखान्यांत कोविशिल्ड लस उपलब्ध असणार आहे.

दरम्यान, २ मेपूर्वी कोव्हॅक्सिनची पहिली मात्रा घेतलेल्या नागरिकांना रविवारी दुसरी मात्रा देण्यात येणार आहे. कोव्हॅक्सिनची पहिली मात्रा दिली जाणार नसल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले. कमला नेहरू रुग्णालय, राजीव गांधी रुग्णालय, सुतार दवाखाना, मुरलीधर लायगुडे रुग्णालय, मालती काची रुग्णालय, संत रामदास शाळा (कन्नड), नायडू रुग्णालय, गलांडे पाटील दवाखाना, औंध कुटी रुग्णालय, बिंदूमाधव ठाकरे दवाखाना, छत्रपती शाहू दवाखाना केदारीनगर, भानगिरे दवाखाना महंमदवाडी, सावित्रीबाई फुले दवाखाना, बाबासाहेब आंबेडकर दवाखाना आणि विलासराव तांबे दवाखाना या ठिकाणी कोव्हॅक्सिन उपलब्ध असणार आहे.

पिंपरीत आज ४१ केंद्रांवर लसीकरण

लोकसत्ता प्रतिनिधी

पिंपरी : पिंपरी चिंचवड शहरातील ४५ वर्षांपुढील नागरिकांना रविवारी करोना प्रतिबंधक 'कोव्हॅक्सिन' लशीची दुसरी मात्रा शहरातील आठ केंद्रांवर दिली जाणार आहे. प्रत्येक केंद्रावर १५० नागरिकांना ही लस दिली जाणार आहे. 'कोविशिल्ड'ची पहिली आणि दुसरी मात्रा ३३ केंद्रांवर दिली जाणार आहे.

'कोव्हॅक्सिन'ची दुसरी मात्रा पहिल्या मात्रेनंतर २८ दिवस झालेल्यांना देण्यात येणार आहे. तर सरकारच्या निर्देशानुसार रविवारी महापालिकेच्या लसीकरण केंद्रावर १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांचे लसीकरण करण्यात येणार नाही. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ४५ वर्षांपुढील ज्या नागरिकांनी पूर्वी 'कोविशिल्ड' या लसीची पहिली मात्रा घेतली आहे, त्यांना या लशीची दुसरी मात्रा १२ ते १६ आठवड्यानंतर देण्यात येणार आहे. यमुनानगर, तालेरा, नवीन जिजामाता, खिंवसरा पाटील रुग्णालय, नवीन आकुर्डी रुग्णालय, कासारवाडी रुग्णालय, सावित्रीबाई फुले शाळा भोसरी, आचार्य अत्रे सभागृह संत तुकारामनगर या ठिकाणी 'कोव्हॅक्सिन'ची दुसरी मात्रा रविवारी सकाळी १० ते ५ या वेळेत मिळणार आहे. तर 'कोव्हिशिल्ड'ची पहिली तसेच दुसरी मात्रा शहरातील ३३ केंद्रावर मिळणार आहे.

कौटुंबिक न्यायालयात १०० जणांचे लसीकरण

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : शिवाजीनगर येथील कौटुंबिक न्यायालयात शनिवारी पुणे महापालिकेच्या सहकार्याने करोना लसीकरण मोहीम आयोजित करण्यात आली. लसीकरण मोहिमेत कौटुंबिक न्यायालयातील न्यायाधीश, वकील तसेच कर्मचारी वर्ग अशा शंभर जणांचे लसीकरण करण्यात आले. कौटुंबिक न्यायालयातील प्रमुख न्यायाधीश सुभाष काफरे आणि कौटुंबिक न्यायालय वकील संघटनेच्या अध्यक्ष ॲड. वैशाली चांदणे यांनी लसीकरण मोहिमेसाठी प्रयत्न केले होते. महापालिकेच्या सहकार्याने शनिवारी लसीकरण मोहीम राबविण्यात आली. लसीकरण मोहिमेत शंभर जणांना लस देण्यात आली. कौटुंबिक न्यायालयातील न्यायाधीश मनीषा काळे, वकील संघटनेच्या उपाध्यक्ष प्रगती पाटील, वकील तसेच कर्मचारी वर्ग आदी याप्रसंगी उपस्थित होते. यापुढील काळात कौटुंबिक न्यायालयातील वकील, कर्मचारी वर्गाचे लसीकरण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे ॲड. चांदणे यांनी सांगितले.

कार्यकर्ते पक्ष सोडू नयेत म्हणूनच सतत सरकार पडण्याची वक्तव्ये

अजित पवार यांची चंद्रकांत पाटलांवर टीका

लोकसत्ता वार्ताहर

बारामती : राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यापासून चंद्रकांत पाटील झोपले की नाही हे कळत नाही. सरकार पडणार, अशी स्वप्ने बहुदा त्यांना पडत आहेत. भाजपचे सर्वाधिक आमदार असूनही राज्यात सत्ता मिळाली नाही. त्यामुळे आपल्या पक्षातील कार्यकर्ते पक्ष सोडून जाऊ नयेत, यासाठी पाटील सातत्याने अशी वक्तव्य करीत आहेत, अशा शब्दांत अजित पवार यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्यावर टीका केली.

अजित पवार यांनी शनिवारी बारामतीत करोना आढाव्याबाबत बैठक घेऊन संबंधितांना योग्य ती खबरदारी घेण्याच्या सूचना केल्या. बैठकीनंतर पत्रकारांनी त्यांच्याशी संवाद साधला. राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार महाराष्ट्र झोपेत असतानाच पडेल, असे वक्तव्य चंद्रकांत पाटील यांनी केले होते. त्याबाबत पवार यांना विचारले असता, पाटील यांच्या वक्तव्याचा त्यांनी समाचार घेतला.

अजित पवार म्हणाले, की महाविकास आघाडीचे सरकार हे तीन प्रमुख पक्षाच्या नेत्यांनी एकत्र विचार आणि चर्चा करूनच सत्तेवर आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एका विचाराने हे सरकार बनविले आहे. त्यामुळे हे सरकार आपला पाच वर्षांचा कार्यकाळ निश्चितच पूर्ण करणार आहे.

परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे महापालिकेतर्फे लसीकरण

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना करोना प्रतिबंधक लस प्राधान्याने देण्याचा निर्णय पुणे महापालिकेने घेतला आहे. महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयातील लसीकरण केंद्रात थेट जाऊन विद्यार्थ्यांना लस मिळणार असून परदेशातील शिक्षण संस्थेत प्रवेश निश्चित झाल्याचे पुरावे दाखवून मंगळवार आणि बुधवार या दोन दिवशी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत विद्यार्थ्यांना लस दिली घेता येईल.

महापौर मुरलीधर मोहोळ यांनी ही माहिती दिली. मुंबई महापालिकेने शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्राधान्याने लसीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई महापालिकेच्या धर्तीवर राज्यातील अन्य महापालिकांनीही परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्याची सूचना पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांनी महापालिकांना केली. तसेच भाजपचे शहर प्रवक्ता संदीप खर्डेकर यांनीही शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या लसीकरणाची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर महापालिकेने निर्णय घेतला आहे.

परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना लस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयातील लसीकरण केंद्रात थेट 'वॉक इन' पध्दतीने विद्यार्थ्यांना लस देण्यात येणार आहे. मंगळवार आणि बुधवार या दोन दिवशी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत लस दिली जाणार आहे. लसीकरणावेळी विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित झाल्याचे पुरावे दाखवणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यास विद्यार्थ्यांचे आठवडाभर लसीकरण करण्याची तयारी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एकदम गर्दी करू नये. शिक्षणासाठीचा प्रवेश निश्चित होऊनही केवळ लसीकरण झालेले नसल्याने विद्यार्थ्यांना अडचण येऊ नये या उद्देशाने हा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेऊन लस घेण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, अशी माहिती महापौर मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

वाकड-हिंजवडी मार्गावर वाहतूक पोलिसाला फरफटत नेण्याचा प्रकार

लोकसत्ता प्रतिनिधी

पिंपरी : संशयास्पद रीत्या दुचाकीवरून जाणाऱ्या दुचाकीस्वाराला पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला असताना न थांबता दुचाकीस्वाराने बंदोबस्तावरील पोलिसाला पन्नास फूट फरफटत नेल्याची घटना वाकड येथे घडली. या प्रकरणी दुचाकीस्वाराला अटक करण्यात आली आहे.

या संदर्भात वाहतूक विभागाचे पोलीस हवालदार शंकर तुकाराम इंगळे (वय ४७) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी संजय एकनाथ शेडगे (वय ४२, रा. मावळ) असे अटक करण्यात आलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाकड-हिंजवडी मार्गावर इंगळे वाहतुकीचे नियोजन करण्याचे काम करत होते. दरम्यान, शेडगे दुचाकीवरून जात असताना संशयावरून इंगळे यांनी दुचाकी थांबविण्यास सांगितले. शेडगे याने दुचाकी रस्त्याच्या कडेला थांबविल्यानंतर इंगळे यांनी कागदपत्राची मागणी केली असता त्याने तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी इंगळे यांनी त्याची दुचाकी थांबविण्याचा प्रयत्न केला असता दुचाकी न थांबविता त्यांना शेडगे याने फरफटत नेले. पुढील तपास वाकड पोलीस करीत आहेत.

मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटण्यासाठी राजसत्ता आवश्यक

प्रकाश आंबेडकर यांची भूमिका

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी न्यायालयामध्ये पुनर्विचार याचिका दाखल करणे आणि ही याचिका फेटाळली गेली तर दुसरी याचिका दाखल करणे एवढे दोनच पर्याय उपलब्ध आहेत. पण, मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटण्यासाठी राजसत्ता आवश्यक आहे, अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी शनिवारी घेतली.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर खासदार संभाजीराजे यांनी आंबेडकर यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन चर्चा केली. त्यानंतर या दोघांनीही पत्रकारांशी संवाद साधला.

शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी या पक्षांच्या राजकारणात मी अस्पृश्य आहे. हे तीनही पक्ष मला विनाकारण भाजपकडे ढकलत आहेत. पण, मी संभाजीराजेंबरोबर आहे, असेही आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

जातीय विषमता कमी होऊन बहुजन समाज एकाच छताखाली कसा राहील हे आंबेडकर यांच्या भेटीचे प्रयोजन होते. राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकत्र होते. तर मी आणि प्रकाश आंबेडकर का एकत्र येऊ शकत नाही, असा सवाल संभाजीराजे यांनी केला. शाहू महाराजांनी सुरुवातीपासून बहुजन समाजाला आरक्षण दिले होते. तर मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही डॉ. बाबासाहेब आबेडकर यांची इच्छा होती.

'नरो वा कुंजरो वा' हीच शरद पवारांची भूमिका

शरद पवार यांचे राजकारण मी गेल्या ४० वर्षांपासून जवळून पाहत आलो आहे. ते 'नरो वा कुंजरो वा' या भूमिकेत असतात. पण, राजकारणामध्ये काही विषय असे असतात की त्यावर स्पष्टपणे भूमिका घ्यावी लागते. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर शरद पवार लवकरच भूमिका घेतील, असा टोला आंबेडकर यांनी लगावला.

आता उद्योगांना प्राणवायूची गरज

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : वैद्यकीय क्षेत्रातून प्राणवायूची मागणी वाढल्यावर उद्योगांना देण्यात येणाऱ्या प्राणवायूच्या पुरवठ्यावर निर्बंध घालण्यात आले होते. प्राणवायू उपलब्ध नसल्याने उद्योगांच्या उत्पादकतेवर परिणाम झाला असून, अधिकचा खर्चही उद्योगांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे उद्योगांच्या प्राणवायू पुरवठ्यावरील निर्बंध सैल करण्याची मागणी उद्योग क्षेत्राकडून करण्यात येत आहे.

पुणे आणि परिसरातील अनेक उद्योगांमध्ये प्राणवायू वापरला जातो. करोनाच्या दुसऱ्या लाटेत प्राणवायूची मागणी वाढून दररोज ३५० टनांवर गेली. त्यामुळे शासनाला उद्योगांच्या पुरवठ्यावर निर्बंध घालून वैद्यकीय क्षेत्रातील मागणी पूर्ण करण्यासाठी राज्याबाहेरून प्राणवायू उपलब्ध करावा लागत होता. आता दुसऱ्या लाटेचा प्रभाव ओसरल्याने रुग्णसंख्या कमी होऊन वैद्यकीय क्षेत्रातून प्राणवायूचा वापर कमी होऊ लागला आहे. या पार्श्वभूमीवर उद्योगांना प्राणवायू पुरवण्याची मागणी करण्यात येत आहे.

रुग्णवाहिका तयार करण्याचा आमचा व्यवसाय आहे. त्यात लेझर कटिंगसाठी वगैरे प्राणवायू वापरावा लागतो. मात्र प्राणवायू उपलब्ध नसल्याने नायट्रोजन वापरावा लागतो. पण नायट्रोजनमुळे गुणवत्तेची तडजोड करावी लागते. त्याशिवाय उत्पादकता कमी झाली आहे, अधिकचा खर्च सहन करावा लागतो. रुग्णवाहिका तयार करणे हा अत्यावश्यक सेवेचा भाग असूनही औद्योगिक प्राणवायू मिळत नाही. विविध उद्योग क्षेत्रांमध्ये प्राणवायूची मागणी आहे. वैद्यकीय मागणी कमी झालेली असताना आता उद्योगांना प्राणवायू देण्याचा सरकारने निर्णय घ्यावा.

निर्बंध सैल करण्याची शासनाकडे मागणी

"वैद्यकीय क्षेत्रातून प्राणवायूची मागणी वाढल्यानंतर उद्योग क्षेत्राचा प्राणवायू पुरवठा थांबवणे हे समजण्यासारखे आहे. मात्र प्राणवायू उपलब्ध नसल्याने उद्योग क्षेत्रासमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातून प्राणवायूची मागणी कमी झालेली असताना टप्प्याटप्प्याने उद्योग क्षेत्राला प्राणवायूचा पुरवठा वाढवण्यात यावा.

– प्रशांत गिरबने,
महासंचालक, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर

मोसमी पावसापर्यंत पूर्वमोसमी पाऊस कायम राहण्याची शक्यता

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : अरबी समुद्रातून येणारे बाष्प आणि राज्यावरून गेलेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे बहुतांश भागात पुढील चार ते पाच दिवस पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. शनिवारी (२९ मे) मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. कोकण आणि विदर्भातही तुरळक ठिकाणी पाऊस होता. राज्यात मोसमी पावसाचे आगमन होईपर्यंत काही भागांत पूर्वमोसमी पाऊस सुरूच राहणार असल्याची स्थिती सध्या निर्माण झाली आहे.

राज्यावर सध्या कमी दाबाचे दोन पट्टे आहेत. एक पूर्व उत्तर प्रदेशापासून विदर्भापर्यंत, तर दुसरा पूर्व मध्य प्रदेशापासून दक्षिण तमिळनाडूपर्यंत आहे. हा दुसरा कमी दाबाचा पट्टा विदर्भ आणि तेलंगणामार्गे गेला आहे. याशिवाय अरबी समुद्रातून राज्याच्या दिशेने बाष्पही येत आहे. त्यामुळे राज्यात सध्या जोरदार वाऱ्यांसह पावसाची स्थिती निर्माण झाली आहे. शनिवारी मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही भागांत संध्याकाळी जोरदार पावसाने हजेरी लावली. कोकणातही सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी पाऊस झाला.

विदर्भातील काही भाग वगळता यंदा संपूर्ण मे महिन्यामध्ये राज्यात पावसाळी स्थिती कायम राहिली आहे. त्यामुळे दिवसाचे कमाल तापमान अनेकदा सरासरीच्या खालीच राहिल्याने उन्हाचा चटका फारसा जाणवला नाही. हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात बहुतांश ठिकाणी २ जूनपर्यंत पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यानंतरही मोसमी वाऱ्यांचा प्रभाव म्हणून काही दिवस राज्यात पूर्वमोसमी पावसाची स्थिती राहणार आहे. मोसमी वारे ३१ मे रोजी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. त्यानंतर आठवड्यात ते तळकोकणातून राज्यात प्रवेश करतील. या संपूर्ण काळात कमी-अधिक प्रमाणात राज्यात पावसाची शक्यता असल्याने यंदा मोसमी पाऊस येईपर्यंत पूर्वमोसमी पावसाचा प्रभाव राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आजही जोरदार पावसाची शक्यता

मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदर्भात २ जूनपर्यंत तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यानुसार रविवारी (३० मे) मध्य महाराष्ट्रातील पुणे, नगर, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, लातूर, उस्मानाबाद आणि विदर्भातील काही जिल्ह्यात पाऊस होण्याचा अंदाज देण्यात आला आहे. काही भागांत विजांचा कडकडाट आणि ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

पेट्रोल-डिझेल दरवाढीविरोधात काँग्रेसतर्फे निदर्शने

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : पेट्रोल आणि डिझेल दरवाढीविरोधात काँग्रेसतर्फे शनिवारी तीव्र निदर्शने करण्यात आली. पेट्रोल आणि डिझेलवरील अबकारी कर कमी करून केंद्र सरकारने करोना काळात इंधन दरवाढीपासून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

शंकरशेठ रस्त्यावरील सरस्वती पेट्रोल पंप येथे झालेल्या निदर्शनामध्ये शहराध्यक्ष रमेश बागवे, प्रदेश सरचिटणीस अभय छाजेड, महापालिका गटनेते आबा बागुल, माजी महापौर कमल व्यवहारे, नीता रजपूत, सुनील शिंदे, नगरसेवक अविनाश बागवे, सतीश पवार, रमेश सोनकांबळे, भरत सुराणा, सीमा महाडिक सहभागी झाले होते. नागरिकांनी उत्स्फूर्तपणे आंदोलनात सहभागी होत मोदी सरकारचा निषेध व्यक्त केला.

हॉटेल व्यावसायिकांच्या मागण्यांवर योग्य तो निर्णय घ्या

उच्च न्यायालयाचे केंद्र सरकारला आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : करोनाच्या पार्श्वभूमीवर लागू केलेल्या कठोर टाळेबंदीमुळे व्यवसाय ठप्प झाल्याची बाब विचारात घ्यावी आणि कर्ज फेडण्याच्या अवधीसह विविध प्रकारच्या कर आकारणीबाबत दिलासा द्यावा या हॉटेल व रेस्टॉरंट मालकांच्या मागण्यांच्या निवेदनावर योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत.

पुण्यातील ५०० हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यावसायिकांच्या 'युनायटेड हॉस्पिटीलिटी असोसिएशन'ने उच्च न्यायालयात याचिका केली होती. तसेच आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत कर्ज फेडण्याच्या कालावधीसह विविध कर आकारणीत दिलासा देण्याची मागणी केली होती.

न्यायमूर्ती के. के. तातेड आणि न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या खंडपीठासमोर नुकतीच या प्रकरणी सुनावणी झाली. त्या वेळी गेल्या वर्षी टाळेबंदी आणि आता करोनाच्या दुसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर लागू कठोर निर्बंधांमुळे व्यवसाय पूर्णपणे ठप्प असून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. त्यामुळेच आपल्या मागण्यांसंदर्भात दिलासा देण्याची विनंती करणारे निवेदन एप्रिल महिन्यात अर्थ मंत्रालयाकडे करण्यात आले होते. मात्र त्यावर काहीच प्रतिसाद देण्यात आलेले नाही. त्यामुळे याचिका करण्यात आल्याचे संघटनेतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

न्यायालयानेही त्यांच्या याचिकेची दखल घेत अर्थ मंत्रालय आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला याचिकेवर उत्तर दाखल करण्याचे आदेश जिले. तसेच अर्थ मंत्रालयाने संघटनेच्या निवेदनावर योग्य तो निर्णय घेण्याचेही स्पष्ट केले.

उत्पादन शुल्क विभागाला चार आठवड्यांची मुदत

अशाच प्रकारच्या मागण्यांबाबतचे निवेदन हॉटेल आणि रेस्टॉरंट मालकांनी राज्याच्या उत्पादन शुल्क विभागाकडेही केले होते. मात्र त्यांच्याकडूनही काहीच प्रतिसाद न मिळाल्याने उच्च न्यायालयात याचिका करण्यात आली होती. त्यावरील सुनावणीच्या वेळी संघटनेच्या मागण्यांच्या निवेदनावर योग्य तो निर्णय घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाच्या अन्य खंडपीठाने उत्पादन शुल्क विभागाला दिले. न्यायालयाने उत्पादन विभागाला त्यासाठी चार आठवड्यांची मुदतही दिली आहे.

करोना प्रतिबंधविषयक बाबींच्या खरेदीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : करोनामुळे जिल्हा परिषदांच्या अंतर्गत खरेदी समिती तथा स्थायी समितीच्या बैठकांवरील निर्बंध लक्षात घेऊन करोना प्रतिबंधविषयक बाबींच्या खरेदीचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्याचा निर्णय सरकारने घेतल्याची माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीस ५० लाख रुपयांपर्यंतच्या खरेदीस मान्यता देण्याचे अधिकार आहेत. पण सद्यस्थितीत करोनामुळे राज्यात सर्वत्र जिल्हा परिषदांच्या अंतर्गत स्थायी समिती बैठकांवर निर्बंध आहेत. तथापी, करोना प्रतिबंधक उपाययोजना करणे महत्वाचे आहे. त्यामुळे स्थायी समिती आणि जिल्हा परिषद यांना असलेले खर्चाचे अधिकार केवळ करोना प्रतिबंधविषयक बाबींच्या खरेदीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे

ग्रामीण भागातील करोना परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी जलद गतीने निर्णय होण्याच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला आहे. करोनाच्या आपत्तीजनक परिस्थितीमध्ये ग्रामीण नागरिकांच्या सुरक्षेसाठी ग्रामविकास विभागामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. \

ओबीसींचे राजकीय आरक्षण संपुष्टात

फडणवीस आणि पटोले यांचे आरोप-प्रत्यारोप

मुंबई : केवळ राज्य सरकारच्या नाकर्तेपणामुळे इतर मागासवर्गीय समाजावर (ओबीसी) पुन्हा अन्याय झाला आहे. यासंदर्भात पाठपुरावा करूनही कोणतीही कारवाई सरकारने केली नाही. आतातरी जागे व्हा, असे पत्र विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठविले आहे. तर इतर मागासवर्गीयांचे आरक्षण रद्द होण्यास भाजप जबाबदार असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी आरक्षणाअंतर्गत राखीव जागांच्यासंदर्भात राज्य सरकारची फेरविचार याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली, त्यास महाविकास आघाडी सरकारचे दुर्लक्ष कारणीभूत असून त्यामुळे ओबीसींचे राजकीय आरक्षण संपुष्टात आले आह असे फडणवीस यांनी नमूद केले आहे.

भाजप जबाबदार : नाना पटोले

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण संपुष्टात येण्यास भाजपच जबाबदार आहे. न्यायालयाने वारंवार सांगूनही केंद्र सरकारने ओबीसींची जनगणना करून आकडेवारी दिली नाही. त्यामुळेच हे आरक्षण रद्द केले. आता राज्य सरकारने हा विषय घटनापीठापुढे घेऊन गेले पाहिजे अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून केली आहे.

करोनामुळे अनाथ झालेल्या मुलांसाठी केंद्राकडून योजना

नवी दिल्ली: आपल्या सरकारच्या दुसऱ्या पर्वातील दुसऱ्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करोनामुळे अनाथ झालेल्या लहान मुलांसाठी शनिवारी अनेक कल्याणकारी घोषणा केल्या. ही लहान मुले जेव्हा १८ वर्षांची होतील तेव्हा त्यांच्यासाठी १० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा आणि त्यांच्या शिक्षणाचा या योजनांमध्ये समावेश आहे.

अनाथ झालेल्या मुलांना कशा पद्धतीने मदत करता येईल याबाबत चर्चा करण्यासाठी मोदी यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. त्यामध्ये या मुलांना 'पीएम-केअर्स फॉर चिल्ड्रन' योजनेखाली मदत करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. अनाथ मुलांच्या नावाने मुदतठेवी उघडण्यात येणार असून ही मुले जेव्हा १८ वर्षांची होतील तेव्हा त्यांना १० लाख रुपये कसे उपलब्ध होतील या दृष्टिकोनातून पीएम-केअर्स फंड त्यामध्ये योगदान देणार आहे, असे पंतप्रधानांच्या कार्यालयातून सांगण्यात आले. वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर या दहा लाख रुपयांमधून पुढील पाच वर्षे या मुलांना दरमहा आर्थिक मदत केली जाणार आहे. त्यानंतर ही मुले २३ वर्षांची झाल्यानंतर त्यांना १० लाख रुपये एकरकमी दिले जाणार आहेत. या कठीण काळात समाज म्हणून अशा मुलांची काळजी घेणे आपले कर्तव्य आहे, असे मोदी म्हणाले.

पंजाब नॅशनल बँक (pnb पंजाब नैशनल बैंक punjab national bank)
एलसीबी फोअरशोअर रोड ब्रँच
रहेजा चेंबर्स, नरिमन पॉइंट, मुंबई-२१,
फोनः ०२२-२२७९०००५/०२२-२२८११४८२
फॅक्सः २२८२३०२२ ईमेलः bo8467@pnb.co.in

हमीदारांकरिता ६० दिवसांची नोटीस

प्रति, ३० एप्रिल २०२१

मेसर्स वाधवान ग्लोबल हॉटेल अँड रिसॉर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड.
चौथा मजला, एचडीआयएल टॉवर्स, अनंत कणेकर मार्ग, बांद्रा(पू), मुंबई-४०० ०५१, महाराष्ट्र.
मेसर्स वाधवान ग्लोबल हॉटेल अँड रिसॉर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड.
दहावा मजला, टीसीजी फायनान्शियल सेंटर, बीकेसी, बांद्रा (पू), मुंबई-४०० ०९८.
मेसर्स वाधवान ग्लोबल हॉटेल अँड रिसॉर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड.
रॅडिसन ब्लू, पुणे हिंजेवाडी, १३६/१, मर्सिडिज बेंझ इंटरनॅशनल स्कूल मागे, फेज-I, पुणे-४११०५७

प्रिय महोदय,

वित्तिय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचनेच्या कलम १३(२) आणि सुरक्षा हीत कायदा २००२ची अंमलबजावणी अंतर्गत नोटीस

रजि : अकाउंट नं. ००६१००आयसी०००००१०७९, ००६१००९३००००१०६६
मेसर्स वाधवान ग्लोबल हॉटेल अँड रिसॉर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड द्वारा लाभ घेतलेले

तुम्ही, **मेसर्स वाधवान ग्लोबल हॉटेल अँड रिसॉर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड,** नोंदणीकृत कार्यालय - चौथा मजला, एचडीआयएल टॉवर्स, अनंत कणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-४०० ०५१, महाराष्ट्र, खालील पत सुविधांचा लाभ घेतला आहे :

सुविधा	मर्यादा	३१.०३.२०२१ रोजी प्रमाणे थकबाकी		
		मुद्दल रक्कम	व्याज	एकूण
टर्म लोन	५५.०० कोटी	५०,७४,३६,३५५.४४	५,४३,५९,८४५.००	५६,१७,९६,२००.४४
ओव्हरड्राफ्ट लिमिट	२.५० कोटी	२,७४,१०,६४३.१७	२२,९३,७५८.००	२,९७,०४,४०१.१७
एकूण	५७.५० कोटी	५३,४८,४६,९९८.६१	५,६६,५३,६०३.००	५९,१५,००,६०१.६१

ऋणकोंनी रु १.५० कोटीच्या मर्यादेसह बँक हमीचा सुद्धा लाभ घेतला आहे, जो सद्या वैध कालावधीअंतर्गत आहे. हप्ता/ व्याज/ मुद्दल रकमेची परतफेड न केल्यामुळे, अकाउंट/ अकाउंट्सचे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शकसूत्रांच्या अनुसार नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. आम्ही दिनांकित ०३.०४.२०२१ पत्राद्वारा वरील सुविधांअंतर्गत व्याज व अन्य आकारांसह एकत्रीत संपूर्ण अदत्त रकमेची मागणी केली आहे/ त्याकरिता स्मरण केले आहे. बँकेला ३१.०३.२०२१ रोजी प्रमाणे देय असलेली रक्कम पूर्णतः प्रदान होईपर्यंत १३.३५% प्र.व. दराने पुढील व्याजासह (यापुढे "सुरक्षित ऋण" म्हणून संदर्भित) रु ५९,१५,००,६०१.६१ (रुपये एकोणसाठ कोटी पंधरा लाख सहाशे एक व पैसे एकसष्ट फक्त) आहे. पूर्वोक्त सुविधांअंतर्गत अदत्त रकमेच्या सुरक्षितेकरिता, तुम्ही, इतर गोष्टींसमवेत, खालील मालमत्ता/ मत्तेच्या संदर्भात सुरक्षा हीताची निर्मिती केली आहे.

अ.क्र.	सुविधा	सुरक्षा
१.	टर्म लोन अका.नं. ००६१००आयसी०००००१०७९	१. प्लॉट नं. १३६/१, हिंजेवाडी फेज-१, फिनोलेक्स केबल्सच्या मागे, हिंजेवाडी, पुणे-४११०५७ येथे स्थित असलेल्या हॉटेलच्या जमीन व इमारतीच्या गहाणवटीद्वारा एकमेव अनन्य प्रथम शुल्क.
२.	ओव्हरड्राफ्ट लिमिट अका.नं. ००६१००९३००००१०६६	२. प्लॉट नं. १३६/१, हिंजेवाडी फेज-१, फिनोलेक्स केबल्सच्या मागे, हिंजेवाडी, पुणे-४११०५७ येथे स्थित असलेले उक्त हॉटेल प्रोजक्टचे फर्निचर व फिक्चर्स, उपकरणे, इ. समाविष्ट जंगम स्थिर मालमत्ता तारणगहाण असलेली.
३.	बँक हमी	

आम्ही याद्वारा या नोटीसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या (साठ दिवस) आत पूर्णतः प्रदान होईपर्यंत संविदात्मक दरात पुढील व्याजासह ५९,१५,००,६०१.६१ (रुपये एकोणसाठ कोटी पंधरा लाख सहाशे एक व पैसे एकसष्ट फक्त) या रकमेचे प्रदान करण्यास तुम्हास फर्माविले आहे. यात कसूर झाल्यास, कायद्याअंतर्गत उपलब्ध असलेल्या बँकेच्या अन्य अधिकारांच्या निष्पादनाव्यतिरिक्त, बँक वित्तिय मत्तेची सुरक्षितता आणि पुनर्रचनेच्या कलम १३(४) आणि सुरक्षा हीत कायदा २००२ची अंमलबजावणी अंतर्गत (यापुढे "कायदा" म्हणून संदर्भित) तरतूद केल्यानुसार कोणताही किंवा सर्व अधिकारांचे निष्पादन करण्यास इच्छूक आहे. सुरक्षित मत्तेच्या तपशीलासंदर्भात, खाली दिल्यानुसार तुमच्याद्वारा सुरक्षित ऋणांची परतफेड न झाल्यास, बँकेद्वारा अंमलबजावणी करण्याचा हेतू आहे.

१. धरतीस कायमरीत्या जोडून असलेल्या, दोन्ही सद्या स्थितीत व भविष्यात व कोणतीही वस्तू धरतीस कायम स्वरुपात लागून असलेल्या किंवा जोडून असलेल्या सर्व सयंत्रे व यंत्रसामग्रीसह एकत्रीत, व्हिलेज हिंजेवाडी, तालुका मुळशी, जि. पुणे येथे स्थित असलेल्या, ७५३४८ चौ.फु.शी तुल्य सुमारे ७००० चौ.मी.मोजमापाची धारण केलेला सर्व्हे नं. १३६/१ जमिनीवर स्थित असलेल्या हॉटेलची जमीन व इमारतीच्या गहाणवटीद्वारा एकमेव अनन्य प्रथम शुल्क

२. प्लॉट नं. १३६/१, हिंजेवाडी फेज-१, फिनोलेक्स केबल्सच्या मागे, हिंजेवाडी, पुणे-४११०५७ येथे स्थित असलेले उक्त हॉटेल प्रोजक्टचे फर्निचर व फिक्चर्स, उपकरणे, इ. समाविष्ट जंगम स्थिर मालमत्ता तारणगहाण असलेली. सुरक्षित मत्तेचे उपलब्ध वेळेत तुमच्याद्वारा विमोचन होण्यासंबंधित कायद्याच्या कलम १३च्या पोट-कलम (८)च्या तरतुदींकडे तुमचे लक्ष वेधीत आहोत.

कृपया नोंद घ्यावी की उक्त कायद्याच्या कलम १३(१३)च्या अनुसार, या नोटीसच्या स्वीकृतीनंतर, तुम्हास बँकेच्या पूर्व-संमतीशिवाय वरील संदर्भित कोणत्याही सुरक्षित मत्तेचे विक्रि, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही तन्हेने (अन्य सामान्य व्यवसायाखेरीज) हस्तांतरण करता येणार नाही.

तुम्ही याची सुद्धा नोंद घ्यावयाची आहे की उक्त कायद्याअंतर्गत तरतूद केल्यानुसार या सांविधिक निषेधाज्ञा / निर्बंधाचे कोणत्याही तन्हेने उल्लंघन करणे हा गुन्हा आहे.

कोणत्याही कारणास्तव, सुरक्षित मत्ता विकली गेली असल्यास किंवा सामान्य व्यवसायात भाडेपट्ट्यावर दिली असल्यास, विक्रि प्रक्रिया किंवा त्यातून प्राप्त झालेले उत्पन्न बँकेत भरणा करावयाचे आहेत / पाठवावयाचे आहेत. तुम्हास सदर वसूली / उत्पन्नाकरिता अकाउंटचा योग्य हिशेब द्यावा लागणार आहे.

*** आम्ही अन्य सुरक्षित मत्तेबाबत अंमलबजावणीचे हक्क राखून ठेवीत आहोत.**

कृपया या नोटीस अंतर्गत केलेल्या मागणीचे अनुपालन करावे आणि सर्व कटूता टाळण्याचा प्रयत्न करावा. याबाबत अनुपालन न झाल्यास, पुढील आवश्यक कारवाई सुरु केली जाईल, ज्याकरिता तुम्हास सर्व किंमत व परिणामाकरिता पात्र ठरविले जाईल.

*** ही नोटीस डीआरटी/ न्यायालयासमोर बँकेद्वारा घेण्यात येणारी कायदेशीर कारवाई, परिस्थितीनुरुप, पूर्व-ग्रह न ठेवता निर्गमित करण्यात आली आहे.**

*** ही नोटीस डीआरटी/ न्यायालयासमोर प्रलंबित खटला/ वाद यामधील बँकेच्या हक्कांसंबंधित पूर्व-ग्रह न ठेवता निर्गमित करण्यात आली आहे.**

आपला विश्वासू,
पंजाब नॅशनल बँक करिता
(उप महा व्यवस्थापक)
प्राधिकृत अधिकारी

home first hffc Home First Finance Company

होम फर्स्ट फायनांस कंपनी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
सीआयएनः यू65990एमएच2010पीटीसी240703
संकेतस्थळः homefirstindia.com दूरध्वनी क्र. : 180030008425 ईमेल आयडी : loanfirst@homefirstindia.com

जोडपत्र - IV-अ [पहा नियम 8 (6) ची तरतूद]
स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, 2002 च्या नियम 8 (6) च्या तरतुदीसह सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002(नमूद कायदा) च्या अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव

सूचना ह्याद्वारे सर्व जनतेला आणि विशेषतः कर्जदार(रां) आणि सह-कर्जदार (रां) रकाना क्र. (ii) ना देण्यात येत आहे की येथे खाली देण्यात आलेल्या सुरक्षित धनको यांच्या कडे गहाण ठेवण्यात/ प्रभारीत असलेल्या आलेल्या रकाना(iii) मध्ये अधिक विस्ताराने नमूद करण्यात आलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा होम फर्स्ट फायनांस कंपनी प्रायव्हेट लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारी ह्यांनी घेतला असून त्यांची देणी अधिक व्याज जे येथे खाली तपशिलामध्ये देण्यात आले आहे त्याच्या वसुलीसाठी आणि ज्याअर्थी वारंवार देण्याचा परतावा करण्यामध्ये कसूर झाल्याबद्दल निम्नस्वाक्षरीकार नमूद कायद्याच्या कलम 13(12) च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली देण्यात आल्या नुसार नमूद मालमत्ता/ मत्तांची ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जसे आहे तसे आहे''तत्वावर देण्यांची वसुली करण्यासाठी विक्री करण्यात येणार आहे. **होम फर्स्ट फायनांस कंपनी प्रायव्हेट लिमिटेड** ला देय असलेल्या कर्जदार (रां) आणि सह-कर्जदार(रां) कडून देय असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी लिलावाचे आयोजन ''ऑन लाईन''करण्यात आले आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	मालमत्ता तपशिल	नोटीस चा दिनांक	डिमांड नोटीसच्या दिनांकानुसार एकूण थकबाकी (रु. मध्ये)	ताब्याचा दिनांक	राखीव मूल्य (रु. मध्ये)	इरठे (रु. मध्ये)	ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ	इरठे आणि कागदपत्रे सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ
1	अमोल अमोलिक, शोभा पंझारी अमोलिक, अमर हरी अमोलिक	सदनिका412 ब्लॉक/ बिल्डींग क्र. किवानाव सी फेज - I आपल घर सणसवाडी गट क्र. 165(फेज I), 181 आणि 183 (फेज II) गट क्र 175, 176 (फेज III) दिनग्रज वाडी, कल्याणी फोर्ज मागे, सणसवाडी, पुणे 412208	24-03-2021	12,68,506	27-05-2021	11,51,400	1,15,140	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
2	अशोक नवले, स्नेहा नवले	सदनिका क्र. 110, आपले घर सणसवाडी, ए गट क्र. 165(फेज I), 181 आणि 183(फेज II), गट क्र. 175, 176(फेज III) दिनग्रज वाडी, कल्याणी फोर्ज मागे सणसवाडी, पुणे412208	24-03-2021	13,10,810	27-05-2021	12,12,000	1,21,200	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
3	अश्विनी नितीन मुंडे, नितीन गणपत मुंडे	सदनिका 401, ब्लॉक/बिल्डींग किंवा नाव ई आपले घर सणसवाडी, ए गट क्र. 165(फेज I), 181 आणि 183(फेज II), गट क्र. 175, 176(फेज III) दिनग्रज वाडी, कल्याणी फोर्ज मागे सणसवाडी, पुणे 412208	24-03-2021	11,76,104	27-05-2021	11,51,400	1,15,140	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
4	दीपक परदेशी, संदीप परदेशी	सदनिका क्र. 201-बी, आपल घर, तळेगाव ढमढेरे गट क्र. 3439, तळेगाव - शिक्रापूर रोड, तालुका शिरूर, पुणे 412208	24-03-2021	12,14,256	27-05-2021	15,93,000	1,59,300	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
5	मल्लिकार्जुन सज्जन	सदनिका क्र. 308, ब्लॉक/इमारत क्र. किवा नाव ए आपले घर सणसवाडी, ए गट क्र. 165(फेज I), 181 आणि 183(फेज II), गट क्र. 175, 176(फेज III) दिनग्रज वाडी, कल्याणी फोर्ज मागे सणसवाडी, पुणे 412208	24-03-2021	12,43,857	27-05-2021	12,12,000	1,21,200	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
6	राहुल सुरेश मराठे, सुरेश मारुती मराठे, अंजना मराठे	102 कात्यवानी होम्स, एस क्र. 295, हिस्सा क्र. 3/5, लोहगाव पुणे, महाराष्ट्र 411047	24-03-2021	18,44,442	27-05-2021	19,24,000	1,92,400	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
7	रोहिणी त्रिमुख्ये, संदीप त्रिमुख्ये	सदनिका क्र. 401, ब्लॉक/ इमारत क्र. किवानाव - ए 3, प्लेटर पौड ए पौड, तालुका मुळशी जिल्हा पुणे, पुणे 412108	24-03-2021	11,99,486	27-05-2021	11,09,800	1,10,980	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
8	उर्मिला सचिन शिंदे सचिन रामचंद्र शिंदे	सदनिकाक्र. 406, चौथा मजला, इमारत क्र ई, आपलं घर, सणसवाडी, दिनराज वाडी, सणसवाडी, तालुका शिरूर, पुणे	24-03-2021	15,34,851	27-05-2021	11,51,400	1,15,140	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
9	वनिता प्रकाश पवार, प्रतिक प्रकाश पवार	सदनिका क्र. 502, विघ्नहर्ता पार्क एस. क्र. 8, हिस्सा क्र. 9/3, अभिनव कॉलेज समोर, मौजे नऱ्हे, पुणे, पुणे 411041	24-03-2021	11,31,517	27-05-2021	13,43,550	1,34,355	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
10	संदीप ठकाजी शिंगोटे	सदनिका क्र. 503, फेज I, गगन आकांक्षा, प्रयाग धाम समोर, कोरेगाव मूळ, उरूळी कांचन, तालुका हवेली, जिल्हा पुणे - 411028	24-03-2021	13,93,671	27-05-2021	19,35,500	1,93,550	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
11	उमादेवी विनोद रेनाक, विनोद रेनाक	2010 ए आपलं घर सणसवाडी गट क्र 165(फेज I), 181 आणि 183 (फेज II) गट क्र. 175, 176(फेज III) डीनग्रज वाडी सणसवाडी, कल्याणी फोर्ज मागे, सणसवाडी, पुणे 412 208	24-03-2021	12,28,490	27-05-2021	12,27,000	1,22,700	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
12	दीपक पांचाळ	सदनिका क्र. 212, इमारत क्र. बी आपलं घर सणसवाडी, फेज 3, गट क्र. 175 आणि 176, डिंग्रजवाडी, सणसवाडी, तालुका शिरुर, पुणे 412208	24-03-2021	12,20,020	27-05-2021	12,27,000	1,22,700	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत
13	तेजस खेडेकर, सुनंदा खेडेकर	युनिट क्र. 309 ए, आपलं घर, सणसवाडी, गट क्र. 165 (फेज I), 181 आणि 183 (फेज II), गट क्र. 175, 176 (फेज III) डिंग्रजवाडी कल्याणी फोर्ज मागे, सणसवाडी, पुणे 412208	24-03-2021	11,92,117	27-05-2021	12,12,000	1,21,200	30-06-2021	28-06-2021 सायं. 5 वा. पर्यंत

अटी आणि शर्ती :

ई-लिलाव सेवा पुरवठादार	ई-लिलाव संकेतस्थळ/ अधिक तपशिल, अन्य अटी आणि शर्तीसाठी	खाते क्र.: इरठे/ अन्य रक्कम जमा करण्यासाठी	शाखा आयएफएससी कोड	लाभार्थ्याचे नाव
कंपनीचे नावः ई-प्रोक्युरमेंट टेक्नोलॉजीस लि. (ऑक्शन टायगर), हेल्प लाईन क्र.: 079-6813 6803 संपर्क व्यक्तीः राम शर्माः 8000023297 ई-मेल आयडीः ramprasad@auctiontiger.net आणि support@auctiontiger.net	http://www.homefirstindia.com https://sarfaesi.auctiontiger.net	91202003626811 - होम फर्स्ट फायनांस कंपनी इंडिया लिमिटेड - ॲक्सिस बँक लि., एमआयडीसी, अंधेरी पूर्व	यूटीआयबी0000395	प्राधिकृत अधिकारी, होम फर्स्ट फायनांस कंपनी इंडिया लिमिटेड

बोली रक्कम वाढविणे - रु. 10,000/-. निम्नस्वाक्षरीकार ह्यांच्या द्वारे वेब पोर्टल (https://sarfaesi.auctiontiger.net)वर देण्यात आलेल्या ई-ऑक्शन प्लॅटफॉर्म द्वारे करण्यात येईल. ऑन लाईन ई-लिलाव बोली अर्ज घोषणापत्र, ऑन लाईन लिलावाच्या साधारण अटी आणि शर्ती असलेली ई-लिलाव निविदा कागदपत्रे पोर्टल साईट वर उपलब्ध आहेत. प्राधिकृत अधिकारी ह्यांच्या कडे उपलब्ध असलेल्या माहिती आणि त्यांच्या ज्ञानाच्या आधारे मालमत्तेवर कोणताही बोझा नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्ता/ मत्तांवरील बोझा, नामनिर्देश आणि दावे/ अधिकार/ देणी/ मालमत्तेला होणारी बाधा यांची स्वतः चौकशी त्यांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी करावी. ई-लिलावाची जाहिरात प्रसिद्ध होणे म्हणजे कोणतीही कटिबद्धता किंवा होम फर्स्ट चे कोणतेही प्रतिनिधित्व दर्शवत नाही. मालमत्तेची विक्री होम फर्स्ट ला ज्ञात असलेल्या किंवा नसलेल्या सध्याच्या किंवा आगामी बोझ्यांसाहित करण्यात येईल. प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनको हे कोणत्याही त्रयस्थ पक्षकारांच्या दावे/ अधिकार/ देणी ह्यांना जबाबदार राहणार नाहीत. सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नियमांच्या/ अटीच्या आधारे करण्यात येईल.

सरफेसी कायदा, 2002 च्या अंतर्गत विक्रीसाठी 30 दिवसांची संवैधानिक सूचना

कर्जदार/ हमीदार ह्यांना ह्याद्वारे डिमांड नोटीस मध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमेचा तसेच त्यावरील आजच्या दिनांकापर्यंतच्या व्याजाचा आणि अनुषंगिक खर्चाचा भरणा ई-लिलावाच्या दिनांकापूर्वी करण्यासाठी अधिसूचित करण्यात येत आहे आणि जर असे न झाल्यास मालमत्तेची लिलाव/ विक्री करण्यात येईल आणि देणी जर काही शिल्लक राहिल्यास व्याज आणि शुल्कासह त्याची वसुली करण्यात येईल.

दिनांक : 30/5/2021
ठिकाण : पुणे

सही/- प्राधिकृत अधिकारी
होम फर्स्ट फायनांस कंपनी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड

homefirst We'll take you home

होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड,
सीआयएन : यू65990एमएच2010पीटीसी240703 वेबसाईट : homefirstindia.com
फोन नं.: 180030008425 ईमेल आयडी : loanfirst@homefirstindia.com

ताबा सूचना

संदर्भः दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, 2002च्या नियम 8 च्या पोट नियम(1) नुसार ताबा सूचना

ज्याअर्थी होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सरफेसि ॲक्ट 2002च्या कलम 13(2) अंतर्गत, खाली दिलेल्या त्यांच्या आपापल्या तारखांना निर्गमित केलेल्या डिमांड नोटिस अन्वये, निम्न नामोल्लेखित तुम्हाला/ कर्जदारांना आपापल्या नोटिसा मिळावयाच्या तारखेपासून 60 दिवसात अदत्त देणी प्रदान करण्यास फर्माविले. तथापि तुम्ही/ कर्जदार सर्वांनी विहित वेळेत उक्त अदत्त देणी प्रदान केली नाहीत. त्यामुळे होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड यांनी सरफेसि ॲक्ट 2002च्या कलम 13च्या पोट कलम(4) च्या उपबंधांनुसार देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करुन येथील निम्नोल्लेखित प्रतिभूत मत्तांचा ताबा घेतला आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव	गहाणकृत मालमत्तेचे वर्णन	कलम 13(2) अंतर्गत डिमांड नोटीसची तारीख	डिमांड नोटीसच्या तारखेरोजी नुसार एकूण अदत्त रक्कम (रुपयात)	ताबा घेण्याची तारीख
1	अमोल अमोलिक, शोभा पुंजहारी अमोलिक, अमर हरि अमोलिक	सदनिका-412, ब्लॉक/ बिल्डींग नं.किंवा नाव-सीफेज I, सणसवाडी गट क्र.165(फेज I), 181 आणि 183 (फेज II), गट क्र. 175,176 (फेजIII) डिंग्रजवाडी, कल्याणी फोर्जच्या मागे, सणसवाडी, पुणे - 412208	24-03-2021	12,68,506	27-05-2021
2	अशोक नवले, स्नेहा नवले	सदनिका क्र.110, आपलं घर सणसवाडी ए गट क्र. 165, (फेज I), 181 आणि 183 (फेज II), गट क्र. 175,176 (फेज III)डिंग्रजवाडी, कल्याणी फोर्जच्या मागे, सणसवाडी, पुणे 412208	24-03-2021	13,10,810	27-05-2021
3	अश्विनी नितीन मुंडे, नितिन गणपत मुंडे	सदनिका क्र. 401, ब्लॉक/ बिल्डींग नं. किंवा नाव- ई, फेज-I, आपलं घर, सणसवाडी, गट क्र. 165(फेज-I) 181 आणि 183 (फेजII), गट क्र. 175, 176 (फेज III), डिंग्रजवाडी, कल्याणी फोर्जच्या मागे, सणसवाडी, पुणे - 412208	24-03-2021	11,76,104	27-05-2021
4	दीपक परदेशी, संदीप परदेशी	सदनिका क्र. 201-बी, आपलं घर तळेगाव ढमढेरे गट क्र. 3439, तळेगाव-शिक्रापूर रोड, तालुका-शिरुर, पुणे-412208	24-03-2021	12,14,256	27-05-2021
5	मल्लिकार्जुन सज्जन	सदनिका-308, ब्लॉक/ बिल्डींग नं. किंवा नाव- ए, फेज-III, आपलं घर सणसवाडी गट क्र.165 (फेजI), 181 आणि 183 (फेज II) गट क्र. 175, 176 (फेज III), डिंग्रजवाडी, कल्याणी फोर्जच्या मागे, सणसवाडी, पुणे-412208	24-03-2021	12,43,857	27-05-2021
6	राहुल सुरेश मराठे, सुरेश मारुति मराठे, अंजना मराठे	102, कात्यायणी होम्स, भू.क्र.295, हिस्सा क्र. 3/5, लोहगाव, पुणे, महाराष्ट्र 411047	24-03-2021	18,44,442	27-05-2021
7	रोहिणी त्रिमुखे, संदीप त्रिमुखे	सदनिका 401, ब्लॉक/ बिल्डींग नं. किंवा नाव-ए 3, प्लेटोरड पौड,ए, मुक्काम-पौड, ता-मुळशी, जिल्हा- पुणे, पुणे 412108	24-03-2021	11,99,486	27-05-2021
8	संतोष दिनकर शिंदे	सदनिका क्र. 101, बिल्डिंग-डी4, फेज-I, आनंदग्राम वाखी, सोलापूर रोड, पुणे 412203	24-03-2021	8,68,984	27-05-2021
9	उर्मिला सचिन शिंदे सचिन रामचंद्र शिंदे	सदनिका क्र. 406, चौथा मजला, बिल्डिंग ई, आपलं घर, सणसवाडी, डिंग्रजवाडी, सणसवाडी, तालुका शिरूर, पुणे	24-03-2021	15,34,851	27-05-2021
10	वनिता प्रकाश पवार, प्रतीक प्रकाश पवार	सदनिका-502, विघ्नहर्ता पार्क, भू.क्र.8, हिस्सा क्र.9/3, अभिनव कॉलेज समोर, मौजे नऱ्हे, पुणे, पुणे- 411041	24-03-2021	11,31,517	27-05-2021
11	संदीप ठकाजी शिंगोटे	सदनिका-503, फेज-I, गगन आकांक्षा, प्रयाग धामच्या बाजूला, कोरेगाव मूळ, उरुळी कांचन, तालुका हवेली, जिल्हा पुणे, पुणे - 412202	24-03-2021	13,93,671	27-05-2021
12	उमादेवी विनोद रैनाक, विनोद रैनाक	210, ए आपलं घर सणसवाडी गट क्र.165 (फेज I), 181 आणि 183 (फेज II), गट क्र. 175, 176 (फेज III) डिंग्रजवाडी, कल्याणी फोर्जच्या मागे, सणसवाडी, पुणे - 412208	24-03-2021	12,28,490	27-05-2021
13	दीपक पांचाळ	सदनिका क्र. 212, बिल्डिंग-बी, आपलं घर, सणसवाडी, फेज-3, गट क्र. 175 आणि 176, डिंग्रजवाडी, सणसवाडी, तालुका शिरूर, पुणे - 412208	24-03-2021	12,20,020	27-05-2021
14	तेजस खेडेकर, सुनंदा खेडेकर	युनिट नं.-309 ए, आपल घर, सणसवाडी, गट क्र.165(फेज-I), 181 आणि 183 (फेज-II), गट क्र. 175, 176 (फेज-III), डिंग्रजवाडी, कल्याणी फोर्जच्या मागे, सणसवाडी, पुणे- 412208	24-03-2021	11,92,117	27-05-2021

कर्जदारांनी रकमेची परतफेडी केली नसल्यामुळे कर्जदाराला/ हमीदाराला आणि सामान्यतः जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की उक्त नियमांच्या नियम 8 सोबत वाचावयाच्या उक्त अधिनियमाच्या कलम 13(4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना निम्नस्वाक्षरीकारांनी उपरोल्लेखित तारखेला येथील निम्न वर्णित मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

कर्जदारांना/ हमीदारांना आणि सामान्यतः जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की उपरि संदर्भित मालमत्ता/ प्रतिभूत मत्ता अथवा त्यांचा कोणताही हिस्सा यांचा खरेदी-विक्री व्यवहार करु नये आणि उक्त मालमत्तांचा/ प्रतिभूत मत्तांचा कोणताही खरेदी विक्री व्यवहार, संपूर्ण प्रदानापर्यंत त्यावरील पुढील व्याजासह देय असलेल्या, मालमत्तांसमोर/ प्रतिभूत मत्तांसमोर येथे वर नमूद केलेल्या रकमेसाठी होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड यांच्या भारासापेक्ष राहील.

प्रतिभूत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेबाबत, अधिनियमाच्या कलम 13 च्या पोट कलम (8) च्या उपबंधांकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

स्थळ : पुणे
दिनांक : 30/05/2021

प्राधिकृत अधिकारी
होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड

लोकसत्ता Classifieds FROM ANYTHING TO EVERYTHING.

व्यवसाय

जमीन खरेदीवर भक्कम सिक्युरिटीसहित विविध ॲग्रो प्रोजेक्टमध्ये उत्पन्न मिळवा, तसेच तुमच्याच परिसरात व्यवसाय करा, उत्तम पैसा कमवा. संपर्क- 7709710861/ 8010059340.
0070741515-1

कॉम्प्युटर्स

Dolphin Computer Coaching classes. B.C.S. online classes. Girl students only.starting on 7.6.2021.Contact 8605980204.
0090285886-1

स्थावर मालमत्ता? तुमच्या अपेक्षेप्रमाणे व्यवहार होण्यासाठी 'लोकसत्ता'त एक छोटी जाहिरात पुरेशी आहे!

नोकरीविषयक

Jr accounts Assistant - Tally MS office, Office cleaning helpers ,Sadashiv peth 9890060740
0050178772-1

मुंबई, नवीमुंबई, पुण्यात महिला बचतगट तसेच ड्रायव्हर, स्मार्ट मुलं-मुलींना त्यांच्याच परिसरात जॉबसाठी बाईक स्कुटी स्वारांना प्राधान्य. 9867931341, 9867934314/ unnatimahilaudyog@gmail.com
0070741666-1

Lady principal and Accountant For School In Pimpri Chinchwad. Contact 9270463358 Email- annsc4710@gmail .com
0090285844-1

मुंबई पुण्यासह उपनगरातील बाईक स्कुटी स्वार मुली-मुलांना तुमच्या जवळ जॉब स्मार्ट महिलेस वर्क फ्रॉम होम, ग्रामीण महिलांना राहण्याची सोय. संपर्कः 9867931341/ 8855921341.
0070741518-1

शिकाऊ व ट्रेन्ड मेकॅनिक, ऑटो इलेक्ट्रिशियन डेंटर फिटर पाहिजे. कामाचे ठिकाण- चिंचवड, पुणे. शिक्षणाची अट नाही. ९३७००४५३५५, कांबळे.
0050178726-2

visit us at WWW.LOKSATTA.COM

जागाविषयक

ALIBAUG-Sahan Sale- 1BHK Rs. 16 Lac all inclusive. Amenities- Club House, Swimming Pool. More details call: (Viestar) 9987305033/ 7977141894.
0070741659-1

कोकणात बंगला निसर्गाच्या सानिध्यात, पुणे-चिपळूण हायवेलगत, शहरापासून ५/७ मिनिटांत, चिपळूण, ता. रत्नागिरी. मो. 8554853111, 7709931961.
0070741076-1

फार्म प्लॉट लोणावळा व नासिकजवळ ११ गुंठे ९ लाखांत, पुणे पानशेत डॅम अर्धा एकर ३ लाखांत, महाड १ एकर फक्त अडीच लाखांत. बुकिंगसाठीः 8855921341/ 9175284426.
0070741665-1

ALIBAUG- Agriculture Land sale- Mandwa/ Awas/ Zirad Thal/ Nagaon/ NA- plots sale- Kihim/ Varasoli. Call: VIESTAR- 9922216108 / 8180074229.
0070741793-1

नावात बदल

I no. 15579360 K Rank L/ HAV my correct name is Vaijnath Shivaji Patil but my name wrongly written Gadwe Vaijnath Shivaji on my record my unit 421 Engr SQDN c/o 56 APO Vaijnath Shivaji Patil and Gadwe Vaijnath Shivaji both are same person aff no. P- 105/2021. 16/03/2021
0090285885-2

I have changed my old name Mary K.A to Mary Paul Thattil Affi.No.158/2021 Dated 27/05/2021. Add. E1/401 Shubhashree Residential, Akurdi, Pune - 411035
0050178844-1

माझे लग्नापूर्वीचे जुने नाव प्रज्ञा सिताराम जोशी हे लग्नानंतर बदलून आता नवीन नाव रिया रोहित जोशी असे झाले आहे. आधार कार्ड नं. ५३२११७०२६६७७
0090285872-2

जन्मतारखेत बदल

I Army no-15152356K Rank- HAV(GD) name- Milan Mandal declare that in army services record, my wife date of birth- 15/11/1990 is wrong her correct date of birth is 15/11/1991, affidavite no. 2152141941268500421761 date-13/05/2021
0090285885-1

सर्व्हिसेस

KEYEXCELLENCE.in File your returns ITR GST etc. Corporate Compliance and Comprehensive Payroll Processing #9175019395 info@keyexcellence.in
0050178697-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

भविष्यविषयक

ॲस्ट्रॉलॉजीः गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा-चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचविते व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ७, हस्तरेषा, ज्योतिषशास्त्र - कु. यशश्री सुधाकर जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४. २८८८९७०६/ ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070739866-1

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर (ॲडव्हर्टाइझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणताही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा महाराष्ट्रात?

'बीसीसीआय'च्या विशेष सर्वसाधारण सभेत प्रस्ताव; 'आयसीसी'कडे एक महिन्याच्या मुदतीची मागणी

पीटीआय, नवी दिल्ली

करोना साथीच्या पार्श्वभूमीवर ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम निर्णय एक महिन्याने घ्यावा, अशी विनंती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून (बीसीसीआय) आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) केली जाणार आहे. या स्पर्धेच्या आयोजनासाठी महाराष्ट्राचा सर्वोत्तम पर्याय शनिवारी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला.

दूरचित्रसंवादाद्वारे ५० मिनिटे चाललेल्या विशेष सर्वसाधारण सभेत 'आयपीएल' आणि ट्वेन्टी-२० विश्वचषक या दोन महत्त्वाच्या विषयांवर बिनविरोध निर्णय घेण्यात आले. सर्वच सदस्यांना विश्वचषक स्पर्धा भारतात व्हावी असे वाटते. या दृष्टीने महाराष्ट्रात मुंबईतील तीन आणि पुण्यात एक अशा चार मैदानांवर स्पर्धा होऊ शकेल, असा प्रस्ताव चर्चेत आला. परंतु ही स्पर्धा महाराष्ट्रात झाल्यास पाकिस्तानबाबतचा निर्णय हा राजनैतिक पातळीवर घ्यावा लागेल.

'आयसीसी'ने निर्णयासाठी एक महिन्याची (१ जुलैपर्यंत) मुदत द्यावी, असा प्रस्ताव 'बीसीसीआय'कडून मांडण्यात येणार आहे. सद्यस्थितीत देशामधील करोना रुग्णसंख्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर ऑक्टोबरमधील स्थितीचा दावा करून अंतिम निर्णय मे महिन्यातच घेणे घाईचे ठरेल, असे बैठकीत मांडण्यात आले.

गांगुली, शाह, शुक्ला 'बीसीसीआय'चे प्रतिनिधी

'बीसीसीआय'चा अध्यक्ष सौरव गांगुली, सचिव जय शाह आणि उपाध्यक्ष राजीव शुक्ला १ जूनला दुबईत होणाऱ्या 'आयसीसी' कार्यकारी मंडळाच्या बैठकीला हजर राहणार आहेत. या बैठकीत ट्वेन्टी-२० विश्वचषकाचा निर्णय घेण्यात येईल.

रणजीपटूंच्या नुकसान भरपाईवर तोडगा

रणजीपटूंच्या नुकसान भरपाईचा विषय विशेष सर्वसाधारण सभेत चर्चेला आला. नुकसान भरपाईचा मुद्दा वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर झाला आहे. आर्थिक वाटपाचे सूत्र निश्चित न झाल्यामुळे रणजीपटूंची भरपाई प्रलंबित आहे. यावर लवकरच तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन 'बीसीसीआय'कडून देण्यात आले.

'आयपीएल' सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये अमिरातीत!



जैव-सुरक्षित वातावरणात करोनाचा शिरकाव झाल्यामुळे स्थगित झालेल्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटचे उर्वरित सामने सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये संयुक्त अरब अमिरातीत खेळवण्यात येणार आहेत. ''सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात अमिरातीत 'आयपीएल'चे आयोजन करण्यास विशेष सर्वसाधारण सभेने संमती दिली आहे. या स्पर्धेच्या तारखा नंतर जाहीर करण्यात येतील,'' असे बैठकीनंतर 'बीसीसीआय'च्या वरिष्ठ पदाधिकाऱ्याने सांगितले. भारतात सप्टेंबरपर्यंत पावसाळा सुरू असतो. त्यामुळे २०२०प्रमाणे अमिरातीमधील तीन मैदानांवर स्पर्धा आयोजित करणे सोयिस्कर ठरेल. या तारखा १८ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या कालावधीतील असतील. या तारखांना खेळाडूंच्या उपलब्धतेबाबत पदाधिकाऱ्यांनी माहिती दिली. ''पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेमुळे इंग्लंडचे खेळाडू 'आयपीएल' खेळू शकले नाहीत. परंतु आम्ही इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळाकडे खेळाडूंची मागणी करणार नाही. 'आयपीएल'मधील उर्वरित ३१ सामने पूर्ण करणे हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहेत,'' असे 'बीसीसीआय'च्या पदाधिकाऱ्याने सांगितले.

सुयश जाधव पॅरालिम्पिकसाठी पात्र

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

पॅराजलतरणपटू सुयश जाधव याने टोक्यो पॅरालिम्पिक स्पर्धेसाठी पात्र ठरण्याचा मान पटकावला आहे. या स्पर्धेसाठी पात्र ठरणारा तो भारताचा पहिला जलतरणपटू ठरला आहे. सुयश आता टोक्यो पॅरालिम्पिकमध्ये ५० मीटर बटरफ्लायमधील एस-७ प्रकारात तर २०० मीटर वैयक्तिक मेडलेमधील एसएम-७ प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. महाराष्ट्राच्या २७ वर्षीय सुयशने जकार्ता येथे २०१८मध्ये झालेल्या आशियाई पॅरा क्रीडा स्पर्धेतील दमदार कामगिरीच्या जोरावर टोक्यो पॅरालिम्पिकमधील आपले स्थान निश्चित केले.

लाल मातीवरील झुंज!

ऋषिकेश बामणे

करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे एकीकडे इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) स्थगित करण्यात आल्याने हिरमोड झालेल्या भारतासह जगभरातील क्रीडाप्रेमींना या आठवड्यापासून टेनिसमधील ग्रँडस्लॅम स्पर्धांची रणधुमाळी अनुभवायला मिळणार आहे. चार प्रतिष्ठित ग्रँडस्लॅम स्पर्धांपैकी एक मानल्या जाणाऱ्या फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेला रविवारपासून प्रारंभ होणार आहे. मात्र यंदाही 'लाल मातीचा बादशाह' असे बिरुद मिरवणारा स्पेनचा राफेल नदाल, सर्बियाचा नोव्हाक जोकोव्हिच आणि स्वित्झर्लंडचा रॉजर फेडरर या अनुभवी त्रिमूर्तीपैकीच एक जण सरशी साधणार की नव्या दमाचे तेजांकित त्यांच्यावर भारी पडणार, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

ग्रास (हिरवळीचे) कोर्ट आणि हार्ड कोर्टच्या तुलनेत लाल मातीवर (क्ले कोर्ट) खेळताना टेनिसपटूचा खरा कस लागतो, असे मानले जाते. 'विम्बल्डन सम्राट' फेडरर आणि ऑस्ट्रेलियन स्पर्धेचा राजा म्हणून ओळखला जाणारा जोकोव्हिच या दोघांनाही प्रदीर्घ कारकीर्दीत फक्त एकदाच फ्रेंच स्पर्धेतील पुरुष एकेरी गटाचे जेतेपद मिळवता आले आहे. त्याउलट ३३ वर्षीय नदालने विक्रमी १३वेळा ही स्पर्धा जिंकली आहे. त्याशिवाय फेडरर आणि नदाल दोघांचीही २० ग्रँडस्लॅम जेतेपदे जिंकली असल्याने पुरुष एकेरीत सर्वाधिक ग्रँडस्लॅम विजेतेपद मिळवणाऱ्यांच्या यादीत कोण अग्रस्थान मिळवणार, याकडेही चाहत्यांचे लक्ष लागले आहे. दोन आठवड्यांपूर्वीच झालेल्या इटालियन चषक या लाल मातीवरील टेनिस स्पर्धेत नदालने जोकोव्हिचला नमवून अजिंक्यपद मिळवले. त्यामुळे आता फ्रेंच स्पर्धेतील त्याची मक्तेदारी कोण संपुष्टात आणणार, हे पाहणे रंजक ठरेल. मात्र नदाल, फेडरर आणि जोकोव्हिच कार्यक्रमपत्रिकेच्या एकाच भागात असल्याने त्यांच्यापैकी एकालाच अंतिम फेरी गाठता येईल, हेसुद्धा स्पष्ट झाले आहे.

रविवार विशेष

नदालला फेडरर आणि जोकोव्हिच यांपासून सर्वाधिक धोका असला, तरी नव्या पिढीतील डॉमिनिक थीम, अलेक्झांडर झ्वेरेव्ह, डॅनिल मेदवेदेव आणि स्टीफानोस त्सित्सिपास या चौकडीपासून त्याला सावध राहावे लागेल. विशेषतः ऑस्ट्रियाच्या थीमने गतवर्षी अमेरिकन स्पर्धा जिंकून त्रिमूर्तीच्या वर्चस्वाला धक्का दिला. २०१८ आणि २०१९मध्ये सलग दोन वेळा फ्रेंच स्पर्धेची अंतिम फेरी गाठूनही थीमला नदालविरुद्धच पराभव पत्करावा लागला. त्यामुळे थीम यावेळी अधिक धोकादायक ठरू शकतो. झ्वेरेव्ह आणि मेदवेदेव यांनीसुद्धा गेल्या वर्षभरात प्रत्येकी एका ग्रँडस्लॅम स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. मात्र त्यांना जेतेपदाने हुलकावणी दिली. दुसरीकडे कारकीर्दीतील पहिल्याच ग्रँडस्लॅम स्पर्धेत फेडररला पराभवाचा धक्का देणाऱ्या त्सित्सिपासने फेब्रुवारीत झालेल्या ऑस्ट्रेलियन स्पर्धेत नदालला चक्क पहिले दोन सेट गमावूनही धूळ चारली. त्यामुळे या चौघांकडून नदाल–फेडरर–जोकोव्हिचला कडवी झुंज मिळेल, हे निश्चित.

पुरुष एकेरीच्या तुलनेत महिला एकेरीत कोणत्याही खेळाडूला ठामपणे जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानता येणार नाही. २०१४पासूनच्या गेल्या सात वर्षांत सात विविध खेळाडूंनी ही स्पर्धा जिंकली आहे. त्यावरूनच या गटात जेतेपदासाठी किती चुरस असेल, याची जाणीव येते. रोमानियाच्या सिमोना हॅलेपने माघार घेतल्यामुळे गतविजेती पोलंडची इगा श्वीऑनटेक, जपानची नाओमी ओसाका, जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असलेली ऑस्ट्रेलियाची ॲश्ले बार्टी या तिघींमध्ये कडवी झुंज असेल. ओसाकाने गतवर्षी अमेरिकन, तर वर्षाच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलियन स्पर्धा जिंकली आहे. त्यामुळे तिला ग्रँडस्लॅम हॅट्ट्रिक साकारण्याची सुवर्णसंधी आहे. ओसाकाच्या मार्गात सर्वात मोठा अडथळा ठरू शकते, ती म्हणजे अमेरिकेची अनुभवी सेरेना विल्यम्स. ३९ वर्षीय सेरेना २०१७मध्ये अखेरची ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकली आहे. त्यानंतर तिने चार स्पर्धांची अंतिम फेरी गाठली. त्यापैकी दोन वेळा ओसाकाने तिला नमवले. त्यामुळे सेरेनाला यावेळी वचपा काढण्याची संधी असेल. मार्गारेट कोर्ट यांच्या विक्रमी २४ ग्रँडस्लॅम जेतेपदांची बरोबरी साधण्यासाठी सेरेनाला केवळ एका जेतेपदाची आवश्यकता आहे.

एकंदर फ्रेंच स्पर्धेद्वारे टेनिसचा ग्रँडस्लॅम हंगाम बहरणार असून आगामी विम्बल्डन आणि अमेरिकन स्पर्धेच्या दृष्टीने लय मिळवण्यासाठी टेनिसपटू सर्वस्व पणाला लावतील, यात शंका नाही. या चढाओढीत फ्रेंच किताबाचा मानाचा तुरा कोणाच्या शिरपेचात रोवला जाणार, याचे उत्तर सर्वांना १३ जूनपर्यंत मिळेल.

rushikesh.bamne@expressindia.com

भारत फक्त दुहेरीत!

पुरुष अथवा महिला एकेरीत भारताच्या एकाही खेळाडूला पात्रता फेरीचा अडथळा ओलांडता आला नाही. सुमित नागल, रामकुमार रामनाथन, अंकिता रैना यांना मुख्य फेरी गाठता न आल्यामुळे आता फक्त दुहेरीतच भारताचे खेळाडू खेळताना दिसतील. अनुभवी रोहन बोपण्णा आणि दिविज शरण आपापल्या विदेशी सहकाऱ्यांसह पुरुष आणि मिश्र दुहेरीत खेळणार आहेत.

सुशीलच्या पोलीस कोठडीत वाढ

नवी दिल्ली : छत्रसाल स्टेडियमवर २३ वर्षीय कुस्तीपटू सागर धनखडच्या हत्येप्रकरणी ऑलिम्पिक पदकविजेत्या सुशील कुमारच्या पोलीस कोठडीत चार दिवसांनी वाढ करण्याचा निर्णय शनिवारी दिल्ली न्यायालयाने घेतला आहे.

लोकप्रभा ऑनलाइन वाचण्यासाठी क्लिक करा...
epaper.lokprabha.com



कृषीप्रधान देशाच्या प्रत्येक गोष्टीवर पावसाळा परिणाम करतो. त्यामुळे आपल्यासाठी हा सगळ्यात महत्त्वाचा ऋतु. यंदा सरासरीइतका पाऊस पडेल या दिलासादायक पूर्वानुमानाबरोबरच आपल्याकडचा पावसाचा मुक्काम वाढायला लागला आहे, पावसाळा काहीसा लांबायला लागला आहे असंही हवामान विभागाचा अभ्यास सांगतो.
– कव्हरस्टोरी
कृष्णानंद होसाळीकर
(हवामानशास्त्र विभागातील वरिष्ठ वैज्ञानिक)

facebook.com/Lokprabha | twitter.com/Lokprabha | lokprabha.com

ADVERTORIAL

नंदिनी ची यशोगाथा

आपल्या ग्राहकांची जीवनशैली अधिक समृद्ध आणि शाश्वत करायची या सोप्या आणि उदात्त उद्देशाने 'नंदिनी ऑर्गेनिक्स' ह्या पुणे-स्थित गृहोद्योगाची यशस्वी वाटचाल गेली आठ वर्ष चालू आहे. सध्या जागरूक नागरिक फिटनेस बरोबरच ओर्गानिक किंवा सेंद्रिय धान्य, फळे किंवा इतर खाद्य पदार्थां साठी आग्रही असतात. आपल्या दर्जेदार उत्पादनांनी अश्या चोखंदळ ग्राहकांना आहारा मार्फत परिपूर्ण व्हॅल्यू ऍडिशन देण्याचा 'नंदिनी ऑर्गेनिक्स' चा मानस आहे

नोकरी नंतर काहीतरी वेगळं करून बघितलं पाहिजे, ह्या हेतूने दत्तात्रय मोराणकर, ह्या पेशाने इंजिनियर असणाऱ्या व्यक्तीने २०१३ साली निवृत्ती नंतर 'नंदिनी ऑर्गेनिकस' ह्या गृहोद्योगाची मुहूर्तमेढ लावली.

सुरुवातीची काही वर्ष जम बसण्यात गेलयावर सध्या 'नंदिनी ऑर्गेनिकस' उत्तम दर्जाचे खाद्यपदार्थ पुरवून अन्न उद्योगात क्रांती घडवत आहेत.

NANDINI ORGANICS

गृहोद्योग व्यवसायात श्री मोराणकर ह्यांच्या प्रमाणे स्नुषा सौ सोनाली मोराणकर आणि पत्नी भारती मोराणकर ह्या उद्योग समर्थपणे सांभाळत आहेत, एवढंच नव्हे तर मोठी भरारी घेत आहेत !

साधारण ८ वर्षात या व्यवसायाचा आता चांगलाच विस्तार झाला असून, अल्पावधीतच पुणेकरांची पसंती मिळवली आहे. गुणवत्ता ह्या एकाच निकषावर ह्या गृहोद्योगाची घोडदौड सुरु आहे. कुठल्याही प्रकारच्या मार्केटिंग साखळी शिवाय केवळ ग्राहकांच्या मुख-प्रसिद्धीच्या जोरावर मोराणकर ह्यांनी हा वेगळ्या धाटणीचा व्यवसाय यशस्वीरित्या चालवला आहे.

खपली गहू, गव्हाचा आटा, रवा, दलिया, शेवया तसेच बार्ली, मुगाचा आटा, प्रोटीन युक्त थालीपीठ भाजणी इत्यादी धान्य-आधारित उत्पादने, तसेच विविध ड्राय फ्रुटस, ब्लॅक राईस, हळद इ. दर्जेदार उत्पादने नंदिनी ऑर्गेनिकस ने चौकस ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिली आहेत. नंदिनी ऑर्गेनिकस चे अजून एक वैशिष्ट म्हणजे डायबेटिक आणि कॅन्सर पेशंट्स साठी सुद्धा विशेष उत्पादने उपलब्ध आहेत.

हे पत्र **वैदेही ठकार** यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. **दूरध्वनी**- ६७२४११००. **फॅक्स** - ६७२४११४७. **लोकसत्ता मुंबई कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. **महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, **अहमदनगर** ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. **कोल्हापूर** ०२३१- २६४४९९४.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **सहायक संपादक : मुकुंद संगोराम** * (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R.N.I. No. MAHMAR/2010/33578 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती
लोकरंग
आपल्या प्रतिक्रिया व सूचना देण्यासाठी lokrang@expressindia.com
रविवार, ३० मे २०२१

जपू या निसर्गाचा आनंदकंद!

पुणे-भोरच्या वरंधा घाटात माझे वनस्पतीशास्त्रातील गुरू वामनराव वर्तक मला पहिल्यांदा घेऊन गेले. खरे तर तिथे घनदाट जंगल असायला हवे होते, पण सगळे उजाड झाले होते. मग अचानक सहा-सात हेक्टरची एक वनराजी दिसली. त्यातून चार उत्तुंग वृक्षांनी डोके वर काढले होते. ते होते धूपवृक्ष. आणि ती होती लोकांनी पवित्र म्हणून राखलेली धूपरहाट. परंतु परंपरेने अनाघ्रात राहिलेल्या अशा देवराया आता दुर्मीळ होत चालल्या आहेत.

पाच जून... जागतिक पर्यावरण दिन! त्यानिमित्ताने प्रख्यात पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांचा पर्यावरण परिसंस्थेचा वेध घेणारी खास लेखमाला...

(लेखांक १)

आपण ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा करतो. 'पण पर्यावरणाचे रक्षण करायचे म्हणजे नेमके काय करायचे भाऊ?' या प्रश्नाला अगदी वेगवेगळी, परस्परविरोधी उत्तरे दिली जातात. लेख येतात : वाघांचे अधिवास वाचवलेच पाहिजेत! अवश्य वाचवू या. पण पृथ्वीच्या पाठीवर निदान एक कोटी जीवजाती आहेत. यात वाघाला अग्रक्रम का द्यावा? मी विज्ञानाचा पाईक आहे. माझी दोन आवडती ब्रीदवाक्ये आहेत : आधुनिक मोलेक्युलर जीवशास्त्राचा जनक बर्नाल म्हणतो, 'विज्ञान हा एक संशयकल्लोळ नाटकाचा प्रयोग आहे. विज्ञान प्रत्येक गोष्ट तावूनसुलाखून बघते. कोणीतरी सांगते म्हणून मान्य करत नाही.' माझे दुसरे आवडते ब्रीदवाक्य आहे गणितज्ञ व्हाइटहेडचे. तो सांगतो, 'निष्कर्ष कितीही कटु असो, विज्ञान वास्तवाचा घट्ट आधार कधीच सोडत नाही.' आज अनेक शहरी निसर्गप्रेमिकांची स्थिती *'वाघ, वाघ ऐसे लागले ध्यान, हरपले मन, झाले उन्मनी'* अशी बनली आहे. मी विचारू इच्छितो : निसर्गरक्षणात वाघाला इतके महत्त्व का द्यावे?

जैवविविधतेच्या संरक्षणाच्या दृष्टीने एखाद्या जीवजातीचे मूल्य कसे ठरवावे याचा अभ्यास केला गेलेला आहे. यासंदर्भात चार निकष मानले जातात. (१) ती जीवजाती ज्या परिसंस्थांत आढळते, त्या किती धोकात्रस्त आहेत? (२) त्या जीवजातीचा भौगोलिक विस्तार केवढा आहे? (३) ती जीवजाती किती वेगवेगळ्या अधिवासांत आढळते? (४) त्या जीवजातीच्या गणगोतांत इतर किती जीवजाती आहेत?

आपण सूक्ष्म जीव, बुरशा, वनस्पती, किडेमकोडे बाजूला ठेवू. फक्त मोठ्या आकाराच्या पशूंचा विचार करत वाघाची तुलना मगरी-सुसरीच्या गणगोतातल्या घडियाळाशी करू या. वाघ झाडोऱ्यापासून ते सदाहरित अशा वेगवेगळ्या रचनेच्या जंगलांत आढळतो. घडियाळ फक्त नद्यांत. नद्या हा अधिवास सगळ्या जगात आणि खासकरून भारतात जंगलांहून खूप तीव्र धोक्यात आहे. वाघ सायबेरियापासून भारत ते इंडोनेशिया या विस्तृत भूभागांत आढळतो. घडियाळ केवळ गंगा व ब्रह्मपुत्रा यांच्या काही थोड्या उपनद्यांत आढळतो. वाघ मांजराचा भाचा आहे. त्याच्या गणगोतांत अनेक जाती आहेत. घडियाळच्या गणगोतांत अगदी मोजक्या. तेव्हा निसर्गरक्षणाच्या दृष्टीने सर्व शास्त्रीय निकषांवर घडियाळ वाघाहून जास्त मोलाचा आहे.

या घडियाळांची संख्या १९४६ मध्ये १०,००० इतकी होती. ती २००६ मध्ये २५० हून कमी झाली. तथापि आपले पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर म्हणतात की, वाघांची संख्या वाढल्यामुळे भारत जगात पर्यावरण संरक्षणात विशेष प्रतिष्ठेच्या स्थानावर पोहोचला आहे. पर्यावरण संरक्षणाच्या कर्तबगारीचे जागतिक पातळीवर नियमित मूल्यमापन केले जाते. या मूल्यमापनानुसार, भारत १६० देशांमध्ये अगदी तळाला- म्हणजे १४० व्या क्रमांकावर आहे. तो का, हे समजावून घ्यायला नेहमीच्या चाकोरीबाहेर पडून या गुंतागुंतीच्या समस्येचे निरनिराळे पदर उलगडून नव्याने विचार करायला हवा. असा साकल्याने विचार करणे ही पर्यावरण विज्ञानाची खासियत आहे. भौतिकी, रसायनशास्त्र, क्रियाविज्ञान, मोलेक्युलर जीवशास्त्र यांचे विषय सरळ असतात. त्यांत अनेक पदराची गुंतागुंत नसते. पण पर्यावरण विज्ञानातील घटना अनेक घटकांच्या परस्परसंबंधांवर अवलंबून असतात. त्यांच्या भौतिकी, रासायनिक, जैविक घटकांवर सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक अशा सगळ्यांचा प्रभाव असतो. शिवाय काय घडते आहे हे समजावून घ्यायला इतिहासाचे आकलन आवश्यक आहे. हे सगळे ध्यानात घेत या समस्येचा उलगडा करणे हे मोठे आव्हान आहे. पण असा उलगडा केल्यावर पुढे काय करावे याची मांडणी करणे आवश्यक आहे. हे केवळ बुद्धिवादाच्या आधारावर ठरवता येत नाही. त्यासाठी मूल्यांचा विचार करावा लागतो. कोणती मूल्ये? अग्रक्रमाने मानवतेची मूल्ये. पण त्याच्याच जोडीला सर्व भारतीय नागरिकांनी स्वीकारणे योग्य अशी भारतीय संविधानाने मान्य केलेली मूल्ये डोळ्यांसमोर ठेवावी लागतील.

काही वर्षांपूर्वी मला भूतानला जाण्याची संधी मिळाली. भूतानचा राजा खूप लोकप्रिय होता. त्याने गादी सोडावी असे कोणीही म्हणत नव्हते. तरीही त्याने आपणहून निवडणुका घेण्याचे ठरवले आणि निवडून आलेल्या लोकसभा सदस्यांच्या हातात सत्ता सोपवून स्वतः केवळ नामापुरता गादीवर राहिला. या लोकसभा सदस्यांनी पर्यावरणाच्या धोरणांची चर्चा करायला काही शास्त्रज्ञांना बोलावले. मी त्यातला एक. भूतानला पोहोचताना विमानतळावर उतरलो आणि मोठा फलक पाहिला : भूतान राष्ट्राचे आर्थिक उत्पादन वाढवायच्या खटाटोपात नाही, तर लोकांच्या आनंदवृद्धीसाठी कटिबद्ध आहे! लोकसभा सदस्यांनी सांगितले की, आमच्या राष्ट्राच्या धोरणाचे पर्यावरणाचे संरक्षण, सुशासन, समाजात सामंजस्य आणि बौद्ध धर्माची मूल्ये हे चार खांब आहेत. सुशासनाबद्दल बोलताना त्यांनी अभिमानाने उल्लेख केला की, राजाच्या मेव्हण्याने खाणकामात काहीतरी गडबड करत पैसे खाल्ले होते. राजाने ताबडतोब त्याला सजा केली.

भूतानचे २० टक्के जंगल अगदी मूळच्यासारखे शाबूत आहे. कारण त्याला देवराई म्हणून संरक्षण दिलेले आहे. 'वाघाचा कडा' (टायगर्स नेस्ट) हा देवराईचा ख्यातनाम डोंगर पाहण्याची संधी मला मिळाली. हा पुण्याच्या पर्वतीहून उंच आहे. त्याच्या माथ्याजवळ बौद्ध मठ आहे. तिथवर घनदाट जंगलातून अगदी निमुळत्या पायवाटेने चढून जाण्याचा अनुभव चित्तथरारक होता. वाटेत दिसले गोराल... डोंगरकड्यावर राहणारे वन्य बोकड. देवराया हा माझ्या आवडीचा विषय आहे. १९७१ साली माझे फर्ग्युसन महाविद्यालयातले आवडते वनस्पतीशास्त्राचे गुरू वामनराव वर्तक यांच्यासोबत मी त्या प्रथमच पाहिल्या. ते मला पुणे-भोरच्या वरंधा घाटात घेऊन गेले. खरे तर इथे घनदाट जंगल असायला हवे होते, पण सगळे उजाड झाले होते. मग अचानक सहा-सात हेक्टरची एक वनराजी दिसली. त्यातून चार उत्तुंग वृक्षांनी डोके वर काढले होते. ते होते धुपाचे वृक्ष- *Canarium strictum.* आणि ती होती लोकांनी पवित्र म्हणून राखलेली धूपरहाट. हे धूपवृक्ष मोठ्या संख्येने कर्नाटक-केरळातल्या सह्याद्रीवरील घनदाट अरण्यांत आढळतात. आपल्याकडे ते क्वचितच आढळतात. परंपरेने या देवराईत ते जतन करून ठेवले होते.

आम्ही ठरवले की आपण जोडीने या देवरायांचा पद्धतशीर अभ्यास करू या. वर्तकांचे एक स्नेही ज्येष्ठ वनाधिकारी होते. त्यांना भेटलो. ते म्हणाले, 'मी मावळात अशा अनेक देवराया पाहिल्या आहेत. तुम्ही पानशेत धरणाच्या पाणलोट क्षेत्रापासून सुरुवात करा. पण तिथे अजिबात रस्ते नाहीत. खूप पायपीट करावी लागेल. मी तुमच्याबरोबर एक वाटाड्या देतो.' तेव्हा फुटलेले पानशेत धरण पुन्हा बांधून झाले होते. धरणात लॉंचने जाऊन मग सगळीकडे पायी डोंगर पालथे घालायचे. लोकांशी बोलत माहिती काढायची. रात्री एखाद्या खेड्यात, नाही तर झाडाखाली झोपायचे. पहिल्या सहा दिवसांच्या सफरीत बरोबर जो वनरक्षक दिला होता, तो गावात पोहोचल्यावर गायब व्हायचा. कुणाकडून तरी कोंबडीचे जेवण, दारू उकळून मस्त झोपून जायचा... तो पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी दिसायचा. पुढच्या अनेक सफरी असले वाटाडे टाळून आम्ही दोघे जोडीने फिरलो.

यातून धूपरहाटीसारख्या खूप सुंदर देवराया पाहिल्या. मला नवनव्या वनस्पती जाती पाहायला मिळाल्या. शिवाय जो कोणीच लिहून ठेवलेला नाही असा इतिहास ऐकला. पानशेतच्या धरणानिमित्त या डोंगराळ, वृक्षाच्छादित प्रदेशात पहिल्यांदाच रस्ते बांधले गेले. पानशेत धरणाच्या खाली गेलेल्या अंबी नदीच्या खोऱ्यात आणि त्याचे पाणलोट क्षेत्र *(पान ४ वर)*

पृथ्वीचा योग आणि भोग

अरण्यामधील वयोवृद्ध व विशाल वृक्षास 'मातृवृक्ष' अशी संज्ञा देण्यात आली आहे. मातृवृक्ष हे अरण्यातील साहचर्य जपण्यात मुख्य भूमिका पार पाडतात. प्रकाश संश्लेषणाची प्रचंड क्षमता असलेले मातृवृक्ष मातीमधील कर्ब धरून ठेवणे, नत्रपुरवठा करणे, पाण्यास प्रवाही ठेवणे अशी महत्त्वपूर्ण कार्ये करतात. अरण्यांना अनेक कठीण प्रसंगांतून सावरण्याची भूमिका पार पाडणाऱ्या मातृवृक्षांना जिवापाड जपणं, हे मानवजातीचं आद्य कर्तव्य आहे.

अतुल देऊळगावकर

डॉ. सुझान सिमर्ड

''आदिवासी कला ही सजावटीसाठी, रसिकतेचं वा माणुसकीचं प्रदर्शन करण्यासाठी अत्यंत उपयुक्त बाब आहे. पण ती कला जपणाऱ्या हाडामांसाच्या माणसांचं काय? आम्हाला कधीतरी बोलू द्या. आमची कैफियत ऐकून घ्या...'' असं पंचवीस वर्षांची अभिनेत्री के. सारा बोलत होती. व्हिएन्ना येथील विनर फेस्टोचे आंतरराष्ट्रीय नाट्यमहोत्सवाचं ऑनलाइन उद्घाटन ब्राझीलमधील आदिवासी साराच्या हस्ते झालं. ती गीत, लेखन व नाटकांतून सदाहरित ॲमेझॉन अरण्याच्या विनाशामुळे तिथल्या आदिवासींची होत असलेली दैना व्यक्त करत असते. आदिवासींच्या हक्कांसाठी निर्भयपणे लढणारी ही तरुणी संपूर्ण जगाला सांगत होती- ''ॲमेझॉनच्या अरण्यावर आणि रहिवाशांवर अनन्वित अत्याचार चालू आहेत. करोनाच्या काळात वैद्यकीय उपचार देतानासुद्धा भेदभाव होतोय. असं का होत आहे, याचे परिणाम काय होणार आहेत, हे आम्ही जाणून आहोत. हा वेडाचार तत्काळ थांबला पाहिजे...'' असा घणाघात करून पुढे ती म्हणाली, ''ॲमेझॉन = सोन्याची खाण = संपत्तीची निर्मिती... म्हणजे 'जीडीपी'त भरघोस वाढ. 'विन-विन'... 'सर्वांना लाभच लाभ!' अशीच कथनं जगभर पसरवलेली व जगाने स्वीकारलेली आहेत. जंगलांच्या कत्तलींमुळे येणाऱ्या आपत्ती, त्यामुळे होणारी बेसुमार हानी यांचं कधीही मोजमाप होत नाही. ते सोयीचं नाही. अनमोल वनसंपदा खरवडून शतकानुशतके इथे राहणाऱ्या आदिवासींना हुसकावण्याचा कार्यक्रम अविरत चालू आहे. जंगल व तिथले स्थानिक ही आधी परकीय व नंतर भूमिपुत्रांची वसाहतच राहिली आहे. परंतु याविषयी कुठेही संताप दिसत नाही. सर्वदूर जीवघेणी शांतता पसरली आहे.''

ब्राझील व युरोप यांच्या सहकार्यातून सोफोक्लिस यांच्या 'ॲंटिगनी' (इ. स. पूर्व ४४१) या अभिजात नाटकाची निर्मिती होत असून त्यात सारा सहभागी आहे. या ग्रीक नाट्यात राजा इडिपसच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा पॉलिनायसिस राज्यावर येतो. दुसरा मुलगा इटोक्लिस बंडाळी घडवतो व त्यात दोघेही मारले जातात आणि त्यांचा काका क्रिऑन सत्ता काबीज करतो. क्रिऑन इटोक्लिसला देशभक्त ठरवतो आणि 'पॉलिनायसिस हा देशद्रोही असून त्याच्या मृतदेहावर अंत्यक्रिया करायच्या नाहीत,' असा आदेश देतो. पॉलिनायसिसची बहीण ॲंटिगनी सत्तेच्या विरोधात जाऊन अंत्यसंस्कार करते. या नाटकात ॲंटिगनीची भूमिका स्वतः सारा करणार होती.

गेले वर्षभर करोना प्रचंड वेगाने पसरल्यामुळे २१ कोटींच्या ब्राझीलमध्ये सुमारे ४.५ लाख लोक बळी गेले आहेत. वैद्यकीय सुविधा व उपचार यांच्या अभावी ॲमेझॉनमधील रहिवाशांचे झपाट्याने मृत्यू होत आहेत. त्यांच्या अंत्यक्रियेसाठीही सवड मिळत नसल्याने *(पान ३ वर)*

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

रेखाचित्र : अन्वर हुसेन

सुभाष अवचट

स्वप्न

स्वप्ने तरल असतात. त्यांना गुरुत्वाकर्षणाचे नियम नसतात. डोळे मिटले की स्वप्ने सुरू होतात. त्यात आपण कोठे जातो? आपण कोणाला किंवा आपल्याला कोण भेटते? पूर्वी ही स्वप्ने मूकपटासारखी ब्लॅक अँड व्हाइट असायची. आता ती कलरफुल असतात म्हणे! स्वप्नातील या अनोळखी व्यक्तींशी तुमचा काय संवाद होतो? ते कोठल्या प्रदेशातील असतात? तो संवाद तुम्हाला ऐकू येतो का? स्वप्नात स्थळ-काळाच्या, सरहद्दींच्या तारांच्या मर्यादा नसाव्यात. एक पारंपरिक असा दृढ समज चालत आलेला आहे, तो हा की, पहाटेची स्वप्ने खरी ठरतात. पण स्वप्नात पहाट, दिवस, रात्र अशा प्रहरांचे घोळ नसतात. झोपेतून उठले की स्वप्ने, त्यातल्या घटना, प्रदेश, व्यक्ती नेमक्या आठवतात का? भविष्यात घडणाऱ्या घटनांचा संकेत ही स्वप्ने देतात का? लहान मुले स्वप्नात हसतात. माझा खंड्या नावाचा कुत्रा झोपेत हसायचा. त्याला स्वप्नात काय दिसत असेल? काही माणसे एकदम दचकून उठतात. त्याला वाईट स्वप्ने म्हणतात. वाईट स्वप्ने पडू नयेत म्हणून झोपायच्या आधी प्रार्थना करण्याचीही प्रथा आहे.

अनेक शतके स्वप्न या विषयावर चिंतन होत आले आहे. स्वप्नाबद्दलच्या स्वतःच्या कुतूहलापोटी अनेक ग्रंथ, थिअरीज् बाहेर आल्या. हिप्नोटाइज करण्यापासून ते एक्स-रे काढून मेंदू आणि स्वप्ने शोधण्याचा प्रयत्न झाला. दलाई लामांना लहानपणी स्वप्न पडले. त्यांच्या मॉनेस्ट्रीजच्या अंगणात काढलेल्या सुरेख रांगोळ्या घोड्यांच्या टापांनी विस्कटल्या गेल्या. या स्वप्नाचा अर्थ शत्रूचे आक्रमण होणार असा वर्तवला गेला. झालेही तसेच. त्यांच्यावर चीनने भीषण हल्ला केला. ही स्वप्नाची कथा इतिहासात नमूद झालेली दिसते. तिबेट, चीन आणि त्यावेळच्या युरोपमधील अनेक साम्राज्यांत अशा स्वप्नांचे अर्थ काढून भविष्यात होऊ शकणाऱ्या घटनांचे विवेचन करणाऱ्या स्त्रियांना राजदरबारी मान असे. स्वप्ने ही चाहूल देतात का? कॉन्शस, सब-कॉन्शस यात लपलेली मनाची ही वैयक्तिक दृश्ये असतात का? हे शोधण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेक पातळ्यांवर चालूच आहे. त्यात मृत्यू, जीवनातल्या दडपलेल्या महत्त्वाकांक्षा, अनेक छोट्या-मोठ्या गरजांचा हा संग्रह तरंगत असावा. मला त्या पराकोटीच्या शास्त्रीय, दुर्बोध संशोधनाचे फारसे आकर्षण नाही. मला त्या स्वप्नातल्या अनोळखी गावाचे, त्यात वाहणाऱ्या प्रकाशाचे, आकारांचे, तरंगत चालणाऱ्या स्त्री-पुरुषांचे, कोठेही जमीन सोडून उभे असणाऱ्या डोंगर, झाडे, घरे आणि त्या गावातल्या गल्ल्याबोळांतून फिरणाऱ्या माझे- जो माझा मलाच दिसत नाही, मी तेथे असूनही तेथे नाही... अशा तरल स्वप्नांची गंमत वाटते. त्यामुळे मी दचकून वगैरे उठत नाही. ते स्वप्न संपू नये असे वाटते. अथवा झोपेच्या आधी मला प्रार्थना करायची वेळ कधी आली नाही. त्या स्वप्नातल्या गावात मी विदाऊट रिझर्वेशन पोहोचलेलो असतो. मी कधीही पाहिले नाही असे पेंटिंग कुठे दिसते का, या अधांतरी शोधात. तेथे असूनही नसावा.

जीवन ही मनाबरोबर घडत जाणारी एकमेकांची कहाणी आहे. येथे येणे आणि जाणे हे सूत्र आहे. काहीतरी मिळवणे आणि तेच हरवणे, हरवलेले परत मिळवणे, हा काही क्षणांचा खेळ आहे. त्यात दुःख नव्हे, तर पश्चाताप असतो. हळहळ, दुरावा, विस्मरण असते. ती ट्रॅजेडी नसते. जंगलाला जंगलच सावरते! जंगलातही असेच खेळ चालू असतात. मुलांचे संगोपन, त्यांचे रक्षण, भुकेसाठी वणवण, दुष्काळ, स्वतःचा बचाव, रक्षण, बंदुकीच्या गोळीचे भय, वणव्याची होरपळणारी आग, महापूर हे त्यात आलेच. त्यांचे सर्व्हायव्हल हे जंगलच सांभाळते. आपणही कळपात राहतो. हा खेळ येथेही चालतो. फक्त निसर्गाने मेंदू हा आपल्याला बोनस दिलाय. मेंदूबरोबर स्वप्नेही जुळ्या मुलांसारखी बरोबर आलीच. जीवन-मृत्यूचा, हार-जीतीचा हा खेळ युगानुयुगे चालत राहणारच.

पिकासो म्हणायचा, जुने ते मोडा आणि तेच परत नवीन पद्धतीने जोडून उभे करून दाखवा. या घडामोडीत स्वप्नांचा प्रवाह अखंड चालूच राहतो. तो भेदभाव करीत नाही. यात कधी सुन्या सुन्या मैफिली असतात, तर वैयक्तिक स्वभावाप्रमाणे सावरणाऱ्या प्रार्थनेच्या प्रतिमाही एकामागे एक येत-जात असतात. स्वप्ने ही खासगी मालमत्ता राहत नाही. ती सार्वभौम विहरत असतात. शास्त्रज्ञांनी ब्रह्मांडाचा शोध या स्वप्नापोटी घेतला असावा. लेखकांनी या स्वप्नांच्या कहाण्यांना साहित्यात रूप दिले. कवींनी कल्पनेचे पंख दिले. या ॲबस्ट्रॅक्ट स्वप्नांना वास्तवात आणण्याची ही धडपड चालूच राहिली. श्रीमंतीची, नवसांची स्वप्ने सकाळच्या प्रकाशात विरघळून जातात. या प्रतिमांना तुमच्यात लपलेल्या प्रतिभेच्या बंद दरवाजाची कडी-कुलपे उघडून तुम्हाला प्रवेश मिळवायचा असतो. कलावंत याच कडीच्या आधारावर अलौकिक विश्व तयार करतात. याला स्वप्नरंजन म्हणायचे! आता हे गुपित राहिले नाही. विज्ञानाने पाठपुरावा केला तरी स्वप्नातल्या या ऊर्जेचा एक्स-रे अजून निघालेला नाही. विश्व तयार करणाऱ्याने काहीतरी राखून ठेवलेच आहे. नाहीतर कीर्तनातली ही खिरापत त्याने येणा-जाणाऱ्यांना वाटली असती की!

पेंटिंग पूर्ण व्हायच्या बेतात आले की वाटते, हे तर मी पूर्वी पाहिले आहे. त्यापूर्वीच ते का दिसत नाही? त्या क्षणापर्यंत तुम्हाला प्रवास हा करायला लागतो. ते अधांतरी फॉर्म्स तुमच्या भोवती सतत फिरत असतात. कधीतरी क्षणभर त्याची प्रचीती येते आणि जाते.

''अचानक या अनोळखी गावात आलो खरा
पण मला जाणवतंय
मी पूर्वी कधीतरी इथे येऊन गेलोय...
मी तिला सांगितलं,
बघ, हे वळण घेतलं की लागेल एक छोटी गल्ली
एव्हाना साऱ्या सावल्या सरकत सरकत
जुन्या विटांच्या भिंतीपाशी एकत्र झाल्या असतील,
डावीकडच्या तिसऱ्या घराच्या दगडी भिंतीत बंद असेल एक खिडकी
लपवलेल्या चेहऱ्यासारखी,
गल्लीच्या टोकापासल्या बुटक्या घरातून बाहेर पडेल
भुरं मांजर
दबकत, पावलांचा कणमात्र आवाज न करता ते
चालत जाईल गल्लीतील अंथरलेल्या शांततेवरून
समोरच्या घरात,
मला वाटतंय, पलीकडे पडकी भिंत सावरीत नक्कीच उभं
असणार
वृद्ध लिंबाचं झाड.
एक घर, त्या शेजारचं गेरूनं रंगवलेलं दार आहे.
त्याला चढून जायला तीन दगडी पायऱ्याही तिथे आहेत,
त्याच्या उंबऱ्यावर उभं राहून, पायऱ्यांवरून उंच उडी मारून
या गल्लीतल्या धुळीतनं धुम्म पळत गेलं
असावं माझं बालपण ते.
अर्थातच माझ्यावर तिचा विश्वास बसला नाही,
तेही साहजिकच.
माझाही यावर विश्वास नाही.

स्वप्नांना लॉजिक असावं-नसावं. 'द ग्रेप्स ऑफ रॉथ' या जॉन स्टाइनबेकच्या कादंबरीत पानापानांत ही स्वप्नं लपलेली आढळतात. व्यंकटेश माडगूळकरांच्या माणदेशाच्या गोष्टींत ती तुमच्यापाठोपाठ माळरानावर चालतात. पृथ्वी थिएटरच्या कॅफेत घुटमळणाऱ्या परप्रांतातून आलेल्या, उधार कपडे घालून लांब वाढवलेल्या केसांच्या तरण्याबांड मुलांच्या डोळ्यांत हिरो बनण्याची स्वप्ने तरळत असतात. आणि इथेच या बॉलीवूडमध्ये सुपरस्टार होऊन साम्राज्य करणाऱ्या राजेश खन्नाची क्रेझ धुळीला मिळते. त्याच्या मृत्यूपर्यंत तो किंग लियरसारखा त्याच स्वप्नात राहिलेला हताश हिरो सर्वांनी पाहिला आहे. स्वप्नातही एक स्वप्न असते. स्वप्नात दृष्टान्त झाला किंवा मिळाला अशा कथा आपल्या ऐतिहासिक आणि धार्मिक पोथ्यांमध्ये चमत्कारांनी भरलेल्या आहेत. त्या लोकांना आवडतात. त्याचे पुरावे लोक मागत नाहीत. स्वप्नात देव येतात आणि मग गावात मंदिरे उभी राहतात. त्याच मंदिराच्या पायऱ्यांवर गांजलेली माणसे माथा ठेवतात. त्या श्रद्धेवर जीवन जगायला आधार मिळतो. मृत व्यक्तीशी स्वप्नात संवाद झाला, असं सांगणारा एक काळही होऊन जातो. ही वैयक्तिक स्वप्नांची कहाणी जगभरची आहे. या स्वप्नांनीच फॅन्टसीचे युग निर्माण केले.

आणि अठराशे नव्याण्णव साली 'इन्टरप्रिटेशन ऑफ ड्रीम्स' या सिग्मंड फ्रॉईडच्या लेखाने सारे जग बदलून गेले. स्वप्नांच्या या दुनियेकडे पाहण्याचे नवीन मार्ग मोकळे झाले. लिहिताना स्वतःवरच रागवून फाडून चुरगळून फेकलेल्या कागदाच्या बोळ्यात फ्रॉईडने स्वप्ने शोधायला शिकवले. या त्याने लिहिलेल्या निबंधानंतर जगाला समजून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्वप्नवत कल्पनांनी मानसशास्त्र आणि कलेत महत्त्वाची भूमिका घेतली आहे. या मानसशास्त्रज्ञांना कलेतलं घंटा कळत नाही, ही भूमिका इतिहासातल्या अनेक चित्रकार, दिग्दर्शक, अभिनेते, लेखकादींनी वारंवार प्रकट केली आहे. कला आणि कलावंताचे मन जाणून घ्यायला फक्त परमात्माच काही उत्तरे देऊ शकतो. हा कट्ट्यावर मिसळ खाऊन चर्चा करण्याइतका उथळ विषय नाही. हे संदर्भ क्रिटिक्सच्या संदर्भातही जगभर आहेत. पण त्याविषयी तुम्हाला वाचायला तुडुंब पुस्तके उपलब्ध आहेत.

अनेक शतके चित्रकलेत प्रयोग होत आले आहेत. अनेक अडचणी चित्रकारांपुढे होत्या. मुख्य म्हणजे चित्रातले परस्पेक्टिव्ह त्यांना सापडत नव्हते. डोळ्यांत हे परस्पेक्टिव्ह मावते. मी येथे आहे, पुढे झाडी आहे, नंतर शेती, त्यात काम करणारे शेतकरी, नंतर टेकडी, त्यावरचे चर्च, त्यापाठी झाडीच्या पलीकडचे डोंगर आणि त्यावरचे आकाश. हे इन्फिनिटीपर्यंतचे दृश्य चित्रात आणण्याचे प्रयत्न होत होते. परंतु ते दाखवताना त्यांना एकात एक गुंतलेली, रचलेली ठळक प्रतिमा दाखवून हे परस्पेक्टिव्ह तयार करावे लागत असे. जसे आपल्या मोगल आर्टमध्ये दिसते. पण त्या चित्रांत खोली नव्हती. त्यावेळी कॅमेरे नसल्याने हे डेप्थ ऑफ फिल्ड तयार करण्याचे प्रयत्न झाले. वरमीर या चित्रकाराने पहिल्यांदा ते चित्रात आणले. एका भिंतीसमोर विणकाम करीत बसलेल्या चित्रात ते त्याला जमले. त्याने साधा पिनहोल कॅमेरा तयार करून हे साधले असावे असा रिसर्च आहे. आउट ऑफ फोकस अशी जर बॅकग्राउंड दाखविली, की हे परस्पेक्टिव्ह त्याने साधले आणि हा प्रश्न सुटला. दुसरा प्रश्न होता तो गुरुत्वाकर्षणाचा. जमिनीवर घडणारी दृश्ये, त्यावर मागे-पुढे उभी असलेली झाडे, डोंगर, अगदी युद्धे असतील; नाहीतर समुद्रातील गलबते, वादळ, सूर्योदय, सूर्यास्ताच्या दृश्यात हे गुरुत्वाकर्षणाचे नाते सांभाळावे लागत असे आणि त्या चौकटी डोईजड होऊ लागल्या. मनमुक्त कल्पनेच्या आविष्कारांनाही या बंधनाच्या बेड्या होत्या. पण इथेच या फ्रॉईडच्या निबंधाने आधार मिळाला आणि स्वप्ने अवतरली. या स्वप्नानेच सर्रिअलिझमचा जन्म झाला. त्याचा नायक होता साल्वोदार दाली! 'द पर्सिस्टंट्स ऑफ मेमरी' या त्याच्या पेंटिंगने कलेला झटकन् नवीन वळण दिले. त्याने आयुष्यभर त्याच्या स्वप्नातल्या इतिहासातील घटनांच्या अनेक कल्पना पेंटिंगमध्ये घेतल्या. तो सर्रिअलिझममध्येच वावरायचा. त्याने एक चमत्कारिक आकाराची उंच खुर्ची तयार केली होती. अंघोळ करून नागडा त्या खुर्चीत ओल्या अंगाने, हातात एक चमचा घेऊन तो बसे. जमिनीवर एक मोठी थाळी ठेवलेली असे. तो डोळे मिटे. त्याला डुलकी येई. काही क्षण तो झोपेत असताना तो चमचा त्याच्या हातातून निसटून खालच्या थाळीवर पडे. त्या आवाजाने तो उठे. एवढीच त्याची झोप असे. तो कधीही झोपेत झोपू शकला नाही. केवळ जागे होणे, या त्याच्या प्रयोगाने कल्पनाशक्ती आणि स्वप्नांचे राज्य वाढवले आणि ते त्याच्या चित्रांत आणले. वितळणारी घड्याळे हे त्याचे उदाहरण आहे. सर्रिअलिझम काही काळ टिकला. चित्र पाहताना अचानक धक्का मिळतो, पण परत तो शांत होतो. त्यामुळे पुन्हा चित्र पाहताना ती मजा येत नाही. नो रिपीट व्हॅल्यू. पण या स्वप्नांच्या थिअरींनी अनेक मोठे चित्रकार या कर्मठ विचारधारेतून मुक्त झाले.

सेझान त्यापैकी एक. त्याला 'फादर ऑफ मॉडर्निझम' म्हणतात. एकाच चित्रात अनेक परस्पेक्टिव्ह त्याने आणले. त्याने नवीन फॉर्म्स ह्युमन बॉडीज्ना दिले. तसाच मार्क शगाल हा एक चित्रकार होता. त्याचा आयुष्यभराचा विषय 'प्रेम' हा होता. खेडेगावातून तरंगत येणारी त्याची प्रेयसी बघताना त्याने गुरुत्वाकर्षणाचे नियम तोडण्याची इजाजत घेतली. त्यामागे स्वप्नांचीच मोकळीक होती. त्यानंतर या स्वप्नांच्या शिडीवरून चढत व्हॅन गॉग, मातीस, क्ले, पिकासो, मार्क रॉथको चढत गेले आणि त्यांनी जगाला अलौकिक प्रतिभेचे दर्शन दिले.

स्वप्ने तुमचे ग्रामर बदलण्याची दृष्टी देतात. शांताबाई शेळके गाण्यातून स्वप्नातल्या गावात नेतात. स्वप्नामधून स्वप्नातल्या प्रियाला मनमुक्त गीत गातात. स्वप्नातल्या सुखाचा स्वप्नातच वेध घेतात.

दोन हजार दहाला 'इन्सेप्शन' नावाची याच स्वप्नाचा आधार घेऊन तयार झालेली अद्भुत फिल्म मी पाहिली. त्यात लिओनार्डो दी कॅपरिओ हा नट आहे. दुसऱ्याच्या स्वप्नात जाऊन सारी कॉर्पोरेट सिक्रेट्स चोरून आणायची, हे यातले सूत्र होते. स्वप्नातल्या अनेक प्रतिमांचा आविष्कार फिल्ममधून पाहताना आपण थक्क होतो.

गेली पाच-सहा दशके मला याच क्रिएटिव्हिटीची संगत आहे. तरीही माझ्या या स्वप्नातल्या रस्त्यावर मला अजून शोधायचेच आहे. त्यात थकवा तर नाहीच, पण कोणती रिग्रेट्सही नाहीत. या प्रतिमांचे कुतूहल मला जागे ठेवते आहे. माझं एक पेंटिंग आहे. पांढरी भिंत, त्यावर दाटलेलं आकाश, भिंतीला टेकून ठेवलेली शिडी आणि पांढऱ्या भिंतीत पिवळ्या प्रकाशातली उघडी खिडकी. मला सतत वाटते, पेंटिंगमधील शिडीवरून खिडकीतून उतरून समुद्राच्या किनाऱ्यावर दूर फिरायला गेलोय मी एकटा...

हे स्वप्न आहे ,की स्वप्नात मला पडलेले दुसरे स्वप्न हे आहे, मला माहीत नाही.

◆ Subhash.awchat@gmail.com

मेधा पाटकर

वाचवू माती, पाणी, हवा... बहुगुणाजींचा ठेवा!



सुंदरलाल या पृथ्वीवरचे एक सुंदर लाल- म्हणजे पुत्र होते. तेही बहुआयामी आणि गुणांनी समृद्ध! आयुष्याची ९० वर्षे खडतर संघर्षमय जीवन व्यतित केल्यानंतर ते सामाजिक पटावरूनही अदृश्य झाल्यागत राहिले. मात्र, वयाच्या ९४ व्या वर्षी ते हे जग सोडून गेल्याने पुन्हा एकदा 'बहुगुणी' विचारधारा अनेकांच्या लेख-संवादातून पुढे आणली जात आहे. उत्तराखंडच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांना शासकीय श्रद्धांजली वाहिलीच; परंतु राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्यांचे 'चिपको आंदोलन' आणि पर्यावरण संरक्षणासाठी झटणे हे अनेक युवा संघटना व संस्थांना प्रेरणादायी ठरते आहे.

'मिट्टी, जल और बयार। जीवन के तीन आधार॥' ही नुसती घोषणा नव्हती, तर तो संदेश होता; जो माती, पाणी, हवा वाचविणाऱ्या बहुगुणांच्या मुखातून उमटला होता. आज तो प्राणवायूविना प्राण गमावणाऱ्या देशवासीयांच्या मनात घुमतो आहे. यावेळीच तर सुंदरलालजी हवे होते... झाडा-जंगलांतून मिळणाऱ्या श्वासाची महत्ता पुन्हा नव्याने जगापुढे मांडण्यासाठी! त्यांचेही करोनाच्या आघाताने जाणे हा एक विरोधाभासच नव्हे का? अनेक संत-तत्त्वज्ञांचे बोल आणि त्याचे मोल त्यांच्या मृत्यूनंतरच जगाला पटते... विचार करायला लावते. बहुगुणाजींच्या बाबतीतही हे खरे ठरू शकते! उत्तराखंडसारख्या अनेक नैसर्गिक आघात सोसणाऱ्या राज्यापासून, गंगेच्या खोऱ्यापासूनच याची सुरुवात झालेली असली तरी पुन्हा एकदा केवळ पर्यावरणच नाही, तर जग वाचविण्यासाठी संपूर्ण जनजागरण साध्य होईल असा विश्वास आपण बाळगू या का?

बहुगुणाजींचा आयुष्यपट हा गांधीवादाच्या कॅनव्हासवर साकारलेला होता. त्यांनी जातिनिर्मूलनासाठी केलेली पदयात्रा त्यांचे व्यापक विचार आणि कृती दर्शविते. गांधींच्या विचारांना भूदान-ग्रामदान यांसारख्या कार्यप्रणालीतून दृश्यरूप देणाऱ्या विनोबांच्या आवाहनापोटी ते पहाडी क्षेत्रात कार्यरत झाले, ते अखेरच्या क्षणापर्यंत! गांधींनाच मानणाऱ्या त्यांच्या सहचारिणी विमलाबहेनजींच्या अटीनुसार, राजकारण वगळून समाजकारणच स्वीकारून ते विवाहबद्ध झाले. या जोडप्याने एकमेकांचे प्रेरणास्रोत बनूनच कार्य केले, हे सुंदरलालजीच सांगत असत. हिमालयातून उगम पावणाऱ्या अलकनंदा, भागीरथी, मंदाकिनी यांसारख्या गंगेच्या उपनद्यांचे जाळेच नव्हे, तर पहाड, पर्वत, जंगल आणि वाहून, धुपून जाणारी जमीनही पिढ्यान् पिढ्यांसाठी वाचावी, सर्वांना ती जीवनदात्री ठरावी, या विचाराने ते झपाटलेले होते. अत्यंत मृदु भाषेत, परंतु कणखर भूमिकेद्वारे त्यांनी व्यक्त केलेले विचार हे पर्यावरणीय चौकटीत, परंतु जीवनरक्षेच्या कोंदणात बसवलेल्या हिऱ्यांसारखे चमकत राहिले आहेत ते आजवर! त्यांचा प्रकाश नाकारणाऱ्या शासनकर्त्यांनी मात्र कोट्यवधी जनांच्या आयुष्यात अंधार दाटणारा मार्गच स्वीकारला!

हिमालयाच्या कुशीत वसलेल्या छोट्या उत्तराखंडपासून नव्हे, तर उत्तर प्रदेशसारख्या बड्या राज्यातून बहुगुणाजींनी आपल्या कार्यास सुरुवात केली असली तरी पहाडी, कष्टाळू आणि निसर्गप्रेमी जनतेवरच त्यांनी लक्ष केंद्रित केले. त्यांची दीर्घ पदयात्रांतून सामील झालेल्या युवकांतूनच आशिष कोठारींसारखे पर्यावरणवादी निर्माण झाले. बिष्णोई समाजातील अमृतादेवींच्या नेतृत्वाखाली झाडे वाचविण्यासाठी जीव गमावणाऱ्यांची प्रेरणा बहुगुणाजींनी 'चिपको आंदोलना'च्या रूपाने पुढे नेली... जी आजही रस्ते, महामार्ग वा मोठ्या धरणांसाठी झाडा-जंगलांचा विनाश करणाऱ्यांविरुद्ध आंदोलनकर्त्यांना लढण्याचे बळ देते. बिरसा मुंडाचा भूअधिकाराचा लढा असो की स्वामी सहजानंद सरस्वतींचा समाजवादी शेतकरी संघर्ष असो, अथवा चिपको आंदोलन असो... ही आंदोलनांची मांदियाळीच परिवर्तनाचा विचार मांडत इतिहास रचते!

बहुगुणाजींनी टिहरी धरणाला संपूर्ण विरोध दर्शवला तेव्हा विकासविरोधाचे दूषण त्यांनाही लावले गेले, जसे नर्मदा आंदोलनाला! मात्र, त्यांनी आजच्या उत्तराखंडला आणि देशालाही अशा विनाशकारी धरणांमुळे होणाऱ्या नुकसानीबाबत इशारा दिला आणि अखेरपर्यंत आपली भूमिका तडजोड न करता कायम ठेवली. आज अमेरिकेनेही टेनेसी खोरे योजनेची दिशा उलथून एक हजाराहून अधिक धरणे ध्वस्त केली आणि त्यांच्यामुळे उद्ध्वस्त होणाऱ्या नद्यांचे रक्षण करण्याचा मार्ग स्वीकारला. मात्र, तरीही भारतीय शासक, राजकीय नेते आणि समाजधुरीण मोठ्या धरणांबाबत पुनर्विचार करण्यास तयार नाहीत. म्हणूनच तर बहुगुणांच्या सत्याग्रही चिकाटीसह आजही एकेका नदीखोऱ्यात लढा दिल्याशिवाय तिथले जीवन वाचवणे अशक्य होते. टिहरीच्या विस्थापितांचे पुनर्वसन आजही अपूर्ण आहे. आणि नर्मदा आंदोलनाच्या ३५ वर्षांच्या काळात हजारोंना जमीन, घरासाठी भूखंड इत्यादी लाभले तरी अखेरच्या वंचितासाठी संघर्ष आवश्यकच आहे.

टिहरी धरणाविरुद्धच्या संघर्षात बहुगुणाजींनी भांडवलशहा, ठेकेदार तसेच 'शासकीय' म्हणविणाऱ्या जनविरोधी संस्था अशा साऱ्यांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. त्यासाठी दोनदा दीर्घ उपोषणे झाली, ती आम्हा सर्वांनाच भलेबुरे शिकवत! मला आठवते की, उपोषणापूर्वीच्या बैठकीत विस्थापितच नव्हे, तर संघर्ष-निर्माणात सामील पहाडी कार्यकर्ते आणि कष्टकऱ्यांच्या प्रतिनिधींना त्यावेळी मोठा धक्का दिला तो बहुगुणाजींनीच... अचानक उपोषण- तेही अनिश्चितकालीन- घोषित करून! नर्मदा आंदोलनातील छोटे तात्कालिक उपवास (जेलमधले वा रस्त्यावरचेही) सोडले तर एकेका दीर्घ उपवासावर उतरताना आणि सोडतानाही घमासान चर्चाच काय, वादविवादही व्हायचे. मात्र, सर्वांच्या निर्णयातच उपवासकर्त्यांचा निर्णय (त्यांचा विशेष अधिकार मंजूर करूनही) सामावला जायचा. त्या दिवशी काहीशा भडकलेल्या कार्यकर्त्यांना काळजी होती ती बहुगुणांच्या वयाची- आरोग्याची! आणि सुंदरलालजींना चिंता होती- राक्षसी धरणापासून पहाडपट्टी वाचवण्याची! गांधीजींनाही असे व्यक्तिवादी नव्हे, व्यक्तिगत निर्णय कधी कधी घ्यावे लागले होते, हे त्यांना समजावताना माझ्याही नाकी नऊ आल्याचे आठवते.

बहुगुणाजींच्या ५६ दिवसांच्या त्या उपोषणानंतर टिहरीचा संघर्ष चिपको आंदोलनाप्रमाणे जगभर दुमदुमला! जे. पी. असोसिएट्ससारख्या महाकाय धरणांतूनच कमावणाऱ्या ठेकेदाराला साथसंगत होती ती टिहरी हायड्रो डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची! त्यामुळेच बहुगुणाजींना ॲड. सकलानी, डाव्या विचारांचे नौटियालजी, जगदंबाप्रसाद रतुडीजी, विजय जरधारीजी अशा अनेकांच्या सहयोगाने त्यांना टक्कर द्यावी लागली होती. या संघर्षात जमिनी लढतीत कारस्थानी अपघातात बहुगुणाजींच्या धरणस्थळीच्या कार्यक्रमाहून परतणाऱ्या १६ जणांचा मृत्यूही सोसावा लागला. शासनाने समर्थन न दिल्यामुळे कोर्टाच्या दारातही उभे राहावे लागले. बहुगुणाजींना निसर्गाची चाड आणि वैज्ञानिक तसेच संविधानात्मक भान असलेल्या एन. डी. जयाल, तरुण गांधीवादी विमलभाई आणि सुप्रीम कोर्टाचे वरिष्ठ वकील संजय पारेखजींची साथ लाभली. या प्रदीर्घ कायदेशीर लढाईतही न्यायाधीशांमध्ये मतभेद होऊन पर्यावरणीय व भूकंपशास्त्रीय मुद्दे 'तांत्रिक' म्हणून नाकारणारा कोर्टाचा निर्णय कारण ठरला बहुगुणाजींच्या दुसऱ्या उपोषणाला!

या ७५ दिवस (ग्लासभर बेल रस घेऊन) चाललेल्या उपोषणादरम्यान अनेक गोष्टी घडल्या. बहुगुणाजींनी सिलियाराचा आश्रम सोडून धरणस्थळी तळ ठोकला तो कायमचाच! त्यांना कुणी भेटू नये आणि त्यांच्याकडे दुर्लक्ष करून त्यांना थकवावे, ही शासनाची नेहमीची वृत्ती दिसली तेव्हा मी थोडा वेष बदलून, डोक्यावर पदर घेऊन विमलभाईंसह रात्री दिल्ली-हरिद्वार बसमध्ये चढले. एका पत्रकाराला सोबत घेतले. तरीही मधेच बस थांबवून पोलिसांनी आम्हाला ताब्यात घेतले. कशीबशी खरडलेली चिठ्ठी एका प्रवाशामार्फत टिहरीला पोहोचली. म्हणूनच कोर्टात आम्हाला उभे करताच पूर्ण बार असोसिएशनच्या वकिलांनी सोबत उभे ठाकून आम्हाला साथ दिली. कोर्टाने बिनशर्त सुटका केल्यावरही कोर्टाच्याच आवारात पुन्हा विनाआधार अटक करून पोलीस वाहनातून आम्हाला फिरवत असताना 'ठीक आहे, आता बहुगुणाजींसह इथेच तळ ठोकू. उत्तराखंडाचे पाहून घेऊ...' अशी धमकी दिल्यावरच दिल्लीला आणून सोडले.

बहुगुणाजींना आंदोलनकर्त्यांचाच नव्हे, तर विद्यार्थी, युवा, पर्यावरणवादी जनसंघटनांचा, वंदना शिवांसारख्या विचारवंतांचा पाठिंबा मिळाला तरीही केंद्र सरकार झुकले नाही ते नाहीच!

यानिमित्ताने पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींना भेटलो तेव्हा संवेदनशील मानल्या जाणाऱ्या त्यांनीही नुसतेच ऐकून घेतले. मात्र अनेक मान्यवरांच्या दबावाने अखेरीस धरणाचे काम थांबवले गेले आणि त्यांचे सरकार कोसळले! आज अनेक वीज प्रकल्प, चारधामसारखे महामार्ग या देवभूमी मानलेल्या क्षेत्राला धक्के देत आहेत. भूकंप, भूस्खलन, पूर आणि नदीघाटीतील आजीविकेवरील संकट सोसत उत्तराखंडमधील जनता जगते आहे. अशा प्रकल्पांविरुद्ध जेव्हा ती आवाज उठवते तेव्हा त्यांची लोकशाहीतील भूमिकाच नाकारत, निसर्गाचे योगदान न मानता शासन भांडवलदार धनदांडग्यांनाच साथ देते. टिहरीसंबंधी चाललेला कोर्टातील लढा जिंकला नाही तरी न्यायपालिकेचा, हरित प्राधिकरणाचा दरवाजा ठोठावत संघटित शक्ती आणि वकिली युक्तीनेच नव्हे, तर घटनात्मक अधिकाराच्या आधारेही जिंकत आहेत. नर्मदा आंदोलनाच्या भूमिकेवर टीकेची झोड उठवणारे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे अर्थशास्त्री भरत झुनझुनवालाही आता समजून उमजून या प्रकल्पांना विरोध करत गंगा वाचवू पाहताहेत. जी. डी. अग्रवालांसारखा संतत्व जपणारा वैज्ञानिक त्यांचे चार साथी याचसाठी हौतात्म्य पत्करूनही आज लढत आहेत. बहुगुणाजींच्या विकासाच्या निरंतर आणि न्याय्य भूमिकेला शासनाचा सहयोग मिळाला असता तर पर्यावरण मंत्रालय स्थापनेसाठी सफल प्रयत्न करणाऱ्या बहुगुणाजींचा हिमालयातील पहाडी पट्टाच काय, आज प्रेते वाहून नेणाऱ्या, प्रदूषित झालेल्या गंगेचा जीवही वाचला असता.

आपल्या व्यापक विचारापोटीच नर्मदा खोऱ्यातील लढतीला सतत साथ-समर्थन दिलेल्या पर्यावरणवाद्यांपैकी एक होते बहुगुणाजी! त्यांच्या नजरेत हा संघर्ष येताच ते स्वतः भेटायला आले. 'नर्मदा घाटी में घूम रही है लडकी' असे वयोवृद्ध वडिलकीच्या भूमिकेतून लेखात मांडत त्यांनी आंदोलनाच्या प्रसिद्धीविन्मुख काळात अनेकांना आमची ओळख करून दिली. अनेक कार्यक्रमांत सामील होत त्यांचा विशेष सहभाग लाभला तो बाबा आमटेंसह पंतप्रधानांसमोर १५०० आदिवासी, शेतकरी, स्त्री-पुरुषांच्या धरणे कार्यक्रमात! व्ही. पी. सिंगांच्या संवादशीलतेमुळे सर्वांना त्यांच्या निवासस्थानी घेऊन जात असताना केरळच्या सुगथा कुमारींबरोबरच बहुगुणाजीही त्यात सामील झाले होते. त्यावेळी एक दीर्घ आणि सखोल संवाद झाला. निर्णय होता सरदार सरोवराच्या पुनर्विचाराचा! मात्र, माधव चितळेजींनी ती प्रक्रिया पुढे जाऊ न देता पुस्तिका छापून एकतर्फी उत्तरे दिली, याचे कारण होते- व्ही. पी. सिंग सरकारचे कोसळणे! आज सरदार सरोवराचे पितळ उघडे पडले आहे, त्याला जबाबदार कुणाकुणाला धरावे आणि कसे?

या गंभीर प्रश्नाबाबत राष्ट्रीय जनशक्तीने आवाज उठवला तो 'हरसूद' मध्ये- १९८९ साली. हरसूद या ७०० वर्षे जुन्या शहरास ध्वस्त करून चुकलेल्या नर्मदासागर धरणाबाबतच नव्हे, तर 'विकास' हा 'जनविकास' व्हावा, निसर्ग आणि मानवाला जपूनच संसाधनांचा वापर व्हावा आणि पिढ्यान् पिढ्यांचा ठेवा एकाच पिढीने विनाशकारी तंत्रज्ञानाने संपुष्टात न आणावा, यासाठी! 'विकास चाहिये, विनाश नहीं!' ही घोषणा देताना त्या ३५००० च्या मेळाव्यातील मंचावर बहुगुणाजींबरोबरच ठाकुरदासजी बंग, सिद्धराज ढढ्ढा होते, तसेच स्वामी अग्निवेशही. शबाना आझमी, शिवराम कारंथही! बाबा आमटेंनी नर्मदा खोऱ्यात त्याचवेळी प्रथम पाऊल टाकले आणि आमच्यासह दहा वर्षे ते राहिले. आपल्या सतत हसतमुख चेहऱ्याने नर्मदाघाटीच नव्हे, तर देशाचे निसर्गधन जपण्याचे बहुगुणाजींचे त्यावेळचे आवाहन आंदोलनाला आत्मविश्वास देऊन गेले होते. तेही दिवस गेले. आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुगुणाजींना आणि आंदोलनालाही पर्यायी नोबेल पुरस्कृत केले गेले तरीही मुलभूत प्रश्नांची गुंतागुंत सुटली नाहीच, हेही खरे!

आज चारधामसारख्या प्रकल्पाबाबत रवि चोपडांसारख्या जनवैज्ञानिकाच्या अध्यक्षतेखाली समिती नेमूनही त्यांचा अहवाल डावलत अशा योजना पुढे रेटणाऱ्या शासनकर्त्यांना बहुगुणाजींचा गुणगौरव कोण ऐकवणार आणि कशासाठी? महाराष्ट्रातला नाणार प्रकल्प असो किंवा समुद्र बुजवून पुतळा किंवा महामार्ग उभारण्याचा निर्णय असो; लाभ-हानीचा विचार कितपत होतो? शेतकऱ्यांच्या जीवावर आणि आजीविकेवर उठलेल्या मोठ्या उद्योगपतींनाच लुटू देणाऱ्या कायद्यांना थोपवताना लोकशाहीचा आधार कोण घेतो? माती, धरती आणि शेतीवरील आक्रमण थोपवणाऱ्या शहिदांना नमन न करणारा सत्ताधीश कसा तगतो? सत्याचा म्हणजे विज्ञानाचाच नव्हे, तर प्रत्यक्ष जीवाघाताचा विचार कोण करतो? बहुगुणाजींनाही भोगावा लागला तो 'करोना' व्हायरस जैविक नव्हे, अजैविकतेतून निर्माण झालेले हत्यार ठरतो! तेव्हा आता तरी पर्यावरणाचे आपल्या जीवनातले स्थान समजावून देणाऱ्या बहुगुणाजींनी मागे ठेवलेल्या प्रेरणा, सत्याग्रही संघर्ष-निर्माण आणि स्वावलंबनाचा समन्वय आपण स्वीकारावा हाच मार्ग उरतो! शासनकर्ते झुकले नाही तरी जनता राजकारणाला पर्यावरणाशी जोडून आवाज उठवेल आणि जनविरोधकांना, निसर्ग-विनाशकांना झुकवेल तेव्हाच बहुगुणाजींना ती खरीखुरी श्रद्धांजली ठरेल.

◆ medha.narmada@gmail.com

डॉ. संजय ओक

मोकळे आकाश...

ब्रोकन क्रेयॉन

परवा एक व्हॉट्सॲप गोष्ट वाचनात आली. आयुष्याची तुलना लहानपणीच्या रंगखडू अर्थात क्रेयॉनच्या तुकड्यांशी केलेली... मला ही कल्पना विलक्षण आवडली. व्हॉट्सॲपच्या माध्यमातून एका अनामिकाने माझ्या विचारांची स्पंदने सुरू झाली.

माझे मन अचानक पाच दशके मागे गेले. शाळेचे दिवस आठवले. दप्तरात वह्या-पुस्तके, कंपासपेटी, याचबरोबर आणखीन एक गोष्ट असायची- रंगीत पेन्सिली किंवा रंगखडू अर्थात् क्रेयॉन्सचा सेट. छोटेखानी, दोन-तीन इंचांची लांबी... त्या खडूंना प्रत्येकाला गुंडाळलेले एक कागदी वेष्टण... त्यातूनही जाणवणारा क्रेयॉनचा मेणचट स्पर्श... नव्याने विकत आणल्यावर त्या बाराही रंगखडूंची केलेली आकर्षक रचना... सर्वांना छान टोके काढलेली. पण एकदा का वापराला सुरुवात झाली, की काही बदल घडायचे. हिरवा, निळा, लाल रंगखडू खूप वापरले जायचे. पांढऱ्याशुभ्र कागदाच्या कॅनव्हासवर कुठे निळे ढग अवतरायचे. राखाडी डोंगर, हिरवी झाडी, निळसर पांढुरकी नदी आणि तिच्या किनाऱ्यावरचे लालचुटुक कौलांचे घर... हे चित्र कागदावर नाही तर उराशी रेखाटत आमचे बालपण आणि यौवन गेले. उत्तरायुष्यात चार पैसे मिळाल्यावर फार्म हाऊसचा शोध घेऊ लागलो तेव्हाही मनात खोलवर हे क्रेयॉन्सच दडलेले होते. काही रंग पुनःपुन्हा वापरले गेले आणि त्यामुळे ते खडू इतरांपेक्षा जास्त झिजले. तर उरलेले काही तुलनेने कमी. पांढऱ्या खडूचा वापर कमी झाला. काळ्या रंगाला तसे आम्ही बालपणात चार हात दूरच ठेवले होते. आयुष्यात सगळे रंग असतात. प्रणयाचा गुलाबी, अमर्याद उत्साहाचा लाल, शांततेचा पांढरा, समृद्धीचा हिरवा, धम्मचक्राचा निळा आणि 'यलो, यलो, डर्टी फेलो' म्हणून खिजवलेला पिवळा... हे सारे आम्हाला आमच्या क्रेयॉन बॉक्सने शिकवलं. पण आयुष्यात, नोकरीच्या ठिकाणी आणि नात्यागोत्यात सारेच काही स्पष्ट पांढरे किंवा काळे नसते, तर संदिग्धतेचे द्योतक असलेला ग्रे अर्थात राखाडी रंगही ठायी ठायी अनुभवास येतो याचाही वस्तुपाठ क्रेयॉन्सनेच दिला. क्रेयॉन लपेटणाऱ्या कागदाची गंमत व्हायची. जसजसा रंगखडू वापरला जाई, तसतशी त्याची झीज होई, आणि कागद मात्र मूळच्या लांबीचाच! परिणामतः तो मधे मधे येई, व्यत्यय निर्माण करे. आणि मग एखाद्या दिवशी मी चिडून तो कागद फाडून फेकून देई. आता रंगखडू पूर्णपणे उघडा असे. त्याचा मेणचटपणा हक्काने माझ्या हातावर चढे. कागदावरचे चित्र पूर्ण होईपर्यंत सगळ्या रंगांची पुटे माझ्या बोटावर चढत आणि हाताचे पार इंद्रधनुष्य होऊन जाई. आयुष्याचेही नेमके असेच होते. एखादी कमी गोष्ट लपवण्याचा आटापिटा करताना एक दिवस असा येतो की संकोच आणि लपाछपीचे सारे पडदे विरून जातात आणि उघडपणे आपण आपले आयुष्य जगू लागतो. आता आपल्याला ना आपल्या वैगुण्यांची लाज वाटत, ना आपल्या दौर्बल्याची भीती.

कधी कधी क्रेयॉन्सच्या बाबतीत मोठा बाका प्रसंग यायचा. पांढऱ्या कागदावर आकाशाचे शेडिंग करताना किंवा एखाद्या मनुष्याकाराला चारकोल शेड देताना माझ्या हाताचाच दाब जास्त पडे आणि तो क्रेयॉन तटकन् तुटे. तुकडा झालेला क्रेयॉन माझा सेट विस्कळीत करे. दुकानदाराकडे जाऊन विकत घ्यावा, तर एकच रंग मिळत नसे. परत संपूर्ण सेटचे पैसे घरात मागण्याची प्राज्ञाच नसे. दोन तुकडे पुन्हा जोडणेही शक्य नसे. हे अचानक आलेलं लंगडेपण, हा आघात त्या बालवयात त्रास देई. पण त्यातही तुकडा तर तुकडा- बोटांची चिमूट घट्ट करून त्या तुकड्याने पुन्हा कॅनव्हासवर रंग भरणे सुरू होई. आणि मग लक्षात येई, की तुटला तरी तुकडा आपले काम चोख बजावतो आहे. रंगछटा तशाच आणि तितक्याच देखण्या उतरत आहेत. तुटला म्हणून टाकू नये आणि तुकडा म्हणून मातू नये. *Even a broken crayon is a crayon afterall* ! आयुष्यातला हा सर्वात महत्त्वाचा धडा या ब्रोकन क्रेयॉनने मला दिला आहे. आयुष्यात आघात झाले, अनपेक्षित दुःख पदरी आले, म्हणून मूळचा स्वभाव, चांगुलपणा, दुसऱ्याला मदत करण्याची वृत्ती... हे इंद्रधनुष्य टाकून कसे चालेल? अर्धवट आठवली म्हणून गाण्यातली ओळ गुणगुणायला कोणी बंदी केलीय?

अर्धवट तुटलेला क्रेयॉन मला क्रेयॉन बॉक्समधून खुणावतो. जीवन आनंदाने जगण्याचा संदेश देतो. आणि रोजच्या सकाळच्या चित्रात उगवतीचे रंग भरता होतो... *Because, even though it is broken... it's a Crayon!*

◆ *sanjayoak1959@gmail.com*

अंजली चिपलकट्टी

थांग वर्तनाचा !

मैत्र जीवांचे !

'गेम थिअरी' हे एक गणितीय मॉडेल आहे हे आपण मागच्या भागात बघितलं. जे सजीव नेहमी अनिश्चित अशा भावना आणि ऊर्मी यांच्यावर हेलकावे खात असतात, त्यांच्या वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी गेम थिअरी वापरणं हे आकलनापलीकडचं वाटू शकतं. परंतु निसर्गामध्ये निर्जीवांपासून सजीवांपर्यंत सर्वत्र सूत्रबद्ध असे गणितीय पॅटर्न सहज दिसून येतात. फुलांच्या पाकळ्यांमध्ये दिसणारी फेबोनसी मालिका, शंखांपासून ते मानवी शरीरात दिसणारा गोल्डन रेश्यो, मुंग्यांपासून ते मेंदूतील न्युरॉन्समध्ये दिसणारे 'फ्रॅक्टल्स'चे पॅटर्न अशा अगणित गणितांमधून सजीव सृष्टीची स्पंदने ऐकू येतात. जणू काही निसर्गाची भाषा गणितीय आहे. (वैज्ञानिक असं मानतातच.)

तर प्राण्यांच्या प्रत्यक्ष जगण्यातल्या आंतरक्रियांमधील गुंतागुंत गेम थिअरीत खऱ्या अर्थानं आणता आली तर मानवी वर्तनाबाबतही काही तथ्यं हाताशी येतील असं ॲक्सलरॉडला लक्षात आलं. मग त्यानं गेम थिअरीच्या घटकांमध्ये बदल करून असंख्य खेळाडू एकमेकांशी खेळत आहेत अशी अनेक सिम्युलेशन्स केली. किती खेळाडू कोणती स्ट्रॅटेजी वापरतात, त्यांचं प्रमाण बदलत नेलं. खेळाच्या असंख्य फेऱ्या, कोणाशी खेळायचं याची निवड करण्याचं स्वातंत्र्य, एकाच वेळी अनेक खेळ अशी गुंतागुंत वाढवत नेली. 'क्षमाशील-जशास तसं', 'जशास तसं' किंवा 'सतत फसवणूक/ सहकार्य' अशा अनेक वेगवेगळ्या स्ट्रॅटेजी वापरून कोणती स्ट्रॅटेजी जास्त काळ टिकू शकते याचा अभ्यास केला. त्यातून असं लक्षात आलं की, गेम थिअरीचे अंदाज या निरीक्षणांशी बरेच जुळतात. यातून माणसाच्या वर्तनाविषयी काही भाकितं करण्याचा प्रयत्न यशस्वी होताना दिसतो. उदाहरणार्थ, दोन कंपन्यांचं जेव्हा विलीनीकरण होतं तेव्हा निर्माण होणारे वाद सोडवण्यासाठी गेम थिअरीचा वापर होऊ लागला आहे. असो. तर आपण गेम थिअरीनं प्राण्यांबाबत केलेली कोणती भाकितं खरी ठरली त्याची उदाहरणं पाहू.

उंदीर, हरीण, काळवीट, वाघ-सिंहवर्गीय प्राण्यांपासून ते चिम्पांझी-बोनोबोसारखे प्राईमेट्स सजातीयांना 'ग्रुमिंग' *(grooming)* करतात- म्हणजे एकमेकांना चाटतात, अंग घासतात, शरीरावरच्या केसांमधून परजीवी कीटक शोधून मारतात, एकमेकांना अन्न भरवतात, वाटून खातात. एकत्र शिकार करणं, संकटात एकमेकांना मदत करणं अशा नानाविध प्रकारे सहकार्य करताना त्यांना परतफेडीची अपेक्षा असते. मागच्या वेळी कोणी मदत केली, कोणी, कधी फसवलं, हे लक्षात ठेवून बहुतांश वेळा 'जशास तसं'चे नियम पाळले जातात. याचे असंख्य पुरावे मिळाल्यानंतरही प्राणी-संशोधकांनी ठरवून विरोधी पुरावे शोधण्यासाठी काही प्राणीवस्त्यांची निरीक्षणं केली. (आठवतंय ना, विरोधी पुरावे कसे महत्त्वाचे असतात ते?) त्याची काही उदाहरणे फारच रंजक आहेत.

ब्लॅक हॅम्लेट माशाचं उदाहरण अद्भुत आहे. हे मासे आपलं लिंग मनाप्रमाणे बदलू शकतात. म्हणजे ते कधी मादी, तर कधी नर बनू शकतात. मादी बनणं म्हणजे अंडी घालणं, त्यांची काळजी घेणं, त्यासाठी शारीरिक तयारी, वगैरे आलंच. अर्थातच त्यासाठी मादीला जास्त ऊर्जा आणि वेळ खर्ची घालावा लागतो. त्यामुळे आपली जनुकं पुढच्या पिढीला सोपवणं हे उद्दिष्ट असेल तर त्यासाठी 'मादी' बनलेल्या माशाला शारीरिकदृष्ट्या खूप गुंतणूक करावी लागते. तर नर बनणं त्यामानाने खूपच स्वस्त पडतं. म्हणून मग हे मासे आळीपाळीने कधी मादी, तर कधी नर बनतात. परिणामी कोणा एकालाच मादीचा भार उचलावा लागणार नाही. (हे असं माणसात करता आलं असतं तर?) आता गंमत पाहा- जर एखादा मासा वारंवार नर बनून मादी व्हायचं टाळत असेल तर ती त्याच्या साथीदाराची फसवणूकच झाली. मग या 'गेम'मध्ये पुढच्या फेरीत इतर मासे 'त्याला' सहकार्य करत नाहीत. म्हणजे त्याची 'मादी' व्हायला कोणी तयारच होत नाही! जशास तसं! हे म्हटलं तर अचंबित करणारं आहे; पण तटस्थपणे पाहिलं तर लक्षात येईल की, असे सहकार्याचे नियम त्यांच्या अस्तित्वाबरोबरच उत्क्रांत झाले आहेत. म्हणजे सहकार्य हा परिणामही नाही आणि कारणही नाही.

'नेकेड मोल रॅट' ही उंदरांची एक जात. यांचं जगणं फारच विस्मयकारक आहे. हे इतर उंदरांच्या मानाने खूप मोठ्या- दोनेकशेच्या कळपात राहतात आणि त्यांच्या भूमिगत वस्त्या फुटबॉलच्या मैदानाइतक्या मोठ्या असतात. कामाच्या वाटपाबाबत हे इतके शिस्तशीर असतात की मुंग्या/ मधमाश्यांच्या जवळ जाणारा हा एकमेव सस्तन प्राणी असावा. बीळ खोदणं, नवीन जागा शोधणं, अन्न मिळवणं, देखरेख करणं, प्रजनन अशी अनेक कामं कोणी व कधी करायची याचं नीट वाटप केलेलं असतं. यांच्या आफ्रिकेतल्या एका वस्तीत संशोधकांना असं दिसलं की, त्यांच्यात दोन-चार तरी असे उंदीर असतात की जे कामच करत नाहीत. नुसता खादाडपणा करत इकडेतिकडे हुंदडतात. काम चुकवून फुकट खाणं म्हणजे फसवेगिरीच. आणि तरी त्यांना कळपात कोणी शिक्षा करत नव्हतं. जशास तसं वागत नव्हतं. संशोधकांना वाटलं, चला, आपल्याला विरोधी पुरावा मिळालाच शेवटी! पण अजून काही काळ निरीक्षण करत राहिल्यावर त्यांच्या असं लक्षात आलं की, ज्यांना ते कामचुकार समजत होते तेच गब्दुल उंदीर पावसाळ्यात आत पाणी शिरू नये म्हणून बिळांची तोंडं बंद करण्यासाठी पळापळ करत होते. समूहात त्यांना एक विशिष्ट भूमिका होती, जी ते चोखपणे निभावत होते!

तर मग माणसांबद्दल काय म्हणता येईल? माणसं आदिम टोळी-काळापासून ते मल्टिनॅशनल कंपन्यांपर्यंत नातलग नसलेल्यांशीच नव्हे, तर न पाहिलेल्या माणसांशीसुद्धा ज्या प्रकारे सहकार्य करतात, त्याला तोड नाही. माणसाच्या उत्क्रांतीमधला ९९% काळ हा सहकार्याच्या पायावर रचला गेला आहे. पृथ्वीवरील कोणतेच मानवी समूह सहकार्याशिवाय जगू शकत नाहीत. समूहात राहून वाटाघाटी करत सहकार्य करण्याची माणसाची प्रेरणा इतकी जैविक अशामुळे आहे, कारण त्याशिवाय माणूसच नव्हे, तर सर्व सस्तन प्राणी ज्यापासून बनले तो आदिप्राणीही अस्तित्वात आला नसता. इतकी जटिल आणि गुंतागुंतीची शारीरिक-सामाजिक रचना समूहात राहण्याच्या गुणांशिवाय उत्क्रांत होऊच शकली नसती. पण तरीही प्राणी आणि माणसं ज्या प्रकारे सहकार्य करतात, त्यात खूपच फरक आहे. प्राण्यांचं असं वागणं हे आपोआप/ अंगभूत *(visceral)* आहे. माणूस मात्र पर्यावरणातून शिकलेल्या वृत्तींनुसार अंगभूत गुणांना बाजूला सारण्याची क्षमता बाळगून आहे. त्यामुळे माणसांत अंगभूत गुण + पर्यावरणातून संस्कारित झालेल्या वृत्ती अशी मिसळण होऊन 'स्ट्रॅटेजी' ठरते.

अगदी नेहमीचे अनुभव पाहू. जवळच्या मित्र-मैत्रिणींबरोबर हॉटेल (रेस्तराँ!)मध्ये गेल्यावर सलग तीन-चार वेळा तुम्हीच बिल दिलं असेल आणि तो/ ती निवांत असेल तर 'हे वागणं बरं नव्हे!' असं मनात येतंच. असं बिल न देणाऱ्यांना आपण 'फुकटे' मानतोच. कल्पना करा की, तुम्ही ऑफिसमध्ये सात-आठ जण पार्टी करणार आहात आणि सर्वजण मिळून बिल देणार आहात. खूप महागडे पदार्थ न मागवता उधळपट्टी केली नाही तर सगळ्यांनाच फायदा होऊ शकतो. पण एक-दोघांनी जरी महागडे पदार्थ मागवायला सुरुवात केली तर इतर सर्व जण त्यात सामील होतात, आणि तुम्हीसुद्धा! अशा वेळी तुम्ही स्वस्त डिश मागवलीत तर तुम्हाला स्वतःवर अन्याय झाल्यासारखं वाटतं! (उगीच मनात खंतावू नका. बहुतांश माणसं अशीच वागतात.)

'ती हॉस्पिटलमध्ये होती तर मी एवढी पळापळ केली, आता मला गरज आहे तर ती फिरकलीही नाही', 'मागच्या वर्षी मी त्याला भुईमुगाचं बियाणं दिलं होतं, या वर्षी मी मागितलं तर देईल की तो!' अशा प्रकारचे आपल्या मनीचे गुज ऐकले तर आपणही 'जशास तसं' सहकार्य करतो हे लक्षात येईल. सहकार्याची कोणती स्ट्रॅटेजी माणूस वापरतो हे बऱ्याच अंशी आजूबाजूच्या पर्यावरणावर अवलंबून असतं. फसवणारे जास्त असतील तर सावधपणे 'ठगास ठग' हेच बरं. पण अशा फसवणाऱ्यांमध्ये थोडे 'जशास तसं'वाले जरी सहकार्यानं वागू लागले तर फसवणाऱ्यांपेक्षा खूपच यशस्वी ठरतात. एकमेकांवर विश्वास ठेवू शकणारे लोक असतील तर 'क्षमाशील + जशास तसं' एकदम जोरात चालतं.

मात्र माणसाची सहकार्याची वृत्ती इतर प्राण्यांच्या तुलनेत फारच प्रगत आहे. समूहनृत्य व कवायतींत आपण ज्या प्रकारे सिंक्रोनायझेशन करू शकतो, त्याच्या जवळपासही इतर प्राणी पोहोचू शकत नाहीत. अदृश्य अशा सिस्टिम्सचे कायदेकानू आपण पाळतो. ते न पाळणाऱ्यांना- म्हणजे फसवणाऱ्या लोकांना शिक्षा व्हावी यासाठी पोलीस, न्यायव्यवस्था यासाठी जादाचा खर्च करण्याची आपली तयारी असते. (पोलीस सामान्य माणसांसाठी काम करतात आणि न्यायव्यवस्थेत न्याय मिळतो, हे गृहीत धरून.)

एक महत्त्वाचा मुद्दा 'पण सर्व जीव स्पर्धा करताना दिसतात की!' असं 'स्पर्धा विरुद्ध सहकार्य' असं द्वंद्व उभं करायचा प्रयत्न अनेकदा होतो. स्वहित (स्वप्रजनन) साधण्यासाठी सजातीयांवर कुरघोडी करायची प्रेरणा जीवांमध्ये जरूर दिसून येते; जी जैविक (हार्ड-वायर्ड) आहे त्याला आपण स्पर्धावृत्ती म्हणू शकतो. स्पर्धेत एकाचा फायदा, तो दुसऱ्याचा तोटा असतो. जणू एकूण बाकी शून्यच! पण जीवांमध्ये सगळेच 'खेळ' स्पर्धेचे नसतात! स्पर्धा, प्रेरणा त्यांच्या सर्व जगण्याला व्यापून उतू जात नाही. समूहात अनेक 'खेळ' सहकार्याचे असतात. त्यामुळे समूहात एकंदर जीवांचा फायदाच होतो. 'हे स्पर्धेचं युग आहे!' या वाक्यातली स्पर्धेची वृत्ती आणि प्राण्यांमधली जोडीदार मिळवण्यासाठीची स्पर्धा यांत खूप फरक आहे. माणसात या वृत्तीचे अनेक पदर- चुरस, असूया, मत्सर अशा भावनांच्या रूपात दिसतात; ज्यामुळे मेंदूत ताणाची निर्मिती होते. म्हणून तर स्पर्धेला अवाजवी महत्त्व देणाऱ्या समूहांमध्ये मुलं/ माणसं नैराश्यग्रस्त असतात.

तुकारामाच्या गाथेपासून कबिराच्या दोह्यांपर्यंत, राज्यघटनेसारख्या जम्बो नियमावलीपासून ते गाणी, नाटकं, सिनेमांपर्यंत, कॉर्पोरेटमधल्या 'टीम स्पिरिट'पासून ईसापच्या गोष्टींपर्यंत सर्वत्र समूहात राहताना वाटाघाटीनं सहकार्य कसं करावं- ज्याला आपण 'जगरहाटी' म्हणू- ते शिकवण्याचे प्रयत्न होताना दिसतात.

सहकार्य करणं म्हणजे 'दूरदृष्टी'नं पाहिलं तर स्वहितासाठीची ती गुंतवणूकच आहे. माणसाच्या 'जाणिवे'त स्वहिताची व्याख्या प्रजननापुरती मर्यादित नाही. त्याला जगणं सुंदर करायला आवडतं. समूहात सहकार्य करताना उत्क्रांत झालेल्या प्रेम, कृतज्ञता, क्षमाशीलता या भावनांचे सूक्ष्म पदर अनुभवायला त्याला आवडतात. त्यामुळे सहकार्याच्या अंगभूत प्रेरणेला विस्तारण्यासाठी माणूस विश्वासाचा पाया रुंद करण्याचा प्रयत्न 'जाणीवपूर्वक' करतो आहे.

◆ *anjalichip@gmail.com*

पृथ्वीचा योग आणि भोग

(पान १ वरून) मृतांचं सामूहिक दफन करावं लागत आहे. अनेकदा कित्येक शव रस्त्यामध्ये पडून असतात. या 'सुसंधी'चा फायदा घेत अनेक उद्योग जंगलात घुसून सुरक्षित ठेवलेल्या जागा बळकावत आहेत. २०१९ मध्ये सत्ताग्रहण केल्यापासून ॲमेझॉनच्या जंगलात सर्व उद्योगांना मोकाट रान देणारे ब्राझीलचे अध्यक्ष जैर बोल्सॅनेरो या आपत्तीमध्ये मृतांची कुचेष्टा व टवाळी करत आहेत. ते करोना- बळींविषयी विचारणा झाल्यास 'एवढं काय त्यात?' असा उन्मत्त सवाल करू शकतात. मूळ विषय दुसरीकडेच नेताना 'ब्राझीलला परकीयांची वसाहत करण्याचा डाव हाणून पाडू,' अशी गर्जना ते करतात. या पार्श्वभूमीवर सारानं हे नाटक ॲमेझॉनच्या अरण्यात सादर करण्याची पूर्ण तयारी केली होती. परंतु करोनामुळे ते शक्य झालं नाही. २०२० च्या ऑक्टोबरमधील साराच्या व्याख्यानात असे अनेक संदर्भ दडले आहेत.

अमेरिकेतील किरकोळ विक्री करणाऱ्या 'वॉलमार्ट', 'कॉस्टको' व 'क्रोगर' या बलदंड साखळी कंपन्यांची एकत्रित विक्री ५०,००० कोटी डॉलर्स एवढी आहे. या कंपन्या सातत्यानं ब्राझीलमधून प्रचंड मांस आयात करतात. ब्राझीलचे उद्योगपती जोसले बॅटिस्टा सोब्रिन्हो यांची 'जे. बी. एस.' ही सर्व प्रकारच्या मांसाचं उत्पादन करणारी जगातील अजस्र कंपनी आहे. त्यांची जगात १५० ठिकाणी उत्पादन केंद्रं आहेत. 'जे. बी. एस.' कंपनीला कोंबड्या, वराह व इतर मांसनिर्मितीसाठी दरवर्षी ३०० चौ. कि. मी.वरील अरण्य साफ करावं लागतं. ते ॲमेझॉनमध्ये सहज उपलब्ध असतं.

कोंबड्या व वराह यांचे प्रमुख खाद्य प्रथिनयुक्त सोयाबीन असल्यामुळे ब्राझील, अर्जेंटिना व अमेरिकेत त्याची मागणी वाढतेच आहे. २००६ मध्ये अमेरिकेतील 'कारगिल', 'बुंगे' व 'कॉफ्को' या धान्यविक्रीतील मक्तेदारी असणाऱ्या कंपन्यांनी ॲमेझॉनचं जंगल वाचविण्यासाठी 'बेकायदेशीररीत्या जंगलतोड करून लागवड केलेल्या सोयाबीनची खरेदी करायची नाही' असा 'सोयाबीन अधिस्थगन करार' केला होता. या कराराचं तंतोतंत पालन करताना या तीन कंपन्या 'फिआग्रिल' या चिनी कंपनीकडून सोयाबीन खरेदी करतात. आणि त्या चिनी कंपनीला ब्राझीलमधून सोयाबीन पुरवठा होतो. सर्व प्रकारचे मतभेद बाजूला सारून व्यापारास लाभणारं हे असं 'बहुराष्ट्रीय' सहकार्य वाखाणण्याजोगं व थक्क करणारं असतं!

२०१३ ते २०१९ या सहा वर्षांत लॅटिन अमेरिका, दक्षिण-पूर्व आशिया व आफ्रिकेत दरवर्षी ४५ लाख हेक्टर अरण्याचा विनाश झाला. २०१९-२० साली ऑस्ट्रेलियातील एक कोटी हेक्टर, ॲमेझॉनमधील नऊ लाख हेक्टर, तर इंडोनेशिया, सायबेरिया व कॅलिफोर्नियामधील दोन लाख हेक्टरवरील जंगल जळून खाक झालं होतं. कुठे लागलेली आग ही नैसर्गिक होती. मात्र, अनेक ठिकाणी जागा रिकामी करण्यासाठीच आगी लावल्या होत्या. थोडक्यात, मागील दहा वर्षांत जगभरातील ग्राहकांच्या मांस, सोयाबीन, पाम तेल व कोको यावरील उड्या वाढत गेल्या, त्या प्रमाणात जगातील जंगल नष्ट होत गेलं. 'तुमच्या ताटात मिष्टान्न पोहोचवण्यासाठी आमचा भूभाग व आमचं जीवन उद्ध्वस्त केलं जात आहे...' हा साराच्या कहाणीचा मथितार्थ आहे. म्हणून सारा हा जगातील मूक आदिवासींचा खणखणीत हाकारा ठरत आहे. (पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी केव्हाच सांगून ठेवलं आहे की, 'सर्वभक्षक ही एक निरंकुश आघाडी आहे. निसर्ग लुटणाऱ्या उद्योगांना बेसुमार लाभ देण्यासाठी राज्यकर्ते तत्पर असतात आणि हे लाभ पोहोचवण्यासाठी नोकरशाही सज्ज असते. साधनसंपदा गेल्यामुळे भूमिहीन, अल्पभूधारक, ग्रामीण कारागीर, पशुपालक, छोटे कोळी, भटके व आदिवासी यांचं जीवन उद्ध्वस्त झालं आहे. सध्या भारतातील ५/६ जनता ही दारिद्र्याच्या महासागरात असून, त्यात १/६ सर्वभक्षकांची ऐश्वर्याची बेटे आनंदाच्या तरंगात आहेत.')

२०१३ साली एका वैज्ञानिक परिषदेत वाढतं कर्बउत्सर्जन व हवामानबदलाचे परिणाम अभ्यासणारे हिमनदी तज्ज्ञ जेसॉन बॉक्स यांच्या शोधनिबंधाचं शीर्षक होतं- 'पृथ्वीवर बलात्कार होत आहे'! असभ्य वाटणाऱ्या या वास्तवदर्शी प्रतिपादनाशी अनेक वैज्ञानिक आता सहमत होत आहेत. 'जीवसृष्टीतील दहा लाख प्रजाती लुप्त होण्याच्या बेतात आहेत. मानवजातीला याचे महाभयंकर परिणाम भोगावे लागतील...' असं २०१९ च्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या जीवविविधता अहवालात म्हटलं होतं. 'जगाची उलथापालथ करणारा करोना ही निसर्गविनाशामुळेच ओढवून घेतलेली आपत्ती आहे. सध्याची मानवी वाटचाल निसर्गाच्या अंताकडे आहे...' असं आता अनेक वैज्ञानिक वारंवार बजावताहेत. या पार्श्वभूमीवर 'संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण प्रकल्पा'ने यंदाच्या पर्यावरणदिनी 'पर्यावरण यंत्रणा संवर्धन दशका'चा आरंभ करण्याचं ठरवलं आहे. चालू दशकात या संकल्पनेला किती प्रमाणात वास्तवात आणता येतं यावर या शतकाचं आणि पृथ्वीचं भवितव्य अवलंबून आहे.

अशा विनाशपर्वात निसर्गातील अनेक रहस्यांचा शोध घेण्यासाठी कित्येक शास्त्रज्ञ आयुष्यभर आटापिटा करत आहेत. अरण्य पर्यावरणशास्त्रज्ञ प्रो. डॉ. सुझान सिमर्ड या ४० वर्षांपासून वृक्षांच्या सहजीवनाचा अभ्यास करत आहेत. पीटर वोल्हेबेन यांची 'द हिडन लाइफ ऑफ ट्रीज' व रिचर्ड पॉवर्स यांची कादंबरी 'द ओव्हरस्टोरी' (पुलित्झर पुरस्कारविजेती) यातील मध्यवर्ती कल्पना सिमर्ड यांच्या संशोधनातूनच साकारली आहे. या मांडणीतूनच जेम्स कॅमेरॉन यांना 'अवतार' चित्रपटाची प्रेरणा मिळाली होती.

प्रो. सिमर्ड यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'फाइंडिंग द मदर ट्री : डिस्कव्हरिंग द विस्डम ऑफ द फॉरेस्ट' या पुस्तकात त्या म्हणतात, ''अरण्य म्हणजे एकलकोंड्या, एकेकट्या वृक्षांचा समूह नसून ते असंख्य प्रकारच्या जिवांचं जाळं आहे. ती आंतरसंबंध उत्क्रांत होत जाणारी जीवसंपदा आहे. अरण्यातील वृक्ष व वनसंपदा यांच्यामध्ये स्पर्धा वा चढाओढ नसून त्यांच्यात कमालीचं सहकार्य असतं. वृक्षांकडे मेंदू नसतो, परंतु मातीत पसरलेली रसायनं हेच त्यांच्यासाठी मज्जातंतूंचं जाळं (नेटवर्क) असतं. तर वृक्षांच्या मुळांवर कवकांचं जे जाळं असतं, त्यातून माहितीची देवाणघेवाण होत असते. या काष्ठजालाच्या साहाय्याने (वुड वाइड वेब) वृक्ष एकमेकांशी संपर्क साधून वसाहतीने नांदत असतात. वृक्षांना आपल्या पिलांच्या अवस्थेची जाणीव असल्यामुळे बाल्यावस्थेत अन्नपुरवठा करून ते त्यांना जपत असतात. वृक्ष एकमेकांना जीवनसत्त्व पुरवतात. कीड वा पर्यावरणीय संकटाची जाणीव करून देतात. परस्परावलंबन, साहचर्य व सहजीवन हे अरण्यांचं असामान्य वैशिष्ट्य आहे.''

(निसर्गावर निस्सीम प्रेम करणाऱ्या पं. कुमार गंधर्व यांनी निसर्गावर अनेक बंदिशी रचल्या. चैत्रातील कडुनिंबाचा बहर व घमघमाट पाहून त्यांनी *'निमोरी का मौरा है रे'* असं सुंदर वर्णन केलं होतं. ते म्हणत, ''झाडांना पाहावं ते एकत्रच! वनराई, आमराईतील झाडं समूहात असल्यामुळे मजेत असतात. त्यामुळे ते मस्त बहरतात. एकटे असले की ते केविलवाणे वाटतात.'' सूक्ष्म निरीक्षण असणाऱ्या कवी व तत्त्वज्ञांचं संपूर्ण निसर्गावर प्रेम होतं. त्यांना निसर्गात परस्परसंवाद असल्याची जाणीव होती. आता विज्ञान त्याचे पुरावे देत आहे.)

संपन्न जीवविविधता ही अरण्यांची शक्ती असून, त्यामुळे अरण्यांना स्थैर्य येते आणि संकटांचा सामना करून पूर्वपदावर येण्याची त्यांची क्षमता वाढते. अरण्यात विविध प्रजाती कमालीच्या समन्वयाने राहत असतात. त्यातून त्यांची सामूहिक शक्ती (सिनर्जी) देणारी यंत्रणा निर्माण होते. नत्र स्थिर करून इतरांना अन्न देणाऱ्या वनस्पतीला पाण्याची निकड असते. खोलवर मुळे गेलेले वृक्ष त्यांना पाणी उपलब्ध करून देतात. अशा परस्परावलंबनातून पर्यावरणीय यंत्रणा उन्नत होत जाते.

सर जगदीशचंद्र बसू यांचा वारसा पुढे नेणाऱ्या सिमर्ड यांनी कार्बनच्या किरणोत्सारी समस्थानिकांचा वापर करून मातीमधील माहिती व संपर्कांचा अभ्यास केला. त्यांच्या सत्यशोधन यात्रेतून आपल्या आकलनशक्तीपलीकडील अनेक वृक्षरहस्ये उलगडली जात आहेत. अरण्यामधील वयोवृद्ध व विशाल वृक्षास सिमर्ड यांनी 'मातृवृक्ष' अशी संज्ञा दिली आहे. ''मातृवृक्ष हे अरण्यातील साहचर्य जपण्यात मुख्य भूमिका पार पाडत असतात. प्रकाश संश्लेषणाची प्रचंड क्षमता असलेले मातृवृक्ष मातीमधील कर्ब धरून ठेवणे, नत्रपुरवठा करणे, पाण्यास प्रवाही ठेवणे अशी महत्त्वपूर्ण कार्ये करत असतात. अरण्यांना अनेक कठीण प्रसंगांतून सावरण्याची भूमिका पार पाडणाऱ्या मातृवृक्षांना जिवापाड जपणं, हे मानवजातीचं आद्य कर्तव्य आहे. मातृवृक्षांची अरण्यामधील कार्यप्रणाली समजून घेण्यासाठी सिमर्ड यांनी अमेरिका-कॅनडातील ९०० कि. मी. परिसरावर असलेल्या अरण्यांतून 'मातृवृक्षांची शोध मोहीम' हा प्रकल्प सुरू केला आहे.

याच काळात शतकानुशतकांपासून चालत आलेल्या अरण्यांतील जैविक जाळ्यांना संपवून टाकण्याच्या उद्योगांचा वेगही वाढतच चालला आहे. हवामानबदल व जंगलविनाशाच्या धोक्यांपासून स्वतःचा बचाव करणं वृक्षांना अशक्य होत आहे. जंगलांमधील भुंग्यांसारख्या कीटकांच्या अनेक प्रजाती नामशेष होत असल्यामुळे जंगलातील कीड वाढून वृक्ष दगावत आहेत. जंगल हे बाष्पोत्सर्जन करून पावसाला हातभार लावतं. तसंच ते कार्बन वायू शोषून आपत्तीरोधक संरक्षक कवचसुद्धा होत असतं. मानवजातीला अनेक आपत्तींपासून वाचवणाऱ्या अरण्यांना वाचवण्यासाठी आता जनतेनंच सरसावणं आवश्यक आहे.

'निसर्गाचं अदृश्य अर्थशास्त्र' समजावून सांगणारे डॉ. पवन सुखदेव म्हणतात, ''जगातील १२० कोटी लोकांचं अन्न, औषध, जळण व रोजगार- म्हणजेच संपूर्ण जीवन पर्यावरणीय व्यवस्थेवर अवलंबून आहे. समाज व निसर्ग यांचं आदिकालापासून घट्ट व जिवाभावाचं (सेंद्रिय) नातं आहे. देवराईला स्पर्शसुद्धा न करण्याचं शहाणपण हे त्यातूनच आलेलं आहे. लाभ-हानी, आनंद-दुःख यांच्या बाजारपेठेतील अत्यंत चुकीच्या संकल्पनांचा प्रसार करणारं शिक्षण हा निसर्गाचे मोल समजून घेण्यातील मोठा अडथळा आहे. बेजबाबदार दूरचित्रवाणी वाहिन्या व उथळ सामाजिक माध्यमवीर यांमुळे नको त्या शिक्षणाचाच प्रसार होत आहे.'' शाश्वत विकासाचे भाष्यकार प्रो. सर पार्थसारथी दासगुप्ता यांनी, ''सदाहरित अरण्ये व महासागरांसारख्या जागतिक संपदांचं नियमन आंतरराष्ट्रीय पातळीवर व्हावं. पर्यावरण यंत्रणांचं संरक्षण करण्यासाठी गरीब देशांना निधी दिला पाहिजे,'' असं सांगितलं आहे. शाश्वततेचे तत्त्वज्ञ प्रो. ग्लेन अलब्रेख्त यांना जगाच्या नवीन रचनेसाठी नवी दृष्टी देणारी 'सहजीवनशास्त्र (सिम्बायॉलॉजी)' ही ज्ञानशाखा विकसित करण्याची निकड वाटते. ''स्थानिक ते जागतिक पातळीवरील मनुष्य व पर्यावरणीय यंत्रणा यांमधील खोलवर परस्परसंबंध समजून घ्यावेत, निसर्गाला हानी पोहोचविणाऱ्या सर्व प्रदूषक घटकांचा अंत घडवावा आणि विश्वनाश रोखण्यासाठी जागतिक यंत्रणा व प्रशासन आणावं,'' असं ते सुचवतात.

मनुष्यप्राणी हा निसर्गातील एक चिमुकला घटक आहे. माती व जीवसंपदा यांच्या कित्येक गूढांचं आकलन आपल्याला अजूनही झालेलं नाही. हे समजून न घेता चालवलेला निसर्गाचा विध्वंस मानवजातीच्या मुळावर उठत आहे. आपण प्रत्येक गोष्टीचं वस्तुकरण करत सुटलो आहोत. मानवी नातं, भाषा, कला या सर्वांकडे पाहताना सर्वत्र उपयोगिता हा एकमेव निकष झाला आहे. या विखंडित वृत्तीतून हे ऱ्हासपर्व आलेलं आहे. कलावंत, तत्त्वज्ञ व विविध ज्ञानशाखांमधील वैज्ञानिक सर्जन पावत जाणाऱ्या निसर्गास उमजून घेण्यासाठी माणूस आणि निसर्ग यांच्यात झालेली फारकत नाहीशी करणं अनिवार्य आहे याचं भान वारंवार आणून देत आहेत. हा समग्र विचार पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी तशा प्रकारचं बालशिक्षण आवश्यक आहे. या दिशेने स्वीडन, फिनलंड, नॉर्वे, जर्मनी, ऑस्ट्रिया, इतर युरोपीय देश, सिंगापूर, जपान अशा अनेक देशांत बालशिक्षणाला अतिशय प्राधान्य दिलं जात आहे. २००६ साली स्वीडनने बालकांच्या हक्कांना विशेष मान्यता देऊन त्याची अंमलबजावणी सुरू केली. 'स्वीडिश समाजाचा पाया असलेल्या मानवी हक्क आणि लोकशाहीच्या मूल्यांविषयी आदर निर्माण व्हावा, प्रत्येक व्यक्तीमधील गुणांविषयी आणि आपणा सर्वांना सामावून घेणाऱ्या पर्यावरणाविषयी आदरभाव निर्माण व्हावा, मानवी आयुष्य हे अमूल्य आहे, प्रत्येकाचे वैयक्तिक स्वातंत्र्य व प्रतिष्ठा यांची जपणूक व्हावी, सर्व व्यक्तींना समान वागणूक मिळावी, लिंगभेद न मानता समानता आणि दुबळ्या व अक्षम व्यक्तींविषयी समभाव ही मूल्यं बालवाडीतच रुजावीत...'' हा स्वीडिश शिक्षणाचा उद्देश आहे. तिथं प्रत्येक मूल महत्त्वाचं आहे हे सातत्याने कृतीतून दाखवलं जातं. त्यामुळे मुलं चांगलं-वाईट, योग्य-अयोग्य यांतील फरक व प्रत्येक गोष्टीमागील कारणांचा विचार करतात. मुलं स्वतःहून चांगल्या सवयींचा स्वीकार करतात. चॉकलेट, फास्ट फूड, शीतपेयं हे सारं आरोग्यास कसं घातक आहे, रस्त्यावरचा सिग्नल तोडणं कसं घातक आहे, कचरा फेकणं, पाणी व अन्नाची नासाडी करणं यामुळे किती प्रकारचे त्रास होतात याची जाणीव मुलांना शिक्षणातून होते. सभ्यता व असभ्यपणा कशात आहे? विवेकी विचार कसा असतो? मतभेद व नाराजी कशी व्यक्त करावी, यामागील तारतम्य त्यांच्या लक्षात येतं. स्वीडनमध्ये माणूस व निसर्ग या दोघांनाही महत्त्व आहे. निसर्ग आपल्याला काय देतो? तो का जपला पाहिजे? निसर्गाच्या विनाशामुळे आपत्ती कशा येत आहेत? कर्ब उत्सर्जनामुळे जगाच्या उष्णतेमध्ये कशी वाढ होत आहे? प्रत्येक कृतीमधून कार्बनची पदचिन्हे मोजता येतात... या बाबी त्यांना लहान वयातच समजतात. कमीत कमी कर्ब उत्सर्जन व्हावं अशी कृती आवश्यक आहे, हे मुलांच्या मनावर आपसूक बिंबवलं जातं, आणि ते स्वतःहून आवड-निवड ठरवू लागतात.

जीवसृष्टीशी थेट नातं असल्यामुळे ही मुलं अरण्याच्या होळीत जळणारी झाडं व प्राणी-पक्षी पाहून कासावीस होतात. ते निसर्ग वाचवण्यासाठी पराकाष्ठा करण्याचा निर्धार करतात. स्वतःच्या देशाला जाब विचारत न्यायालयाकडे धाव घेतात. अशी शिकवण असलेली पिढी साराचा उद्वेग समजून घेऊ शकेल. झाडांना मिठी मारावीशी वाटणं ही आतून आलेली भावना आहे. तसं नातं असेल तरच तशी कृती होऊ शकते आणि इतिहास घडतो, याची जाण या पिढीला येईल. यंदाचा पर्यावरण दिनाचा संकल्प या पिढीसाठी महत्त्वाचा आहे.

विनोबांनी पृथ्वीचा महिमा संस्कृत भाषेतून समर्थपणे व्यक्त कसा होतो, हे समजावून सांगितलं आहे. ते म्हणतात, '' गुणसंपन्न पृथ्वीच्या एकेका गुणांसाठी एकेक शब्दयोजना आहे. पृथ्वी म्हणजे पसरलेली, धरा म्हणजे धारण करणारी, ऊर्वी म्हणजे विशाल, गुर्वी- वजनदार, क्षमा- सहन करणारी!'' कोणे एकेकाळी अशी शब्दरचना करणारं मन, तसं नातं व तशी संस्कृती आपल्याकडे होती. पृथ्वीचा योग हा दुर्मीळ हे समजून तसं वर्तन होतं. 'पृथ्वी = भोगवस्तू' हे समीकरण खोडून पुन्हा सुसंस्कृत व्हायचं असेल तर शिक्षणाचा उद्देश तसा असावा लागेल. परंतु 'निसर्गास कःपदार्थ लेखत लाखो कोटींची अर्थव्यवस्था करणं' हाच मुळात शिक्षणाचा हेतू असेल तर...?

◆ *atul.deulgaonkar@gmail.com*

भुकाळी, फॅंड्री, पंदी, पोर्क...

भूषण कोरगांवकर

चवीचवीने...

डोंबाऱ्यांची भुकाळी : माही पौर्णिमेला डोंबारी समाजाच्या सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला, पण त्यात भुकाळी नव्हती. भुकाळी म्हणजे डुकरं. हा शब्द डोंबारी समाजाच्या पारुशी भाषेतला आहे. प्रत्येक भटक्या समाजाची स्वतंत्र पारुशी किंवा सांकेतिक भाषा असते. डुक्करपालनाचा व्यवसायही ते करतात. 'त्याची चरबी म्हणजे बर्फी असती, बर्फी! याच्या मांसाला आणि चरबीला इतकी चव असती की जास्तीचा मसालाबी टाकावा लागत नाही...' दशरथ लाखे माहिती देतात : 'लग्न, दसरा अशा खास प्रसंगी भुकाळीच्या बिर्यानीचा जंगी बेत असतो. चरबी, मांस, मसाले, साधे तांदूळ एकमेकात मिसळून असली भारी टेष्ट येते की ज्याचं नाव ते!'

भुकाळीचा वास घेतलेले इतर समाजाचे लोक चोरून, तोंड लपवून त्यांच्याकडे खायला येतात, इतकी त्याची गोडी असते. परंतु आजकाल डोंबारी समाजातली बरीच मंडळी माळकरी बनून शाकाहारी झाली आहेत. शिवाय मांसाहार करणाऱ्या त्यांच्यातल्या तरुण पिढीने भुकाळी खाणं सोडून दिलंय. इतकंच कशाला, त्या शब्दाचा उच्चार करणंही ते टाळतात. समाजातील प्रतिष्ठित वर्ग ज्या गोष्टीला तुच्छ लेखतो, त्याकडे पाहायची बहुसंख्यांची दृष्टीही कशी गढूळ बनते याचं हे उत्तम उदाहरण. मी स्वतःसुद्धा याच मनोवृत्तीचा भाग होतो.

रानडुक्कर आणि डुक्कर : लहानपणापासून लोकांचं ऐकून 'डुकरं घाणीत लोळतात, घाणच खातात, त्यामुळे त्यांचं मांस बाधतं...' हे मनावर ठसलेलं होतं. सुट्यांमध्ये कोकणात भाईमामा शिकार करून रानडुक्कर आणायचे. त्याची सागुती नेहमीच्या चिकन-मटणापेक्षा वेगळी, तरीही छान लागायची, एवढंच आता लक्षात आहे. नेमकी चव विसरायला झालीय. पण 'रानडुक्कर वेगळा. तो जंगलात राहतो, स्वच्छ असतो म्हणून आपण खाऊ शकतो...' अशी स्पष्टीकरणं तयार असायची. त्यामुळेच वीणा पिंटो, जनु (जेनिफर), सिंथिया असे 'ते' खाणारे शेजारी आणि पुढे रोजच्या संपर्कात असणारे झिलिया कॉड्रस, ॲलन फर्नांडिस, कॅरल डिसूझा, मेलरॉय डिसूझा असे इष्टमित्र लाभूनही पोर्क खायला मन धजावत नव्हतं.

परदेशी चव : पुढे २००५ साली पहिली युरोपवारी झाली. ज्या ठिकाणी जायचं, तिथलं लोकल अन्नच खायचं आणि शक्य होईल ते सगळं खाऊन पाहायचं, हा माझा पूर्वीपासूनचा खाक्या. त्या नियमाने तिथलं बेकन, हॅम, सलामी, सॉसेजेस हे डुकराच्या साठवलेल्या मांसाचे विविध प्रकार खाल्ले आणि त्या चवीने मी वेडा झालो. हे मांस विशिष्ट प्रकारे कापून, धूर देऊन (किंवा नुसतंच) क्युअर करून घेतलं की त्यातलं पाणी आटून ते बरेच दिवस टिकतं. मांसाचा कुठला भाग, कशा प्रकारे कापलाय आणि त्यावर कुठली प्रक्रिया केलीय यावर त्याचं नाव, चव आणि पुढच्या रेसिपीज् अवलंबून असतात. मला यातलं सगळ्यात जास्त आवडतं ते बेकन. हे पातळ तुकडे नुसते तळून इतके सुंदर लागतात, की त्यात कुठलाच मसाला वगैरे घालायची गरज भासत नाही. भारतातसुद्धा पंचतारांकित हॉटेलांमधलं जेवण मला पसंत नसलं तरी तिथला ब्रेकफास्ट खूप प्रिय आहे. आणि त्यामागचं मोठं कारण म्हणजे बेकन. (डोंबारी आणि इतर अनेक समाजांतही मांस असं वाळवून साठवण्याची परंपरा आहे. त्याला 'चान्या', 'बोटकं' अशी नावं असतात. आणि ती फारच रुचकर लागतात असं ऐकून आहे.)

कॅथलिक घरांमधलं पोर्क : भारतात परतल्यावर हे नव्याने ओळख झालेलं चविष्ट मांस खायचे वेध लागले. खिलवणारे तयार होतेच. झिलियाची सासू, ॲलनची आई या पट्टीच्या सुगरणी. त्यांनी बनवलेले सॉर्पोतेल, विंदालु हे पोर्कचे प्रकार खाल्ले. पुढे बाहेर हॉटेलमध्येही खाऊन पाहिलं. पण 'काहीतरी एक वेगळीच चव लागतेय,' 'कदाचित भारतीय पोर्क अशा चवीचं असेल' असे स्वतःशीच आडाखे बांधत राहिलो. वास्तविक पश्चिम किनारपट्टीवरचा कॅथलिक समाज आणि त्यांची खाद्यसंस्कृती यावर एक स्वतंत्र लेख होईल इतकं सुंदर आणि काही काही बाबतीत हिंदूंपेक्षा बरंच वेगळं असं त्यांचं जेवण असतं. वेगवेगळे केक्स आणि गोडधोड, भाज्या, चटण्या, डोसे, इडल्या, नॉन-व्हेजचे असंख्य प्रकार हे सगळं चविष्ट बनवणाऱ्या मेरी आंटी, मम्मी, कॅरल यांच्या हातचं पोर्क मात्र माझ्या पचनी पडत नव्हतं. 'आपल्याला डुकराचं साठवलेलं मांसच आवडत असेल, ताजं मांस काही झेपणारं नाही' असा मी स्वतःचा समज करून घेतला आणि भारतीय पोर्कला रामराम ठोकला.

कूर्गची वारी : पुढे २०१७ साली कूर्गला फिरायला गेलो असताना ज्या होम-स्टेमध्ये राहिलो तिथल्या मालकिणी टायनी आंटी (भागीरथी अय्यप्पा) आणि नमिता सुमंत यांच्याशी मैत्री झाली. दोघी कूर्गी म्हणजे कोडावा या सधन, जमीनदार समाजाच्या. हा समाज कर्नाटकाचा भाग असला तरी स्वतःची वेगळी, ठळक ओळख राखून आहे. त्यांचा वेश, भाषा, खाणं, रूढी-सगळंच वेगळं. रायफल, बंदुका आदी शस्त्रं 'विना-परवाना' बाळगायला सरकारची कायदेशीर मान्यता असलेला हा समाज. डोंगराळ भागात भरपूर जमीन असल्यामुळे आणि त्यांच्या सधन, सबळ इतिहासामुळे कदाचित ब्रिटिशांनी त्यांना ही परवानगी दिली, जी आजपर्यंत कायम आहे. अजून एका बाबतीत यांचं वेगळेपण दिसून येतं, ते म्हणजे त्यांची पोर्कची आवड. हिंदू धर्मात वरच्या मानल्या जाणाऱ्या जाती-वर्गात डुक्कर (रानडुक्कर नव्हे!) आवडीने आणि अभिमानाने खाणारा माझ्या माहितीत अजून दुसरा कुठला समाज नाही. ईशान्येकडेही ते खाल्लं जातं; परंतु त्याबद्दल पुन्हा कधीतरी.

तर पोचल्याच्या पहिल्याच दिवशी जेवणात कडंबुट (उकड्या भाताचे वाफवलेले गोळे), नाचणीच्या शेवया, हळसांड्याची आमटी (त्यांच्या भाषेत 'सलसांडे'), चिकन फ्राय, चटण्या, कोशिंबिरी, पापड असा भरगच्च मेन्यू होता. पण नजर जात होती ती तेलाच्या तवंगात तरंगणाऱ्या काळसर मांसाहारी करीकडे.

'ते पोर्क आहे, खाणार तुम्ही?'

मी पोर्क खायला तयार झालोय याचं त्यांना कौतुक वाटलं. ताज्या पोर्कची करी खायचं मला खरं तर टेन्शन आलं होतं. पण तिच्या रूपाने आणि गंधाने मोह होत होता. पहिला घास तोंडात टाकला आणि त्या अलवार चवीने मन एकदम वेडंपिसं झालं. कितीही चाटूनपुसून खाल्ली तरी समाधान होत नव्हतं. मला चिकनपेक्षा मटण आवडतं, आणि मटणापेक्षा मासे. पण हे मांस इतकं सुंदर लागत होतं की, ते माशांवर मात करणार की काय अशी मला भीती वाटायला लागली.

'पोर्क करीमधले 'मॅजिक इनग्रेडियंट' आहेत आमचा झटपट काळा मसाला आणि काळं विनेगार.' नमिता म्हणाली.

'काळं विनेगार?' हे मी प्रथमच ऐकत होतो.

'हो. मंगलोरी लोकं सफेद विनेगार वापरतात. ते खूपच आंबट आणि काहीसं कृत्रिम चवीचं असतं. आमचं काचमपुळी विनेगार इथल्या एका फळापासून बनतं. रंग आणि स्वादासाठी ते एक-दोन चमचे पुरतं. पोर्कसाठी जास्त मसाले, तेल, आंबट वापरायचंच नसतं. पण हे आमच्यासारख्या पिढ्यान् पिढ्या खात आलेल्यांनाच समजणार ना? यांची संस्कृती तर पोर्तुगीज आल्यानंतरची...' नमिता बोलत होती आणि मला पोर्कची सॉर्पोतेल, विंदालु न आवडण्यामागची कारणं लक्षात येत होती. हा मूळ दोष मांसाचा नसून, मसाल्याच्या कॉम्बिनेशनचा होता तर!

कूर्गी पंदी करी

एक किलो पोर्कच्या तुकड्यांना एक चमचा हळद आणि चवीनुसार खडे मीठ व लाल तिखट चोळून अर्धा तास मुरवत ठेवायचं. दोन मोठे कांदे, एक लसणीची गड्डी, तेवढंच आलं, दीड चमचा जिरं, हिरव्या मिरच्या, थोडीशी कोथिंबीर, एक तमालपत्र यांचं अगदी मोठमोठे तुकडे दिसतील इतपत जाडंभरडं वाटण करून घ्यायचं.

प्रेशर पॅनमध्ये मुरलेलं मांस टाकून पाच मिनिटं परतायचं. चरबीचं तेल सुटतं, त्यामुळे वेगळं तेल घालायचं नाही. वाटण टाकून परत दहा मिनिटं परतायचं. मग थोडंसं पाणी टाकून एक-दोन शिट्ट्या काढायच्या. (पोर्क लवकर शिजतं.) थंड झाल्यावर त्यात दोन मोठे चमचे काळा मसाला, एक चमचा मिरपूड, पाव चमचा गरम मसाला आणि एक मोठा चमचा काळं विनेगार (किंवा चिंचेचा कोळ किंवा कोकम आगळ) घालून एक दणदणीत वाफ काढायची.

कूर्गी काळा मसाला एकदम सोपा. दोन चमचे धणे पावडर काळसर होईपर्यंत कोरडी भाजून घ्यायची. यातच ते अगदी थोडा गरम मसाला मिसळून साठवून ठेवतात.

कूर्गवरून परत आल्यावर भारतीय पोर्कही तितकंच रुचकर असतं हे समजलं. आता डोंबारी पद्धतीचं पोर्क खायला जेजुरी आणि वाईला जायचंय. का कुणास ठाऊक, ते चवीला या कुर्गी पोर्कसारखंच भारी लागणार असं वाटत होतं. आणि काय आश्चर्य! चंद्रकांत लाखेंना त्याची रेसिपी विचारली, ती अगदी थेट कूर्गी पद्धतीसारखीच आहे. फक्त ते धणे पावडर न करपवता घरचा काळा मसाला वापरतात आणि आंबट काहीच घालत नाहीत, एवढे दोनच फरक.

'थोडा गूळ टाकायचा आणि थोडं रक्तबी फ्राय करून, कुस्करून टाकायचं. त्यानं चवबी वाढती आनि पचायलाबी ते हलकं होतं.' मास्तरांनी आणखी एक टीप दिली. आता मी कोविड कधी संपतोय आणि कधी एकदा त्यांच्यातल्या लग्नाचं आमंत्रण येतंय याची वाट पाहतोय.

(छायाचित्रे : डॉ. अजय नायक)

◆ *bhushank23@gmail.com*

डाऊनलोड करा स्टोरीटेल!
निवडा सिलेक्ट!
ऐका मराठी!
दररोज ऑडिओबुक्स ऐकण्याची कारणे...
1 ऐकताना अन्य कामेही करता येतात...
2 नेहमीचे पुस्तक वाचायला अवघड जात असेल तर ऑडिओबुक मदत करते...
3 ऑडिओबुक्स पुस्तकांचा अनुभव द्विगुणित करतात...
4 ऑडिओबुक्स सहजपणे बाळगता येतात...
5 ऑडिओबुक्स डोळे मिटूनही ऐकता येतात...
storytel
www.storytel.com या वेबसाईटला भेट द्या.
App Store Google Play

Homoeo Laboratories
Homoeopathy....The holistic healing.
दातांचे संरक्षण
कुटुंबातील बालकांपासून मोठ्यांपर्यंत

हर्बल टुथपेस्ट
मुलांचे दात सुलभतेने येण्यासाठी
किड्स टुथपेस्ट
डेन - टॉनिक®
Mfg.:Homoeo Laboratories, Pune. Email : homoeolab@gmail.com
SS:B.R.Ent, Mumbai. Mobile 7219731618 / 8652756688

जपू या निसर्गाचा आनंदकंद!

(पान १ वरून) असलेल्या डोंगरउतारांवर स्थानिक शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनी होत्या. नदीच्या चिंचोळ्या खोऱ्यात ते भातशेती करायचे आणि डोंगरउतारावर फिरती शेती. दोन-तीन वर्षे नाचणी, सावा, तीळ पिकवून मग दहा-पंधरा वर्षे ती जमीन पडीत टाकायची अशी पद्धत होती. पण शेती करताना ते आंबा, हिरडा सांभाळून ठेवायचे. डोंगराच्या अगदी वरच्या चढांवर सरकारी राखीव जंगल होते. ज्यांची जमीन धरणाखाली बुडली, त्यांचे पुनर्वसन पूर्वेच्या पर्जन्यछायेच्या प्रदेशात होणार होते. धरणाच्या बांधकामाला सुरुवात झाली. रस्ते झाले. गाड्या फिरू लागल्या. आणि आतापर्यंत कधीही जास्त रोख पैसा न पाहिलेल्या शेतकऱ्यांना एक नवे जग सामोरे आले. १९५५-६० च्या दरम्यान पुण्यात लाकडी कोळशाला प्रचंड मागणी होती. हे वखारवाले, धरण बांधणारे इंजिनीयर, वनविभागाचे कर्मचारी एकदिलाने अंबी खोऱ्यातली वनसंपत्ती लुटायला तुटून पडले. त्यांनी सारे डोंगर उघडेबोडके करून टाकले. लोक सांगायचे की, धरणाचे इंजिनीयर वखारवाल्यांबरोबर गावोगाव फिरले. तुम्ही आता हालणारच असे लोकांना सांगत पिढ्यान् पिढ्या जतन केलेली हिरडा, आंब्यांची मोठमोठी झाडे विकायला प्रोत्साहन देत. एकेक झाड आठ आण्याला अशा दराने विकून त्यांचा कोळसा केला गेला. वरच्या राखीव जंगलातही लोकांच्या सांगण्याप्रमाणे, वनखात्याद्वारे प्रचंड भ्रष्टाचार होऊन जंगल साफ झाले. शेवटी विस्थापितांचे नीट पुनर्वसन झालेच नाही. त्यातले बहुतांश लोक १९७१ साली उघड्याबोडक्या झालेल्या, माती धुपून गेलेल्या डोंगरांवर सरकून उपजीविका करत होते. यातून स्थानिक लोकांचे तर नुकसान झालेच; पण वनसंपत्तीची, जलसंपत्तीचीही प्रचंड हानी झाली. डोंगरउतारांवर मातीची मोठी धूप होऊन धरण झपाट्याने गाळाने भरले.

आमचा देवरायांचा अभ्यास चालू असताना आम्हाला एक दिवस एक पोस्टकार्ड आले. ते होते श्रीवर्धन तालुक्यातल्या गाणी गावाच्या ग्रामस्थांचे. त्यांनी लिहिले होते की, 'आमच्या गावच्या दहा हेक्टरच्या देवराईतल्या झाडांवर तोड करायची म्हणून वन विभागाने छापे मारले आहेत. आम्ही ही देवराई तोडू नका म्हणून रेन्जरला विनंती केली. तो म्हणाला, वरून आदेश आला तरच मी तोड थांबवू शकतो. त्याने ऐकले आहे की, वर्तक-गाडगीळ देवारायांचा अभ्यास करताहेत. त्यांची आमच्या साहेबांशी ओळख आहे. त्यांना लिहून बघा, कदाचित ते मदत करू शकतील तुम्हाला. त्याच्या या सांगण्यावरून आम्ही हे पत्र लिहीत आहोत. तुम्ही आमच्या गावाला या. आमची राई बघा आणि आम्हाला काही ना काही करून मदत करा.'

वर्तक आणि मी म्हणालो, 'चला, जायलाच पाहिजे.' श्रीवर्धनला गेलो. गाणीला कसे जायचे चौकशी केली. डोंगरातून आठ किलोमीटर चालले की पोहोचता येईल, तिथे काही वाहन जात नाही असे कळले. भल्या पहाटे चालत निघालो. सगळे डोंगर उजाड. रखरखीत. चढत, उतरत गाणीला पोहोचलो. तिथे डोंगरमाथ्यावर काळकाईची दहा हेक्टरची घनदाट राई होती. गावकरी सांगायला लागले, 'काही वर्षांमागे इथे भरपूर झाडी होती. अनेक बारमाही ओढे होते. ही राई सोडून बाकी सगळी झाडी सफाचट झाली. आणि या राईतून वाहणारा एक ओढा सोडता बाकीचे कोरडे पडले. ही राईही तुटली तर तो ओढाही आटेल आणि आमचे हाल कुत्रा खाणार नाही.' आम्ही त्या सुंदर, जीवविविधतेचे आगार असलेल्या वनराजीतून हिंडून आलो. पुण्याला परतल्यावर वन विभागाच्या प्रमुखांना पत्र लिहून ही राई तोडली जाऊ नये अशी विनंती केली. त्यांनी भेटायला बोलावले. म्हणाले, 'ठीक आहे, तुम्ही म्हणता म्हणून मी ही तोड थांबवतो. पण तुमची विनंती म्हणजे शुद्ध वेडगळपणा आहे.' मग आम्ही ज्या रायांना जीववैविध्याचे अनमोल ठेवे समजत होतो त्यांना एका वाक्यात त्यांनी मोडीत काढले. म्हणाले, 'मी पाहिल्या आहेत तुमच्या देवराया... नुसत्या जुनाट लाकूडफाट्यांनी तुंबलेल्या आहेत.' **(क्रमशः)**

◆ *madhav.gadgil@gmail.com*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

किंमत ₹ ६०/-
पॉवर्ड बाय CORDELIA
सर्वत्र उपलब्ध
॥ उद्यमात सकल समृद्धि: ॥ MIDC प्रस्तुत
लोकसत्ता महाराष्ट्राचा चिंतामणी
डॉ. सी. डी. देशमुख - १२५वी जयंती विशेषांक
सहप्रायोजक लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. शिखर बँक
मराठी प्रज्ञा आणि प्रतिभेचा एक अतुल्य आविष्कार म्हणजे **सीडी देशमुख**!
संस्कृत पंडित, रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर, माजी केंद्रीय अर्थमंत्री, देशातील अनेक संस्थांचे जनक आणि एक तत्त्वनिष्ठ, क्रियाशील विद्वान!!
अशा प्रकांडपंडित, सर चिंतामणराव द्वारकानाथ देशमुख 'सीडीं'च्या १२५ व्या जयंतीनिमित्त 'लोकसत्ता' घेऊन येत आहे एक संग्राह्य विशेषांक '**महाराष्ट्राचा चिंतामणी**'.
यात आहेत सीडींच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देणारे अनेक मान्यवरांचे लेख, सीडींची दुर्मीळ मुलाखत, भाषण, आचार्य अत्रे, सीडींच्या पत्नी दुर्गाबाई देशमुख आदींचे हृद्य लिखाण.
प्रत्येक घरात असायलाच हवा असा महाराष्ट्राचा चिंतामणी !
अधिक माहितीसाठी संपर्क : मुंबई - कुलाबा ते माहीम: संजय माचिवले - ९८३३५४५३२९, रवींद्र महाडिक - ८३६९३६५०९८ ● **वांद्रे ते पार्ले:** अमित जाधव - ७९७७२४२४८५ ● **अंधेरी ते जोगेश्वरी:** रुपेश थरवल - ९९२०८१९२६९ ● **गोरेगाव ते दहिसर:** राम शेंडे - ९८३३२१४४६० ● **मीरा रोड ते विरार:** सुभाष कदम - ९७६९३६८१११ ● **पालघर ते डहाणू:** नीरज राऊत - ९९६०४९७३७८ ● **मुलुंड, भांडूप, विक्रोळी, घाटकोपर ते कुर्ला:** दिवाकर डगरे - ९८८१२७२४०० ● **चेंबूर ते सायन:** रामदास शिंदे - ९८८१२५६०६९ ● **ठाणे ते कळवा:** मिलिंद दाभोळकर - ९१६७२२१२४६, कमलेश पाटकर - ९८२०६६४६७९ ● **डोंबिवली ते बदलापूर:** हर्षल फडणीस - ८८८८६२२७७७ ● **ऐरोली ते पनवेल:** समीर म्हात्रे - ९०२१७८३४०८ ● **नाशिक:** प्रसाद क्षत्रिय - ८०८७१३४०३३ ● **रायगड:** विजय रसाळ - ९२२६०५५६७७ ● **रत्नागिरी, सिंधुदुर्ग:** हेमंत चोप्रा - ९४२००९५१०४. **पुणे - पिंपरी- भोसरी-निगडी:** अमोल गाडगीळ - ९८८१२५६०८२ ● **चिंचवड, काळेवाडी:** सुधीर मराठे - ८३०८३६६८७१ ● **येरवडा, चंदननगर, विश्रांतवाडी, पेठ एरिया:** सचिन झारगड - ९८८१२५६०२२ ● **डेक्कन, स्टेशन:** विकास जाधव - ८६५५३४१०६८ ● **हडपसर, धनकवडी, कोंढवा, पद्मावती:** जितेंद्र भोईणकर - ८२९१३०८६९५ ● **कोथरूड, कर्वे नगर, वारजे, भुसारी कॉलनी:** महेश जाधव - ९०११०१७७२० ● **स्वारगेट, क्वार्टरगेट, अरोरा टॉवर्स:** गिरीश टोकशिया - ९७६७७२६८१० ● **नळ स्टॉप, पानमळा, धायरी:** संतोष लिंगायत - ९६८९८२४१७२ ● **युनिर्व्हसिटी, सांगवी, बोपोडी:** किशोर अमराळे - ९८८१६४२३२३ ● **पुणे जिल्हा आणि सोलापूर:** दिपक क्षीरसागर - ९८८१२५६०४९ ● **सांगली आणि कोल्हापूर:** संदीप गिरीगोसावी- ९६५७२५५२७७ ● **सातारा:** सर्जेराव कातीवले - ८८८८८७५४८६. **नागपूर - कार्यालय:** दि इंडियन एक्स्प्रेस लि., प्लॉट नं. ३८, पहिला मजला, अॅडिसन टेड सेंटर, अंबाझरी ले आऊट, नागपूर. **वितरण विभाग फोन:** ०७१२-२२३६९८९. ● **नागपूर शहर:** गजानन बोबडे - ९८२२७२८६०३, अनंता तेलरांधे - ९४२३१७११७७ ● **भंडारा, गोंदिया:** नरेंद्र शुक्ला - ९८२२७०३०३९ ● **चंद्रपूर, गडचिरोली:** शरद भूते - ९०९६०५०७४० ● **अमरावती, वर्धा, यवतमाळ:** नितीन ईश्वरे - ९७६३७०५८८७ ● **अकोला, बुलढाणा, वाशिम:** भुषण दांडेकर - ९९२३९४००१४. **औरंगाबाद - कार्यालय:** लोकसत्ता, १०३ गोमटेश मार्केट, न्यु गुलमंडी रोड ● **औरंगाबाद शहर लातूर:** सदाशिव देशपांडे - ९९२२४००९७६ ● **बीड, उस्मानाबाद:** रमेश गोरे - ९९२२४००९६९ ● **नांदेड, परभणी, हिंगोली, जालना:** भास्कर टाले - ९९२२४००९७१ ● **जळगाव, धुळे, नंदुरबार:** अनिल सोनवणे - ९८८११३६१४० ● **अहमदनगर:** संतोष बडवे - ९९२२४००९८१.